**प्रस्तावना** :— सर्व मानवांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. माणुस म्हणुन जगत असताना काही अधिकारांची गरज मानवांना लागते. भारतामध्ये आज सुद्धा दलितांना काही ठिकाणी मुक्तपणे फिरता येत नाही. भारतीय घटनेने काही मुलभूत अधिकार दिलेले आहेत परंतु ते सुद्धा कायमस्वरूपी उपाय म्हणून भेदाभेद थांबवता येत नाही. आजच्या युगामध्ये सुद्धा दलितांवर अनेक ठिकाणी अन्याय अत्याचार केले जातात. माझ्या मतानुसार जातीव्यवस्था ही भारताच्या विकासातील एक महत्त्वाचा सामाजिक धोका आहे तसं पाहिलं तर उच्च व कनिष्ठ जातीय असे कोणतेही वैशिष्ट्ये सापडत नाही. आजच्या घडीला ग्रामीण भागामध्ये दोन रूप ठेवण्याची परंपरा दिसून येते. उच्च शिक्षिताना सुद्धा अशा प्रकारच्या भेद भावाला तोंड द्यावे लागते. दलितांना नाकारणे, उच्च वर्गाचे प्राबल्य इ. आजच्या स्थितीमध्ये सुद्धा दलितांवर हल्ले होतात, बलात्कार, खुन व भेदभाव दिसून येतो. ही एक मानवी मुल्यांच्या विरोधात असलेली धमकी आहे. मुलभूत अधिकार हे अत्यंत गरजेचे आहे ज्यामुळे सामाजिक सुरक्षितता सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वांगिण विकासासाठी आवश्यक आहे. मानव अधिकार ही मुळात अशी कल्पना आहे जे मुलभूत अधिकार आहेत ज्यामध्ये जगण्याचा अधिकार, स्वातंत्र्य, संपत्ती मिळवण्याचा अधिकार, मानव अधिकार आपल्याला आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करण्यास मदत करतात. जेणेकरून आपल्यातील बुद्धीमत्ता, सदसद विवेक बुद्धी व हुशारीचा वापर करून आपल्या भौतिक गरजा पुर्ण करू शकतो असे म्हणावे लागते की या अधिकारांच्या संरक्षणाशिवाय कोणताही मानवी विकास हा अशक्य आहे. डिसेंबर, १९४८ मध्ये राष्ट्र संघाच्या समितीने जाहीर केले की वैश्विक मानवाधिकार हे मानवी मुल्यावर आधारित तत्वे आत्मसात करावे. ही गोष्ट ध्यानात घेऊन मानवी अधिकाराची चळवळ ही नवी नाही. युनोने जाहीर करण्याअगोदर ती अस्तित्वात होती. परंतु असे मानले जाते याची सुरूवात खऱ्या अर्थाने युनोने जाहीर केल्यानंतर झाली. मानवाधिकार हे एकूण सहा प्रकारामध्ये विभागले आहेत. त्यामध्ये सुरक्षा हक्क ज्यामध्ये लोकांच्या हत्या, अत्याचार, बलात्कार कायदेविषयक अधिकार कोणत्याही प्रकारची चौकशी न करता तुरूंगवास, गुप्त कार्यवाही, सजा इत्यादी. स्वातंत्र्याचे हक्क हे श्रद्धा, व्यक्त करण्याचे स्वातंत्र, संघटन, सामाजिकरण व चळवळ, राजकीय हक्कामध्ये राजकारणामध्ये सहभागी होण्याचे स्वातंत्र्य, ज्यामध्ये निदर्शन करणे, जमाव करणे, मतदान करणे व सरकारी कार्यालयात सेवा करणे. समानतेच्या अधिकारामध्ये समानतेची हमी, समान नागरिकत्व, कायद्यासमोर सर्वसमान व भेदाभेद विरहीत जीवन. सामाजिक अधिकारामध्ये सर्वांना समान शिक्षण गरीबीपासून सर्वांची सुटका करणे, भुक मुक्त देश बनवणे मुळात भारत हा लोकशाही देश असल्यामुळे आपल्या देशामध्ये मानवी अधिकारांचे पालन केले पाहिजे.

**दलित कोण आहेत?** — मनुच्या धर्मानूसार दलित म्हणजे जे शुद्र आहेत व ज्यांचा जन्म हा ब्रम्हाच्या पायामध्ये झाला आहे म्हणून दलित हे खालच्या वर्गातील असून त्यांचे सर्व अधिकार हे सवर्ण लोकांच्या हातात असतात. दलितांनी कोणत्याही पदावर आपली छाप पाडली असली तरी त्यांना त्यांच्या जातीमुळे अपमान व दुजाभावाची वागणूक सहन करावी लागते. त्याचे प्रमाण अजुन ही ग्रामीण भागात जास्त आढळून येते. भारतीय राज्य घटनेनूसार एस. सी. प्रवर्ग म्हणजे आजचा दलित होय. दलित म्हणजे विस्कटलेला, पिडीत, वंचित व हिन्दीमध्ये त्याला हिन्दु धर्मातील शेवटचा जात घटक होय. हिंदु धर्मातील जात व्यवस्था ही उतरंडी प्रमाणे सर्वात जुनी म्हणजे हजारो वर्षे प्राचीन आहे. वरच्या स्तरातील ब्राम्हण हा प्रथम (वर्ग) जात (पुजारी) त्यानंतर क्षत्रिय व वैश्य (व्यापारी, शेतकरी) त्यानंतर सर्वात शेवटचा प्रवर्ग म्हणजे शुद्र (कामगार) त्याच्यांतील मागास म्हणजे दलित हा वर्ण होय. याना सर्वात अपवित्र समजले जात असे परंपरेने जात ही जन्माने प्राप्त होते. त्याना त्यांच्या जाती बाहेर विवाह किंवा व्यवसाय करता येत नाहीत. जातीव्यवस्था ही दलितांसाठी एक प्रकारे अवमुल्यन आहे. उदा. दलितांना इतर वर्णांची सोडून राहिलेली घाण कामे करावी लागतात त्यामध्ये मेलेली जनावरे आढणे, मैल वाहुन नेणे, रस्त्याची सफाई करणे, चर्मकाम करणे ही सर्व कामे कमी दर्जाची समजली जातात. कारण अशी सर्व कामे ही कातडीशी संबंधित आहेत. दलितांना खास करून दुजाभावाची वागणूक ही ब्राम्हण जातीकडूनच मिळते.

**दलित समाजाची सद्यस्थिती** — आपण प्रजासत्ताकाची ६८ वर्षे साजरी करीत आहोत परंतु दलित समाजाचा दर्जा आज ही हिन असाच आहे. हे प्रत्येक नागरिकांच्या दृष्टीने घृणास्पद आहे. अनेक प्रकारची सरकारे आली परंतु त्यांनी पूर्णता जातीभेद थांबवण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. आजच्या घडीला सुद्धा दलितांवर अनेक असे गुन्हे घडत आहेत. त्याचा लढा अजुन समानतेसाठी सन्मानासाठी सुरूच आहे. सामाजिक एकात्मता धोक्यात असून सुद्धा दलितांवरील हल्ले अजून थांबले नाहीत. मी माझे दुख कसे बोलू की समाजातून जातीयता पुर्णपणे गेली पाहिजे? त्याचबरोबर मोठमोठ्या विचारवंतानी असे सांगितले की खेड्यातील जीवन हे सुखी समृद्ध आहे परंतु ते अर्ध्य सत्य आहे परंतु आज ही जास्तीत जास्त खेड्यामध्ये दलितांना समान दर्जा दिला जात नाही. आज सुद्धा गावचा सरपंच किंवा प्रमुख हा दलित व्यक्ती असल्यास त्याला ग्रामपंचायत मध्ये सभेला बसता येत नाही. दलित ही सुद्धा माणसे आहेत परंतु त्यांना प्राण्यासारखी वागणूक दिली जाते.

**काही महत्त्वाचे मुद्दे दलितांच्या हक्कांची पायमल्ली करणारे**

- जरी कायद्यामध्ये मोठ्या प्रमाणात तरतुद करण्यात आली असली तरी सरकार पूर्णपणे अयशस्वी झाले आहे की दलितांना

त्यांचा कौटुंबिक व आंतरराष्ट्रीय नियमाप्रमाणे दलितांना संरक्षण देण्यामध्ये.

- मानवी हक्क संघटना, वर्तमानपत्रे असे अनेक गोष्टी सांगतात की, अनेक प्रकरणामध्ये दलितांना मारले जाते, त्यांची घरे पेटवली जातात, त्यांच्यावर बलात्कार केले जातात खुन व पिळवणूक केली जाते.

- अजून ही दलित लोक हे मोठ्या प्रमाणात सामाजिक भेदभाव सहन करीत आहेत. त्याचबरोबर त्यांना आंतर जातीय हिंसाचा ठराविक कामाबरोबर सगळ्या प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागत आहे.

जरी भारत सरकार दलितावर अत्याचार नाकारत असले तरी अनेक अहवाल असे दाखवतात की, भेदभाव हा दलितांवर होत आहे त्यामुळे ते विखुरलेल्या स्थितीमध्येच आहेत.

**भारतातील दलितांच्या विरोधात मानवी हक्कांचे उल्लंघन:—** हिंदु धर्मानूसार व त्याच्या श्रद्धेनूसार, सर्व मनुष्य प्राणी समान म्हणून जन्माला येत नाहीत हिच गोष्ट जातीवर आधारित भेद निर्माण करते. ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी दलितांचा अपमान, छळ, मारहाण, खुन इ. अस्पृश्यता ही त्याचा पाया आहे. ज्यामुळे दलितांना त्याच्या मुलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जाते त्याचबरोबर कायदेविषयक भेदभाव, सामाजिक, स्वातंत्र्य, अमानवी जीवन, त्याचे कामाच्या ठिकाणी भेदभाव, गरीबीकरण, कुपोषण, अनारोग्य, मोठ्या प्रमाणातील निरक्षरता या सर्व गोष्टींचा समावेश हा मानवी हक्क उल्लंघनामध्ये होते.

सद्य परिस्थितीमध्ये सुद्धा भारतातील ग्रामीण भागामध्ये दलितांना जवळपास १५८ सामान्य गोष्टी पासून वंचित ठेवले आहे. ज्यामध्ये पाणी देणे, अन्न व इतर पेये, त्यांना बुट घालण्यापासून परावृत केले जाते जेव्हा ते उच्च जातीय लोकांना भेटण्यासाठी जातात. त्यांना उच्च जातीय लोकांच्या वस्तीमध्ये सायकलने जाऊ दिले जात नाही. त्याचबरोबर त्यांना पाळीव प्राण्यांच्या कारणास्तव अमानवी पद्धतीने गुन्हे दाखल केले. त्यांना जमिनी मिळवणे पासून वंचित ठेवले जाते त्याचबरोबर त्यांना जबरदस्तीने कमी दर्जाची कामे दिली जातात उच्च जातीय व पोलिस यंत्रणेमार्फत सुद्धा याच पद्धतीने वागवले जाते. अनेक दलित कुटूंबे ही विहीर, मंदिर यात प्रवेश नाकारला जातो परंतु त्याच्या मालकीच्या वस्तुवर सुद्धा त्यांना हक्क सांगता येत नाही. अजुन ही मोठ्या प्रमाणात दलित हे अत्यंत गरीबी व दारिद्रियामध्ये जीवन जगत आहेत. त्यांच्याकडे शेतीचे अल्प प्रमाण आहे त्यांना नोकरीच्या चांगल्या संधी मिळत नाहीत, शिक्षणापासून त्यांना वंचित ठेवले जात आहे.

राष्ट्रीय मानवाधिकार समिती मार्फत केलेल्या सर्वेक्षणानूसार वर्षाला ६२,००० गुन्हे हे नोंदवले जातात. प्रत्येकी दोन तासाला कुठेतरी देशामध्ये दलितांवर हल्ले होतात. प्रत्येक दोन तासाला तीन दलित स्त्रीया व मुलांच्यावर हल्ले होतात किंवा बलात्कार केला जातो. दोन दलितांना ठार मारले जाते त्याच दोन दलितांवर जाळून टाकण्याचे अत्याचार होतात. प्रत्येक दिवसाला (नरूला; मॅशलाल हयुमन राईट रन पॅग) सर्व गुन्हयांचे खालील प्रमाणे काही अमानवी मानवी हक्क उल्लंघन भारतामध्ये अलीकडे नोंद झाले आहे. उदा. पाच दलितांना उत्तर भारतातील जिल्ह्यामध्ये हरयाना या राज्यात ४००० लोकांच्या जमावाने गायीचे चामडे काढले म्हणून मारले (कारण हिंदु धर्मशास्त्रानुसार गाय ही पवित्र मानले जाते.) त्याच आणखीन एक कारण म्हणजे त्यांनी पोलिसांना लाच देणे मान्य केले नव्हते. आणखीन एक घटनेमध्ये स्त्री तामिळनाडू राज्यातील (दक्षिण भारत) जीला उच्च जातीय त्याच गावातील लोकांनी मारहाण करून विनयभंग केला. तीची संपूर्ण गावातुन नग्न धिंड त्याच्या कुटूंबासह काढण्यात आली त्यानंतर पोलिसानी सुद्धा तिला तुरूंगात मारहाण केली त्यामुळे तिला प्रसुतीपर्व गर्भपात करावा लागला. (आंबेडकर—अनहिलेशन)

फक्त ३.५ लोकांच्यावर गुन्हा नोंद केली जाते दहापैकी एका गुन्हा हा नोंद केला जातो. कायदा हा वाईट किंवा अडचण नाही तर पुर्णता कायद्याचा वापर हा अयशस्वी होतो त्याचे कारण १५ उच्च जातीय हिंदु हे ८५ संपत्तीचे मालक आहेत. सत्ता, न्यायव्यवस्था, पोलिस यंत्रणा व १०० माध्यमे ही त्यांच्या ताब्यात आहेत ज्यामुळे अशा गुन्हेगाराना सजा दिली जात नाही. (राष्ट्रीय आयोग) अत्यंत महत्त्वाचे म्हणजे हे सर्व गुन्हे अत्याचार फक्त दलितांवर होतात असे नाही तर इतर जे अल्पसंख्याक समुदाय आहेत त्यांचावर सुद्धा असेच मानवी हक्काचे उल्लंघन होते मागील काही वर्षामध्ये १५९ हिंदूनी मुस्लीम लोकांच्या विरोधात मानवी हक्कांचे उल्लंघन केले आहे. त्याचबरोबर ख्रिश्चन व शीख अल्पसंख्याक लोकांच्या बाबतीत अशीच परिस्थिती आहे. उदा. ३,००० मुस्लीमांना मशिदीमध्ये हिंदुच्या कडून मारण्यात आले. १९९२—१९९४ मध्ये ४००० शीख लोकांना दिल्ली येथे जातीय दंगलीत मारण्यात आले. अलीकडच्या वर्षामध्ये दोन हजार मुस्लीमांनी गुजरात मध्ये व हजारो ख्रिश्चनाना ठार मारण्यात आले.

**दलितांविरोधी अत्याचार:—** अत्याचार/अन्याय ही कायदेविषयक संज्ञा आहे. दलितांच्या विरोधात अत्याचार हे वेगवेगळ्या प्रकारचे असतात ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

१.दुखापत करणे, अपमान दलितांना नाकारणे इत्यादी.
२.हल्ला करणे, बलात्कार करणे जबरदस्तीने दलित स्त्री किंवा मुलींचा विनयभंग करणे.
३.शारीरिक इजा करणे किंवा दलितांना ठार मारणे.
४.दलितांना दिलेल्या जमिनीचा ताबा घेणे त्यामध्ये शेती करणे.
५.जबरदस्तीने दलितांना घर सोडण्यास भाग पाडणे किंवा दलितांना गाव किंवा राहण्याचे ठिकाण सोडण्यास भाग पाडणे.
६.दलितांच्या जमिनीच्या पाण्याचा किंवा राहत्या ठिकाण्यांच्या कायदेविषयक बाबत हस्तक्षेप करणे.
७.दलितांना भिक मागणे किंवा तत्सम कामे करण्यास भाग पाडणे.
८.जाणीवपूर्वक अपमान करणे, अपमानित वागणूक देणे इत्यादी.

**अस्पृश्यता पाळणे** — गुजरातमध्ये आज ही अस्पृश्यता

पाळली जात आहे. खालील काही घटनांमध्ये अस्पृश्यता पाळण्याचे आपणांस पहावयास मिळते.

१.ग्रामीण भागामध्ये दलितांना सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेतले जात नाही . ज्यामध्ये मंदीर प्रवेश नाकारणे, मुख्य ठिकाणी बसणे, धार्मिक कार्यात सहभाग होणे. गावच्या इतर कार्यक्रमामध्ये उच्च जातीय लोकांकडून अशी वागणूक दिली जाते.

२.दलितांना उच्च वर्गीय वापरतात त्या वस्तू वापरू दिल्या जात नाही, घर भाड्याने दिले जात नाही. एकाच विहीरीच पाणी दिले जात नाही त्याच भांड्याने पाणी पिऊ दिले जात नाही.

३.शाळामध्ये दलित विद्यार्थ्यांना वेगळे बनवले जाते.

४.अशा जातींवर आधारित भेदभावामुळे दलिताचे शिक्षणाचे प्रमाण इतर उच्च जातींपेक्षा कमी झाले आहे.

५.खालच्या/कमी दर्जाच्या शिक्षणामुळे जास्तीत जास्त दलित व्यक्ती (७८) कामगार म्हणून काम करतात ज्यामुळे त्यांना संधी मिळत नाही. त्यामुळे त्याचे वरचे स्थलांतर होत नाही. त्याचा परिणाम म्हणुन ते आर्थिक दृष्ट्याा कमकुवत राहतात.

६.उद्योगधंद्याचा प्रयत्न लक्षात घेता उच्च जातीय समुदाय हा दलितांनी उभारलेल्या दुकानातून वस्तू खरेदी करीत नाहीत असे आढळुन आले आहे.

७.गुजरात आजही दलितांना गलिच्छ काम करावे लागत आहे. उदा. हाताने मैला सफाई करणे ज्यामध्ये ही कामे दलित स्त्रियांना करावे लागते ज्यांना आपण वाल्मीकी किंवा त्यांच्या उपजातीतील असतात आणि सरकार हे दुर्देवाने नाकारते. ही प्रथा अस्तित्वात नाहीत असे म्हणते.

८.सरकारी यंत्रणा नेहमी दलितांच्या मुलभुत गरजा जसे, पाणी, वीज देण्याचे गळते. मात्र ह्या सर्व सुविधा सर्वणांना लवकर उपलब्ध केल्या जातात. दलितांनी केलेल्या विनंत्या या नेहमी टाळण्याच काम सरकार करते.

९.जेव्हा एखादा दलित व्यवस्थेविरूद्ध उभ राहण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचावर हल्ला करून त्याचा विरूद्ध सामाजिक बहिष्कार घातला जातो.

१०. १९८९ च्या दलित प्रतिबंध कायद्याचे पुर्णपणे पालन केले जात नाही (यामध्ये घटना, खटला नोंदच करून घेतला जात नाही.) उच्च जातीय सरकारी अधिकाऱ्या मार्फत कारण ते तसा भेदभाव करतात.

११. दलित हे मुळातच भुमीहीन असतात व गावातील सर्वनाकडे जास्तीत जास्त जमीन असते. सरकारी अधिकारी व त्यांची यंत्रणा दलितांना जमिनी देण्याच्या कायद्याचे पालन करीत नाही. अशा प्रकरणामध्ये जरी सरकार जमीन देणार असले तरी त्याचे काम पुर्ण केले जात नाही. त्यामध्ये दफ्तर दिरंगाई करून दलितांना जमिनीपासून वंचित ठेवले जाते. ज्याचे कारण म्हणजे जातीवर आधारित भेदभाव.

**दलितांवरील मानवी हक्कांचे उल्लघनांची कारणे**

**१) हिंदु परंपरा व संस्कृती:—** हिंदु संस्कृती ही पुर्णता मनुच्या तत्वावर आधारित आहे. त्यामध्ये दलितांना कुठेही स्थान नाही. त्यामुळे अनेक विचारवंतांच्या मतानुसार सर्वच दलित हे दबले गेले आहेत. हिंदु धर्मामध्ये सामाजिक एकात्मतेला थारा नाही. मनुच्या तत्वज्ञानाच्या प्रभाव उच्च जातीय लोकांच्या रक्तामध्ये भिनला आहे. त्यामुळे दलितांवरील मानवी हक्क उल्लंघनाचे हे एक कारण होते.

**२) हिंदुत्वार विश्वास:—** ही आपली एक प्राचीन परंपरा आहे. ज्यामध्ये संपूर्ण ब्राम्हण समुदाय ह्या तत्व प्रणाली मुळे आपले अस्तित्व टिकवुन आहे. ते असे मानतात की, दलित हे गुलाम, नोकर मदत करणे व पाठिंबा इ. उच्च जातीय लोकांना सहकार्य करणारे आहेत. अशा प्रकारे हिंदुत्वामुळे दलितांना भेदभावाची वागणुक मिळते. अशा प्रकारे दलित हक्कांचे उल्लंघन करणारे अनेक कारणे यात सापडतात.

**३) उच्च जातीय वर्चस्व:—** भारतात सर्वत्र उच्च जातीय लोकांचे वर्चस्व हे दिसुन येते. त्यांना कनिष्ठ जातीची प्रगत खपत नाही. ते नेहमी दलितांना त्याच्या वर्चस्वाखाली ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. हे एक महत्त्वाचे कारण आहे की समाजामध्ये भेदभाव निर्माण करणारे उच्च जातीय लोक कधीच दलितांना समान मानत नाही. सर्व भारतातील माझ्या मतानुसार आज ही दलितांना सामाजिक समानता मिळत नाही. हे सर्वत्र, संपूर्ण देशामध्ये पाहायला मिळते जे घटनेवर विश्वास ठेवतात ते सुद्धा हे मानतात. हे संपूर्ण उच्च जातीय वर्चस्वाचे एक कारण आहे.

**४) कामाचे निर्बंध:—** आरक्षणामुळे भारतामध्ये काही बदल घडून आले आहेत मात्र भारतामधल्या जास्तीत जास्त गावामध्ये दलितांना ठराविक कामच करावे लागते. दलितांचे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्याने उच्च जातीय लोक त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतात व त्याच्याकडून गुलामासारखी कामे करवून घेतात. त्यांना रोजंदारीवर ठेवून काम करून घेतले जाते ते लिहू, वाचू शकत नाहीत म्हणून त्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेतला जातो. ते प्रश्न विचारू शकत नाही व त्यांना त्याची जाणीव सुद्धा नाही. अशा प्रकारे उच्च जातीय लोक दबाव तंत्राचा वापर करून कामे करून घेतात. दलितांनी उच्च जातीय लोकांच्या आदेशांचे पालन केलेच पाहिजे असे मानले जाते.

**५) भेदभाव:—** जेव्हा भारतीय हिंदु समाजाने मनुचे तत्वज्ञानास सुरूवात केली तेव्हा पासून भेदभाव ह्या गोष्टींची सुरूवात झाली. जरी एखादा दलित उच्च शिक्षित असला तरी त्याला गावामध्ये भेदभावाला सामोरे जावे लागतेच. ही एक सर्वमान्य अशी गोष्ट आपल्या भारतीय समाजामध्ये आढळते. देशामध्ये भेदभाव हे वेगवेगळ्या स्वरूपात आढळुन येते. दलित व्यक्ती उच्च जातीय लोकांच्या वस्तीमधुन जाऊ शकत नाही. सर्व दलितांना सवर्ण लोकांच्या खाली बसले पाहिजे. भारतीय समाजामध्ये उच्च जातीय समाज हा दलितांचा समान दर्जा कधीही मान्य करीत नाही.

**६) बालकामगार:—** दलित हे इतके गरीब, दरिद्री आहेत की ते त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करू शकत नाहीत. दलित हे निराधार आहेत त्यांना सरकारी योजनांचा फायदा कसा करून घ्यायचा हे माहीत नाही. त्यामुळे त्यांची मुले ही उच्च जातीय

जमीनदार नोकरदार यांचे काम करणेसाठी ठेवली जातात. भारतामध्ये बालकामगार ही एक सर्वश्रुत गोष्ट आहे.

७) **आंतरजातीय हिंसाचार:–** भारतामध्ये अशा अनेक घटना आढळुन येतात की जाती–जाती मध्ये तेढ किंवा हिंसाचार आपणांस दिसून येतो. त्यामध्ये जास्तीत जास्त ह्या घटना दलितांशी निगडीत जातीमध्ये असतात. सरकार कोणत्याही पक्षाचे विचारांचे असले तरी दलितांवर हल्ल्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आपणांस दिसून येते. संपूर्ण दलितांना मारल्याचा घटना आपणांस दिसून येतात. ग्रामीण भागामध्ये दलितांनी नेहमी उच्च जातींचे आदेश पाळले पाहिजेत नाही तर त्यांचे अस्तित्व धोक्यात येते.

८) **दलितांना मिळणारी तुच्छ वागणूक:–** हिंदु समाजामध्ये आपण सर्वत्र दलितांना तुच्छ वागणूक दिल्याचे दिसून येते. अनेक समुदायामध्ये दलिताविषय एक घृणास्पद अशी वागणूक देण्याची मानसिकता दिसून येते. आज सुद्धा दलित हे दबलेले म्हणून ओळखले जातात. ते त्यांचे हक्क घेवू शकत नाहीत कारण ते दलित आहेत म्हणून.

९) **अस्पृश्यता:–** भारतीय घटनेच्या कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट झाली आहे, ज्यामध्ये मुलभूत अधिकारांचा समावेश होतो. परंतु आज अखेर अस्पृश्यतेमध्ये काहीही बदल झालेला दिसून येत नाही. आज ही दलितांना अस्पृश्य समजले जाते. हिंदु समाजामध्ये दलितांना अनेक हक्क दिले आहेत. ज्यामुळे सामाजिकएकात्मता वाढावी परंतु, माझ्या माहितीनुसार भेदभाव ही एक सर्वांना माहीत असलेली गोष्ट आहे. सर्व माणसे सारखी आहेत परंतु अस्पृश्यता ही सर्वत्र पाहायला मिळते.

१०) **पोलीस चौकीत प्रवेश नाकारणे:–** दलितांना अन्यायाविरूद्ध न्याय मागणेसाठी पोलीस चौकीत येवू दिले जात नाही. आपण वर्तमान पत्रामध्ये फक्त पाहतो की, पोलीस चौकीत न्याय मिळवून दिला जातो. सर्व पोलीस चौकीमध्ये आपणांस पाहावयास मिळते की, त्यांच्यावर सरकारचे अनेक प्रकारचे दबाव येतात. उच्च जातीय लोक त्याच बरोबर सरकारी उच्च जातीय अधिकारी यांचे कडून दलितांना दाबून ठेवण्यात येते. पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करणे दलितांना खुप अडचणीचे व अवघड काम आहे.

११) **मंदीर प्रवेश नाकारणे:–** आजच्या स्थितीला सुद्धा गावामधील मंदिरामध्ये जास्तीत जास्त ठिकाणी दलितांना मंदिर प्रवेश दिला जात नाही. मला खात्री आहे दलितांना मंदिर प्रवेश नाही याची मग आपण कसे शोधणार की सामाजिक समानता रूजली का नाही? त्याच मुख्य कारण म्हणजे हिंदुत्वावर विश्वास हेच आहे. हिंदू परंपरेनुसार सर्व सारखे आहेत हे मान्य होत नाही आणि हेच सिद्ध होते.

१२) **पाणी व पाणीपुरवठा सोयी नाकारणे:–** हिंदू धर्मानूसार दलित हे सर्वात खालच्या स्तरातील मानले जातात. त्यामुळे सर्व दलित समाज हा उच्च जातीय लोकांच्या वर्चस्वाखाली ठेवला जातो. भारत सरकारने दलितांना जमिनी देऊ केल्या होत्या. परंतु उच्च जातीय लोक दलितांना शेती पिकवण्यासाठी पाणी व त्याच्या योजना देण्याचे टाळतात. उच्च जातीय लोक हे कधीही मान्य करीत नाहीत की दलितांनी शेती करून त्याचे बरोबर यावे. शेती पिकवणे व आपला विकास, अस्तित्व टिकवणे म्हणजे दलितांना एक संघर्षच आहे; ग्रामीण स्तरावर.

१३) **विकास कार्यक्रमांचा वापर:–** सरकार दिवसेंदिवस अनेक विकासांचे कार्यक्रम, योजना जाहीर करणे. ज्यामुळे दलितांचा, सामाजिक, आर्थिक परिस्थिती बदलावी म्हणुन परंतु या सर्व योजना सक्षमपणे राबवल्या जात नाहीत. खरेतर सर्वच योजनाच्या बाबतीत असे घडते परंतु दलितांसाठी असलेल्या योजना बाबत याचे प्रमाण सर्वांत जास्त असल्याचे आढळून येते. हे खरे तर सरकारच्या इच्छा शक्तीचा भाग आहे परंतु शासन करणारे सरकार हे गांभीयाने घेत नाही. हे सुद्धा महत्त्वाचे मानवी हक्क उल्लंघन दलितांसाठी होते असे म्हणावे लागेल.

१४) **दलितांना धार्मिक, सांस्कृतिक उत्सवातुन अलिप्त ठेवले जाते:–** गावामध्ये आज सुद्धा दलितांना धार्मिक व सांस्कृतिक उत्सवामधून बाजुला ठेवले जाते. उच्च जातीय समुदायाकडुन असे जाणीव पुर्वक केले जाते. त्यांना उच्च जातीय लोकांबरोबर गावामध्ये बसता येत नाही. त्यामुळे त्यांना धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमातुन अलिप्त ठेवण्यात येते.

**दलित स्त्रीयांवरील बलात्कार प्रकरणामध्ये अपयश –**

राष्ट्रीय मानव अधिकार आयोगानुसार दलित स्त्रीयांवर होणारा बलात्काराच्या घटना ह्या सामान्य समजले जाते. समाजामध्ये दलित स्त्रीवर बलात्कार घटना ह्या नगण्य समजल्या जातात. उच्च जातीय समुहाकडून दलित स्त्रीयांच्या विनयभंग व बलात्कार केले जातात. त्यांचे प्रमाण हे खेड्यामध्ये जास्त आहे.

भारतातील दलितावरील मानव हक्क भंग संपुष्ठात आणण्यासाठी काही सुचना

१) **दलित कायदा अत्याचार अंमलबजावणी:–** भारतीय घटनेने दलितांच्या संरक्षणासाठी अनेक अधिकार दिलेले आहेत. परंतु भारतामध्ये काटेकोरपणे पाळले जात नाहीत किंवा त्यांची अंमलबजावणी केली जात नाही. सरकार ह्या बाबत खुप कठोर असायला हवे. त्याचबरोबर सदर कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. सध्या देशाच्या हित्याच्या दृष्टीने दलितांना समान वागणूक देणे गरजेचे आहे. सरकारने एखादी मोहीम दलित हक्कासंबंधी सुरू करावी.

२) **दलित राजकीय हक्कांची हमी :–** राजकीय हक्क हे खरे तर दलितांना मुख्य प्रवाहात आणण्याचे साधन आहे. संपूर्ण केंद्र सरकारने या बाबत स्वतंत्र यंत्रणा दलित राजकीय हक्कासंदर्भात सुरू करावी, राजकीय हक्क हे दलितांना त्यांच्या विकासात मदत करेल. सर्वच सरकारानी दलितांना कॅबीनेट दर्जाची मंत्री पदे देऊन त्याना त्यांचा विकास करण्यास मदत करावी.

३) **दलितांवरील गुन्हे नष्ट करणे:–** सर्वच सरकार दलितांवरील गुन्हे नष्ट करण्यात अपयशी ठरली आहेत. अशा प्रकारे सरकारने एक टप्पा पुढे येऊन दलितांवर अन्यायकारक गुन्हे नष्ट केली पाहिजेत व त्यांना मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. आपण अतिशय कडक/कठोर नियम आणून व त्याची अंमलबजावणी करून समाजातील भेदभाव नष्ट केला पाहिजे. सरकारने अतिशय वेगाने दलितांना न्याय मिळवुन दिला पाहिजे.

४) **बालमजुरी व बंदीस्त कामे संपुष्ठात आणणे:–** आज सुद्धा आपण पाहू शकतो की काही ठराविक कामे ही फक्त दलितांकडुनच करून घेतली जातात. त्याचबरोबर बालमजुरी ही सुद्धा दलित समाजामध्ये जास्त आहे. सत्तेमध्ये असलेल्या सरकारने दबाव टाकुन अशा प्रकारच्या वाईट प्रथा देशामधुन नष्ट केल्या पाहिजेत. जे जबरदस्तीने बंदिस्त कामे व बालमजुरीमध्ये आली आहेत. त्याच्या हिताच्या व हक्काच्या दृष्टीने अशा प्रकारच्या खटले दाखल करून मानवी हक्कांचे उल्लंघन थांबवले पाहिजे.

५) **दलित अत्याचार पिडीतांना शीघ्र न्याय देणे:–** खरेतर

दलित प्रतिबंध खटले दाखल करून न घेणेबाबत मोठ्या प्रमाणात राजकीय दबाव असतो. मानव हक्क उल्लंघन कायदेपेक्षा खऱ्या अर्थाने त्यावर जास्त लक्ष केंद्रीत करून हे थांबवले पाहिजे. सरकारने तात्काळ आदेश देऊन दलितांना न्याय मिळवून दिला पाहिजे. सत्तेमध्ये असणाऱ्या सरकारने तंत्रज्ञानाचा वापर करून जलद न्याय मिळवून दिला पाहिजे त्यासाठी स्पष्ट अशी मार्गदर्शक तत्वे असली पाहिजे.

**६) ग्रामीण भागामध्ये दलितांना समान सामाजिक दर्जा दिला पाहिजे:—** भारतीय ग्रामीण भागामध्ये भेदाभेद ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. आज सामाजिक समानता आणण्यासाठी अनेक अडचणींना तोंड देत आहेत. घटनात्मक कार्यवाही ही अत्यंत गरजेची बाब झाली आहे. ज्यामुळे समाजामध्ये सामाजिक एकात्मता आणता येवू शकते.

**७) दलितांमध्ये शिक्षणाची टक्केवारी वाढवणे:—** शिक्षणाने खरे तर सामाजिक दर्जा हा उंचावला जाऊ शकतो. शिक्षण हेच एक शस्त्र आहे जे दलितांना आर्थिक व सामाजिक समान दर्जा देऊ शकते. दलितांना त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी सरकारने सकारात्मक पावले उचलली पाहिजे. ज्यामुळे दलितांचा शिक्षणाचा टक्का वाढला पाहिजे अशा प्रकारची कृती म्हणजे दलितांना न्याय देण्यासारखे काम आहे. शिक्षण दलितांना ज्ञान देऊ शकते.

**८) सरकारने सर्व गावातील देवळामध्ये प्रवेश मिळण्यासाठी सक्ती करणारे कायदे केले पाहिजेत :—** सर्व गावातील मंदिरामध्ये मुक्त संचार करण्यासाठी सरकारने कठोर व तात्काळ आदेश काढावेत. त्यामुळे खरोखरच सर्वांना मंदीरे प्रवेश समान होईल. सत्तेतील सरकार नेहमी राजकीय नाट्य करतात. खरे तर दलितांचे हे एक स्वातंत्र्य पुर्व काळापासुनचे स्वप्न होते. आम्ही अशा प्रकारच्या आदेशाची सरकार कडून अपेक्षा करतो. सरकारने ही एक गंभीर बाब म्हणून स्विकारून सामाजिक एकात्मता प्रस्थापित करावी.

**९) आर्थिक विकास :—** बरेचसे दलित कुटूंबे आज ही दारिद्रय रेषेखाली आपले जीवन जगत आहेत. जेव्हा सर्व दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारेल तेव्हाच त्याची प्रगती होईल व त्याचा योग्य सामाजिक, सांस्कृतिक विकास होईल. सरकारने दलितांना मुक्त आर्थिक मदत करावी ज्यामध्ये भ्रष्टाचार असता कामा नये.

**१०) सरकारने मुक्त मध्ये आंतरजातीय विवाह संरक्षणामध्ये पार पाडली पाहिजेत :—** हिंदु समाजामध्ये आंतरजातीय विवाह हे सामाजिक एकात्मता निर्माण करू शकतो. हे लग्न पुर्णता सरकारी संरक्षणामध्ये पार पाडली पाहिजेत. सरकारने आंतर जातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना देणारी आर्थिक मदत वाढवली पाहिजे. दलित आपले अस्तित्व सरकारच्या मदतीवर जीवन ठेवू शकतो.

**दलितांना संरक्षणासाठी काही महत्त्वाच्या सुचना**

1. दलित व अल्पसंख्याक समुदाया विरोधातील पोलिसांचे काम याबाबत काही ठोस निर्णय व नियमावली तयार करणे.
2. भक्कम अशा प्रकारचे सरकारी धोरण व त्यांची अंमलबजावणी दलितांच्या संरक्षणासाठी करणे. ज्यामध्ये प्रामुख्याने दलित स्त्रियांच्या वर शारीरिक लैंगिक अत्याचार थांबला पाहिजे.
3. जातीवर आधारित सामाजिक विघटन वस्तींमध्ये होणारे जातीवर आधारित विभाजन त्याच शाळा व वस्तीच्या ठिकाणी सगळ्या राहणे, वस्ती करणे याचे संरक्षण व्हावे इ.
4. दलितांची पिळवणूक थांबवण्यासाठी त्याच बरोबर पुर्नवसन योजना आखणे व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करून दलितांना त्यांच्या बंदीस्त कामातुन उदा. सफाई, स्वच्छता कामगार, बालमजुरी व दलित स्त्रीयांना वेश्या व्यवसायापासून थांबवणे यासाठी प्रयत्न करणे.

**समारोप :—** कशा प्रकारे मी माझे दुख व्यक्त करू की ज्यामुळे भेदाभेद व अस्पृश्यता संपुर्णपणे या भारतीय समाजातुन नष्ट होईल. सर्व माणसे सारखी आहेत सर्वांची वैशिष्टे सारखीच आहे परंतु जातीय भेदभाव हा हिंदू धर्मामध्ये आढळून येतो. आजही आपल्या देशामध्ये दिवसेंदिवस—तासा—तासाला भेदभावाची घटना घडत असतात. एक भारताचा नागरिक म्हणुन ह्या गोष्टींचा मला खुप तिरस्कार वाटतो. ज्यामध्ये दलितांना भेदाभेद केला जातो. माझ्या मतानुसार ही परिस्थिती अशीच राहिली तर या देशातुन जातिभेद नष्ट करणे हे एक स्वप्नच राहील. माझा असा ठाम विश्वास आहे की जातिभेद हा सुशिक्षित लोकांच्या रक्ताच्या पेशीमध्ये सुद्धा हा रूजलेल्या आहे. मी उच्च जातीय लोकांना असे विचारू इच्छितो की तुम्ही तुमच्या समाजाला आरक्षण मिळावे म्हणून लढत आहात परंतु तुम्ही का समाजामध्ये दलितांना समान न्याय देत नाही? का तुम्ही दलितांना माणसासारखी वागणूक देत नाही? सरळपणे मी असे म्हणतो याला मानवता म्हणता येते का? असे उच्च जातीय समुदायाला विचारतो की जेव्हा तुम्ही दलितांना भेदाभेदाची वागणूक देता तेव्हा त्यांना कसे वाटत असेल का? तुम्ही असे विचार करू शकता की दलित हे सामाजिक एकात्मता प्राप्त होण्यासाठी लढा देत आहेत. जरी भारताने स्वातंत्र्यानंतर काही तरी मोजता येईल एवढा विकास केला आहे परंतु दलितांच्या संरक्षणासाठी काय केले आहे. आजही दलित लोक हे या भेदभावाला सामोरे जात आहेत त्यांच्यावर हे उच्च जातीय लोकांनी लादले आहे. त्याचबरोबर सरकारी अधिकारी सुद्धा त्याचप्रमाणे त्यांच्याशी वागतात, व दलितांना भेदभावाची वागणूक देतात. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार अशी वागणुक देणे म्हणजे अजामीन पात्र असे कृत्ये आहेत. जरी भारत सरकार हे नाकारत असले तरी आणि सांगत असले तरी मोठ्या प्रमाणात दलितांना भेदाभेदाची वागणूक दिली जाते. त्यांना संरक्षण देण्यामध्ये सरकार अपयशी ठरले आहे. यांचे आंतरराष्ट्रीय अनेक समिती व नियमाप्रमाणे अनेक पुरावे आपणांस सापडतात. त्यांच्या अहवालावरून असे सिद्ध होते की, आजचा दलित हा 'विखुरलेल्या' स्थिती मध्येच आहे. जो पर्यंत दलित अत्याचार व मानवी हक्कांचे उल्लंघन थांबत नाही तोपर्यंत आंतरराष्ट्रीय स्तरावरून भारतामध्ये घरगुती कायद्यामध्ये बदल करून जास्तीत जास्त लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम करावे लागेल.


*संदर्भ*

1. *इंडियन्स इव्हेन्टस् ऑफ ह्यूमन राईट वॉच, २००७.*
2. *व्हायलन्स ऑन दलित इन मिर्चपूर.*
3. *लिट आयडेन्टी ॲण्ड पॉलीटीक्स, गुहा राय, २००१.*
4. *इनट्रॉडयूक्सन टू ह्यूमन राईट प्रॉब्लेम्स ॲण्ड प्रसपेक्टस् दिल्ली, २००१.*
5. *ह्यूमन राईट ऑफ दलित इन इंडिया ह्यूमन राईट्स ब्रिफ, २००१ (१८).*
6. *दलित इन कनर्व्हसन सिरेमनी बी. बी. सी. न्यूज, २००६.*

# आधुनिक भारतातील समाजशास्त्राचा विकास

**डॉ. नारायण तु. कांबळे,** प्रोफेसर, पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद ता.अहमदपूर जि.लातूर

भारताला समाजशास्त्राच्या अध्ययनात अग्रणी मानले जाऊ शकते. कारण सामाजिक अध्ययनाचा भारताचा इतिहास चार हजार वर्षांपेक्षाही जास्त आहे. अधिकांश समाजशास्त्रज्ञ किंवा पाश्चात्त्य विचारवंत समाजशास्त्राची सुरुवात युरोपातून मानतात आणि पक्षपात करून हे विसरतात, की जेव्हा युरोपात सभ्य जीवन नव्हते त्याच्या अगोदरपासून भारतात सामाजिक जीवन उन्नत अवस्थेत होते. समाजशास्त्राचा आशय सामाजिक संबंधाविषयी व त्याच्या व्यवस्थित ज्ञानाशी आहे. प्राचीन भारतात उपनिषद, महाभारत, स्मृती गीता इ. मध्ये सामाजिक संबंधाविषयी, त्याच्या स्वरूपाबाबत आणि सामाजिक व्यवस्थेचे जे सूक्ष्म अध्ययन व विवेचन केले गेले आहे ते वास्तविक अर्थाने समाजशास्त्रीय अध्यययनच आहे. ज्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारावर भारताच्या प्राचीन सामाजिक अभ्यासकांनी, विद्वानांनी संयुक्त कुटुंब पद्धती, वर्णव्यवस्था, आश्रम—व्यवस्था, कर्मसिद्धान्त, पुरुषार्थ, पुनर्जन्म, मोक्ष, गावपंचायत, जातीव्यवस्था (श्रमविभाजन), विवाहसंस्था व त्याचे नियम आणि इतर तत्सम बाबी सामाजिक ज्ञानामुळेच शक्य झाले आहे. वैदिक आणि उत्तर वैदिक काळातील सामाजिक चिंतनात धर्माचा प्रभाव अधिक आढळतो. या काळात सामान्यत: लोक सामाजिक ज्ञानाला धार्मिक ज्ञान आणि सामाजिक व्यवस्थेला धार्मिक व्यवस्थेच्या रूपात पाहत असत. चाणक्याच्या अर्थशास्त्राला समाजशास्त्राचा महान ग्रंथ मानता येईल. यामध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक नीतीचे प्रतिपादन करण्यात आले आहे. याच्या तुलनेत युनानी विचारवंताचा स्तर किंवा विचारांचे प्रस्तुतीकरण फारसे सूक्ष्म वाटत नाही. प्राचीन भारतात सामाजिक ज्ञानाची ही प्रथमावस्था होती तरीही ती तुलनेने सर्वोच्च होती.

कौटिल्याचे अर्थशास्त्र, शुक्राचार्याचे नीतिशास्त्र, मोगल काळातील ऐनी मकबरी इत्यादी ग्रंथापासून असे दिसून येते की, त्यावेळची सामाजिक स्थिती काय होती, सामाजिक व्यवस्था कशी होती, कोणत्या प्रकारचे रीतिरिवाज प्रथा, परंपरा आणि व्यवहाराबाबतचे आदर्श नियम कशा प्रकारचे होते.

**आधुनिक काळात भारतातील समाजाशास्त्राचा विकास —** वैज्ञानिक पद्धतीने समाजाचे अध्ययन करण्याचा जेथे प्रश्न निर्माण होतो तेथे असे म्हणता येईल की, भारतात समाजशास्त्राचा विकास वर्तमान काळातील आहे. एका स्वतंत्र विषयाच्या स्वरूपात समाजशास्त्राचे अध्ययन—अध्यापन सर्वांत अगोदर मुंबई विद्यापीठात इ.स.१९१९ मध्ये प्रो.पोट्रीक गिड्सच्या अध्यक्षतेखाली सुरू झाले. त्यानंतर १९२३ मध्ये म्हैसूर विद्यापीठात समाजशास्त्राच्या अध्ययन—अध्यापनाची सुरुवात झाली. पुढे वेगाने भारतातील इतर विद्यापीठात समाजाशस्त्राच्या विषयाचे अध्ययन सुरु करण्यात आले. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, पंजाब, लखनौ, कानपूर, दिल्ली, आग्रा, मेरठ, इन्दौर, गोरखपूर, रांची, कर्नाटक, राजस्थान, हैद्राबाद अशा अनेक विद्यापीठांमधून समाजशास्त्राचे अध्ययन—अध्यापन व संशोधन कार्य चालू आहे. संशोधनाच्या क्षेत्रात 'आग्रा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायसेन्स'चे नाव उल्लेखनीय आहे. इ.स. १९१४ ते १९४७ पर्यंतचा काळ भारतात समाजशास्त्राच्या औपचारिक प्रतिस्थापनेचा काळ म्हणता येईल. आज भारतात समाजशास्त्राच्या विकासाने वेग धरला आहे. समाजशास्त्राच्या विकासाच्या दृष्टीने देशात काही शोध संस्थान देखील सुरु करण्यात आले आहेत. उदा. टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशियोलॉजी एण्ड सोशल वर्क्स लखनौ, आई.आई.टी. कानपूर इ. आज तर चिकित्साशास्त्रात अर्थात संस्थांमध्ये समाजशास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व वाढत आहे. वर्तमान भारतात कृषी विद्यापीठांमध्ये देखील ग्रामीण समाजशास्त्राच्या अध्ययनाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. भारतातील काही प्रमुख समाजशास्त्रज्ञांची नावे पुढीलप्रमाणे देता येतील—डॉ.जी.एस. घुर्ये, डॉ.के.एम. कपाडिया, डॉ.पी.एन. प्रभू, डॉ. एम.एन. श्रीनिवास, डॉ.राधाकमल मुकर्जी, डॉ.शामाचरण दुबे, डॉ. आर.एन. सक्सेना, डॉ.ए.आर. देसाई, डॉ.आई.पी. देसाई, डॉ.डी.एन. मुजुमदार इ. प्रो.विनयकुमार सरकार द्वारा लिखित The positive background of Hindu Sociology, The Falk Element in Hindu Culture and Human Progress AM U Creative India from Mohen-jodaro to the age of Ramkishna, Vivekanand इत्यादी ग्रंथांनी भारतात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन—अध्यापन करण्याच्या एका नव्या युगाची सुरुवात झाली आणि इतर विद्वानांना यासंदर्भात विचार करावयास भाग पाडले.

प्रो. बृजेंद्रशीलने 'Positive Science of the Ancient Hindus' ग्रंथातून प्राचीन हिन्दुत्वाचे शास्त्रीय विवेचन केले आहे. डॉ. भगवान दासने आपल्या 'The Science of Social Organization' (१९९०) या ग्रंथात मनुच्या समाजव्यवस्थेचे विस्ताराने अध्ययन केले आहे. प्रो. केवल मोटवानीने आपल्या 'India's Ancient Literature : An Introductory Survey' या ग्रंथात प्राचीन परंपरेच्या संदर्भात हिन्दुत्वाचे वैज्ञानिक विवेचन केले आहे. या विद्वानांच्या योगदानाला विसरता येत नाही.

डॉ. कपाडियाने 'विवाह, कुटुंब आणि नातेदारी' वर आपल्या अध्ययनाच्या आधारावर बरेच काही लिहिले आहे. आपल्या लेखांच्या व्यक्तिरिक्त दोन महत्त्वाच्या ग्रंथांची रचना केली आहे. ते ग्रंथ म्हणजे १. मॅरेज एण्ड फैमिली इन इंडिया आणि २. हिन्दू विनशीप हे ते दोन ग्रंथे होत. डॉ. मुजुमदाराने बिहार, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश आणि बंगालच्या आदिवासी क्षेत्रात महत्त्वाचे संशोधन कार्य केले आहे. जातीव्यवस्था आणि ग्रामीण भारताबाबतही डॉ. मुजूमदारांनी बरेच काही लिहिले आहे. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्ये 'रेस एण्ड कल्चर इन इंडियाज', 'एन इन्ट्रोडक्शन टू सोशल एथ्रोंपोलॉजी', 'ट्राइब इन ट्रांन्सशन', 'कास्ट एण्ड कम्युनिकेशन इन एन इंडियन व्हिलेज', 'दि अफेअर ऑफ ए ट्राइब', 'मॅट्रिक्स ऑफ इंडियन कल्चर' इत्यादींचा समावेश होतो.

पाश्चात्त्य परंपरेशी संबंधित इतर काही भारतीय विद्वानांनी देखील समाजाचे अध्ययन केले आहे. या विचारप्रवाहाशी संबंधित विद्वानांनी धार्मिक विश्वास आणि नैतिक विचारांच्या तुलनात्मक अध्ययनावर भर दिला. उदा. एम.एन. श्रीनिवास यांनी दक्षिणेतील कुर्ग प्रदेशातील कुर्ग लोकांचे या दृष्टीने अध्ययन केले आणि आपले पुस्तक 'रिलीजन एण्ड सोसायटी अमंग दी कुर्गज् ऑफ साऊथ इंडिया' लिहिले. इतर समाजशास्त्रज्ञांनी अशा प्रकारचे अध्ययन फारसे केले नाही. खरे तर अशा प्रकारच्या अध्ययनाची आवश्यकता, उपयोगिता आणि महत्त्व आहे. श्रीनिवास यांनी भारतीय समाजशास्त्रात संस्कृतिकरणाची नवीन संकल्पना दिली. 'मॅरेज एण्ड फॅमिली इन म्हैसूर', 'कास्ट इन मॉडर्न इंडिया एण्ड अदर एसेज', 'सोशल चेंज इन मॉडर्न इंडिया', 'इंडियन व्हिलेज', 'दी रिमेंबर्ड व्हिलेज' इत्यादी ग्रंथ भारतीय समाजशास्त्राला श्रीनिवास यांचे योगदान म्हणता येईल.

भारतात अनेक विद्वानांनी 'ग्रामीण अध्ययने' देखील केली आहेत. ही अध्ययने अमेरिकन समाजशास्त्रीय परंपरेनी बरीच प्रभावित असल्याची दिसतात. भारतात डॉ. एस. सी. दुबे, डॉ. मुजुमदार, डॉ. ए. आर. देसाई इत्यादी प्रमुख समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण समाजाच्या अध्ययनात विशेष योगदान दिले आहे. डॉ. एस. सी. दुबे यांनी पुढील ग्रंथ लिहिले आहेत –'एन इंडिया व्हिलेज', 'इंडियन चेंजिंग व्हिलेजेस' आणि 'द कमार' इत्यादी डॉ. मुजुमदार यांनी आपल्या 'रूरल प्रोफाईल' मध्ये ग्रामीण समाजाचे समाजशास्त्रीय चित्रण केले आहे. डॉ. ए. आर. देसाई यांनी भारतीय ग्रामीण समाजावर बरेच काही साहित्य उपलब्ध करून दिले आहे. 'रूरल सोशियॉलॉजी इन इंडिया', 'रूरल इंडिया इन ट्रान्सेशन', 'सोशल बॅकराऊंड ऑफ इंडियन नॅशनलिजम्' इत्यादी ग्रंथ भारतीय समाजशास्त्राच्या दिलेल्या योगदानाची पावती आहेत. डॉ. राधाकमल मुकर्जी यांनी 'अर्थशास्त्राचा संस्थात्मक सिद्धांत' (इन्स्टिट्यूशनल थिअरी ऑफ इकॉनॉमिक्स) मांडला. यामध्ये आर्थिक जीवनावर सामाजिक मूल्य आणि परंपरांचा कसा प्रभाव पडतो हे दर्शविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. डॉ. पी.जी. मुकर्जींनी अर्थशास्त्राशी संबंधीत प्राचीन ज्ञानाला इतिहास आणि समाजशास्त्राशी जोडण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. भारतात समाजशास्त्रीय चिंतनावर पाश्चात्त्यांचा प्रभाव असल्या कारणाने समाजशास्त्राचा स्वतंत्रपणे विकास होऊ शकला नाही. आज असे म्हणता येईल की, आता समाजशास्त्र उपनिवेशवादाच्या प्रभावापासून मुक्त होऊ पाहत आहे आणि स्वतंत्रपणे विकासाचा मार्ग धरू इच्छितो आहे.

भारतात समाजशास्त्राच्या विकासाची दुसरी प्रवृत्ती व तिच्या समर्थकांनुसार भारतीय समाजशास्त्रीय विचारांचा प्रवाह व त्याचा आधार पाश्चात्त्य समाजशास्त्रीय सिद्धांत नसून भारतीय परंपरागत सिद्धांत असले पाहिजे. भारतीय समाज आणि संस्कृतीत अशी काही वैशिष्टे आहेत, ज्यांना पाश्चात्त्य समाजशास्त्रीय सिद्धांताचे अनुकरण करून समजून घेतले जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत समाजशास्त्राचा विकास परंपरागत भारतीय समाजशास्त्रीय सिद्धांताच्या आधारावरच समजून घेता येईल. असे केल्यानेच आपण भारतीय समाजाला योग्य पद्धतीने समजून घेऊ शकू. अशा प्रकारच्या विचारकांमध्ये श्री. आनंदकुमार स्वामी, डॉ. भगवानदास, प्रा. ए. के. सरण, नरेंन्द्र आणि नर्मदेश्वर प्रसाद इत्यादींचा समावेश करता येइल. आनंदकुमार स्वामी आणि डॉ. भगवानदास यांचे असे मत आहे की, पाश्चात्यांपासून घेतलेल्या सिद्धांताच्या आणि संकल्पनांच्या आधारावर आम्हाला भारत व भारतीय समाज नीट समजून घेता येणार नाही. भारतीय समाज व पाश्चात्य समाज यांच्यातील सामाजिक मूल्य, जीवनदर्शन आणि संस्कृतीत काही मूलभूत अंतर आहे. त्यामुळे पाश्चात्य सिद्धांत भारतातील सामाजिक जीवनाला वास्तविक स्वरूपात समजून घेण्यास फारसे उपयोगाचे नाहीत व बऱ्याच प्रमाणात ते सिद्धांत भारतीय परिवेशात निरुपयोगी, व्यर्थ व कुचकामाचे ठरतात. पाश्चात्य सिद्धांताच्या आधारे भारतीय समाज समजून घेणे म्हणजे अंधारात प्रवास करण्यासारखे आहे. भारतीय समाजाला भारतीय मूल्यांच्या, इतिहासाच्या आधारावरच समजून घेणे गरजेचे आहे. आनंदकुमार व डॉ. भगवानदास यांच्या मतानुसार परंपरागत भारतीय विचारांचे अध्ययन तात्त्विक दृष्टीने झाले पाहिजे. प्रो. सरनने भारतीय समाजाच्या संरचनेच्या अध्ययनाकरिता सामाजिक मूल्यांना योग्य प्रकारे समजून घेण्यावर भर दिला आहे. प्रो. नर्मदेश्वर प्रसादने जातीव्यवस्थेच्या अध्ययनाच्या आधारावर भारतीय समाज आणि संपूर्ण जीवन–व्यवस्थेला समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व विचारवंतांची अशी मान्यता आहे की भारतीय समाज, सामाजिक संस्था आणि संस्कृती इतक्या गुंतागुंतीच्या आहेत की यांच्या अध्ययनानीच आम्हाला संपूर्ण समाज व्यवस्था समजून घेता येईल. आज अधिकांश समाजशास्त्रज्ञ असे मानतात की केवळ परंपरागत भारतीय सिद्धांताच्या आधारेच नव्हे तर आवश्यक तेथे पाश्चात्त्य सिद्धांत आणि संकल्पनांचा देखील आधार घेतला पाहिजे.

डॉ. डी. पी. मुकर्जी यांनी भारतीय समाजशास्त्राच्या विकासात बरेच काही योगदान दिले आहे. मुकर्जीचा असा विश्वास होता की, भारतीय समाजाचा स्वत:चा असा एक विचारप्रवाह, जीवन तत्त्वज्ञान आहे त्याच्या स्वत:च्या काही मान्यता आहेत. ज्याचे अध्ययन करण्याची आवश्यकता आहे. भारतीय समाजाला समजून घेण्यासाठी भारतीय परंपरांचे अध्ययन करणे फार गरजेचे आहे. पुढे मुकर्जी म्हणतात, भारतात संशोधन कार्य केवळ पाश्चात्य संस्कृतीत आयातित सिद्धांतांवर–संकल्पनांवर आणि अध्ययन पद्धतीच्या आधारावर होऊ नये, येथे संशोधनासाठी भारतीय परंपरा, प्रथा, संस्कार, लोकरीती इत्यादी बाबींना नीट समजून घेतले पाहिजे. यासाठी ऐतिहासिक पद्धतीची मदत घेतली पाहिजे. मुकर्जीच्या मते, भारतात पाश्चात्त्य आणि भारतीय परंपरांच्या समन्वयात्मक चिंतनाच्या आधारावरच समाजशास्त्राचा योग्य व उपयोगी विकास होउ शकतो.

राधाकमल मुकर्जी म्हणतात, समाजशास्त्रीय विचारांना योग्य प्रकारे समजून घेण्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोनाचा उपयोग केला पाहिजे. समाजाच्या सामान्य सिद्धांतांना समजण्यासाठी त्या समाजाच्या स्तरीकरण पद्धतीला आणि विद्यमान अलौकिक विश्वासांच्या बाबत तथ्य प्राप्त करणे आवश्यक आहे. पाश्चात्य समाजशास्त्रीय परंपरांनी प्रभावित होऊन मुकर्जी यांनी भारतात

परिस्थितीकीय समाजशास्त्र (इकोलॉजिकल सोशियॉलॉजी) चा विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लिहिलेल्या 'डायनॉमिक ऑफ मार्क्स', 'सोशल इकोलॉजी' आणि 'सोशल स्ट्रक्चर ऑफ व्हॅल्यू' इत्यादी ग्रंथातून त्यांनी आपले विचार मांडले आहेत. डॉ. जी. एस. घुर्येच्या मते केवळ पाश्चात्य सिद्धांताचे अंधानुकरण करून भारतीय समाज व संस्कृती समजू शकत नाही. युरोपात समाजशास्त्राचा जो काही विकास झाला आहे, जे काही सिद्धांत व संकल्पना विकसित झाल्या आहेत, ज्या पद्धतींचा वापर केला गेला आहे, त्यांना भारताची परिस्थिती, समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये इत्यादी गोष्टी लक्षात न घेता आंधळेपणाने वापर करणे धोक्याचे आहे. समन्वयात्मक चिंतनाच्या आधारावरच भारतात समाजशास्त्राचा विकास केला गेला पाहिजे. डॉ. आर. एन. सक्सेना देखील वरील विचारांना अनुमोदन करतात. त्यांच्या मतानुसार पुरुषार्थ सिद्धांत–धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या सामाजिक संबंधाचा आधार आहे आणि समाजशास्त्रात याच्या अध्ययनावर भर दिला गेला पाहिजे.

भारतात समाजशास्त्राच्या विकासाच्या इतर प्रवृत्ती मार्क्सवादी विचारांनी प्रभावित असल्याचे देखील आढळून येते. प्रो. डॉ. डी. पी. मुकर्जी या प्रवृत्तीने प्रभावित राहिले आहे. तरीदेखील त्यांनी सांस्कृतिक परंपरांच्या अध्ययनाच्या आधारावर समाजव्यवस्थेला समजून घेण्यावर भर दिला आहे. भारतात समाजशास्त्राच्या विकासात वरील विद्वानांव्यतिरिक्त डॉ. पी. एन. प्रभू, डॉ. सच्चिदानंद, डॉ. योगेश भटल, डॉ. योगेंद्र सिंह, प्रो. एल. पी. विद्यार्थी, प्रो. राजारामशास्त्री, प्रो. एम. एल. ए. राव, प्रो. वाई. पी. दामले, डॉ. श्रीमती इरावती कर्वे, डॉ. बृजलाल चव्हाण, प्रो. एस. पी. नगेन्द्र यांनीही योगदान दिले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतात आजपावेतो समाजशास्त्रीय चिंतनाला स्पष्ट अशी दिशा मिळालेली नाही. पाश्चात्य सिद्धांताच्या, पाश्चात्यांच्या विचारातून भारतीय समाजव्यवस्थेचे आंधळे चिंतन करण्याची, न्यूनगंडाची प्रवृत्ती गेलेली नाही. भारतीय समाजशास्त्राचे अध्ययन म्हणावे तितके विकास पावलेले नाही.

# महाराष्ट्र मानव विकास मिशनचा शिक्षण विषयक परिणाम

**प्रा. नवगणकर आर. व्ही.,** तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव, जि. हिंगोली. मो. ९१३०००२००५
**डॉ. वेदप्रकाश मलवाडे,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय, लातुर.

आजपर्यंतच्या विकास धोरणाने देशात देश व महाराष्ट्रात मुठभर लोकांच्या हातात सर्व संपत्ती व उत्पादनाची साधने एकवटली आहेत. अशा मुठभर लोकांच्या विकासावरून देशाचा व राज्याचा विकास लक्षात घेता येत नाही. या विकासाने गरिब व श्रीमंतातील आंतर मोठया प्रमाणावर वाढले. विभागीय असमतोल निर्माण झाला. बेकारी, दारिद्रय, महिलांची वंचितता कमी झाली नाही. अशा विकासाने सामाजिक समता, मानव अधिकाराची पूर्तता व मानवी क्षमतांचा विकास झाला नाही. बहुसंख्य लोकांवर त्यांचा वाईट परिणाम झाला. गरिबांना विकासाचा फायदा झाला नाही. उलट गरिब अधिकच गरिब होत गेला तर श्रीमंताची श्रीमंती वाढतच गेली. सामान्य माणसाच्या जीवनमानाचा दर्जा उंचावला नाही. लोकांना शिक्षण, आरोग्य व उत्पन्न वाढीच्या पर्यायी संधी उपलब्ध झाल्या नाहीत. म्हणजेच आजपर्यंतचा विकास मानव केंद्रीत नव्हता हे डॉ. अमर्त्य सेन व डॉ. महबुब उल हक यांच्या मानव विकास अहवालाने संपूर्ण जगाच्या लक्षात आणुन दिले. मानव विकास हे साध्य असून आर्थिक विकास हे एक साधन आहे. विकास हा वंचित मानसाभोवती फिरताना दिसला पाहिजे. सर्वसामान्य मानुस आपल्या आयुष्यात ज्या मुल्यांना महत्व देतो, त्याची प्राप्ती करण्याच्या संधीचा विस्तार विकासाच्या प्रक्रियेत झाला पाहिजे. म्हणजेच विकास शेवटच्या तळागाळातील व्यक्ती पर्यंत पोहोचला पाहिजे. या दृष्टीकोणाला डोक्यावर घेवून जगभर मानव विकासाचे कार्य सुरू आहे. महाराष्ट्राने सन २००२ साली आपला पहिला मानव विकास अहवाल UNDP च्या निर्देशानुसार तयार केला. या अहवालाची पाहणी केली असता राज्याच्या असे लक्षात आले की, राज्यातील १२ जिल्हे अतिमागास आहेत. तेथील शिक्षण, आरोग्य व उत्पन्नाची स्थिती दयनिय आहे. लोकांना विकासाच्या संधी उपलब्ध नाहीत. म्हणून २००६ साली या जिल्हयांच्या विकाससाठी महाराष्ट्र मानव विकास मिशन सुरू केले. या मिशन मध्ये मराठवाडयातील हिंगोली, परभणी, नांदेड, जालना व उस्मानाबाद या पाच जिल्हयांचा समावेश आहे. म्हणजेच मराठवाडा हा राज्यात मोठया प्रमाणावर मागास आहे. या मिशनअंतर्गत मानवी विकासाचे निर्देशक म्हणून शिक्षण, आरोग्य व उत्पन्न या संदर्भात विविध कार्यक्रम राबविण्यात आले. शासनाचा हा कार्यक्रम महत्वाचा वाटल्या मुळे प्रस्तुत अध्ययनात **''महाराष्ट्र मानव विकास मिशनचा मराठवाडयातील शिक्षण विषयक परिणाम''** तपासण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी **अध्ययनाचे उद्देश** पुढील प्रमाणे ठरविण्यात आले होते.

१ महाराष्ट्र मानव विकास मिशनच्या शिक्षणासंदर्भातील योजनांचा अभ्यास करणे

२ महाराष्ट्र मानव विकास मिशनचा मराठवाडा विभागातील शिक्षण विषयक परिणामांचा अभ्यास करणे

**संशोधन आराखडा** : प्रस्तुत अध्ययनासाठी संशोधन संशोधन विषयाच्या स्वरूपाशी संबंधीत वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आला आहे. म्हणजेच या संशोधनाचे स्वरूप अंशत: वर्णनात्मक व अंशत: निदानात्मक स्वरूपाचे आहे. अध्ययन क्षेत्रातुन तथ्ये संकलन करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला.

**अध्ययन विश्व:** प्रस्तुत अध्ययनासाठी मराठवाडयातील जालना, परभणी, हिंगोली, नांदेड व उस्मानाबाद या पाच जिल्हयांची निवड करण्यात आली. म्हणून प्रस्तुत संशोधनाचे हे अध्ययन विश्व मानण्यात आले आहे.

**नमुना निवड** : प्रस्तुत अध्ययन नमुना पध्दतीवर आधारीत असून अभियानातील मराठवाडा विभागाची सहेतूक निवड करण्यात आली. मराठवाडयातील जालना, परभणी, हिंगोली, नांदेड व उस्मानाबाद या पाच जिल्हयातील अभियानातील समाविष्ठ १२ तालुक्यातील मंठा, जिंतूर, सेनगाव, भोकर व कळंब या पाच तालुक्यांची लॉटरी पध्दतीने निवड करण्यात आली व नमुन्यात निवडून आलेल्या पाचही तालुक्यातील गावांची प्रथमत: यादी प्राप्त करून या यादीतून लॉटरी पध्दतीने प्रतेक तालुक्यातुन ६ या प्रमाणे ३० गावांची निवड करण्यात आली. प्रत्येक गावातील कुटुंब प्रमुखांच्या यादीतुन अनियमित अंकन पध्दतीने प्रत्येकी १० उत्तरदाते या प्रमाणे ३० गावामधुन ३०० ग्रामस्थांकडून तथ्यांचे संकलन करण्यात आले. तसेच यात ३० शिक्षक आणि ३० डॉक्टर किंवा परिचारीका व ३० सरपंच किंवा उपसरपंच किंवा अभियान समिती अध्यक्ष यापैकी एक याप्रमाणे उत्तरदात्यांचा समावेश करण्यात आला. ३० शाळा व ३० गावांचा सर्वे करण्यात आला. अशाप्रकारे संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील साधा यादृच्छिक नमुना प्रकारांचा उपयोग करून नमुना निवडण्यात आला आहे.

**तथ्ये संकलन पध्दती व तंत्रे** : अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही तथ्ये संकलनाच्या स्त्रोतांचा आधार घेतला आहे. **प्राथमिक तथ्ये संकलन:** अध्ययन क्षेत्रातुन तथ्ये संकलन करण्यासाठी मुलाखत व निरीक्षणाचा वापर केला आहे. मुलाखत अनुसुची तयार करताना प्रामुख्याने अध्ययनाचे उद्देश व उपकल्पना समोर ठेउनच या तंत्राची निर्मिती केली. यात बंदिस्त प्रश्न, मुक्त प्रश्न व प्रामुख्याने मापन तंत्राचा उपयोग केला. **व्दितीय तथ्ये संकलन:** विविध पातळीवरिल मानव विकास अहवाल, महाराष्ट्र मानव विकास मिशनचे अहवाल, कार्यपुर्ती पुस्तीका, जिल्हा मानव विकास समितीने प्रकाशित केलेली प्रकाशने, महाराष्ट्र मानव विकास मिशन दिशादर्शक कृती आराखडा, शासकिय परिपत्रके, माहीती पुस्तीका, जिल्हा, तालुका व गाव पातळीवरिल मानव विकास समितीचे रेकॉर्ड, इत्यादी लिखित साधन सामुग्रीचा उपयोग केला.

**महाराष्ट्र मानव विकास मिशन अंतर्गत शिक्षणाच्या योजना:–** लोकसंख्येची गुणवत्ता वाढविणारा महत्वाचा घटक म्हणून शिक्षणाच्या गुणवत्तेचा विचार केला जातो; म्हणून शिक्षण हा मानवी विकासाचा निर्देशक ठरतो. शिक्षणाच्या संधी किती वाढल्या व लोकांचा शिक्षणातील सहभाग वाढल्यामुळे फलश्रुती किती प्रमाणात झाली यावर मानव विकास अवलंबून असतो. शिक्षणाचा प्रत्येक टप्पा हा व्यक्तीला अधिकाधिक क्षमतेकडे नेणारा असल्याने मानवी विकासात शिक्षणाची भुमिका महत्वाची ठरते. शिक्षणाने व्यक्ती, समाज व परिसर यांत अपेक्षित परिवर्तन घडवून आणता येते. महाराष्ट्रात शैक्षणिक विकासासाठी विविध योजना व कार्यक्रम अभियानक्षेत्रात राबविले जात आहेत. (मानव विकास कार्यपुर्ती अहवाल, २००९)

**प्रौढ शिक्षण:–**मानव विकास निर्देशांक काढण्याचे सुत्रांमध्ये संपुर्ण साक्षरता हा एक महत्वाचा घटक आहे. प्राथमिक सर्वेक्षणावरून असे दिसून आले की, मिशनच्या कार्यक्षेत्रात १२ जिल्हयांतील २५ तालुक्यामध्ये अंदाजे ५.५० लक्ष लोक निरक्षर होते. यापैकी १५ ते ६० वर्षे वयोगटातील निरक्षरांची संख्या अंदाजे चार लक्ष होती तर ६० वर्ष आणि त्यापेक्षा अधिक वयोगटातील निरक्षरांची संख्या दिड लक्ष इतकी होती. या मिशनतर्फे चार लक्ष निरक्षरांना साक्षर करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या कार्यक्रमाची अमलबजावणी जानेवारी २००७ मध्ये सुरू करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत कार्यक्षेत्रात ११५३४ साक्षरता केंद्र सुरू करण्यात आले. त्यामध्ये एकूण ३५५७३३ निरक्षरांची नोंदणी करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी निरंतर शिक्षण विभागाकडून करण्यात आली. गाव पातळीवर स्वंयसेवकांची नियुक्ती करून प्रशिक्षण देण्यात आले. स्वंयसेवकांना प्रत्येक साक्षर व्यक्तींकरिता रू ७५ इतके मानधन देण्यात आले. प्रत्येक व्यक्तीमागे साधारणत: रू १५० इतका खर्च करण्यात आला.

**शाळा तेथे प्रयोग शाळा:–** या उपक्रमांतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी वर्ग असणाऱ्या सर्व शाळांमध्ये प्रयोगशाळा तयार करण्यात आल्या असून त्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना वेगवेगळया प्रकारच्या शास्त्रीय उपकरणांची, वस्तुंची, निसर्गाची माहीती करून देण्यात येत आहे. उपक्रमांतर्गत मिशनच्या कार्यक्षेत्रातील २७७४ शाळांमध्ये प्रयोग शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रत्येक तालुक्यास साधारणत: ५० शाळांना १२.५० लक्ष एवढा खर्च करण्यात आला. (शासन निर्णय १९ जुलै २०११)

**शाळा तेथे वाचनालय:–** प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन वाढविण्याच्या दृष्टीने प्रत्येक शाळेमध्ये स्वतंत्र वाचनालय सुरू करून अशा वाचनालयातं शिक्षण विभागाने प्रमाणित केलेल्या वेगवेगळया विषयांची दर्जेदार २०० पुस्तके पुरविण्यात आली. विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनामुळे शैक्षणिक पातळी उंचावली तसेच सामान्य ज्ञानात सुध्दा भर पडली. मिशनच्या कार्यक्षेत्रातील २९३१ शाळांमध्ये वाचनालय सुरू करण्यात आले.

**शिष्यवृत्ती परीक्षा:–** चौथी व सातवी इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेला बसावे आणि जास्तीतजास्त गुण घेवून उतीर्ण व्हावे, या दृष्टीने मिशनच्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांमध्ये विशेष शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले. शिष्यवृत्ती परिक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना सर्व विषयांची पुस्तके देण्यात आली. या उपक्रमामुळे मिशन कार्यक्षेत्रातील सर्व विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षेत उतीर्ण होतील या दृष्टीने संपूर्ण उपक्रमाची आखणी व अंमलबजावणी करण्यात आली.

**क्विझ कार्यक्रमाचे आयोजन:–** जिल्हा परिषदेच्या प्रथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने ''क्विझ कार्यक्रमांचे'' आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रार्थनेच्यावेळी सामान्य ज्ञानावर आधारित मुलांना प्रश्न विचारले जातात.

**संगणक प्रशिक्षण:–** मिशनच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षणापासूनच माहीती तंत्रज्ञानाची ओळख होऊन पुढील शिक्षणात संगणक क्षेत्राची निवड करण्यामध्ये अडथळा निर्माण होऊ नये, यादृष्टीने संगणक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला.

**सायकल वाटप कार्यक्रम :–** पाचवी नंतर पुढील शिक्षणाच्या सुविधेचा व वाहतुक सुविधेच्या अभावामुळे पालक आपल्या मुलीस बाहेरगावी शाळेत पाठवित नाहीत, परिणामी गळती व अनुपस्थितीत वाढ होते. हे थांबविण्यासाठी मुलींना मानव विकास मिशनतर्फे सायकलींचा पुरवठा करण्यात आला. २०१३–१४ ते २०१६–१७ या कालावधीत १,१०,१४३ मुलींनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेवर या कालावधीत अंदाजे ३३ कोटी ४ लाख २९ हजार एवढा खर्च झाला. (https://www.loksatta.com 2017)

**मानव विकास बस सेवा:–** वाहतुकीची व्यवस्था जेथे उपलब्ध नाही किंवा कमी प्रमाणात आहे अश्या ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतर असलेल्याठिकाणी मिशनने मानव विकास बस सेवा सुरू करून १२ वी पर्यंतच्या सर्व मुलींना शिक्षणासाठी वाहतुकीची मोफत व्यवस्था केली. या योजनेवर २०१६–१७ या कालावधीत ६१.१८ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली होती. (https://www.loksatta.com 2017)

**डयुअल डेक्सचा पुरवठा:–** जिल्हा परिषदेच्या बऱ्याच शाळांमध्ये इयत्ता सहावी आणि सातवी मध्ये शिकणारे विद्यार्थ्यांनासुध्दा जमिनीवर बसावे लागत होते; याचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होत होता. हे ओळखुन मिशनने जिल्हा परिषदेच्या सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी १६९ शाळामध्ये २५०० डयुअल डेक्सचा पुरवठा केला.

**किचनशेड बांधकाम:–** मध्यान्न भोजन योजना अनेक वर्षापासुन राबविली जाते परंतु अन्न शिजवण्यासाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध नव्हती. बचतगट, ठेकेदार पाहिजे त्या ठिकाणी अन्न शिजवित होते; त्या ठिकाणची स्वच्छता राखली जात नव्हती म्हणुन मिशनने किचनशेड बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला. २००८–०९ पर्यंत अंदाजे १२५० किचनशेड मानव विकासच्या कार्यक्षेत्रातील शाळेत बांधण्यात आले.

**शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण:—** मिशनतर्फे शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले. मुलांचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करून त्यांच्या वयाप्रमाणे वर्गात प्रवेश दिला गेला; यामुळे अनेक शाळा बाहय मुले शाळेच्या प्रवाहात आले.

**शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणणे:—** शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी निवासी शाळा, सेतुशाळा, फिरती शाळा, पाळणागृहाची व्यवस्था केल्या गेली. श्रमीकांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या मुलांच्या शाळांचा प्रश्न सोडविण्यासाठी ही व्यवस्था केल्या गेली.

**बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन:—** शाळेच्या परिक्षेत्रातील बालकामगारांचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करून मुलांच्या शिक्षण विषयक अधिकारांचे रक्षण करण्यासाठी त्यांचे शैक्षणिक पुनर्वसन केल्या गेले.

**शाळेत पिण्याचे पाणी व स्वच्छता गृहाची व्यवस्था:—** प्रत्येक शाळेत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून त्या ठिकाणच्या स्वच्छता गृहाची उभारणी करणे हे काम मानव विकास मिशनने हाती घेतले आहे.

**शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे:—** शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावणेकरिता सर्वोत्कृष्ट शाळा प्रोत्साहनपर बक्षिस योजना, विद्यार्थी दत्तक योजना, शिक्षकांना प्रशिक्षण, शैक्षणिक साधन निर्मीती या योजना राबवील्या जातात. (मानव विकास कार्यपुर्ती अहवाल. २००९).

**तथ्य विष्लेशण व निष्कर्ष:—** प्रस्तुत अध्ययनात या संदर्भात प्रत्येक्ष लोकांमधुन माहीतीचे संकलन करून अभियानाची परिणामकारकता अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

**शिक्षण विषयक संकलीत माहीतीचे विष्लेषण:—** प्रस्तुत अध्ययनात महाराष्ट्र मानव विकास मिशनचा शिक्षण विषयक परिणाम शोधण्यासाठी शिक्षणावर आधारित अध्ययन क्षेत्रातील ३०० ग्रामस्थांना ०६ प्रश्न, ६० शिक्षकांना २६ प्रश्न, ३० अभियान समिती अध्यक्षांना ०४ प्रश्न विचारण्यात आले होते. तसेच ३० गावांच्या सर्वेक्षणांत शिक्षणावर आधारित ०६ प्रश्न होते तर ३० शाळांच्या सर्वेक्षणांत शिक्षणावर आधारित २० प्रश्न होते. एकंदरित मानव विकास मिशनचा शैक्षणिक परिणाम तपासण्यासाठी एकूण ६२ प्रश्नांचा समावेश होता. यावर एकूण प्रतिसाद मिळालेल्या प्रश्नावलींची संख्या ४५० एवढी होती. सदर संकलित माहीतीच्या आधावर विश्लेषण करण्यात आले आहे. माहीतीच्या अर्थनिर्वचनासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग केलेला आहे. सर्व वर्गीकृत माहीतीचे शेकडेवारीत रूपांतर करून अर्थनिर्वचन केलेले आहे. व शेवटी निष्कर्ष मांडलेले आहेत.

**शिक्षकांकडून प्राप्त माहीतीचे विश्लेषण व निष्कर्ष:—** ७५ : शिक्षकांच्या मते अभियान राबविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'उत्तम' व 'फारच चांगली' वाढ झाली आहे. या अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीत 'उत्तम' व 'फारच चांगला' परिणाम होतो असे ६२ टक्के शिक्षकांचे मत आहे. सदर अभियान सुरू झाल्यापासून आजारपण व स्थलांतर इत्यादी कारणामुळे अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ झाल्याचे ५० टक्के शिक्षकांचे मत आहे. ८१ टक्के शिक्षकांनी या अभियानाने शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले असे मत मांडले आहे. ८३ टक्के शिक्षकांनी या अभियानामुळे शाळेला उपलब्ध झालेल्या सोई सुविधांचा विद्यार्थी 'फारच चांगला' व 'उत्तम' वापर करतात असे मत मांडले आहे. अभियानामुळे शाळा तेथे प्रयोगशाळा व वाचनालय या उपक्रमाला विद्यार्थी प्रतिसाद 'फारच चांगला' व 'उत्तम' आहे असे ८३ टक्के शिक्षकांचे मत आहे. या अभियानाच्या स्कूल बस व सायकलमुळे मुलींच्या उपस्थितीत 'उत्तम' व 'फारच चांगला' परिणाम जाणवतो, असे ७३. ३३ टक्के शिक्षकांचे मत आहे. तर या मुळे मुलींच्या शालेय पटसंख्येत 'फारच चांगला' व 'चांगला' परिणाम जाणवतो, असे ६५ टक्के शिक्षकांचे मत आहे. संगणक प्रशिक्षण वर्गास विद्यार्थ्यांचा 'चांगला' व 'फारच चांगला' प्रतिसाद आहे, असे ५६.६६ टक्के शिक्षकांचे आहे. किचनशेडमुळे सकस व स्वच्छतापुर्ण आहार मिळत आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यात व शालेय उपस्थितीत वाढ झाली आहे असे ६३.३४ टक्के शिक्षकांचे मत आहे. शिकवणी वर्गामुळे १० वी, १२ वी नापास विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणांची संधी प्राप्त होत आहे असे ६१.६७ टक्के शिक्षकांचे मत आहे. एकूण शिक्षकांपैकी ४०.०० टक्के शिक्षकांच्या मते शाळेला स्थानिक लोकांचे सहकार्य 'फारच चांगल्या' व 'चांगल्या' प्रकारचे आहे. अभियानाचा आपल्या अध्यापन कार्यावर 'अजिबात' भार जाणवत नाही असे ७६.६७ टक्के शिक्षकांचे मत आहे, ते हे अभियान शिक्षणाचा दर्जा व गुणवत्तेत वाढ करणारे असल्यामुळे उत्स्फुर्त योगदान देतात. अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय प्रगतीत 'उत्तम' व 'फारच चांगला' परिणाम होतो असे ६१.६६ टक्के शिक्षकांचे मत आहे.

या वरून हे सिद्ध हाते की, मानव विकास अभियानामुळे शालेय बांधकाम, रंगरंगोटी, डयुअलडेक्स किचनशेड व इतर सुविधा यातुन शालेय परिसर स्वच्छ व सुंदर झाला. पिण्याचे स्वच्छ पाणी, पोषक आहार व नियमित आरोग्य तपासणी, शौचालयाचे बांधकाम इत्यादी सुविधा शाळेला मिळाल्या. या अभियानामुळे शाळाबाहय मुलांच्या प्रमाणात लक्षणिय घट झाली; दर्जेदार, मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क बालकांना मिळू लागला आहे.

**ग्रामस्थाकडून प्राप्त माहीतीचे विश्लेषण व निष्कर्ष :—** ७५ टक्के ग्रामस्थ अभियान राबविल्यामुळे शाळेत 'उत्तम' व 'फारच चांगला' बदल झाल्याचे सांगतात तर ७५ टक्के ग्रामस्थांच्या मते अभियानाचा गावाच्या एकूण साक्षरता वाढीत 'उत्तम' व 'फारच चांगला' उपयोग झाला आहे. ८२ टक्के ग्रामस्थाच्या मते मानव विकास मिशनच्या स्कुल बसचा मुलींच्या शिक्षणासाठी 'उत्तम' व 'फारच चांगला' लाभ झाला आहे. ७० टक्के ग्रामस्थ शैक्षणिक सुविधेबाबत 'उत्तम' व 'फारच चांगले' समाधानी आहेत. मानव विकास अभियानाच्या कार्यक्षेत्रातील कुटुंबात ५१ ते ७० वर्षे वयोगटाचे एक किंवा दोन व्यक्ती प्रौढ निरक्षर आहेत. केवळ ०६ टक्के ग्रामस्थ आपल्या गावातील शाळेविषयी पूर्णत: असमाधानी आढळुन आले आहेत.

या वरून हे सिद्ध हाते की, या अभियानामुळे शाळेचे अंतर्बाहय चित्र पूर्णत: बदलले आहे. गावाची साक्षरता वाढविण्यात हे अभियान उत्तम योगदान देत आहे. अभियानाची शाळा ते घर मोफत वाहतुक बससेवेवर सर्वाधिक ग्रामस्थ खुश आहेत. विविध शैक्षणिक सुविधा, सायकल वाटप याचा परिणाम म्हणून ग्रामस्थ मानव विकास मिशनच्या शिक्षण विषयक योजनांविषयी समाधानी आहेत. तसेच या अभियानाने प्रौढसाक्षरतेसाठी दिलेले योगदान ग्रामीण शिक्षणाच्या प्रमाणवाढीस लाभदायी ठरले आहे.

**मानव विकास समिती अध्यक्षाडून प्राप्त माहीतीचे विश्लेषण व निष्कर्ष:—** स्थानिक मानव विकास समिती अध्यक्षांनी हे अभियान राबविण्यापुर्वी मुले शाळेच्या वेळेत गाव भर फिरताना आढळत असल्याचे सांगितले. तसेच बऱ्याच मुलांनी शाळेत प्रवेश घेतला नव्हता, मध्येच वेगवेगळया कारणास्तव मुले शाळा सोडून देत असत, असेही बहुतांश अध्यक्षांचे मत होते. शालेय सुविधांचा अभाव, शिक्षणाच्या बाबतीतील उदासिनता व ग्रामीण कुटुंबातील दारिद्रय यामुळे शिक्षणाचे व गळतीचे प्रमाण अधिक होते. या सर्व परिस्थितीत अभियानामुळे मोठया प्रमाणावर बदल झाला. बहुतांश समिती अध्यक्षांच्या मते त्यांनी गावात प्रौढसाक्षरता, लोकसंख्या शिक्षण, कुटुंब कल्याण, लैगिक आजार साथीचे रोग या विषयी विविध कार्यकमांच्या माध्यमातुन उद्‌बोधन केले आहे.

**गावांचे सर्वेक्षण:—** एकूण ३० गावांपैकी ५६.६६ टक्के गावांमध्ये वाचनालयात 'पूर्णत:' व 'बहुतांश' वाचक वर्ग उपस्थित होता. ७३.३३ टक्के गावांमध्ये 'पूर्णत:' व 'बहुतांश' शाळा पक्की व रंगरंगोटी केलेली आहे. ८३.३४ टक्के गावांमध्ये 'पूर्णत:' व 'बहुतांश' विद्यार्थीनी मानव विकास स्कुल बसने शाळेला जातात. ४६.६७ टक्के गावांमध्ये 'पूर्णत:' गावात मुलींकडे सायकली आढळतात. ८६.६७ टक्के गावांमध्ये 'बहुतांश' व 'पूर्णत:' शाळेचे किचनशेड स्वच्छ व टापटीप आहे. गांवातील सार्वजनिक वाचनालयांना भेटी दिल्या असता बहुतांश गावात वाचन संस्कृती विकसित होताना आढळली. बहुतांश गावातील शाळा या पक्कया व रंगरंगोटी केलेल्या आढळून आल्या. मानव विकास मोफत स्कुल बससेवेचा बहुतांश मुली लाभ घेत असुन मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यात व शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यात ही योजना उपयुक्त ठरत असल्याचे निदर्शनास आले. बहुतांश सर्व गावातील शाळेचे किचनशेड स्वच्छ व टापटीप आढळून आले. बहुतांश गावातील बहुतांश विद्यार्थी शाळेच्या वेळेत गावात फिरताना अथवा खेळताना आढळून आली नाहीत.

**शालेय विद्यार्थी व शाळा सर्वेक्षण:—** एकूण शाळापैकी ८० टक्के शाळातील 'बहुतांश' व 'पूर्णत:' विद्यार्थ्यांना शाळा व अभ्यासाची आवड निर्माण झाली आहे. ७६.६७ टक्के शाळातील 'बहुतांश' व 'बऱ्यापैकी' विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे. ८० टक्के शाळातील 'बहुतांश' व 'बऱ्यापैकी' विद्यार्थी शाळेतील वाचनालय व प्रयोगशाळेचा नियमित लाभ घेतात. ६९.९९ टक्के शाळातील 'बहुतांश' व 'बऱ्यापैकी' विद्यार्थी शाळेतील अभ्यासिका केंद्राचा नियमित लाभ घेतात. ८० टक्के शाळातील मुलींची मानव विकास स्कुल बससेवेमुळे 'बहुतांश' व 'पूर्णत:' उपस्थिती वाढली आहे. ७६.६७ टक्के शाळातील 'बऱ्यापैकी' व 'बहुतांश' लाभार्थीनी मिळालेल्या सायकलने शाळेत येतात. ६६.६७ टक्के शाळांमधील 'बहुतांश' व 'पूर्णत:' विद्यार्थ्यांची वाहतुकीच्या अभावामुळे शाळा बुडत नाही. ७६.६६ टक्के शाळामधील 'बहुतांश' व 'बऱ्यापैकी' १० वी १२ वी नापास विद्यार्थी शिकवणी वर्गाचा लाभ घेतात. ७३.३३ टक्के शाळामधील विद्यार्थ्यांचा 'बहुतांश' व 'बऱ्यापैकी' क्विझ कार्यक्रमाला प्रतिसाद आहे. ८० टक्के शाळामधील 'बहुतांश' व 'पूर्णत:' विद्यार्थ्यांना नि:शुल्क पाठयपुस्तक योजनेचा वेळेवर लाभ होतो. ८० टक्के शाळेच्या परिक्षेत्रातील 'बहुतांश' व 'पूर्णत:' बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन झाले आहे. ४३.३४ टक्के शाळेला 'पूर्णत:' व 'बहुतांश' शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. ८० टक्के शाळेतील दोन किंवा अधिक इयत्तेतील मुलं एकत्र बसवुन शिकविली जात नाहीत. ४२.६७ टक्के शाळेला 'बहुतांश' व 'पूर्णत:' शैक्षणिक साहित्य, तक्ते, नकाशे, बोर्ड, खेळ व इतर साधने आहेत. ४३.३४ टक्के शाळेला 'बहुतांश' व 'पूर्णत:' खेळाचे साहित्य व मैदान आहे. ६० टक्के शाळेत 'बहुतांश' व 'बऱ्यापैकी' मुलांना बसण्यासाठी डयुअलडेस्क आहेत. ८० टक्के शाळामध्ये 'पूर्णत:' व 'बहुतांश' शिष्यवृत्ती परिक्षेचा अभ्यास करून घेतला जातो. ६० टक्के शाळेतील 'बहुतांश' व 'बऱ्यापैकी' वर्ग खोल्यात विजजोडणी व फॅन आहेत. ७३.३३ टक्के शाळेची 'बहुतांश' व 'पूर्णत:' ईमारत चांगल्या अवस्थेत आहे. या अभियानामुळे शालेय विद्यार्थ्यांत शाळेचे आकर्षण वाढले आहे. तसेच अभ्यासात आवड निर्माण झाली व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे. विविध स्पर्धेत सहभागाचे प्रमाण वाढले आहे. शिष्यवृत्ती परिक्षेत पास होण्याचे प्रमाण वाढले. शाळेतील वाचनालय व प्रयोगशाळेचा विद्यार्थी नियमित लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले असून त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोण व बौध्दीक विकास होताना आढळले. घरातील अपुऱ्या जागेमुळे व अपुऱ्या सोयीमुळे अभ्यासात येणाऱ्या अडचणी अभ्यासिका केंद्राने दूर केल्या आहेत. बहुतांश विद्यार्थी या केंद्राचा लाभ घेताना आढळले. माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील मुलींची उपस्थिती मानव विकास बससेवामुळे वाढली असल्याचे निदर्शनास आले. लाभार्थी मुली मोठया प्रमाणावर सायकलने शाळेत येत असल्याचे निदर्शनास आले. मिशनचा परिणाम म्हणून बहुतांश वाहतुकीच्या अभावामुळे कोणत्याही विद्यार्थ्याची शाळा बुडत नाही. १० वी १२ वी नापास विद्यार्थी शिकवणी वर्गाचा लाभ घेवून उत्तीर्ण होत आहेत. क्विझ कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात वाढ होत आहे. नि:शुल्क पाठयपुस्तक योजनेचा बहुतांश सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना वेळेवर लाभ होत आहे. या मिशनने पालकांचे समुपदेशन करून मोठया प्रमाणावर बालमजुरांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे यशस्वी प्रयत्न केले आहेत. शाळेला वर्ग खोल्यांची उपलबधी असल्यामुळे मुलांना एकत्र बसविणे गरजेचे नाही मात्र अपुऱ्या शिक्षकांमुळे एक दोन वर्गाची मुले कांही शाळांत एकत्र बसलेली आढळली. आरामदायक डयुअलडेक्स उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा

शिक्षणाचा दर्जा उंचावला आहे. बहुतांश शाळामधुन शिष्यवृत्ती परिक्षेचा अभ्यासक्रम शिकविला जातो. बहुतांश शाळांत बऱ्यापैकी वर्ग खोल्यांत विज जोडणी व फॅन उपलब्ध आहेत. बहुतांश सर्व शाळांच्या इमारती पक्या व चांगल्या स्वरूपात असल्याचे या सर्वेक्षणातुन निदर्शनास आले. प्रस्तुत संशोधनात या पाचही जिल्हयांच्या नमुना अध्ययनावरून असे निदर्शनास आले की, हे अभियान मराठवाडयाच्या मागास भागातील मानवी विकासापासुन वंचित असलेल्या लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यात प्रयत्नरत आहे.

(टीप: प्रस्तुत लेख हा ''महाराष्ट्र मानव विकास मिशनचा मराठवाडयातील सामाजिक व आर्थिक परिणाम: एक समाजशास्त्रीय अध्ययन'' या माझ्या पीएच्. डी. साठी केलेल्या संशोधनावर अधारित आहे.)

---

*संदर्भ:–*


१. *महाराष्ट्र शासन नियोजन विभाग. (२००२). महाराष्ट्र मानव विकास अहवाल. महाराष्ट्र शासन: प्रकाशन विभाग.*

२. *महाराष्ट्र शासन नियोजन विभाग. (२०१२). महाराष्ट्र मानव विकास अहवाल. महाराष्ट्र शासन: प्रकाशन विभाग.*

३. *महाराष्ट्र शासन. अर्थ व सांख्यिकी संचलनालय, नियोजन विभाग (२०१७–२०१८). महाराष्ट्राची आर्थिक पाहणी. मुंबई: महाराष्ट्र शासन मुंबई*

४. *ए. पी. जे. अब्दुल कलाम (२०१३). हम होंगे कामयाब. नई दिल्ली: प्रभात प्रकाशन.*

५. *धनागरे द. ना. (२००५). संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव. पुणे, प्रतिमा प्रकाशन.*

६. *भाउ धर्माधिकारी (संपादक). (१९९५). ग्राम–स्वराज्य. पुणे: पृथ्वीराज प्रकाशन.*

७. *हाडेकर डी. वाय. (२००५) डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान. पुणे,सुगावा प्रकाशन.*

८. *देशपांडे जोत्स्ना, (२०११), विकासाचे अर्थशास्त्र, नागपूर: पिंपळापूरे अॅन्ड कंपनी*

९. *शर्मा,एम. (२०१४). भारत का आर्थिक विकास और चुनौतिया. वर्ड फोकस, ३०, ८२–८८*

१०. *वर्ल्ड इकानॉमिक सिचुएशन अॅड प्रोस्पेक्ट, २०१७*

११. *महाराष्ट्र शासन निर्णय, (२९ जुन २००६). महाराष्ट्र शासन नियोजन विभाग. शासन निर्णय क्र.ममवि–२००६/प्र.क्र.२०/का.१४१३.*

१२. *महाराष्ट्र शासन निर्णय, (२९ जुलै २०११). महाराष्ट्र शासन नियोजन विभाग. शासन निर्णय क्र.ममवि–२०१०/प्र.क्र.८१/का.१४२८.*

१३. *साप्ताहिक स्वतंत्र नागरिक – दिनांक २०/०२/२०१८ (http://Swatamtranagrik.in/2018/10/मानवी भांडवल निर्देशांक)*

१४. *UNDP. (1990). Human development report. New york : Oxford Publication.*

१५. *Govt. of India (1999). Human development report of India. New Delhi: Oxford Publication.*

१६. *Govt. of India (2005). Human development report of India. New Delhi: Oxford Publication.*

१७. *UNDP. (2017). Human development report. New york : Oxford Publication.*

१८. *http://www.un.org/development/desa/publication.*

१९. *Govt. of India. (2018). Economics Survey of India (2017-18) Publication Govt. of India.*

२०. *Human Development Reports- hdr.undp.org, retrieve at*

२१. *http://hdr.undp.org/en/composite/tremds)*

२२. *Http://hdr .undp.org/en/composite/HDI*

२३. *Http://hrd.undp.org and Http://hrd.globaldatalab,org)*

२४. *http://hrd.undp.org*

# पर्यावरण संरक्षण जाणिव जागृती एक अभ्यास विषेश संदर्भ : जळगाव शहर

**डॉ. जयश्री महाजन**, समाजशास्त्र विभाग, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव.

सजीवांच्या दृष्टीकोनातून पर्यावरणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. योग्य पर्यावरणाशिवाय सजीवांचे जीवन सुकर व आरोग्यदायी असू शकत नाही.

समाज आणि पर्यावरण या दोहोंचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. पर्यावरण भारतीय समाजाचा एक मुलभुत पाया किंवा अभिन्न अंग आहे. भारतीय रुढी, परंपरा, पध्दती आणि संस्कृती परस्परांशी एवढया निगडीत आहे की, त्यांचे स्वतंत्र अस्तित्व एकमेकांशिवाय स्पष्ट करणे कठीण होते. प्राचीन वेद, पुराण, रामायण, महाभारत, भगवतगीता, कुराण, बायबल यासारख्या धर्मग्रथांतुन पर्यावरणाविषयी कृतज्ञतेचे उल्लेख आढळतात.

इमे ग्रहा मयोभूव उर्जस्वन्त: पयस्वन्त:

पूर्णावामस्य विष्ठस्तेनी जाजन्सु जानत :

या अथर्ववेदातील श्लोकातुन स्पष्ट होते की, हे घर सुखदायी असून धन्यधान्याने भरलेले आहे. दुधातुपाने संपन्न आहे. सर्वप्रकारच्या सौंदर्याने सजलेल्या निसर्गाशी आमची दृढ मैत्री व्हावी आणि आम्ही परस्परांना चांगल्या प्रकारे समजुन घ्यावे. भारतीय संस्कृतीत मानवी जीवनाची दिनचर्या पर्यावरणाशी जोडलेली आहे. पर्यावरणाविषयी जाणीव जागृती ठेवणाऱ्या परंपरागत संस्कृतीत भारतीय बांधवांनी आपले सण उत्सव पर्यावरणाशी जोडले असल्याचे लक्षात येते. वृक्षांची पुजा, सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये नागाचे विष कॅन्सरला उपयोगी पडते म्हणुन केली जाणारी नागपंचमी, दुष्काळ पडू नये म्हणुन केली केलेली सूर्यपूजा, धरती आपल्याला पोसते म्हणुन ज्ञात असलेली भूमिपूजा, मत्स्योत्पादन, मीठ व इतर साधनसंपत्तीचा उपयोग करून घेणाऱ्या कोळी समाजाकडून साजरी होणारी नारळी पोर्णिमा, पोळा, वनस्पती औषधांचे महत्व स्पष्ट करणारी कडूनिंबाच्या पानाचे महत्व सिध्द करणारी व तो पाला चूर्ण म्हणुन गुळाबरोबर प्राशन करून उष्णता कमी करणारी गुढीपाडव्याची पुजा, खोकल्यावर उपयुक्त औषधी म्हणुन तुळसपानाचे महत्व स्पष्ट करणारी तुळसपूजा, थंडीमध्ये शरीरात उष्णता टिकवून ठेवण्यास पोषक ठरणारी मकर संक्रांतीची तिळगुळाच्या आहाराची प्रथा मानवी जीवनातील दिसणारी पर्यावरणविषयक आस्था स्पष्ट करते. भारतीय समाजात पर्यावरणाचे प्रतिबिंब आपल्याला स्पष्टपणे आढळते.

विज्ञानयुगातील मानवाच्या बौध्दिक प्रगतीमुळे यांत्रिकीकरण वाढले आणि औद्योगीकरणास चालना मिळाली. मानवी जीवन विकास आणि राष्ट्हित साधण्याची ती साधने बनतील. त्यातूनच विकासाची गती वाढली आणि पर्यावरणाकडे मानावाचे दुर्लक्ष झाले. निसर्गाने मानवाला अनेक संसाधने उपलब्ध करून दिलेली आहेत. परंतु मानवाने या संसाधनांचा अविवेकीपणे आणि अतिरेकीपणे वापर केला. आपल्या गरजा पूर्ण करतांना नैसर्गिक पर्यावरणाचे नुकसान होते हा याचा फारसा विचार मानवाने केला नाही.

आपला विकास करून घेतांना निसर्गावर, पर्यावरणावर मोठा घालाच घातला. निसर्गातील संपदा वापराचा मानव अतिरेक करीत असल्यामुळे वनसंपदा, प्राणीसंपदा, जलसंपदा, मृदासंपदा यात असमतोल निर्माण झाला आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे हवा, पाणी, ध्वनी, मृदा प्रदुषण वेगाने होतांना जाणवत असून त्याचे पर्यावरणीय दुष्परिणाम दिसू लागले आहेत. वाढती लोकसंख्या मोठी शहरे, वाढती कारखानदारी, वाहतूक, मानवाची बेफिकीर वृत्ती हे घटक अनेक पर्यावरणीय समस्या निर्मितीस कारणीभूत ठरत आहेत.

मानवाने स्वत:ची प्रगती साधुन घेतांना नैसर्गिक पर्यावरणात जी ढवळाढवळ केली त्यामुळे समस्यांची तीव्रता वाढली. पर्यावरणीय समतोल बिघडून अनेक आपत्ती नव्याने जन्माला आल्या. याचा दिर्घकालीन परिणाम समाजावर होत असतो. पर्यावरण प्रदूषणाचा वाढता वेग लक्षात घेता, भविष्यकाळात पृथ्वीवरील सजीवसृष्टीस धोका पोहचल्याशिवाय राहणार नाही. या पर्यावरणीय प्रदुषणाला, समस्यांना आळा घालणे गरजेचे असल्यामुळे सर्वच देशात पर्यावरण संदर्भातील समाजाच्या जबाबदारीचा, जाणिवांचा आढावा घेण्यात आला. समाजातील घटकांमधील पर्यावरणविषयक जाणिव, जागृती अभ्यासण्याचा दृष्टीकोनातुन जळगाव शहरातील १६२ एककांची नमुन्यात निवड केली. प्राथमिक तथ्य संकलनासाठी प्रश्नावली या प्राथमिक तंत्राचा अवलंब करण्यात आला.

**संशोधनाची उदीष्टये :–** पर्यावरण ही निसर्गाची मानवाला मिळालेली एक महत्वपूर्ण देणगी आहे. मानव हा स्वत: पर्यावरणाचा एक महत्वाचा घटक आहे. मानवाच्या वाढत्या व अतिरेकी हस्तक्षेपामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. पर्यावरणीय घटकांचे प्रदुषण होत आहे. हे सर्व टाळण्यासाठी सर्वप्रथम पर्यावरणाच्या संदर्भात जनजागृती करण्याची आवश्यकता आहे.

प्रस्तुत अध्ययनात खालील उद्दीष्टे निश्चित केली गेली.

१. नागरिकांच्या पर्यावरणविषयक माहितीचा वेध घेणे.

२. नागरिकांची आपत्तीविषयक जाणीव जागृती अभ्यासणे.

३. समाजाच्या निरनिराळया वर्गात पर्यावरण समस्यांविषयीची जाणिव रेखांकित करणे.

४. पर्यावरण संरक्षण जबाबदारी विषयक नागरिकांची मानसिकता लक्षात घेणे.

**प्राप्त माहितीचे विश्लेषण –**

- पर्यावरण समस्या जाणीव जागृती अभ्यास करीत असतांना निवडलेल्या नमुन्यात ८२ स्त्रिया आणि ८० पुरूषांचा समावेश आहे.
- ४५ वयापेक्षा जास्त वय असणारे ३५ व ४५ पेक्षा कमी वय असणारे ४७ स्त्रिया आहेत. पुरूषांच्या संदर्भात हे प्रमाण ३०

आणि ५० असे आहे. नमुन्यात ४५ पेक्षा कमी वय असलेल्या उत्तरदात्याचे प्रमाण महत्तम आहे.

- शिक्षणाच्या संदर्भात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या एककांची संख्या जास्त आहे.

प्रस्तूत नमुन्यात ९६ टक्के उत्तरदाते मराठी भाषिक आहेत. ४ उत्तरदाते व इतरभाषिक लोक आहेत परंतु त्यांना सुध्दा मराठी भाषा लिहिता वाचता येत असल्याचे लक्षात आले.

**पर्यावरण माहिती –**

- पर्यावरणाशिवाय मानव ही कल्पनाच शक्य नाही. पर्यावरणाचे मुख्यत: तीन प्रकार आहेत. नैसर्गिक पर्यावरण, मानवनिर्मित पर्यावरण, जैविक पर्यावरण. माती, पाणी, हवा, वातावरण, पाउस या घटकांचा समावेश होतो. नैसर्गिक पर्यावरणात लोकसंख्या, वसाहती, शहरे, कारखानदारी, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय घटक, यांचा तर, मानवनिर्मित पर्यावरणात सुक्ष्म जीवजंतु, कीटक, पक्षी, प्राणी, वनस्पती यांचा जैविक पर्यावरणात समावेश होतो. यासंदर्भात अध्ययन केले असता ६९.५२ टक्के लोकांना पर्यावरण विषयक माहिती असल्याचे नमुद केले तर १९.४५ टक्के लोकांनी नकारार्थी उत्तर दिले. ११.०३ टक्के लोकांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

- आपत्तीविषयक माहितीसंदर्भात नागरीकांकडून उत्फुर्त प्रतिसाद मिळाला. नैसर्गिक व मानवी आपत्तीसंदर्भात सर्वच उत्तरदात्यांमध्ये जाणिव जागृती असल्याचे आढळुन आले.

**पर्यावरण समस्या जाणिव –** पर्यावरणीय समस्यांचे दुष्परिणाम लक्षात घेता पर्यावरणाच्या संतुलनासाठी, संरक्षणासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत, कायदे आहेत. सरकारी पातळीवर अनेक नवनवीन योजना आखल्या जातात. पर्यावरण साक्षरतेसंदर्भात विविध माध्यमांव्दारे जनजागृती केली जाते. पर्यावरण संतुलनासाठी केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरसुध्दा मोठया प्रमाणात कार्य केले जाते. याच दृष्टीकोनातून उत्तरदात्यांची पर्यावरणीय समस्याविषयी जाणीव अभ्यासण्यात आली. त्यासाठी त्यांना पाच विधाने देवुन त्यांचे मत व्यक्त करण्यास सांगितले. त्यातुन त्यांच्या अभिवृत्तीचे मापन करण्यात आले.

**१. अनुकूल पर्यावरणात मानवाचा विकास होवु शकतो. –** या विधानाला ६५.४० टक्के उत्तरदात्यांनी सहमती दर्शवली आहे. तटस्थ असणारे उत्तरदात्यांची टक्केवारी २३ टक्के इतकी आहे. तर ११.८० टक्के लोकांनी या विधानाला कोणताही प्रतिसाद दिला नाही.

यावरून अनुकुल पर्यावरणातून मानवाचा विकास होतो. या विधानाचे महत्व उत्तरदात्यांना मान्य असल्याचे दिसते. ही स्वीकृती पर्यावरण जाणिवतेचा संकेत देणारी आहे.

**२. दुषित पर्यावरणामुळे लोकांना विविध प्रकारच्या आजारांना तोंड द्यावे लागते. –** मानवी आरोग्याचा पर्यावरणाशी अतिशय जवळचा संबंध आहे. शुध्द पर्यावरणातील मानवाचे आरोग्यही सुदृढ व निरोगी रहाते. दुषित पर्यावरण अनेक रोगांच्या प्रसारास पोषक ठरते. यासंदर्भात उत्तरदात्यांना या समस्येची जाणिव आहे काय? हे तपासण्याच्या हेतुने वरील विधानासंबंधी प्रतिक्रिया जाणून घेण्यात आल्या.

या विधानास ८२ टक्के उत्तरदात्यांनी सहमती दर्शवली तर दोन टक्के लोकांनी असहमती दर्शवली ६२ टक्के लोकांनी या संदर्भात उत्तर देण्याचे टाळले. एकुण महत्तम उत्तरदात्यांनी या विधानाला सहमती दर्शवून त्याचे महत्व मान्य केले आहे.

**३. मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपामुळे पर्यावरणात प्रदुषण घडून येत आहे व समस्या निर्माण होत आहेत. –** मानवी जीवन अधिक सुखी व समृध्द बनविण्यात पर्यावरणाचा महत्वाचा वाटा आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मानव निसर्गावर कुरघोडी करीत आहे. परिणामी पर्यावरणात प्रदुषण घडून अनेक समस्या निर्माण होत आहेत याची जाणीव उत्तरदात्यांमध्ये कितपत आहे? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

या विधानाला सहमती दर्शविणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ६४.१५ टक्के इतके आहे. तर १६.४० टक्के लोकांनी या संदर्भात असहमती दर्शवली आहे. १४ टक्के लोक तटस्थ आहेत. तर ५.४५ टक्के उत्तरदात्यांनी कोणतीही प्रतिक्रीया व्यक्त केली नाही.

**४. लोकसंख्यावाढीमुळे विविध प्रकारच्या पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. –** मानवी लोकसंख्या आणि पर्यावरण हे दोन्ही परस्परपुरक असुन स्पर्धकही आहेत. मानवी लोकसंख्येचा अतिरिक्त भार आणि पर्यावरणीय घटकांचा अतिवापर यामुळे पर्यावरणीय समस्यांनी अधिकच गंभीर रूप धारण केले आहे. यासंदर्भात उत्तरदात्यांच्या अभिवृत्ती जाणून घेण्यासाठी हे विधान करण्यात आले.

बहुसंख्य म्हणजे जवळजवळ ८२ टक्के उत्तरदात्यांनी या विधानाला सहमती दर्शविली, तटस्थ राहणाऱ्या लोकांचे प्रमाण १४ टक्के इतके आहे. तर ४ टक्के लोकांनी यासंदर्भात उत्तर देण्याचे टाळले. एकुण महत्तम उत्तरदात्यांनी या विधानाला सहमती दर्शवून लोकसंख्यावाढीच्या दुष्परिणामाची त्यांना जाणीव असल्याने दर्शविले.

**५. बेसुमार जंगलतोड, वायुप्रदुषण यामुळे वातावरणातील ओझोन वायुचा क्षय होत आहे. –** पृथ्वीवरील जीवसृष्टीची छत्री म्हणुन ओझोनचा उपयोग होत आहे. सुर्यापासुन बाहेर पडणारे अतिनील किरणांचा ओझोन वायु शोषून घेतो. त्यामुळे पृथ्वीवर त्याचा विपरीत परिणाम होत नाही. परंतु मानवी हस्तक्षेपामुळे ओझोन वायूचा क्षय होत आहे. यासंदर्भात प्रतिक्रिया जाणून घेण्यात आल्या.

यासंदर्भात ५२.४० टक्के उत्तरदात्यांनी सहमती दर्शविली तर असहमती दर्शविणारे उत्तरदात्यांचे प्रमाण २४.२० टक्के आहे. ९ टक्के निवेदकांनी यासंदर्भात उत्तर देण्याचे टाळले तर १४ टक्के उत्तरदाते तटस्थ आहेत. म्हणजेच वातावरणातील ओझोन वायुचा थर कमी होत आहे. याची जाणीव निम्यापेक्षा जास्त उत्तरदात्यांना असल्याचे लक्षात आले.

**६. मानव टाकत असलेल्या प्लॅस्टीकसारख्या निरूपयोगी वस्तूंमुळे पर्यावरण प्रदुषित होत आहे. –** जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे टाकावु व निरूपयोगी वस्तूंच्या प्रमाणात वाढ होऊन घनकचरा प्रदुषणाची समस्या अधिक उग्र रूप धारण करीत आहे.

प्लॅस्टीकसारख्या वस्तु, पिशव्या नष्ट होत नाहीत. त्यामुळे त्यांची विल्हेवाट लावणे हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात उत्तरदात्यांमध्ये कोणती जाणीव दिसते, हे येथे लक्षात घेण्याचा उद्देश आहे.

यांसदर्भात ६५.४० टक्के उत्तरदात्यांनी या विधानाला सहमती दर्शविली. या विधानाबाबतीत तटस्थ राहणारे लोकांचे प्रमाण १९ टक्के आहे. ६.३० टक्के उत्तरदात्यांनी यासंदर्भात असहमती दर्शविली तर १०.०३ टक्के लोकांनी प्रतिक्रीया देण्याचे टाळले. प्लॅस्टीकसारख्या निरूपयोगी वस्तुंमळे पर्यावरण प्रदुषीत होते या अनुषंगाने सहमतीचे प्रमाण महत्तम आहे.

**पर्यावरण संरक्षण जबाबदारी –** जलप्रदुषणाचा गंभीर परिणाम मानवी आरोग्यावर होतो. यासंदर्भात देवाचे आणि निर्माल्य आणि पवित्र समजल्या गेलेल्या वस्तु नदीत विसर्जित करणारे उत्तरदात्यांचे प्रमाण ८२ टक्के असुन ९ टक्के उत्तरदाते तटस्थ आहेत. एकंदरीत श्रध्देचा एक भाग म्हणुन त्याच्या दुष्परिणामांची माहिती असुनसुध्दा महत्तम उत्तरदाते निर्माल्य नदीत विसर्जीत करीत असल्याचे लक्षात आले.

**स्वयंचलित वाहनांची देखभाल –** स्वंयचलित वाहनांचा दैनंदिन वापर मोठया प्रमाणात केला जातो. त्यातुनच बाहेर पडणारा कार्बन मोनाक्साईड वायु, धुर, मानवी शरीरास अपायकारक आहे. या सर्व दुष्परीणामांचा विचार करून उत्तरदात्यांकडून स्वंयचलित वाहनांची देखभाल केली जाते का? हे अभ्यासण्यात आले.

एकंदरीत महत्तम उत्तरदाते स्वयंचलित वाहनांच्या बाबतीत उदासीन असल्याचे जाणवले.

**दैनंदिन जीवनात सौरचूल, सौरबंब, गोबरगॅस, पवन उर्जा यांचा वापर –** संरक्षणात्मक उपाययोजना म्हणुन सौरचुल, बंब गोबरगॅस, यासारखी उपकरणे वापरली जातात. परंतु केवळ १६ टक्के लोकच या उपकरणांचा वापर करतात तर ८४ टक्के नागरीक यापैकी कोणत्याही साधनांचा वापर करीत नसल्याचे जाणवले.

**उपाययोजना –** एकंदरीत पर्यावरण विषयक जाणीव जागृती असली तरी त्याच्या गंभीर परिणामांची दखल नागरिकांना नाही. त्याचबरोबर धार्मिक अंधश्रध्दामुळे पर्यावरणाची नासाडी होत असल्याचे लक्षात येते. यांसदर्भात नागरिकांच्या मनात पर्यावरणाचे महत्व बिंबवणे एक आव्हानच आहे. त्यासाठी आपण खालील उपाययोजना करू शकतो.

१. ध्वनीप्रदुषणात धार्मिक अंध्दश्रध्दा हे एक महत्वाचे कारण आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्यांना श्रध्दा व अंधश्रध्दा याचे ज्ञान देणे गरजेचे आहे. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत श्रध्दा, अंधश्रध्दा याबाबत लहान मुलांच्या मनात जाणिव निर्माण होऊन संभाव्य धोके टळू शकतात. त्यासाठी पालकांचेही प्रबोधन करणे गरजेचे आहे.

२. शासकीय पातळीवर स्वंयचलित वाहनांची तपासणी, शिबिरे घेऊन त्यामुळे होणारे प्रदुषणावर मर्यादा येऊ शकते. त्यासाठी सामान्य नागरिकांमध्ये जाणीव जागृती बिंबवणेही गरजेचे आहे.

३. प्लॅस्टीक पातळीवर नागरीकांची मानसिकता लक्षात घेऊन शासकीय पातळीवर प्लॅस्टीक वापरावर बंदी आणणे आवश्यक आहे. त्यासाठी दंड आणि शासन या दोन्हीचा उपयोग होऊन प्रभावी उपाययोजना आवश्यक आहे. शालेय जीवनापासूनच त्याबाबत विद्यार्थ्यामध्ये स्वयंशिस्त कशी निर्माण होईल याचा विचार करून त्यांचे सामाजीकरण करणे गरजेचे आहे. मुळातच पर्यावरण संवर्धन हे स्वत:च्या भल्यासाठी आवश्यक आहे हा विचारच विद्यार्थ्यावर बिंबवणे आज काळाची गरज आहे. नव्हे ते एक आव्हान आहे.

*संदर्भ:–*


१. *Brijkumar and Prasadsing, Disaster Management psycho social support and health services. Sumit Eterprises 2010.*

२. *Deolankar Vivek, Disaster Management strategies. Commonwealth 2010.*

३. *Ramamurti K. Disaster Management. Visdom Press Delhi 2011.*

४. *कर्नल पी. पी., आपत्ती व्यवस्थापन संकल्पना आणि कृती. डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७.*

५. *चव्हाण, साहेबराव आणि बोधनकर सुधीर, व्यावसायिक पर्यावरण. साईनाथ प्रकाशन, नागपुर, २००७.*

६. *सोमण मा. श., सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, २००८.*

७. *चौधरी ए. पी., आपत्ती व्यवस्थापन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१२.*

# महिलांचे राजकीय सक्षमिकरण आणि संविधानिक प्रतिनिधीत्व

**डॉ. दीपक कृष्णराव पवार,** सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट अॅन्ड कॉमर्स, ३१०–ब, नविन नंदनवन, नागपूर–०९ Email:profdipakpawar@rediffmail.com Mob. : 9423405816, 8983314468

**संक्षेप :–** महिलांच्या सक्षमिकरणाकरीता शिक्षण, अर्थोत्पादन, सामाजिक दर्जा व भुमिका हे अत्यंत महत्वाचे घटक आहेत. पण याहीपेक्षा महत्वपुर्ण घटक म्हणजे राजकीय सहभाग, तो मात्र दुर्लक्षीत राहीला आहे. स्त्रियांना राजकीय निर्णय प्रक्रियेत महत्वांच्या पदावर आणि आर्थिक घडामोडींच्या क्षेत्रात सहभागी करुन घेतल्यास त्यांना राजकीय, आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होऊन, त्यांच्या हिताचे व संरक्षणाचे कायदे करुन त्यांची प्रभावी नियंत्रणाद्वारे अंमलबजावणी करता येते. आणि त्याद्वारे स्त्रियांचे पुर्ण सक्षमिकरण साधता येते. कौंटुबिक वातावरणात किंवा चार भिंतीच्या घरात राहून परावलंबीपणातून, भित्रेपणा निर्माण होतो. परंतू राजकीय सहभागातून मनातला भित्रेपणा लवकर जातो, त्याचबरोबर सत्तापदावर राहून आत्मविश्वास वाढतो. जगाच्या तुलनेत भारतीय संसदेत व विधीमंडळात महिलांचे प्रमाण फार कमी आहे. ते कधीही १० टक्केपेक्षा अधिक राहिले नाही मात्र स्वातंत्र्यानंतर प्रथमता एप्रिल २०१९ च्या १७ व्या लोकसभेच्या निवडणूकीत निकालानंतर महिलांचे प्रमाण सर्वात अधिक म्हणजे १४.३ टक्के पर्यंत पोहचले. ऑक्टो. २०१९ च्या विधानसभेव्सा निवडणूकीत मात्र हे प्रमाण ८.३३ टक्के इतकेच आहे. महिलांचा काही प्रमाणात का होईना १७ व्या लोकसभेत सहभाग वाढला आहे हा आशेचा किरण आहे. १७ व्या लोकसभेत महिलांचे प्रमाण वाढण्यात निवडणुकीपूर्वी मीटू चळवळ, शबरीमाला मंदीर प्रवेश, तोंडी तलाक या बाबी बरोबर स्त्री केंद्री योजना, बेटीबचाव बेटी पढावो, तसेच ग्रामीण भागाकरीता उज्ज्वला योजना यांचा प्रचारात वापर केला गेला. तसेच स्त्रियांच्या रोजगाराच्या अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे यावर जाहीर नाम्यात भर दिला. या व्यतिरिक्त मुस्लिम स्त्री संघटना, सेंटर फॉर सोशल रिसर्च व इतर स्त्री संघटनांनी चाच काळात महिलांच्या प्रश्नांची चर्चा घडविण्याचा प्रयत्न केला. या सर्व स्त्रियांच्या बाजूच्या वातावरण निर्मिती मुळे आजपर्यंतच्या निवडणूकीच्या तुलनेत महिलांचा सहभाग वाढला. त्याचबरोबर महिला आरक्षण धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज मध्ये ५० जागा व पदांवर आरक्षण देण्यात आले त्याचाही प्रभाव पडला. संधी नव्हती म्हणून महिला मागे राहिल्यात, संधी मिळताच त्यांनी राजकीय क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहे. पण आता गरज आहे ती संसद व विधीमंडळातील महिलांना आरक्षणाची.

**प्रस्तावना:** महिलांच्या सक्षमीकरणाकरिता शिक्षण, अर्थोत्पादन, सामाजिक दर्जा व भूमिका हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. त्याकरिता महिलांनी जास्तीत जास्त शिक्षण घेऊन आपला बौद्धिक स्तर वाढविणे आवश्यक आहे. चांगले शिक्षण घेतले तर त्यांना रोजगाराच्या चांगल्या संधी मिळू शकतात. स्त्रियांना आर्थिक सत्ता व अधिकार नसेल तर त्या पतीवर किंवा वडिलांवर पूर्णपणे अवलंबून असतात. त्यामुळे घरातील पुरुष स्त्रियांवर नियंत्रण मिळवतात. जर स्त्रिया अर्थोत्पादन करू लागल्या तर त्यांना कुटुंबात आणि सामाजिक स्थानात वाढ होते. स्त्रिया स्वातंत्र्याचा अनुभव घेऊन त्यांना आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याची संधी मिळते. समाजात त्यांना आपले स्थान निर्माण करता येते. त्यांना कामगार वर्गात, कार्यालयात, कर्मचारी वर्गात सहभाग वाढतो. त्यातुन त्यांचे नेतृत्व गुण विकसित होण्यास मदत होते. या संदर्भात समाजशास्त्रज्ञ ब्लूम्बर्ग यांचा लिंग स्तरिकणाचा सिध्दांत (Gender Stratification Theory) महत्वाचा आहे. ब्लूम्बर्ग च्या मते, ''ज्या समाजात स्त्रिया देशाच्या आर्थिक घडामोडीच्या महत्वाच्या कार्यात सहभागी असतात, त्या समाजात स्त्रियांचे आर्थिक आणि सामाजिक अधिकार जास्त असतात. या उलट स्थिती असेल तर स्त्रियांचा दर्जा आणि अधिकार आणि कमी प्रतीचा असतो.[१]

स्त्रियांना राजकीय निर्णय प्रक्रियेत महत्त्वांच्या पदावर आणि आर्थिक घडामोडींच्या क्षेत्रात सहभागी करून घेतल्यास त्यांना राजकीय, आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होऊन, त्यांच्या हिताचे व संरक्षणाचे कायदे करून त्यांची प्रभावी नियंत्रणाद्वारे अंमलबजावणी करता येते. आणि त्याद्वारे स्त्रियांचे पुर्ण सक्षमीकरण साधता येते. राजकीय सहभागातून राजकीय सत्ता प्राप्त होते आणि राजकीय सत्तेने अनेक गोष्टी प्राप्त करता येऊ शकतात. आपल्या प्रश्नांची सोडवणूक करता येते, निर्णय घेता येतात, आदेश देता येऊन, इतरांकडून आदेशाचे पालन करुन घेता येते. कायदे तयार करुन घेता येतात, महिला विकासाच्या योजना आखता येतात, याद्वारे महिलांना संरक्षण देऊन सर्वांगिण कल्याण साधून त्यांचे सक्षमिकरण करता येते कौंटुबिक वातावरणात किंवा चार भिंतीच्या घरात राहून परावलंबीपणातून, भित्रेपणा निर्माण होतो. परंतु राजकीय सहभागातून मनातला भित्रेपणा लवकर जातो, त्याचबरोबर सत्तापदावर राहून आत्मविश्वास वाढतो.

महिलांना राजकारणातील अधिकारपदावरील समान हक्क का हवा आहे? यावर प्रसिद्ध समाजकार्य शास्त्रज्ञ प्रा. सुरेंद्रसिंग व प्रा. एस.पी. श्रीवास्तव यांचे भाष्य महत्त्वाचे आहे. ते म्हणतात– ''राजकीय स्तरावर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यास व पुरुषाएवढा झाल्यास राजकारणात बदल होईल. राजकारणाची व समाजाची दिशा बदलण्यास महिलांचा राजकारणातील सहभाग वाढणे आवश्यक आहे.''[३] परंतु जगात कोणत्याही देशात महिला व पुरुष यांच्यामध्ये लिंग समानता आढळत नाही. जगातील एकूण देशांपैकी स्विडन व फिनलँड या दोन देशांमध्येच महिलांना पुरुषांप्रमाणेच समान राजकीय हक्क व त्यासाठी कायदेशीर संरक्षण देण्याची व्यवस्था आहे. पण प्रगत अशा अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स किंवा इतर देशात कोठेही अशी व्यवस्था नाही. त्यामुळे जगात

लोकसंख्येत ५० टक्क वाटा असूनही, १५ टक्के पेक्षा जास्त राजकीय पदे त्यांना मिळालेली नाहीत.

**महिलांचा राजकीय सहभाग आणि भारत :—** विसाव्या शतकात जगाच्या राजकारणात मोठया प्रमाणात बदल झालेत. हुकूमशाही किंवा साम्राज्यवादी राजकीय व्यवस्थेचा अंत होऊन लोकशाही राजकीय व्यवस्थेची सुरुवात झाली. इंग्लंड व अमेरिका या देशाने स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला. १९५० नंतर जागतिक राजकारणात महिलांचा सहभाग वाढू लागला. अनेक राष्ट्रांचे पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष, पक्षाध्यक्ष आणि इतर सर्वोच्च पदे महिलांनी आपल्या सक्षमतेने मिळविली. सीरीमायो भंडारनायके, इंदिरा गांधी, मार्गरेट थॅचर, बेनझिर भुट्टो, चंद्रिका, कुमारतुंगा, शेख हसिना वाजेद, बेगम खालिया झिया, तर अगदी अलिकडे भारताच्या सोनिया गांधी, आणि अमेरिकेच्या कॉलिन पॉवेल, हिलरी क्लिंटन यांनी आपल्या देशाच्या व जगाच्या राजकारणात ठसा उमटविला. तरी पण जगाच्या संसदे मधील स्त्रियांची संख्या तुलनेने कमीच आहे. आंतर संसदीय संघाच्या पाहणीनुसार अमेरिकेत स्त्रियांचे संसदेतील प्रमाण १२.६ टक्के, युरोपात १२.६ टक्के, पॅसिफिक देशात ११.६ टक्के, सहारा व आफ्रिका खंडात १०.४ टक्के, आशिया खंडात १३.१ टक्के आणि अरब राष्ट्रात ३.३ टक्के आहे. जगात सर्वात जास्त स्त्री सदस्य संख्या स्वीडन मध्ये ४० टक्के आहे. न्युझीलंड मध्ये २९.२ टक्के, अर्जेंटिनात २५.३ टक्के आणि चिनमध्ये २१ टक्के आहे[२]. या तुलनेत भारतीय संसदेत व विधीमंडळात महिलांचे प्रमाण फार कमी आहे.

**महाराष्ट्र विधानसभेत महिलांचे प्रतिनिधीत्व**

| अ. क्र. | विधानसभा निवडणूक वर्ष | एकूण सदस्य | महिला सदस्य | महिलांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९६२ | २६५ | १७ | ६.१४ |
| २ | १९६७ | २७१ | १२ | ४.४२ |
| ३ | १९७२ | २७१ | २८ | १०.३३ |
| ४ | १९७८ | २८९ | ९ | ३.१२ |
| ५ | १९८० | २८९ | २० | ६.९० |
| ६ | १९८५ | २८९ | १६ | ५.५३ |
| ७ | १९९० | २८९ | ६ | २.०७ |
| ८ | १९९५ | २८९ | ११ | ३.८० |
| ९ | १९९९ | २८९ | १३ | ४.५० |
| १० | २००४ | २८९ | १२ | ४.१५ |
| ११ | २००९ | २८८ | १२ | ४.१६ |
| १२ | २०१४ | २८८ | २० | ६.९४ |
| १३ | २०१९ | २८८ | २४ | ८.३३ |

सर्व स्तरातील महिलांचे खऱ्या अर्थाने, आणि जलद सक्षमीकरण करण्याकरिता त्यांचा राजकीय सहभाग वाढणे खूप गरजेचे आहे. त्याकरिता अगदी तळागाळापासून (Grass Root) महिलांचा राजकीय सहभाग वाढून, त्यांचे राजकीय सामाजिकरण होऊन त्याचा परिणाम स्वरुप महिलांचा विधिमंडळ व संसदेतील सहभाग वाढावा या हेतूने २४ एप्रिल १९९३ ला ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करून पंचायत राज व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. महिलांचा या स्तरातील सहभाग आणि कर्तुत्व लक्षात घेऊन तसेच यातून मिळालेल्या चांगल्या परिणामातून ते १४ एप्रिल २०११ ला ते ५० टक्के केले गेले. पण याचा परिणाम स्वरुप वरच्या स्तरात महिलांचा सहभाग वाढला नाही. नुकत्याच झालेल्या पुरोगामी व विकसित राज्य असलेल्या महाराष्ट्र राज्यच्या विधानसभेच्या निवडणुकीचा विचार केला असता असे दिसून येते की महाराष्ट्र एकूण ८.९७ कोटी मतदार आहे. त्यात पैकी ४.३८ कोटी महिला म्हणजे जवळ जवळ ५० टक्के महिला मतदार आहे. २०१९ च्या या निवडणुकीत २३५ महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होत्या पण त्यापैकी फक्त २४ महिला निवडुन आल्या आहेत, त्यांचे विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येशी प्रमाण ८.३३ टक्के इतकेच आहे.

**भारताच्या लोकसभेतील महिलांचा सहभाग**

| अ. क्र. | विधानसभा निवडणूक वर्ष | एकूण सदस्य | महिला सदस्य | महिलांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९५२ | ४९९ | २२ | ४.४ |
| २ | १९५७ | ५०९ | २७ | ५.४ |
| ३ | १९६२ | ५०३ | ३४ | ६.८ |
| ४ | १९६७ | ५२३ | ३२ | ५.९ |
| ५ | १९७१ | ५२८ | ३६ | ४.२ |
| ६ | १९७७ | ५४४ | १९ | ३.४ |
| ७ | १९८० | ५४४ | ३२ | ७.९ |
| ८ | १९८४ | ५४४ | ४६ | ८.१ |
| ९ | १९८९ | ५२५ | २८ | ५.३ |
| १० | १९९१ | ५३१ | ३९ | ७.२ |
| ११ | १९९६ | ५३७ | ३६ | ७.२ |
| १२ | १९९८ | ५४४ | ४४ | ८.० |
| १३ | १९९९ | ५४८ | ४८ | ८.८ |
| १४ | २००४ | ५४५ | ४८ | ८.८ |
| १५ | २००९ | ५४५ | ५९ | १०.८ |
| १६ | २०१४ | ५४५ | ६२ | ११.३८ |
| १७ | २०१९ | ५४५ | ७८ | १४.३१ |

सतराव्या लोकसभेची निवडणूक अनेक अर्थाने लक्षणीय आहे. यात स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक महिला खासदार निवडुन येण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच पुरुष मतदार आणि स्त्री मतदार यांच्या मतदानाच्या टक्केवारीतील अंतर कमी झाले आहे, म्हणजे महिलांचे मतदानाचे प्रमाण वाढले आहे. महिलांचा निवडणुकीतील उत्साही सहभाग राजकीय प्रक्रियेविषयी वाढत्या जागरुकतेची निदर्शक म्हणावे

का? असा प्रश्ण निर्माण होतो आहे. या निवणूकीत भारतीय संसदेच्या इतिहासात पहिल्यांदाच लोकसभेत सर्वाधिक ७८ महिला खासदार निवडून आल्या. पहिल्या लोकसभेत पाच टक्के महिला खासदार होत्या, तर सतराव्या लोकसभेत त्यांची टक्केवारी १४.३ पर्यंत पोचली आहे. गेल्या वर्षापासून महिलांना विधीमंडळ व संसदेत लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजे ५० टक्के आरक्षण द्यावे अशी मागणी आहे. तसे संसदेत बील पण दाखल झाले होते, पण हे बील मंजूर होऊन हे आरक्षण थंडगार झाले गेल्या पाच वर्षात तर अशी काही मागणी होती? हे पण विसरलेत काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. पण स्वातंत्र्यानंतर प्रथमता २०१९ च्या १७ व्या लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर महिलांचे प्रमाण सर्वात अधिक म्हणजे १४.३ टक्के पर्यंत पोहचले, असे काय घडले, या महिला कोण? त्यांचा सहभाग का? वाढला ही बाब महत्वाची आहे.

**महिलांचा सहभाग सहभाग का वाढला आहे?**

या निवडणूकीपुर्वी मीटू चळवळ, शबरीमाला मंदीर प्रवेश, तोंडी तलाक या विषयांच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा घडत होती. त्याचे पडसाद विविध पक्षाच्या जाहीर नाम्यात उमटल्याचे दिसून आले. कॉग्रेसने ! या कायद्याचा आढावा घेणे तसेच महिलां विरोधी हिंसा आणि गुन्हे याकरिता विशेष तपास यंत्रणा निर्माण करणे या मुद्यांचा जाहिरनाम्यात भर दिला होता. तर भाजपने स्त्री केंद्री योजना, बेटीबचाव बेटी पढावो, तसेच ग्रामीण भागाकरीता उज्ज्वला योजना यांचा प्रचारात वापर केला. तसेच स्त्रियांच्या रोजगाराच्या अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे यावर जाहीर नाम्यात भर दिला. या व्यतिरिक्त मुस्लिम स्त्री संघटना, सेंटर फॉर सोशल रिसर्च व इतर स्त्री संघटनांनी चाच काळात महिलांच्या प्रश्नांची चर्चा घडविण्याचा प्रयत्न केला. या सर्व स्त्रियांच्या बाजूच्या वातावरण निर्मिती मुळे आजपर्यंतच्या निवडणुकीच्या तुलनेत म्हणजे ८०४९ उमेदवारांमध्ये ७१५ महिला होत्या, त्याची टक्केवारी ८ टक्के इतकी होती. २०१९ च्या निवडणुकीत सर्वाधिक महिला उमेदवारांना निवडणुकीत तिकीटे ही बिजू जनता दल आणि तृणमूल कॉग्रेसने दिली पण महत्वाच्या म्हणजे कॉग्रेस व भाजपा या पक्षांमध्ये महिलांबाबत उदासिनता होती.

ज्या महिला उमेदवारांना तिकीटे मिळाली किंवा निवडून आल्या त्यामध्ये राजकीय वारसा लाभलेल्या बहु–बेटी–पत्नी सिनेतारक व वादग्रस्त व्यक्तीमत्वाच्या महिला आहेत. याला अपवाद अतिशी, रम्या हरदास, प्रमिला बिसोई या आहेत ज्यांना कोणतेही ग्लॅमर किंवा वारसा नव्हता. महत्त्वाचे म्हणजे जुन्या नेत्यांमध्ये मिराकुमार, शीला दीक्षित, मेहबुबा मुफ्ती यांचा पराभव झाला. तर भाजपाच्या सोळा खासदार पुन्हा निवडून आल्यात. वरच्या राजकारणात म्हणजे विधिमंडळ व संसदेत महिलांचे प्रतिनिधीत्व वाढले आहे. पण या प्रतिनिधीत्वात स्वयंप्रकाशी महिलांचे प्रमाण फार नगण्य असून ज्यांना वाडवडिलांचा राजकीय वारसा लाभला तसेच त्यांना ग्लॅमर आहे अशा सिनेतारका किंवा वादग्रस्त महिलांचा मोठया प्रमाणात निवडून आल्या आहेत. मोदी सरकारच्या मंत्री मंडळात ५८ मंत्र्यांपैकी सहा मंत्री आहेत. एकूणच महिलांचे हिताचे निर्णय किती घेतात, हे प्रश्न संसदेत कसे लावून धरतात किंवा महिलांच्या प्रश्नां संदर्भात संवेदनशिलता दाखवत विधायक कार्य करतात काय? आशा करुया.

महिला आरक्षण धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज मध्ये ५० जागा व पदांवर आरक्षण देण्यात आले त्यामुळे राजकीय पक्षांना महिलांची आरक्षित जागांवर निवडणूक लढविण्याकरिता गरज भासली. नुसत्याच कोणत्याही महिलांना पक्षाच्या वतीने उभे करून निवडणूक लढविणे आणि पुढे निवडून आल्यावर पक्षाच्या विचाराने, पक्षाच्या निवडणूक अजेंड्यानुसार, पक्षाच्या नियंत्रणात काम करवून घेणे कठीण किंवा अडचणीचे होते. म्हणून प्रत्येक पक्षाने, आपआपल्या पक्षात महिलांना सहभागी करून घेतले. त्यांना पक्षाची विचारसरणी, ध्येय धोरण आणि नियम व शिस्तीचा परिचय करून देण्याकरिता, पक्षाच्या वतीने आयोजित चर्चासत्रे, परिषदा, सभा, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग इत्यादी द्वारे त्यांना राजकीय प्रशिक्षण देण्यात आले. त्यातील नेतृत्वक्षम आणि कर्तबगार महिलांचा शोध घेऊन, त्यांना पक्षाच्या वेगवेगळ्या स्तरातील पक्षाधिकारी म्हणून नेमण्यात आलेले आहे. काही पक्षांनी, पक्षाच्या महिला आघाड्या देखील सुरू केल्या आहेत.

महिलांना आरक्षण धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज च्या राजकारणात मोठ्या प्रमाणात प्रवेश मिळाला. या प्रवेशामुळे पुरुषी एकाधिकाराच्या समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात महिला आल्यात. आज त्या ५० आरक्षित जागांच्या व्यतिरिक्त, सर्वसाधारण पुरुष प्रतिस्पर्धी असलेल्या जागेवरही निवडणूका लढवित आहे. सत्तापद काबीज करून, आपल्या कर्तबगारीने अनेक महिलांनी चांगली छाप राजकारणात पाडली आहे. अशा महिलांची स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराजच्याही कार्यक्षेत्रापुढे प्रादेशिक व राष्ट्रीय पातळीवर आगेकूच सुरू झाली आहे. मॅक्झिन मोलिनॉक्सचे 'राजकीय प्रभावासाठी आवश्यक असणारे सर्व निकष एकजात पुरुषी आहेत.' हे विधान चूक ठरले आहे. संधी नव्हती म्हणून महिला मागे राहिल्यात, संधी मिळताच त्यांनी राजकीय क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. पण आता गरज आहे ती संसद व विधीमंडळातील महिलांना आरक्षणाची.


*संदर्भ ग्रंथ :*

*१. डॉ. पवार दीपक (२०१६): महिलांचे राजकीय सक्षमिकरण, श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर, दुसरी आवृत्ती, पृष्ठ १६८*

*२. डॉ. पवार दीपक (२०१६): महिलांचे राजकीय सक्षमिकरण, श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर, दुसरी आवृत्ती, पृष्ठ १६८*

*३. लेले चित्रा : सत्तेतल्या कारभारणी, दैनिक सकाळ, ११ जुन २०१९, पृष्ठ ४*

# पुरुषप्रधान समाज व्यवस्था आणि स्त्रियांचा सामाजिक दर्जा

**डॉ.सतीश गंगाराम ससाणे,** समाजशास्त्र विभागप्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर मो.९९२३९०२७९६

**प्रस्तावना:—** भारतीय समाजाचा ऐतिहासिक आढावा घेतल्यास असे निदर्शनास येते की, भारतीय संस्कृतीची अधिष्ठाती स्त्रीच आहे. वैदिक कालखंडात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान अधिकार होते. विविध क्षेत्रात त्यांना सामावून घेतले जात होते. स्त्रियांना मान—सन्मान होता. शिक्षणाची, विद्येची, कला क्षेत्राची दारे खुली होती. मात्र उत्तर वैदिक कालखंडात स्त्रियांचा दर्जा कमकुवत झाला. विशेषत: स्मृतीकाळ हाच खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या कमकुवत दर्जाला कारणीभूत ठरला आणि या कालखंडात स्त्रिया हळूहळू माणूस असून त्यांना गुलाम बनवले गेले. त्यांना चार भिंतीच्या आतील घरकामात बांधून टाकले गेले. पतीला परमेश्वर बनवले अन् पत्नीला दासी बनवून पतीसेवा, पतीचा धर्मपालन करणे बंधनकारक केले आणि समाजकारण, अर्थकारण, शिक्षण यापासून तिला फारकत दिली. पुरुषप्रधानता वाढली. पितृसत्ताक कुटुंबाला चालना, पुत्र हाच वंशाचा दिवा मानला गेला.

स्मृतीकालखंडाचा तात्त्विक विचार म्हणजे, 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हति' याचा अर्थ या कालखंडात स्त्रीला कसलेच स्वातंत्र्य असता कामा नये. फक्त 'चूल आणि मूल' सांभाळणे, गुलाम, लाचार, दासी म्हणूनच संपूर्ण आयुष्य तीने जीवन जगावे. वडील, पती, मुलगा यांच्या संरक्षणाखाली जीवन जगले पाहिजे, हाच विचार पुरुषप्रधान व्यवस्थेने रुजविला.

जैन व बौद्ध कालखंडाचा विचार केल्यास तो कालखंड विज्ञाननिष्ठ पुरोगामी समतामूलक न्यायनिष्ठ तत्त्वावर आधारलेला दिसतो. भारताच्या प्राचीन ऐतिहासिक कालखंडाचे विचार केल्यास फक्त जैन व बौद्ध कालखंडात सर्वांत जास्त प्रमाणात स्त्रियांना समता आणि समतेने जीवन जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले होते. वर्धमान महावीरांच्या परिवारात चंदना हिच्या अधिकारात ३६ हजार श्रमणी होत्या. जेव्हा भगवान बुद्धांनी कपीलवस्तूला भेट दिली तेव्हा शाक्य पुरुषाप्रमाणे शाक्य स्त्रियांना देखील संघात प्रतिष्ठा होण्याची उत्सुकता होती अशा स्त्रियांना त्यांनी महाप्रजापती गौतमी यांच्या नेतृत्वाखाली त्यांना सामावून घेतले. या वदन स्त्री जीवनाच्या ऐतिहासिक कालखंडाचा आढावा घेतल्यानंतर वैदिक व बौद्ध जैन कालखंडाच अपवाद ठरतात. ज्या कालखंडांना स्त्री जीवनाचा सुवर्ण कालखंड म्हणावा लागतो. अन्यथा इतर सर्वच कालखंडात पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या जीवनाला काळीमाच फासलेली पहावयास मिळते. त्यामुळे आजच्या २१ व्या शतकाच्या वैज्ञानिक आणि संविधान असणाऱ्या कालखंडात देखील स्त्रीला अजूनही माणूस म्हणून संपूर्णपणे मान—सन्मान मिळत नाही. याउलट खून, बलात्कार, अपहरण, कौटुंबिक हिंसाचारालाच बळी जावे लागते. म्हणून स्त्री जीवनाचा दर्जा आजही खालावलेलाच आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश:—** १) भारतीय स्त्री जीवनाला समानतेचा दर्जा मिळणे आवश्यक आहे. २) पुरुषप्रधान समाज व्यवस्थाच स्त्री जीवनाला कलंकीत करणारी ठरली याचा आढावा घेणे. ३) स्त्री—पुरुष यांच्याबाबत भारतात लिंगभेद अजूनही प्रकर्षाने मानले जातात. ४)धर्मानुसार मुलगा हाच वंशाचा दिवा मानला जातो. ५) असमान दर्जामुळे स्त्री हिंसाचाराचे प्रमाण सातत्याने वाढते आहे याचा आढावा घेणे.

**गृहितके:—** १) वैदिक, जैन आणि बौद्ध कालखंडाचा अपवाद सोडला तर प्रत्येक कालखंडात स्त्री जीवनाची हेळसांड झालेली दिसते. २) महिला सक्षमीकरणाला चालना देणे आवश्यक आहे. ३) स्त्रिया पुरुषांप्रमाणेच कर्तृत्वशील असतात पण त्यांना समानतेची संधी मिळाली पाहिजे. ४) कौटुंबिक हिंसाचाराच्या बळीतून त्यांना वाचवले पाहिजे. ५) स्त्री—पुरुष समानता हे तत्त्व खऱ्या अर्थाने पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने अंगीकारले पाहिजे.

**तथ्य संकलन:—** प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोतांद्वारे माहिती संकलीत केली आहे. ज्यात संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके व इंटरनेट यासारख्या साधन सामग्रीचा उपयोग केलेला आहे.

**पुरुष समाज जीवनाची मानसिकता आणि स्त्री जीवन:—** स्त्री जीवनाच्या इतिहासाचा आढावा घेतला तर वैदिक, बौद्ध आणि जैन कालखंडातच स्त्रियांना सुवर्णयुग मिळालेले होते. इतर कालखंडात मात्र स्त्री जीवनाची किती हेळसांड झाली याचा स्वतंत्र इतिहास पाहावा लागतो. याला सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय समाजातील पुरुषप्रधान समाजव्यवस्था आणि त्यांची मानसिकता होय. हिंदू धर्मातील प्रथा परंपरेने धर्माला महत्त्व देऊन धर्माच्या नावाखाली वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था बळकट केल्या. मनुस्मृतीला अधिष्ठान देवून स्त्रियांना पुरुषांच्या हातीतील बाहुले केले. तिला दासी, गुलाम, लाचार केले गेले, हिनवले गेले. केवळ चुल आणि मुल सांभाळणारी, उपभोगाची एक वस्तू म्हणूनच तिला मानले गेले. आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अधिकारापासून तिला वंचित ठेवले गेले. त्यामुळे पुरुषप्रधानतेच्या मानसिकतेतून स्त्रियांचे जीवन म्हणजे मरण यातना भोगणारे जीवन बनले. त्यातच सतीची प्रथा, देवदासी प्रथा, विधवा पुनर्विवाहास विरोध, बहुपत्नी विवाह, हुंड्याची प्रथा अशा अनेक धार्मिक परंपरेच्या अन् कर्मकांडाच्या बेड्यात अडकावून तिला बंधिस्त केले गेले. स्त्री म्हणून पायाखालचे पायतण मानले जाते. तिने जास्त बोलू नये, कुठला विचार मांडू नये, कसलेच अधिकार गाजवू नये. कोणत्याही कार्यक्रमात पुढाकार घेवून नये म्हणून तिला सारखे कुटुंबातून छळले जाणे, तिला अपमानास्पद वागणूक देणे, शारीरिक, मानसिक, भावन, लैंगिक छळ केला जातो. कौटुंबिक हिंसाचारातून तर अमानवी कृत्य केली जातात. उदा. ठार मारणे, जाळून मारणे, हुंडयासाठी सतत छळ करणे, धमकी देणे, जीवितास धोका निर्माण करणे, असुरक्षितता निर्माण करणे, नातेवाईकाचा संपर्क तोडणे, गर्भपाताची सक्ती करणे, मुलीच जन्माला घातल्या म्हणून

तिचा छळ करणे, खून, बलात्कार, सासू—सार मंडळींकडून क्रूर छळ अशा प्रकारच्या बातम्या आपण वाचतोच. त्यामुळे स्त्री ही जन्मापासून मरेपर्यंत जीवन जगतच नाही तर फक्त मरणयातना भोगत असते. मग केव्हा आपल्याच माणसाकडून तर कधी समाजातील गिधाड प्रवृत्तीच्या नरभक्षकाकडून. परवाच घडलेली घटना तुम्हा—आम्हाचे डोळे चक्रावून सोडणारी आणि ऱ्हदय हेलावून टाकणारी. हैद्राबाद येथील प्रियंका रेड्डी सोबत झालेले दुष्कृत्य म्हणजे स्त्री मातेच्या गर्भात सुरक्षित नाही. समाज दरबारात सुरक्षित नाही. गल्लीपासून दिल्लीपर्यंत स्त्री जीवनाच्या व्यथा—कथा सातत्याने वाईट घटनांच्या माध्यमातून आपल्यासमोर येताना दिसतात. याला विविध कारणे आणि सामाजिक परिस्थिती जबाबदार असेल परंतु सर्वात गंभीर बाब म्हणजे पुरुषप्रधान समाजव्यवस्थेची मानसिकता आणि त्यातून वाढत जाणारी क्रुरता, गिधाड प्रवृत्ती, लैंगिक आसक्ती, व्यसनाधिनता, निष्ठुरता, स्त्रियांना दिले जाणारे कनिष्ठ स्थान, कनिष्ठ दर्जा. यामुळेच स्त्रियांना पुरुषी वर्चस्वाला बळी पडावे लागत आहे.

या गोष्टी थांबवण्यासाठी राष्ट्रसंतांनी, समाजसुधारकांनी पुरोगामी आणि विज्ञानवादी धर्मसंस्थापकांनी स्त्रियांना समान अधिकार, हक्क मिळवून दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीला मातेसमान दर्जा देऊन संबंध स्त्री जीवनाचा गौरव केला. म.फुलेंनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य देऊन स्त्रियांना शिक्षणक्षेत्रात आणले. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री—पुरुष समानता आणण्यासाठी आरक्षण धोरणातून महिला सक्षमीकरणाला चालना दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाच्या राज्यघटनेत स्त्रियांनी न मागताच त्यांना मूलभूत मानवी अधिकार दिले. त्यात शिक्षणाचा, मतदानाचा हक्क देवून प्राचीन काळात पुरुषांच्या पायथ्यापाशी पशु—प्राण्यासारखे जीवन जगणाऱ्या स्त्रियांना माणूस म्हणून ताठ मानेने जीवन जगण्याचा अधिकार दिला. त्यामुळे आज स्त्रिया सरपंच पदापासून देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत जावून पोहोचल्या त्या केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास दिलेल्या भारतीय संविधानाची देण म्हणावी लागते आणि महिलांना कसलाच, कुठलाच त्रास होवू नये त्यांचा छळ होवू नये म्हणूनही या संविधानात विविध कलमांची तरतूद करून कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे. एकीकडे भौतिक स्वरूपात, कायदे, सामाजिक चळवळी अस्तित्वात आहेत. मात्र दुसरीकडे स्त्रियांचा सामाजिक दर्जा आजही कनिष्ठ असलेला दिसतो. त्यामुळे कधी 'निर्भया' तर कधी 'प्रियंका रेड्डी' यासारख्या घटनांनी स्त्रियांचा छळ होताना दिसतो आहे.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेची मानसिकता बदलायची असेल तर छत्रपती शिवरायांचा आचार, खऱ्या अर्थाने अंगिकारावा लागेल. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दिलेले हक्क त्यांना आपण दिलेच पाहिजेत. त्यांचा मान—सन्मान केलाच पाहिजे तरच स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हळूहळू बदलेल. तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्री म्हणून जीवन 'माणूस' म्हणून जीवन जगण्याचा हक्क त्यांना मिळेल. अन्यथा स्त्री अत्याचाराचे सत्र असेच चालू राहील. '

सोच बदलो, खुद को बदलो
तभी समाज बदलेगा और
जब समाज बदलेगा तो देश बदलेगा
और सारा जहाँ बदलेगा'

यासाठी गरज आहे पुरुषी अत्याचार थांबविण्याची, पुरुषी अहंकार, पुरुप्रधान मानसिकता बदलण्याची.

*संदर्भ*

*१. स्त्री—पुरुष तुलना—पुरुषोत्तम खेडकर*
*२. स्त्री—प्रश्नांची वाटचाल—परिवर्तनाच्या दिशेने, विद्युत भागवत*
*३. महिला सक्षमीकरण : डॉ.सुरेखा गोगट*
*४. भारतीय सामाजिक समस्या — प्रा.एस.एन. गंदेवार*

# बौद्ध धम्म आणि मानवी कल्याण

**प्रा. डॉ. शंकर बागडे,** मराठी विभाग प्रमुख, एम.बी. पटेल कॉलेज, साकोली मो. ९३७०६३२४६१

विश्व शांतीदूत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा जन्म ख्रिस्तपूर्व ५६३ मध्ये वैशाखी पौर्णिमेला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शुद्धोदन व आईचे नाव महामाया असे होते. कपिलवस्तु नगरीचा राजा शुद्धोदन फार मोठा योद्धा व श्रीमंत होता. राजकुमार सिद्धार्थ गौतमाचे बालपण सुखात गेले. वयाच्या सोळाव्या वर्षी सिद्धार्थ गौतम व यशोधरा यांचे लग्न झाले. अनेक वर्षानंतर यशोधरेला एक पुत्र झाला. त्याचे नाव राहुल असे ठेवण्यात आले.

सिद्धार्थ गौतम वयाच्या विसाव्या वर्षी शाक्य संघाचे सभासद झाले.रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून शाक्य आणि कोलीय यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यावेळी शाक्य संघाच्या सेनापतीने कोलियांच्या विरुद्ध युद्ध करण्याचा ठराव मंजूर केला. त्या ठरावाला सिद्धार्थ गौतमाने विरोध केला. त्यामुळे शाक्य संघाच्या नियमानुसार सिद्धार्थ गौतमाला तीन प्रकारच्या शिक्षा फर्मावण्यात आल्या. ''एक सैन्यात दाखल होऊन युद्धात सामील होणे; दुसरा देहान्तशासनाला अथवा देशत्यागाला संमती देणे आणि तिसरा, आपल्या कुटुंबीयांवर सामाजिक बहिष्कार ओढवून घेऊन त्यांच्या मालमत्तेची जप्ती होऊ देण्यास तयार होणे.''[१] त्यापैकी देशत्यागाची शिक्षा पत्करून ; सिद्धार्थ गौतम वयाच्या एकोणतीसाव्या वर्षी परिव्रज्या घेतात.

परिव्रज्या स्वीकारल्यानंतर सुरूवातीची सहा वर्षे अनेक ऋषी–मुनींच्या आश्रमात व सहवासात विविध विषयावर सिद्धार्थ गौतमाने ज्ञान ग्रहण केले. वयाच्या पस्तीसाव्या वर्षी सिद्धार्थ गौतमांनी बुद्धगयेला पिंपळवृक्षाखाली चार आठवडे ध्यानस्थ बसून विविध विषयांवर चिंतन केले. त्यातून सत्यज्ञान सिद्धार्थ गौतमांना प्राप्त झाले. जीवन जगण्याचा नवीन मार्ग त्यांना गवसला. आपल्याला प्राप्त झालेले सम्यक ज्ञान इतरांना सागांवे असा निश्चय करून; तथागत गौतम बुद्ध सारनाथला गेले. तेथे पाच संन्यासी ब्राह्मणांना तथागत गौतमांनी आपला धम्म (जीवन जगण्याचा मार्ग) सांगितला. तो धम्म त्यांना पटला. त्यामुळे ते पाच ब्राह्मण संन्यासी तथागत गौतमाला शरण आले आणि त्यांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. ''भगवान बुद्धाविषयी त्यांचा आदर इतका अमर्याद झाला की, ते त्यास ताबडतोब शरण गेले आणि आपले शिष्य म्हणून आपला स्वीकार करावा अशी त्यांनी त्यास विनंती केली. एहि भिक्खवे (भिक्खूंनो, या.) हा मंत्र उच्चारून भगवान बुद्धाने त्यांना आपल्या धम्मात प्रविष्ट करून घेतले. ते पंचवर्गीय भिक्खू म्हणून पुढे ओळखले जाऊ लागले.''[२] पुढे तत्कालीन राजे, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रातिशूद्र व स्त्रिया या सर्वांना तथागत गौतमांनी बौद्ध धम्माची दीक्षा देऊन; आपला फार मोठा अनुयायी वर्ग निर्माण केला.

तथागत गौतम बुद्ध तत्कालीन लोकांना सांगतात की, बुद्ध धम्म हा महासागरासमान आहे. ज्याप्रमाणे अनेक लहानमोठ्या नद्या, नाले सागराला येऊन मिळाल्यावर त्यांचे स्वत:चे अस्तित्व नाहिसे होते. त्याप्रमाणे बुद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतर मूळची जात–वर्ण–धर्म यांचे अस्तित्व नाहिसे होते. बौद्ध म्हणजे बौद्ध! तत्कालीन लोक जेव्हा तथागत गौतम बुद्धाला देव मानू लागले तेव्हा ते लोकांना समजावून सांगताना म्हणतात, मी देव नाही ! मला देव समजू नका. मी तुमच्या सारखा माणूस आहे. तुमच्यात व माझ्यात फरक एकच आहे. तो म्हणजे ज्ञानाचा. हे ज्ञान मी स्वत: प्राप्त केले आहे. ते ज्ञान तुम्हाला मी सांगतो आहे. सांगितलेले ज्ञान व विचार तुम्ही आपल्या बुद्धीच्या कसोटीवर घासून पहा. पटेल तर घ्या अन्यथा घेवू नका. मी मार्गदाता आहे ; मोक्षदाता नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''भगवान बुद्ध हा केवळ मार्गदाता होता. मोक्ष हा ज्याचा त्याने आपल्या श्रमाने मिळवावयाचा आहे.''[३] याप्रमाणे तथागत गौतम बुद्धांनी विज्ञाननिष्ठ व बुद्धीनिष्ठ असा धम्म मानवांच्या कल्याणासाठी शोधून काढला.

तथागत गौतम बुद्धांनी चार सत्ये सांगितली आहेत. ती म्हणजे १) दु:ख २) दु:खाची कारणे ३) दु:खनिरोध व ४) दु:खमुक्ति.

सुख प्राप्तीचा मार्ग म्हणजेच धम्म. धम्माचे पालन माणसांनी केले तरच मानवाला सम्यक सुख प्राप्त होईल. मानवी जगाचे कल्याण होईल बौद्ध धम्म ३, ५, ८, १०, या अंकातून थोडक्यात समजून घेता येतो.

३ म्हणजे त्रिशरण. याचा अर्थ पुढीलप्रमाणे –

१) मी बुद्धाला अनुसरतो

२) मी धम्माला अनुसरतो.

३) मी संघाला अनुसरतो.

५ म्हणजे पंचशील. यांचा अर्थ पुढीलप्रमाणे –

१.मी जीवहिंसेपासून अलिप्त राहण्याची शिकवण ग्रहण करतो.

२.मी चोरी करण्यापासून अलिप्त राहण्याची शिकवण ग्रहण करतो.

३.मी कामवासनेच्या दुराचारापासून अलिप्त राहण्याची शिकवण ग्रहण करतो.

४.मी खोटे बोलण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.

५.मी मद्य, मादक तसेच मोहात पाडणाऱ्या मादक पदार्थाच्या सेवनापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.

८ म्हणजे अष्टांगिक मार्ग. हे मार्ग पुढीलप्रमाणे – १) सम्यक् दृष्टी २) सम्यक् संकल्प ३) सम्यक् वाचा ४) सम्यक् कर्मान्त ५) सम्यक् आजीविका ६) सम्यक् व्यायाम ७) सम्यक् स्मृती ८) सम्यक् समाधी.

१० म्हणजे दहा पारमिता. त्या पुढीलप्रमाणे – १) दान २) शील ३) नैष्क्रम्य ४) प्रज्ञा ५) वीर्य ६) शांती ७) सत्य ८) अधिष्ठान ९) मैत्री १०) उपेक्षा.

अशा पारमिता अंगी बाणविणे यालाच धम्म म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''उत्कर्ष हा फक्त बौद्ध धर्मातच होऊ शकेल. भगवन्ताचा समतेचा उपदेश होता. बौद्ध संघात आले म्हणजे आपली जात जाते व सर्वजण समान असतात. असे समतेने सांगणारा एकच महापुरूष आहे आणि तो महापुरूष म्हणजे भगवान बुद्ध होय.''[४]

बुद्धाच्या धम्मामध्ये देव, आत्मा–पुनर्जन्म, जाती, चातुर्वर्ण्य, यज्ञ, व्रतवैकल्ये, अंधश्रद्धा यांना स्थान नाही. तर स्वातंत्र्य, समता,

बंधुता, न्याय, मानवता, सदाचार, परोपकार, पापमुक्ति, कुशल कर्म, चित्तशुद्धी, मानवी कल्याण अशा जीवनमूल्यांना बुद्धाच्या धम्मामध्ये विशेष प्राधान्य आहे. ''हे अद्‌भूत आहे, भन्ते! अद्‌भूत!! जे विस्कळीत झालेले आहे त्याची घडी नीट बसवावी किंवा जे गुप्त होते ते प्रकट करावे किंवा वाट चुकलेल्याला मार्ग दाखवावा किंवा ज्यांना डोळे आहेत त्यांना पाहता यावे म्हणून अंधारात दीप प्रज्वलीत करावा, त्याचप्रमाणे भगवतांनी अनेक मार्गांनी धम्माची शिकवण दिली, ही केवढी अद्‌भूत गोष्ट! ख्रिस्तपूर्व ५०० वर्षापूर्वी भगवान बुद्ध जेव्हा आपल्या धम्माचा उपदेश करीत तेव्हा अनेक श्रावकांच्या हृदयातून अशाप्रकारचे शब्द उत्स्फूर्तपणे बाहेर पडत असत. परंतु आज २५५० वर्षानंतरही बुद्ध शिकवणीच्या संपर्कात येणाऱ्यांना अशा प्रकारचे शब्द स्फुरले नाहीत तर नवल!''[५]

मानवाच्या कल्याणासाठी वयाच्या ३५ व्या वर्षापासून ते वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत तथागत गौतम बुद्धांनी संपूर्ण भारतात धम्म प्रचार व प्रसार केला. या कालावधीत गौतम बुद्धांनी ८४ हजार व्याख्याने व प्रवचने दिली. त्याची आठवण म्हणून सम्राट अशोकांनी संपूर्ण भारतात ८४ हजार विहार बांधली आणि बौद्ध धम्माचा प्रसार भारताच्या बाहेर श्रीलंका, जपान, चीन, मंगोलिया, कोरिया, ब्रह्मदेश, थायलँड, इत्यादी आग्नेय आशियातील देशांमध्ये केला. शंकरराव हातोले म्हणतात, '' भगवान बुध्दाच्या महान शिकवणुकीमुळेच एके काळी भारताने सत्‌धर्म मानव जातीला देण्यात एक प्रकारे धर्म दिवाच प्राप्त करून घेतला होता. पुन: एकदा अखिल भारतीय लोक त्यांच्या स्वत:च्या कल्याणासाठी, त्याचप्रमाणे जगाच्या कल्याणासाठी भ. बुद्धाच्या धर्म निशाणाखाली येवोत, अशी मी प्रार्थना करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे लाखो अनुयायी यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेवून भारतीय धर्माच्या इतिहासात हे जे नवीन सुवर्ण पान उघडले आहे त्याचे सर्व भारतीयांनी मनन करावे.''[६]

प्राचीन काळात संपूर्ण भारतीय लोकांत मान्यता पावलेला बौद्ध धम्म ; मध्ययुगात राजाश्रय न मिळाल्यामुळे बौद्ध धम्माला ओहोटी लागली. मानवी जीवनातून धम्माला हद्दपार करण्यात आले. त्यामुळे कर्मठ वर्ण्यव्यवस्था, उच्चनीचतेवर आधारीत जाती व्यवस्था, स्पृश्य–अस्पृश्यता, स्त्री–पुरूष विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय, अत्याचार, शोषण यांना भरती आली. पीडित–शोषितांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''या देशात आम्हाला हजारो वर्षे निरुत्साही करून टाकणारी अशी परिस्थिती आहे, ही परिस्थिती जोपर्यंत आहे. तोपर्यंत आपल्या उन्नतीबद्दल उत्साह उत्पन्न होणे शक्य नाही. मनुस्मृतीमध्ये चातुर्वर्ण्य सांगितले आहे. ही चातुर्वर्ण्य व्यवस्थाही मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला अत्यंत घातक आहे.''[७]

आधुनिक काळात इंग्रजी राजवटीने झालेल्या राजकीय स्थित्यंतरामुळे महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी प्रत्येक व्यक्ति–समाज व देशाच्या उन्नतीचे अफाट कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तथागत गौतम बुद्धाचा धम्म अशोक विजयादशमीच्या पर्वावर दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी स्वत: स्वीकारला; आणि पाच लाख बांधवांना २२ प्रतिज्ञासह बौद्ध धम्माची दीक्षा दिली. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''मैं मनुष्यमात्र को नीच मानने वाले हिन्दू धर्म का त्याग करता हूं। मै ऐसा अनुभव कर रहा हूं, जैसे कि मुझे नरक से छुटकारा मिल गया है।''[८] बौद्ध धम्माची दीक्षा धर्मांतरीत बौद्धांने प्रत्येकाला–इतरांना द्यावी अशी अपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त करून; सारा भारत बौद्धमय करीन हे ध्येय निर्धारीत केले. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतातील मोठमोठ्या शहरात धम्मदीक्षा मेळावे घेऊन; धम्मप्रसार व धम्मजागृती करणार होते. तसेच विद्वान लोकांना बुद्धाचा धम्म समजावून सांगणार होते. परंतु त्यांना धर्मातरानंतर अधिक आयुष्य लाभले नाही. त्यामुळे धम्मचक्र जलद गतीने फिरले नाही. ते धम्मचक्र गतीमान करणे ही आजच्या बौद्धांची व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांची नैतिक जबाबदारी आहे. ''अत्त दीप भव' हे घोषवाक्य भगवान बुद्धाची माणसाला मौलिक देण आहे. त्यात आळस आणि भिकमागूपणा ह्य मानवीय शत्रूंना अथवा मजबूरीचे जीवन जगण्याच्या सवयींना दूर करण्याचे कौशल्य आहे. अर्थात 'स्वावलंबी व्हा' म्हणजे तुम्ही मजबूर होणार नाहीत. आपल्या पायावर उभे राहाल. स्वत:च्या पायावर उभे राहणे म्हणजेच स्वत:च्या प्रतिभेने दुसऱ्यांना वाट दाखवत–दाखवत आपणही स्वयंप्रकाशित होणे व आपण आपणाला पारखणे, निरीक्षण करणे, आपणात निर्माण होणाऱ्या प्रवृत्यांना जाणून घेणे, सत्क्रियेत वावरणे, दुष्क्रियांपासून अलिप्त होणे म्हणजे कुशल प्रवृत्तीत जीवन जगणे अकुशलास आपणात येऊ न देणे म्हणजेच 'अत्त दीप भव' अभिधम्मपिटकाचे हेच मूळ सूत्र आहे.''[९]

मानवी कल्याणासाठी बौद्ध धम्म आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक भारतीय नागरिकांनी बौद्ध धम्माचा स्वीकार व अनुसरण करणे ही काळाची गरज आहे. तात्पर्य, ''बुध्दाचा धम्म मानवी कल्याणाचा ध्यानी घ्या हो। धम्माचरण करण्यासाठी पुढे या हो। एकीचे बळ मिळेल फळ ध्यानी घ्या हो। सर्वजन सारे निस्वार्थाने एक व्हा हो''

*संदर्भ ग्रंथ :*

*१. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, सिद्धार्थ प्रकाशन, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, १९९० पृ. २७.*
*२. तत्रैव, पृ. १०४*
*३. तत्रैव, पृ. १७०*
*४. शंकरराव हातोले (संपादक) : धम्म दीक्षा समारंभ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऐतिहासिक भाषण, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८४, पृ. ५८–५९*
*५. उर्गेन संघरक्षित : आर्य अष्टांगिक मार्ग, त्रिरत्न ग्रंथमाला, नागपूर, चतुर्थ आवृत्ती २०१३, प्रकाशकीय, पृ. १*
*६. शंकरराव हातोले (संपादक) : धम्म दीक्षा समारंभ, उनि, पृ. ६९*
*७. तत्रैव, पृ. ५६*
*८. डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. संजय गजभिए : बाबासाहेब डॉ. आंबेडकर की धम्मक्रांति, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण २०१४, पृ. ४०२*
*९. भदन्त तिस्सवंस : बौद्ध धम्मग्रंथ, अभिधम्मपिटक, सुगत प्रकाशन, नागपूर, २००५, दोन शब्द, पृ. १*

# विस्थापन आणि विकासाची प्रक्रिया

**डॉ. नलिनी आय. बोरकर,** समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेटोलपंप,जवाहरनगर जि. भंडारा मो. ९४२१२४०९६३

**प्रस्तावना** :— दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला संपूर्ण जगात गतीमानता प्राप्त झाली. महायुध्दात विजयी व पराभूत झालेल्या दोन्ही बाजूंच्या राष्ट्रांना युध्दाच्या झळीमुळे उध्वस्त झालेले कारखाने, शहरे, दळणवळणाचे मार्ग पुन्हा नव्याने उभारवयाचे होते. साम्राज्यवाद व वसाहतवादाच्या गळफासातून मूक्त झालेल्या आशियायी आणि अफ्रिकन राष्ट्रानांही आपापल्या देशाची आर्थिक व सामाजिक पुर्नरचना करावयाची होती. त्यामुळे विकासाची प्रक्रिया गतीमान करणे ही सर्वच राष्ट्रांची गरज झाली होती. आर्थिक विकासाचा संबंध केवळ आर्थिक क्षेत्रापुरता मर्यादित राहीला नसुन त्याचा संबंध आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेशी आहे. आधुनिकीकरण हे आर्थिक क्षेत्राप्रमाणे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रास लागु आहे, त्याचा आधुनिकतेने भारलेल्या मानसिकतेशीही निकटचा संबंध आहे. विकासाचा केंद्रबिंदू सर्वसामान्य माणूस आहे. त्याच्या कल्याणासाठी विभिन्न क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता आहे तसेच विकासाचे व सुधारणांचे फायदे संपूर्ण समाजाला मिळविण्याची आवश्यकता आहे.

आर्थिक वृध्दी + संरचानत्मक बदल = विकास असे समीकरण रूढ झाले आहे. (रा.ज. लोटे २०१५—३५१) विकास कार्यक्रमातून सरासरी आयुर्मानात वाढ, बालमृत्यूच्या प्रमाणात घट, स्त्रियांच्या साक्षरतेत वाढ झाली की समाजात संरचनात्मक बदल घडून येणारच हे निश्चित आहे. म्हणून सामाजिक परिवर्तनाचे विभिन्न गैरआर्थिक पैलू म्हणजे आर्थिक विकास असे मानले जाते. धरणांची निर्मिती, खाणींचा विस्तार, औद्योगिक प्रकल्प आणि वसाहतींची निर्मिती, विजेच्या निर्मितीत वाढ हे सर्व आर्थिक विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतून घडत असते. यातून अर्थसंस्था मजबूत होणार हे निश्चित आहे. परंतू दुसऱ्या बाजूला मोठमोठी धरणे बांधली जात असतांना गावेच्या गावे उठविली जातात. या धरणांमुळे विस्थापित होणाऱ्या विस्थापितांचे दूसरीकडे पूर्नवसन करावे लागते. कार्गोहब विमानतळ निर्माण करावयाचे असेल तर त्या परिसरातील काही शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनी गमवाव्या लागतात. म्हणून विस्थापीत व पूर्नवसनाचे प्रश्न आजच्या ज्वलंत सामाजीक समस्यांचे रूप घेऊन दिसून येतात.

**विस्थापन** :— नर्मदा नदीवरील सरदार सरोवराचे बांधकाम हा भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला विषय ठरला होता. या प्रकल्पाच्या निर्मितीमुळे ज्या लोकांना विस्थापीत व्हावे लागले त्या सर्वांनी लढा उभारला. काही काळ काम बंद ही पाडले होते. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. या प्रकल्पाला अर्थ सहाय्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि विश्व बॅंकेपर्यंत जाऊन तेथेही आपली बाजू लावून धरली. जलविद्युत प्रकल्पांच्या निर्मितीमुळे सुध्दा अनेक लोक विस्थापित होत असतात. उदा. हिमाचल प्रदेशामधील अनेक विस्थापीतांनी अशा जलविद्युत प्रकल्पांना विरोध केल्याचे दिसून येते. मोठमोठी धरणे निर्माण करणे व त्यापासून सिंचनाला सोयी तयार करणे अशा अनेक प्रकल्पामुळे अनेक गावांना त्यांच्या मुळच्या जागेवरून विस्थापित केले जाते. आजच्या घडीला विस्थापन ही विकासाच्या हातात हात घालून येणारी समस्या झालेली आहे. विकासाच्या मार्गावर समाज मार्गक्रमण करीत असतांना विस्थपनासाठी सामाजिक समस्या मोठया प्रमाणात भेडसावू लागली आहे.

**विस्थापनाचा अर्थ** :— भुकंप, महापूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे व युध्द विकास प्रकल्प, जलविद्युत प्रकल्पाची निर्मिती इत्यादीमुळे विस्थापन घडून येते. सुध्द, भुकंप, महापूर इत्यादीमुळे विस्थापित झालेल्या लोकांना समाजातील सर्व स्तरातील लोकांची व मिडीया ची मोठया प्रमाणात सहानुभूती मिळत असते. त्यांच्या बचाव कार्यासाठी व त्यांचे पूर्नवसन करण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था, दानशुर व्यक्ती व संस्थाने समोर येत असतात. युध्द पातळीवर त्यांच्यासाठी मदतकार्याचे आवाहन केले जाते. याऊलट विकास, प्रकल्प, धरणे, जलविद्युत प्रकल्प यांच्या निर्मितीमुळे अनेक गावेच्या गावे त्यांच्या मुळ स्थानावरून हटविली जातात. वर्षोवर्षे वडीलोपार्जित गावात राहणाऱ्या लोकांवर अचानक गाव सोडून विस्थापीत होण्याची पाळी येते. परंतू त्यांच्या भावना मिडीया व इतर लोक समजून घेत नाहीत. त्यांना सहानुभूती व मदत मिळत नाही. त्यांच्या समस्यांवर विचार केला जात नाही.

खरे तर नैसर्गिक आपत्ती निघून गेल्यानंतर व युध्दसमाप्ती नंतर काही काळाने लोक त्यांच्या परिसरात परत जावू शकतात. परंतू प्रकल्पग्रस्तांना मात्र त्यांचा परिसर कायम गमावण्याची पाळी येते. धरणांबाबतच्या जागतीक अयोगाने आपल्या अहवालात नमुद केले आहे की, ‘‘विस्थापीतांबाबत सहानुभूतीवाटत असूनही हे नमुद करावेसे वाटते की पुर्नवसनानंतरच्या त्यांच्या जीवनपध्दतीत कमालीचे दारिद्रय आणि लाचारीचा मोठया प्रमाणावर शिरकाव झाला असल्याचे दिसून येते’’ (रा.ज. लोटे – २०१५ –३५८,३५९). पुर्नवसनानंतर विस्थपितांच्या जिवनाचे निरिक्षण केल्यास असे लक्षात येते की, त्यांच्या पूर्वीच्या अयुष्यापेक्षा हे नवे आयुष्य त्यांना जगने कठीण आहे. जमिनीचा व घरादरांचा मोबदला जो पैशाच्या रूपात मिळतो त्यासाठी बहीण भाऊ आपापसात वैरी झालेले आढळतात. गावातील सलोख्याचे व मैत्रीचे संबंध पूर्णपणे नष्ट झालेले आढळतात. त्यांच्या पूर्वीच्या मानमरातबाचे नष्ट झालेले स्वरूप त्यांना जिवन जगणे कठीण बनविते. अशा अनेक समस्यांचा सामना त्यांना करावा लागतो. विस्थापित लोक आपल्या घरादाराला, मालमत्तेला, शेतजमिनीला, रोजगाराला मूकतात त्यांचा रहिवासच हरवतो. एकप्रकारे विकासप्रकल्प तेथील स्थानिक लोकांच्या बलिदानावर उभे राहतात असे म्हटले तरी वागवे ठरू नये. त्यांचे दुसऱ्या क्षेत्रात पुर्नवसन नव्हे तर त्यांचा रहिवास, त्याच पूर्वीचे जीवन

त्यांना प्रदान करणे हे न्यायाला धरूनच आहे. शासनातर्फे त्यांच्या पूर्नवसनाचा प्रयत्न केला जातो पण तो पुरेसा नसतो. त्यामुळे विस्थपितांच्या प्रश्नांनी समस्येचे रूप धारण केले आहे.

विस्थापितांना शेती व घरदार यांच्या मालमत्तेचे मूल्यांकना करून आर्थिक मोबदला दिला जातो. परंतू त्यांना त्यांच्या मूळ निवासस्थानी असणाऱ्या पर्यावरणातून आर्थीक उत्पन्न मिळायचे त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायच्या उदा. वनस्पतींची मुळे व पाने, नदीपात्रात सापडणारे औषधीयुक्त मौल्यावान खडे इत्यादी विकून त्यांची उपजिविका भागत असे. परंतू पुर्नवसनानंतर त्यांच्या उत्पन्नात घट झाल्याचे निदर्शनास येते. पुर्नवसनानंतर विस्थापित लोक नवीन जागेत मानसिक दृष्टया परके राहतात. आपल्या परंपरांचे व संस्कृतीचे जतन करणे त्यांना जड जाते. नवीन ठिकाणी राहणारे लोक विस्थापितांना परके समजतात व त्यांच्यात संघर्षाचे प्रसंग उभे राहतात. हे मानसिक – सामाजिक प्रश्न वेगवेगळे असतात पण त्यांची सुरूवात विस्थापनापासून होते.

**व्याख्या** : १) कोलीन्स कोसाईल्डच्या शब्दकोशानुसार – ''लोक ज्या क्षेत्रात राहतात तेथून त्यांना जबरदस्तीने दूर पाठविणे म्हणजे विस्थापन होय.'' २) जोस मुरीकन, जॉर्ज आणि अन्य यांच्या मते, ''विस्थापन अशी संकल्पना आहे की, विकासाच्या प्रकल्पाकरिता लोकांना त्यांच्या मूळच्या स्थानावरून उठविले जाते.''

**विस्थापनाचे परिणाम : १) विस्थापितांकडे दुर्लक्ष** : विकास प्रकल्प तयार करतांना त्या जागेवरील लोकांच्या विस्थापनाच्या योजना कगदोपत्री बनवून तयार केल्या जातात त्यांच्या मालमत्तेचा मोबदला बाजार भावाने देण्याचे कबूल केले जाते. त्याशिवाय पक्की घरे, वस्त्या, रोजगार देवू अशी आश्वासने दिली जातात. या सर्व अमिषांना बळी पडून ते आपली मालमत्ता, घरेदारे, शेतीवाडी शासनास दयायला तयार होतात. शासकीय कागदपत्रांवर त्यांच्या सहया घेतल्या जातात. प्रत्यक्षात मात्र प्रकल्प पूर्ण होवून १० ते १५ वर्षे लोटूनही त्यांचे पुर्नवसन केले जात नाही. शेती गेल्यामुळे हाताला काम नसते व मजूरी मिळत नसल्याने उपासमार होते. अनेक पुर्नवसीत लोकांना मानसिक धक्का बसतो आणि त्यांच्या आरोग्याच्या समस्या सुध्दा निर्माण होतात.

**२) विस्थपितांचे सामाजिक जिवन नष्ट होते** : विस्थापनामुळे लोकांचे पारंपारिक आर्थिक, सामाजिक जिवन नष्ट होते. त्यांच्या जवळील उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शेती ती शासनाने हिसकावून घेतलेली असते. त्यांच्यासमोर उदरनिर्वाहासाठी काय करावे हा मोठा प्रश्न आवासून उभा राहतो. गावातील मान मरातब व बनविलेली पत नष्ट झालेली असते. सरकारने दिलेला मोबदला पैशाच्या स्वरूपात असल्याने खर्च झालेला असतो. पुढील आयुष्य कसे जगावे असा प्रश्न त्यांना भेडसावित असतो अशा अवस्थेत त्यांचे मानसिक आरोग्य बिघडून उदास मनस्थितीत जिवन जगावे लागते.

**३) पुर्नवसनाचे ठिकाणाबाबत मतभेद** : विस्थातिप झालेल्या लोकांचे पूर्नवसन करण्यासाठी शासनाने जे ठिकाण निवडलेले असते बहुतेक वेळा ती जागा विस्थापित लोकांना मान्य नसते. ते गाव मूळच्या गावापासून खूप लांब आहे. तिथे आमच्या समाजातील लोक नाहीत. अशा प्रकारच्या तक्रारी विस्थापित करीत असतात. त्यांच्यात व शासनात या विषयावरून मतभेद होतात.

**४) पूर्नवसनाच्या प्रक्रियेत लहान मुले व वृध्दांचा बळी** : विस्थापनाच्या समस्येवर तोडगा म्हणून पूर्नवसन केले जाते. परंतू पूर्नवसनाची जागा आरोग्यास योग्य नसेल किंवा त्यांच्या मूळच्या गावातील आनंदी व आरोग्यदायी वातावरण तिथे नसेल तर लहान मूले व वयोवृध्द लोकांना ते वातावरण लवकर मानवत नाही ते आजारी पडू शकतात व प्रसंगी दगावू देखील शकतात.

**५) पुर्नवसीत व स्थानीक संघर्ष** : विस्थापित लोकांचे पुर्नवसन एखादया गावातील मोकळया जागेत केले जाते. जिथे गावातील लोक पूर्वी गुरे चारायचे असे कुरण ते असते या विस्थपितांच्या पूर्नवसनासाठी गावातील मोकळे कुरण वापरल्यामुळे कुरणाची जागा कमी होते. स्थानिकांना गुरे कुठे चारावीत हा प्रश्न सतावतो. गुरांच्या चाऱ्यासाठी दूरवर जावे लागते त्यामुळे कष्ट व वेळ वाया जातो असे त्यांना वाटते. तसेव पुर्नवसीत लोक राहायला आल्याने गावात कुशल व अकुशल कामगारांच्या संख्येत वाढ होत असते. गावातील मजूरीचे दर कमी होतात. याचा फटका स्थनिकांना बसतो. त्यामुळे पूर्नवसीत लोक स्थनिकांना आपले शत्रु आहेत की काय असे वाटते व दोघांमध्ये संघर्ष उत्पन्न होत असतो. विस्थापित लोकांचे पुर्नवसन करतांना वरिल समस्यांचा सामना करावा लागतो. त्यासाठी काही उपाययोजना केल्यास हा प्रश्न सोडविता येतो.

**विस्थापितांचे पुर्नवसन करण्यासंबंधीच्या उपाययोजना** :

**१) पूर्नवसनासंबंधी कालबध्द नियोजन** : एखांदा विकास प्रकल्प शासनाने हाती घेतला की त्याबरोबरच तो पूर्ण होण्यास लागणारा कालावधी सरकारला जाहीर करावा लागतो त्याच धर्तीवर पूर्नवसनाच्या कार्यक्रमाचा सुध्दा एक कालबध्द नियोजन आराखडा आखण्यात यावा. प्रकल्पाच्या सुरू होण्यापासून ते पूर्ण होवून कार्यान्वीत होवूनही पूर्नवसनाचा प्रश्न तसाच ठेवला जातो. ज्यामुळे विस्थापित लोकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे पूर्नवसनाचा प्रश्न सोडविण्यासाठी सुध्दा काही निश्चित कालावधीचे नियोजन केले पाहिजे.

**२) विस्थापितांना पूर्नवसनासंबंधी मार्गदर्शन** : व्यक्ती पिढयान्पीढया ज्या परिसरात राहतो त्या परिसरावर तेथील वातावरणावर तो मनापासून प्रेम करीत असतो. त्यांच्या आयुष्यातील सुख व दु:खाच्या घटना त्याच परिसरात घडलेल्या असतात. त्यामुळे तो परिसर सोडून जाण्याची मानसिकता लोकांची नसते. म्हणून विकास प्रकल्पासाठी त्यांना जागा सोडायला लावणे याची मानसिक तयारी करून घेणे आवश्यक ठरते. नवीन परिसरात, नवीन व्यवसाय, शेती करणे, मिळालेला पैसा जपून ठेवणे इत्यादीबाबत विस्थापितांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन मिळाले तर त्यांचे पूर्नवसन योग्य प्रकारे व सुरळीतपणे होवू शकते.

**३) पूर्नवसनासाठी गाव हे एक मानावे** : पुर्नवसनाच्या प्रक्रियेत एक व्यक्ती, कुटुंब हे एकक न मानता संपूर्ण गाव हे एकक मानावे. संपूर्ण गावाचे एकाच ठिकाणी पूर्नवसन झाले तर विस्थापीतांना होणारा मानसिक त्रास बऱ्याच प्रमाणात कमी होवू शकतो.

४) **घरासाठी विनामूल्य जागा आणि गावातील सर्व सोयी सुविधा** : विस्थापितांना नविन जागी घरे बांधण्यास विनामुल्य जागेचे वाटप करणे आवश्यक आहे. जागा मोफत मिळाली तर ते स्वत:च्या जमिनीच्या मोबदल्यात मिळालेल्या पैशातून घरे बांधू शकतात. तसेच पुर्नवसन झालेल्या वसाहतीत रस्ते, नाल्या, प्राथमिक शाळा, दवाखाने, खेळाची मैदाने यासारख्या सर्व नागरी सोयी पुरविणे आवश्यक आहे. हया व यासारख्या सोई सवलती मिळालेल्यामुळे त्यांचे जिवन थोडे का होईना सुखी व संपन्न होवू शकते.

५) **रोजगारासाठी शेतजमीन** : विस्थापीत लोकांची शेतजमीन विकास प्रकल्पात गेल्यामुळे त्यांना त्याचा मोबदला पैशाच्या रूपात दिला जातो. परंतू पैसा आला की तो चैनी विलासी जिवनात खर्च होतो मात्र रोजीरोटीचा प्रश्न तसाच अंधातरीत राहतो. शेती व्यवसाय करण्यात त्यांचे आयुष्य गेल्यामुळे त्यांना दुसरा व्यवसाय जमत नाही. त्यामूळे शेतीच्या मोबदल्यात त्यांना शेतीसाठी जमीन उपलब्ध करून दिली तर त्यांच्या उदरभरणाचा प्रश्न कायमचा सुटू शकतो.

६) **मालमत्तेची भरपाई वेळेवर दयावी** : विकास प्रकल्पात जमीन घर–दार गेल्यामुळे विस्थापीतांना नुकसान भरपाई दिली जाते. परंतू शासनाकडून ही नुकसान भरपाई मिळायला खूप उशिर होत असतो. तोवर विस्थापीतांचे हाल होत असतात. स्वमालकीची जमीन व जवळ पैसा नसल्यामुळे ते कोणताच व्यवसाय व कामधंदा करू शकत नाही त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते. तसेच उशिरा मिळालेल्या पैशांचे मूल्य काळानुसार कमी झालेले असते म्हणून त्यांच्या वाटयाला दारिद्रिय येते.

७) **कमी व्याजदराने कर्जाची तरतूद** : विस्थापीतांना त्यांच्या जमिनीच्या व घरादाराच्या मोबदल्यात मिळत असलेली रक्कम लवकरच खर्च होते परंतू त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न तसाच राहतो. त्यांना व्यवसाय करायचा असेल तर भांडवल किंवा कर्ज उपलब्ध नसते कमी व्याजदराने कर्जाची तरतूद करून दिल्यास त्यांना कोणताही जोडधंदा करून आपला उदरनिर्वाह चालविता येईल.

८) **इतर अन्य सोईसुविधा** : विस्थापीतांच्या समस्योला आळा बसावा म्हणून व त्यांच्यावर अन्याय होवू नये म्हणून कुटुंबा पैकी एकाला नोकरी देता येईल तसेच प्रकल्पाच्या लाभामध्ये भागीदारी देवून त्यांची आर्थिक अडचण दूर करता येईल. विस्थापीतांना सुरक्षा आणि सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहे.

**समारोप** : विस्थापीतांची योग्य व्यवस्था करण्यात शासन कमी पडत आहे आणि त्यांना फार हाल भोगावे लागत आहेत. त्याशिवाय विस्थापनामुळे पर्यावरणाची जी हानी होते ती वेगळीच. त्यामुळेच सामान्य लोक विस्तापनाला विरोध करू लागले आहेत. आंदोलने उभारू लागले आहेत. भारतात वेगवेगळया कारणांनी लोकांच्या जमीनी अधिग्रहीत करून तेथील लोकांना विस्थापीत व्हावे लागले तेव्हा त्यांनी उग्र चळवळी उभ्या केल्या याची काही उदाहरणे खालीलप्रमाणे देता येतील.

१) **सरदार सरोवर प्रकल्प** : नर्मदा नदीवर गुजरात राज्यात धरण बांधून सरदार सरोवर निर्माण करण्यात आले. या नदीवर ३० मोठया धरणांचे प्रकल्प आहे. या सरोवरांमुळे गुजरातमधील कोरडेपणा नष्ट होईल असे गृहीत धरण्यात आले होते. परंतू हे सरोवर बांधण्याकरिता कितीतरी कुटुंबाचे आयुष्य उध्वस्थ झाले आहे. विस्थापीतांच्या पुर्नवसनाचा प्रश्न अजूनही लोंबकळत आहे. आदिवासी व स्थानिक लोकांचे जिवन उध्वस्त झाले तसेच पर्यावरणाची अपरिमीत हानी झाली. हे दोन्ही प्रश्न घेवून श्रीमती मेघा पाटकर यांनी आंदोलन उभारले (पंडीत, बापट – २००९–२६५).

२) **नंदिग्राम** – विशेष आर्थिक पट्टा : पश्चिम बंगाल मधील नंदीग्रामच्या विस्थापीत होवू घातलेल्या लोकांनी शासनाला चिवटपणे दिलेल्या यशस्वी लढयाचे उदाहरण ताजे आहे. आर्थिक सुधारणांच्या मागे लागलेल्या पश्चिम बंगाल सरकारने विशेष आर्थिक पट्टा विकसीत करण्यासाठी नंदीग्रामची निवड केली. व तेथे लोकांच्या शेतजमिनी घेऊन त्यावर मोठमोठे उदयोगधंदे उभारण्याची आखणी केली. परंतू लोकांनी आपल्या सूपीक शेतजमिनी देण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांच्यावर धाकदपटशा करून त्यांना मारहाण करण्यात आली. या आंदोलनामुळे पश्चिम बंगाल सरकारची खूप नाचक्की झाली. आणि त्यांना विशेष आर्थिक पट्टयाचा आराखडा बासनात गुंडाळावा लागला.

३) **नागपूरचा मिहान प्रकल्प** – नागपूर येथे भारतातील मोठा कार्गो हब विमान दुरूस्ती केंद्र व आंतरराष्ट्रीय दर्जाचे मोठे विमानतळ बांधण्याचा प्रकल्प प्रथ्सवित आहे. विमानतळ प्राधिकरण, महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारचा हा संयुक्त उपक्रम नागपूरच्या सोनेगाव विमानतळाच्या परिसरात आकार घेत आहे व तो मिहान प्रकल्प म्हणून ओळखला जातो. या प्रकल्पासाठी विमानतळ परिसरातील विस्तृत जमीन अधिग्रहन करणे आवश्यक होते. काही जमीन वायुदलाची असल्याने ती हस्तांतरीत करणे सोपे गेले. पण शहरी वस्तीची जमीन व खेडयांतील शेतजमीन मिळवितांना विस्थापितांचा प्रश्न निर्माण झाला विस्थापितांच्या जमीनीला योग्य भाव मिळत नाही व मोबदला सुध्दा लवका मिळत नाही. शहरी वस्ती आपली जागा सोडण्यास तयार नाही यातून आंदोलन उभे राहीले. शेवटी शहरी वस्तीला अधिग्रहणातून वगळण्यात आले. अनेक गावकऱ्यांच्या ग्रामस्थांनी त्याविरूध्द आंदोलन उभारले त्यामुळे प्रकल्पाचे काम रखडले. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास नागपूर व सभोवतालच्या परिसराचा जसा झपाटयाने विकास होईल तसेच ध्वनीप्रदुषण व वायुप्रदुषण वाढुन पर्यावरणाला हानी सुध्दा होणार आहे. (डॉ. सुरेखा पंडीत, बापट – २००९–२६५, २६६).

अशा प्रकारे आधुनिक समाजात विकासाची प्रक्रिया अनेक समस्यांना घेवून येत आहे त्यातील विस्थापन ही एक महत्वपूर्ण सामाजिक समस्या निर्माण झाली आहे.

*संदर्भ ग्रंथ :*


*१. लोटे, रा. ज., भारतीय समाज आव्हाने व समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.*

*२. पंडीत, सुरेखा व बापट, पर्यावरणशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*

*३. अनुराधा, सुनीता नारंग, पर्यावरण अध्ययन, कल्याणी पब्लिशर्स, नवी दिल्ली.*

*४. पाटील, प्रमोद, भारतीय समाज प्रश्न आणि वर्तमान समस्या, अंशुल पब्लिकेशन, नागपूर.*

*५. आगलावे, प्रदिप, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*

# भारतातील भटक्या–विमुक्त जमातीं संदर्भातील आयोग, समित्या, अभ्यास : एक संक्षिप्त आढावा

**प्रा. विनायक सुभाष लष्कर,** विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, ४१३१०२ पुणे, महाराष्ट्र
मो. ८८०६८०६३६२ Email: vinayak.lashkar@gmail.com

भारतामध्ये ब्रिटिशांच्या आगमनानंतर या ठिकाणच्या मुलनिवासी जाती–जमातींना आणि विशेषतः उदरनिर्वाहासाठी भटकंती करणाऱ्या, नैसर्गिक संसाधनावर आधारित जिवन जगणाऱ्या आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यमध्ये सक्रिय सहभागी असणाऱ्या काही निवडक जाती–जमातींना ब्रिटिशांनी कायदा करून 'गुन्हेगार जमात' असे घोषीत केले. प्रस्तुत कायदा ब्रिटिशांनी १८७१ साली निर्माण केला. या कायदाअंतर्गत तत्कालीन १९८ जमातींना गुन्हेगार ठरविण्यात आले. याचाच फायदा तत्कालीक जातीयवाद व जमातवादाचे समर्थन करणाऱ्या मंडळींनी घेतला आणि यांमुळे अशा प्रवर्गामध्ये अंर्तभुत असणाऱ्या सर्व जमातींना प्रस्थापित समाजाकडून अनेक प्रकारच्या अन्याय अत्याचारांना बळी पडावे लागले.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील या ठिकाणच्या तथाकथित गुन्हेगार जमाती या पारतंत्र्यातच आपले जिवन जगत होत्या. स्वतंत्र भारतामध्ये देखील या जमातींना ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या 'खुल्या कारागृहामध्ये' म्हणजेच तारेच्या कुंपनामध्ये आपले जिवन जगावे लागत होते. ब्रिटिशांनी या जमातींच्या संदर्भात निर्माण केलेल्या सर्व कायदे व नियमांची स्वतंत्र भारत काटेकोरपणे अंमलबजावणी करत होता. या जमातीच्या लोकांना तारेच्या कुंपनाबाहेर संचाराचे स्वातंत्र्य नव्हते. ब्रिटिशांची गुलामगिरी झुगारुन देणारा आणि ब्रिटिशांचा अन्याय सहन न करणारा भारतीय समाज मात्र याच भारताचा एक मुलनिवासी समाज घटक पारतंत्र्यातच ठेवण्यात आपले भले मानत होता. स्वतंत्र भारतातील स्वातंत्र्य सेनानी, समाजसुधारक, प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेते मंडळी देखील या जमातींची काहीच दखल घेत नव्हते. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी आपण मात्र पारतंत्र्यामध्ये का जिवन जगत आहोत? हा प्रश्न सतत सतावत असल्या कारणाने याच जमातीमधील काही व्यक्तींनी तत्कालीक पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची भेट घेवून त्यांना स्वतंत्र भारतात देखील आपल्याला कशा प्रकारची अमानुष वागणुक मिळत आहे याचा पाढा वाचला, आपली व्यथा मांडली आणि आपल्याला न्याय मिळावा यासाठी विनंती केली. परिणामी पंडीत नेहरुनी १९५२ साली महाराष्ट्रामध्ये सोलापूर या ठिकाणी अस्तित्वात असणाऱ्या 'सेटलमेंट' मधील लोकांना तारेचे कुंपन तोडून मुक्त केले. या जमातींना भारताला स्वातंत्र्य मिळून देखील पारतंत्र्यातच जिवन जगावे लागत असल्याने आणि भारताच्या स्वातंत्र्यानतर तब्बल ५ वर्षांनी स्वातंत्र्य मिळाल्यामुळे त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीक मुख्यमंत्र्यांनी 'विशेष मुक्त' म्हणून 'विमुक्त' जमाती असा प्रवर्ग निर्माण करुन एकूण १४ जमातींचा 'गुन्हेगारी जमातींमध्ये' समावेश केला.

**राष्ट्रीय पातळीवरील आयोग व समित्या :–** स्वतंत्र भारतामध्ये या जमातींचा व्यवस्थित अभ्यास करुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक प्रकारच्या अभ्यासगट व शासकीय समित्यांची स्थापना केली गेली. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी देखील ज्या प्रशासकीय अधिकाऱ्यांसानी वंचित समुहांच्या सुधारणेविषयी धोरणांची निर्मिती केली त्यामध्ये १९१७ साली भारताचे शैक्षणिक आयुक्त (Educational Commissioner) असणारे सर हेन्री शार्प यांनी 'वंचित समुहांच्या' (Depressed Classes) गटा मध्ये पुढील तीन घटकांचा समावेश केला. यांमध्ये १) ऐतदेशिय/मुळ किंवा दऱ्याखो–यात वास्तव्यास असणाऱ्या जमाती (Aboriginal or Hill Tribes) २) वंचित समुह (Depressed Classes) आणि ३) 'गुन्हेगार जमाती' (Criminal Tribes).

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर तथाकथित गुन्हेगार जमातींच्या तत्कालीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी भारत सरकारने १९४९–५० मध्ये 'द क्रिमिनल ट्राईब ॲक्ट इनक्वॉयरी कमिटी' (The Criminal Tribes Act Enquiry Committee) अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली. या समितीने भारतामध्ये कोण–कोणत्या राज्यामध्ये 'गुन्हेगार जमाती कायदा' अस्तित्वात आहे याचा शोध घेवून त्याचे परिणाम काय होत आहेत याचा संपूर्ण आढावा घेवून या जमातींच्या संदर्भातील प्रश्नाची मांडणी केली आहे. याचबरोबर यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी काही उपाययोजनाही सुचविल्या आहेत. याचबरोबर या समितीने 'गुन्हेगार जमाती कायदा' नष्ट करुन 'सवयीचा गुन्हेगार कायदा' अस्तित्वात आणला.

यानंतर म्हणजे १९५२ साली स्वतंत्र भारताने 'गुन्हेगार जमातींच्या संदर्भात एक अत्यंत महत्वाचे असे पाऊल उचलले. ते म्हणजे या जमातींवर असणारा 'गुन्हेगारी' चा कलंक पुसण्याचे. स्वतंत्र भारताने 'द क्रिमिनल ट्राईब लॉ (रिपिल ॲक्ट) १९५२' हा कायदा करुन 'गुन्हेगार जमातीं'वर कायदेशीर रीत्या असणारा गुन्हेगारीचा कलंक पुसण्याचे काम केले. याचबरोबर स्वतंत्र भारताने विकास कार्यक्रम ठरविताना 'पंचवार्षिक योजना' भारतामध्ये सुरु केल्या आणि त्या माध्यमातून त्यांनी भारतीय समाजातील विविध समाज घटकांसाठी किंवा त्यांच्या उत्थानासाठी विविध आर्थिक, शैक्षणिक आणि पायाभुत सोयी सुविधांच्या संदर्भात काही कार्यक्रम तयार केले. या योजनामध्ये 'सामाजिक न्याय' या घटकांअंतर्गत विविध जाती जमातींच्या विकासाच्या योजना मोठ्या प्रमाणावर तयार केल्या. त्यामध्ये दलित आदिवासी इतर मागासवर्गीय, विमुक्त भटक्या जमाती आणि अल्पसंख्याक इ. घटकांचा समावेश केला.

भारत सरकारने २६ जानेवारी १९५३ साली संविधानाच्या अधिनियम ३४० अनुसार राष्ट्रपतींच्या आदेशाने काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली 'मागासवर्गीय आयोगाची' स्थापना

केली. हा आयोग 'कालेलकर' आयोग म्हणून परिचित आहे. प्रस्तुत आयोगाने दोन वर्षे सखोल अभ्यास करुन ३० मार्च १९५५ साली भारत सरकारला आपल्या अहवाल सादर केला. या अहवालामध्ये एकूण २३११ मागास जाती/समुदायाची यादी तयार करण्याचे काम केले होते. या समुदायापैकी २३७ जाती/समुदाय हे 'अति मागास' असल्याचे त्यांनी या अहवालामध्ये नोंदविले होते. प्रस्तुत आयोगाने भारत सकारला या जमातींच्या सामाजिक व आर्थिक उत्थानासाठी काही उपाययोजनाही सुचविल्या होत्या. यांमध्ये प्रामुख्याने १९६१ साली होणारी जनगणना ही जातीनिहाय केली पाहिजे. तांत्रिक व व्यवसाय प्रशिक्षण संस्थामध्ये मागासवर्गीय शिक्षित विद्यार्थ्यांना ७० टक्के जागा आरक्षित ठेवल्या पाहिजेत, नोकऱ्यामध्ये आरक्षण ठेवायला पाहिजे. आणि याचबरोबर शेती व शेतीवर आधारित व्यवसायासंदर्भात विशेष योजना तयार करुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सुचविण्यात आले होते.

यानंतर भारत सरकारने सन १९६५ साली अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या यादीची पुर्नतपासणी करण्यासाठी बी. एम. लोकूर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. प्रस्तुत समिती ही 'लोकुर कमिटी' म्हणूनच परिचित आहे. या समितीने त्यांच्या अहवालामध्ये विमुक्त व भटक्या जमातींच्या संदर्भात स्पष्टपणे असे नोंदविले आहे की, ''विमुक्त व भटक्या जमातीच्या लोकांमध्ये आदिवासी समुहाची अनेक लक्षणे आणि पारंपारिक दृष्ट्या चालत आलेली सामाजिक स्पृश्यता यांची लक्षणे दिसतात.'' या समितीने राज्य सरकारसोबत झालेल्या चर्चेदरम्यान असे देखील सांगितले की, या जमातींची जिवन जगण्याची पद्धती ही 'भटक्या' (Nomadic) स्वरुपाची असल्या कारणाने या जमातींना 'अनुसूचित जाती व जमातींच्यासाठी' (Sheduled Caste and Tribe) तयार केलेल्या योजनांचा पुरेसा फायदा होणार नाही.

१ जानेवारी १९७९ साली भारत सरकारने बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या वंचित जाती समुहाचा शोध घेण्यासाठी एका आयोगाची स्थापना केली. प्रस्तुत आयोग हा 'मंडल आयोग' म्हणून परिचित आहे. प्रस्तुत आयोगाने विमुक्त जाती जमातींच्या संदर्भात अशी भुमिका मांडली की, ''विमुक्त व भटक्या जमाती या भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अस्तित्वात असणाऱ्या अनुसुचित जाती–जमातीसारख्या वंचित आहेत.'' पारंपारिक व्यवसायामध्ये गुंतलेल्या जाती उदा. मच्छीमार, बंजारा, पाल इ. जाती या भारतामध्ये काही भागात इतर मागास वर्गीयांच्या सुचीमध्ये समाविष्ट केलेल्या दिसतात. या सर्व जमातींना अनुसूचित जाती–जमाती सारख्याच उत्थानाच्या सवलती मिळायला हव्यात व त्यांच्या उत्थानासाठी वेगळा विभाग व मंत्रालय निर्माण करायला हवे असे देखील सुचविण्यात आले होते.

भारत सरकारने २००२ साली भारतीय संविधानात्मक कार्याचे पुर्ननिरिक्षण करण्यासाठी न्यायमुर्ती व्यंकटचलय्या आयोगाची स्थापना केली. प्रस्तुत आयोगाचे मुख्य काम म्हणजे सध्या अस्तित्वात असलेल्या संविधानाचे कार्य योग्य पद्धतीने चालू आहे का? आणि भारतीय लोक या संविधानाने सुखी व समाधानी आहेत का? याची तपासणी करुन अहवाल सादर करणे हे होते. प्रस्तुत आयोगाने आपल्या अंतीम अहवालामध्ये भटक्या विमुक्त जमातींच्या संदर्भात मांडणी करताना असा उल्लेख केला आहे की, ''विमुक्त जमातीमधील लोकांना चुकीच्या पद्धतीने व बळजबरीने 'गुन्हेगार' म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. याचबरोबर कायद्याच्या रक्षाणाची जबाबदारी असणाऱ्या प्रतिनिधीप्रमाणेच सामान्य जनतेनेही या जमातींच्या लोकांना अन्याय अत्याचाराची वागणूक देवून त्यांची नेहमीच पिळवणूक केली. ''याचबरोबर प्रस्तुत आयोगाने 'डिनोटिफाईड ॲण्ड नोमॅडीक ट्राईब्स राईटस ॲण्ड ॲक्शन ग्रुप' यांच्या प्रतिनिधींनी या जमातींच्या संदर्भात सादर केलेल्या उपाययोजना व माहितीची दखल घेवून हा निर्णय घेतला की प्रस्तुत प्रकरण हे सामाजिक न्याय मंत्रालय, भारत सरकार, यांच्याकडे पाठवून अन्य आयोगामाफत याची तपासणी करण्यात यावी.

८ सप्टेंबर २००६ रोजी भारत सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालय विभागाने डॉ. गणेश देवी यांच्या अध्यक्षतेखाली भटक्या व विमुक्त जमातींच्या अभ्यासासंदर्भात १० सदस्य असलेल्या 'तांत्रिक सल्ला गटाची' (Technical Advisory Group) स्थापना केली. प्रस्तुत गटामध्ये निवड केलेले १० सदस्य हे जागतिक पातळीवरील भटक्या–विमुक्त जमातींच्या संदर्भात अभ्यास करणारे अभ्यासक व कार्येकर्ते होते.

प्रस्तुत अभ्यास गटाने विमुक्त व भटक्या जमातींची व्याख्या आणि त्यांची वेगवेगळ्या राज्यामध्ये असणारी असमान वर्गवारी यांचा पुर्नविचार करुन त्यांना एका समान पातळीवर आणण्याचे प्रयत्न करावेत असे सुचविले. या संदर्भात त्यांनी विशेषत्वाने विमुक्त व भटक्या जमाती या भारतामध्ये अस्तीत्वात असणाऱ्या राज्यातील प्रवर्गाप्रमाणे अनुसूचित जाती व जमातीच्या सुचिमध्ये समाविष्ट करावे अशी भारत सरकारला शिफारस केली आहे.

याचबरोबर विमुक्त व भटक्या जमातीची जनगणना करुन त्यांना त्यांचे मुलभूत मानवी अधिकार, सामाजिक न्याय व त्यांचे संविधानिक न्याय हक्क (Constitutional Rights) मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जावेत असे सुचित करण्यात आले. भटक्या स्वरुपाचे जिवन जगणाऱ्या जमातींना कसण्यासाठी जमिनी, वास्तव्यासाठी घरे व रोजगाराची साधने उपलब्ध करुन देवून त्यांना स्थिर स्वरुपाचे जिवन जगण्यासाठी अनुकुल परिस्थिती निर्माण करावी. विमुक्त व भटक्या जमातीच्या लोकांना त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, विज, शिक्षण, आरोग्य या सारख्या मुलभूत दैनंदिन जिवनासाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. याचबरोबर या जमातीच्या लोकांना जन्म, मृत्यु, जातीचे व रहिवासी दाखले, मतदानाचे ओळखपत्र, शिधा पत्रिका, गायरान जमिनीवर जनावरांना चराईचे हक्क या सारख्या सुविधा विनाअट त्वरित उपलब्ध करुन द्याव्यात. भटक्या विमुक्त जमातीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर अभ्यास समिती स्थापन केली जावी आणि भारतातील भटक्या विमुक्त जमातींच्या लोकांना लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य

संस्थेमध्ये प्रतिनिधित्व देण्यात यावे अशा प्रकारच्या मुलभूत शिफारशी या अभ्यास गटाने भारत सरकारला केल्या होत्या.

भारत सरकारने ६ फेब्रुवारी २००६ रोजी सामाजिक न्याय मंत्रालयाअंतर्गत बाळकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली 'विमुक्त भटक्या व अर्ध भटक्या जमाती राष्ट्रीय आयोगाची' स्थापना केली. प्रस्तुत आयोगाने वेगवेगळ्या राज्यामध्ये दौरे करुन तेथील राज्य सरकार, विविध जात संघटनांचे प्रतिनिधी त्या त्या भागातील सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक शास्त्रातील अभ्यासकांशी चर्चा केल्या. काही राज्यामध्ये विविध विषयावर कार्यशाळा व चर्चासत्र घेण्यात आले. या सर्व कृतीवर आधारित निष्कर्षाच्या आधारे प्रस्तुत आयोगाने २ जुलै २००८ रोजी भारत सरकारला आपला अहवाल सादर केला.

रेणके आयोगाने त्यांच्या अहवालामध्ये भटक्या विमुक्तांची लोकसंख्या अंदाजे १० ते १२ कोटी असल्याचे नमुद करत या लोकसंख्येच्या प्रमाणात भटक्या विमुक्तांना शासकीय/बिगरशासकीय विविध महामंडळे अस्थापना व कार्यालयांमध्ये नोकरीसाठी आरक्षणाची प्रमुख मागणी केली. याचबरोबर भारतामध्ये अनुसूचित जाती व जमातींना असणाऱ्या सोयी–सवलती व योजना ह्या भटक्या विमुक्त जमातींना देखील लागु कराव्यात अशी मागणी केली. भटक्या विमुक्तांसाठी अनुसूचित जाती–जमातीसारखी 'विशेष घटक योजना' (Sub-Plan) तयार करुन त्यासाठी विशेष आर्थिक तरतुद अर्थसंकल्पामध्ये करावी अशी शिफारस केली आहे. याचबरोबर भटक्या विमुक्त जमातींच्या सर्वांगीण उत्थानासाठी कायदेविषयक बाबींची पुर्नरचना, दैनंदिन जिवनावश्यक मुलभूत गरजा, शैक्षणिक क्षेत्रामध्ये सोयी–सवलती भटक्या विमुक्तांवरील अन्याय अत्याचार रोखण्यासंदर्भात कडक निर्बंध, स्त्रियांचे व बालकांचे आरोग्याचे, शिक्षणाचे व रोजगारासंदर्भातले प्रश्न या व अशा स्वरुपाच्या एकूण ७६ शिफारशी शासनाला सादर केल्या आहेत.

२६ नोव्हबर २०१० साली भारत सरकारने सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सल्लागार परिषदेमध्ये (National Advisory Counsil) भटक्या–विमुक्त जमातींच्या विकासासाठी काही योजना तयार करणे संदर्भात कार्यकारी गटाची (WorkingGroup) स्थापना करण्यात आली. प्रस्तुत कार्यकारी गटाने १८ एप्रिल २०११ रोजी रेणके आयोगाचे सदस्य व तांत्रिक सल्ला गटाचे सदस्य यांच्याबरोबर दोन वेळा राष्ट्रीय पातळीवर सल्लामसलती झाल्या. यानंतर १३ जुलै २०११ रोजी दुसरी सल्लामसलत झाली. या सल्लामसलतीसाठी समाजातील जमातीमधील नेते, मंत्रालयामधील अधिकारी, एनजिओंचे प्रतिनिधी आणि विद्यापीठातील तज्ञ यांना चर्चासत्रासाठी बोलविले होते. प्रस्तुत कार्य गटाने आयोजित केलेल्या उपरोक्त सल्ला मसलती व चर्चासत्र यांच्या माध्यमातून मिळालेल्या योगदानाच्या आधारे आपला अहवाल तयार केला. या अहवालामध्ये भटक्या विमुक्त जमातीसाठी शैक्षणिक, आर्थिक व कायदेविषयक तरतुदी करण्यात आल्या. यांमध्ये विशेषत: भटक्या विमुक्तांची जातीनिहाय गणना करणे, यांच्यावर होणाऱ्या अन्याय–अत्याचाराच्या संदर्भात कायद्यांमध्ये बदल करुन त्यांना संरक्षण देणे. यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करणे. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग व राज्य मानव अधिकार आयोग यांमध्ये किमान एक सदस्य भटक्या विमुक्तजमातींचा असावा, भटक्या विमुक्तांच्या आर्थिक उत्थानासाठी 'विशेष घटक योजना' तयार करण्यात यावे अशा प्रकारच्या अनेक शिफारशी नॅकच्या कृतीगटाने भारत सरकारला केल्या आहेत.

**राज्य पातळीवरील आयोग व समित्या :–** भारतामध्ये ज्या प्रकारे राष्ट्रीय पातळीवर भटक्या विमुक्तांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय उत्थानासाठी अनेकविध आयोग व समित्या नेमून वास्तविकतेचा शोध घेण्याचा व त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला गेला तशाच प्रकारे राज्य पातळीवर देखील काहीसे प्रयत्न केले केले. लेखाच्या या भागामध्ये भटक्या–विमुक्त जमातीच्या विकासाच संदर्भात महाराष्ट्र राज्य पातळीवर जे आयोग व समित्या नेमण्यात आल्या त्यांचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्र शासनाने १३ ऑगस्ट १९४९ रोजी डॉ. के. बी. अन्नोलीकर यांच्या अध्यक्षतेखाली भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी ९ सदस्यांची एक समिती स्थापन केली. प्रस्तुत समितीने महाराष्ट्र सरकारला जो अहवाल सादर केला त्यामध्ये भटक्या विमुक्त जमातींना अन्न, वस्त्र, निवारा व रोजगार मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे असे सुचविण्यात आले. याचबरोबर प्रस्तुत समितीने भटक्या विमुक्त जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे असे नमुद करत त्यामुळे शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे, त्यांना शाळेसाठी आवश्यक असणारी साधन सामग्री मोफत पुरवावी, मुलांना शासकीय वसतीगृहामध्ये राखीव जागांची तरतुद आणि या जमातीच्या मुलांसाठी शिष्यवृत्तीची देखील विशेष तरतुद करावी असे ठळकपणे सुचविण्यात आले होते. या जमातींच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात सुचना करताना या समितीने अधिक रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, उपलब्ध नोकऱ्यांमध्ये त्यांना विशेष संधी दिली जावी, तरुणांना स्वयंरोजगारासाठी मोफत प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दयावे आणि शासनानेही शासकीय पातळीवर स्वयंरोजगारासाठी आर्थिक सोयी व सवलती निर्माण कराव्यात असे सुचविण्यात आले होते. 'भटक्या' स्वरुपाचे जिवन हे भटक्या–विमुक्त जमातींच्या विकासामधील मुख्य अडथळा असल्याकारणाने तो दुर करण्यासंदर्भात देखील या समितीने त्यांना स्थिर करण्यासाठी काही शिफारशी महाराष्ट्र शासनाला सुचविल्या होत्या. यांमध्ये प्रामुख्याने भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांना निवासासाठी शासनामाफत मोफत घरे उपलबध करुन देणे, या जमातीच्या लोकांना स्वत:ची घरे बांधण्यासाठी अत्यंत अल्प दरामध्ये कर्जाची सोय उपलब्ध करुन देणे आणि रोजगाराचे साधन म्हणून भूमिहिनांना काही प्रमाणात का होईना शेतजमीन शासनाकडून दिली जावी असे सुचविण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्याला केंद्र सरकारकडून मिळालेल्या सुचनेनुसार महाराष्ट्र शासनाने १४ एप्रिल १९६० रोजी 'विशेष कार्यअधिकारी' हे शासन दरबारी पद निर्माण केले. या पदावर एल. बी. थाडे यांची नियुक्ती करुन भटक्या विमुक्त जमातीच्या जगण्याच्या स्थितीविषयी व उदरनिर्वाहाच्या साधनांच्या सद्यस्थितीविषयी अभ्यास करुन अहवाल सादर करण्याचे महाराष्ट्र शासनाने सुचविले. प्रस्तुत समीतीने आपल्या अभ्यासाअंती महाराष्ट्र शासनाला सादर केलेल्या अहवालामध्ये भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांची जिल्हानिहाय लोकसंख्येची आकडेवारी, त्यांचे समकालीन शैक्षणिक, निवारा व रोजगाराच्या स्थितीविषयी, या जमातींच्या भाषा, या जमातींचे मुळ स्थान आणि उपजिविकेची साधने इ. विषयीच्या माहितीच्या अंर्तभाव केला आहे. याचबरोबर प्रस्तुत समितीच्या अधिकाऱ्यांनी सदरचा अभ्यास अत्यंत कमी कालावधीमध्ये पुर्ण केला असल्याने अत्यंत

तोडका आहे. त्यामुळे या जमातीचा सविस्तर पुर्णअभ्यास करुन यांच्यासाठी व्यापक अशा विकासाच्या योजना तयार केल्या जाव्यात असे सुचविण्यात आले होते.

महाराष्ट्र सरकारने २००४ साली निवृत्त न्यायाधीश आर. एम. बापट यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सरकारच्या राज्य मागास आयोगा अंतर्गत भटक्या विमुक्त जमातीच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी एक समिती नेमली. प्रस्तुत समितीने अभ्यासाअंती तयार केलेल्या अहवालामध्ये विमुक्त–भटक्या जमातीच्या लोकांची सामाजिक, आर्थिक व राजकीय अवस्था अत्यंत दयनिय स्वरूपाची असल्याचे नमूद करत ज्याप्रमाणे आजही समाजामध्ये व शासन दरबारी अनुसूचित जाती/जमतीकडे बघण्याचा दृष्टीकोन आहे. त्याचप्रमाणे विमुक्त भटक्या जमातींना देखील वागविले जाते असे नमुद केले आहे. याचबरोबर बापट आयोगामध्ये असे ही नमुद करण्यात आले आहे की, विमुक्त व भटक्या जमाती आणि अनुसूचित जाती/जमाती यांच्यामध्ये सांस्कृतिक साम्य आहे. या सर्व कारणामुळे महाराष्ट्र सरकारने या सर्व जमातींना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करावे.

२३ ऑगस्ट २००५ रोजी महाराष्ट्र सरकारने पुन्हा बापट आयोगाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी पाडताळण्यासाठी व महाराष्ट्रातील मुळ 'विमुक्त जातींचा' अनुसूचित जातीमध्ये तर मुळ 'भटक्या जमातींचा' अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यासाठी न्यायमुर्ती अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली एक नविन आयोग नेमला. सुरुवातीच्या काळामध्ये कार्यालय, कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी नियुक्ती व त्यांच्या वेतनाचा खर्च या सर्व तांत्रिक बाबीमध्ये अडकल्यामुळे काहीच काम पुढे सरकू शकले नाही. २३ ऑगस्ट २०१२ रोजी प्रस्तुत आयोगाला काम करण्यासाठी मुदतवाढ देण्याविषयी चर्चा सुरु झाली. यानंतर १६ जानेवारी २०१३ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये याविषयी चर्चा होवून प्रस्तुत आयोगाला मुदत वाढ न देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेवून प्रस्तुत आयोगाच्या अध्यक्षांच्या बदली विषयी शिक्कामोर्तब केले गेले. प्रस्तुत आयोगाचे अद्यापपर्यंत काहीही काम झालेले अस्तित्वात नाही.

**समारोप** :– महाराष्ट्र राज्यातील आणि एकूणच भारतामधील विमुक्त भटक्या जमातींच्या संदर्भात उपरोक्त आयोग, समित्या, अभ्यास आणि कार्यगट यांच्या निर्मितीची पार्श्वभूमी, स्थापनेनंतरची स्थित्यतरे आणि अमंलबजावणी अभ्यासता. आपणाला या जमातींविषयी शासन दरबारी असणारी अनास्था आणि बेजबाबदार कार्यप्रणालीचा प्रत्यय येतो. महाराष्ट्रामध्ये भटक्या–विमुक्त जमातींच्या प्रश्नावर काम करणारे अनेक सामाजिक कार्यकर्ते जातीय संघटनांचे प्रमुख आणि बिगरसरकारी संस्था अस्तित्वात असून देखील या जमातींची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय अवस्था जैसे थे च आहे.

महाराष्ट्राची शाहू–फुले, आंबेडकरी विचारांची वारसा असणारी पुरोगामी आणि आर्थिक प्रगतीमध्ये वेगवान असण्याची प्रतिमा विचारात घेता, या ठिकाणच्या विमुक्त–भटक्या जमातींना आजही त्यांच्या मुलभूत गरजा व संविधानिक अधिकार मिळण्यापासून वंचित राहावे लागत आहे. या जमातींना आजही रोजगाराच्या शोधामध्ये भटकंती करावी लागत आहे. आजही या जमातींविषयी आणि जमातींच्या समकालीन प्रश्नांविषयी साधी माहिती व आकडेवारी देखील शासन दरबारी उपलब्ध नाही. या जमाती आजही समाजातील प्रभुत्वशाली जातीकडून होणारे अन्याय अत्याचार सहन करत आहेत. आजही या जमातींच्या लोकांकडे आपले प्रशासन 'गुन्हेगार' याच नजरेने पाहत आहेत. शासन आजही यांना स्थिर स्वरूपाचे जिवन जगण्यासाठी व उदरनिर्वाहासाठी शासकीय (पडिक) जमिनी देण्यास तयार नाही. या जमातीमधील जे लोक थोडेफार शिक्षण घेवून पांढरपेशीय व्यवस्थेचा भाग बनले त्यांना देखील शासन दरबारी अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या जमातीमधील दोन प्रकारचे वगळलेपण वाट्याला आलेला भाग म्हणजे स्त्रिया यांचे प्रश्न तर अत्यंत बिकट आहेत.

उपरोक्त सर्व प्रश्नांची यादी खूप मोठी आहे. या समस्यांवर आता आयोग, समित्या, कार्यगट आणि अभ्यासगट नेमण्याऐवजी, नेमलेल्या सर्व आयोग–समित्यांच्या पुर्नविचार करुन या जमातींना न्याय देण्याची गरज आहे. या जमातींना अनुसुचित जाती–जमातींप्रमाणे संविधानिक हक्क, लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक वाटा (बजेट) आणि सामाजिक सुरक्षेचा अन्याय व अत्याचार प्रतिबंध कायदा निर्माण करुन एक माणूस म्हणून जगण्याची संधी दिली पाहिजे. अन्यथा आपण कुठल्या देशाचे नागरीक आहोत? हा प्रश्न भविष्यकाळात या जमातींच्या डोक्यात निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. प्रस्तुत सामाजिक अराजकता निर्माण होण्या अगोदरच, योग्य ती उपाययोजना करणे, हे सामाजिक हिताच्या दृष्टीने योग्य पाऊल ठरेल. असे वाटते.

**References:**


1. Bijral, Q. (2017). "The violent legacy of stigma: Ex-criminal tribes in India". https://thelogicalindian.com/opinion/ex-criminal-tribes/ Criminal Tribes Act, 1871.
2. D'Souza, D. (n.d.). "Declared criminal at birth: India's denotified tribes". Manushi.
3. Fischer, F., & Forester, J. (1993). The argumentative turn in policy analysis and planning. Durham, NC: Duke University Press.
4. Jones, M.D., Shanahan, E.A., McBeth, M.K. (Eds.), 2014. The science of stories: Applications of the Narrative Policy Framework in public policy analysis. New York: Palgrave Macmillan.
5. Kapadia, K.M. (1952). "The criminal tribes of India". Sociological Bulletin, 1(2), 99-125.
6. Schwarz, H. (2010). Constructing the criminal tribe in colonial India: Acting like a thief. WileyBlackwell: Chichester, UK. Scott, J. (2010). The art of not being governed: An anarchist history of upland Southeast Asia. Yale University Press, New Haven, CT.
7. Solanki, A. (2014). The Criminal Tribes Act: Classifying criminals in British India (1871-1927). MA thesis, University of Chicago.
8. Solanki, A. (n.d.). "Notes on Language and Classification in case of the Criminal Tribes Act (1871- 1927)".
9. Torgalkar, V. (August 10, 2016). 69 Years after independence, there are still tribes that are considered 'born criminal'.
10. Welfare measures for denotified tribes sought (Jan 18, 2017).
11. National Commission for Denotified, Nomadic and Semi-Nomadic Tribes, Ministry Of Social Justice & Empowerment Government of India, (June 30, 2008).
12. http://socialjustice.nic.in/writereaddata/UploadFile/NCDNT2008-v1%20(1).pdf
13. National Advisory Council Working Group on Denotified and Nomadic Tribes, Ministry Of Social Justice & Empowerment Government of India, (November 26, 2010).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांची प्रासंगिकता

**प्रा. डॉ. एस. जे. इंगळे,** के. आर. एम. महिला महाविद्यालय, नांदेड.

भारतीय समाजाच्या वैचारिक जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. भारताच्या इतिहासात क्रांतीकारक बदल घडवुन आणण्याचे महान कार्य ज्या थोर पुरूषांनी केले त्यात डॉ. आंबेडकर हे अग्रगण्य होत. तत्कालीन समाज व्यवस्थेतील जातीयता, अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यामुळे भारतीय समाजजीवन अनेक समस्यांनी ग्रस्त बनले होते. भारताच्या सामाजिक जीवनात डॉ. आंबेडकरांच्या रूपाने एक अभूतपूर्व अशा जाणीवांचे, विचारांचे दालन उघडले गेले. त्यांनी दलितोद्धार, समाजोद्धार व स्त्रीयांच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले. समाजातील विविध विषयांवर व समस्यांवर मनन, चिंतन करीत बहुमोल विचार मांडले आहेत व आपल्या विचार कर्तृत्वाने आणि कर्तबगारीने समाजाला व देशाला नवे आयाम पुरविले असल्याने त्यांचे सामाजिक विचार आजही तितकेच बहुमोल आहेत.

डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक विचारांमध्ये समाजशास्त्रीय दृष्टीकोन असलेला आढळून येतो. समाज परिवर्तनासाठी व्यक्तीच्या मनात प्रथम सामाजिक जाणीव निर्माण होणे आवश्यक असुन, समाजाच्या प्रगती, विकास व परिवर्तनाच्या मार्गातील मुख्य अडचण म्हणजेच समाजात असलेली सर्व प्रकारची विषमता असल्याचे प्रतिपादन ते करतात. सामाजिक अन्याय, धार्मिक ग्लानी, राजकीय अवनती यामुळे समाजाची अधोगती होत असुन, धर्मावर आधारीत समाज वर्ण व अनेक जातीभेदांनी विभागला गेलेला असल्यामुळेच भारतीय समाजाची अधोगती झालेल्या मत व्यक्त करतांना ते दिसतात.

म्हणून सामाजिक संबंध हे न्यायावरच आधारलेले असावे असे त्यांना वाटत असे. मानवी प्रतिष्ठा, स्वातंत्र, समता व सामाजिक आर्थीक न्याय, भौतिक भरभराट, अध्यात्मिक शिस्त यासाठी त्यांनी त्यांचे सबंध आयुष्य वेचले देशाच्या प्रगतीसाठी जातीविरहीत, वर्गविरहीत असा समाज असल्याची आवश्यकता त्यांनी वेळोवेळी प्रतिपादन केलेली दिसते. थोडक्यात त्यांना एका नविन समाजाची घडण करावयाची होती. त्यांच्या मते स्वातंत्र, समता व बंधुत्व या तीन तत्वावर हिंदू समाजाची पुनर्रचना होणे आवश्यक असुन, त्यात सामाजिक न्यायाला महत्व दिले गेले पाहिजे. समाजातील सर्व घटकात सामंजस्य असेल तरच सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला वेग येईल असा आशावाद ते व्यक्त करत असल्याचे दिसून येते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांच्या अध्ययनाची आवश्यकता** : डॉ. आंबेडकरांचे सामाजिक विचार हे स्वातंत्र, समता, बंधुत्व व न्याय या आधुनिक मानवतावादी मुल्यांचा अंगीकार करणारे असल्यामुळे समाज परिवर्तन, समाज पुनर्रचनेच्या, सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने मार्गदर्शक व उपयुक्त असल्याने त्यांच्या सामाजिक विचारांची आवश्यकता भासते.

**गृहीतकृत्य** : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारात स्वातंत्र, समता, बंधुत्व व न्याय या तत्वांचा समावेश असल्याचे दिसून येते.'

**संशोधनाच्या मर्यादा** : प्रस्तूत अध्ययन करतांना मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गौरव ग्रंथ, इतर ग्रंथे, वर्तमानपत्रे यांची निवड केलेली आहे.

**डॉ. आंबेडकरांचे समाजविषयक विचार** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एका नविन समाजाची घडण करावयाची होती. देशाच्या प्रगतीसाठी जातीविरहीत, वर्गविरहीत असा समाज असण्याची आवश्यकता त्यांनी वेळोवेळी प्रतिपादन केली होती. त्यांच्या मते स्वातंत्र, समता व बंधुत्व या तीन तत्वांवर हिंदू समाजाची पुनर्रचना होणे आवश्यक असुन, त्यात सामाजिक न्यायाला महत्व दिले पाहिजे. समाज परिवर्तनासाठी प्रथम व्यक्तीच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण होणे आवश्यक असुन, समाजाची प्रगती, विकास व परिवर्तनाच्या मार्गातील मुख्य अडचण म्हणजेच समाजात अस्तीत्वात असलेली सर्व प्रकारची विषमता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केलेले दिसून येते. सामाजिक अन्याय, धार्मिक ग्लानी, राजकीय अवनती यामुळे समाजाची अधोगती होत असुन, धर्मावर आधारीत समाज वर्ण व अनेक प्रकाराच्या जातीभेदांनी विभागल्या गेल्यामुळे भारतीय समाजाची अधोगती झाल्याचे मत ते व्यक्त करतात. व्यक्तीचे सामाजिक आर्थीक न्याय, भौतिक भरभराट, अध्यात्मिक शिस्त यासाठी त्यांनी संपुर्ण आयुष्यभर कार्य केलेले दिसून येते. समाजातील सर्व घटकात सामंजस्य असेल तरच सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला वेग येईल असा आशावाद ते व्यक्त करतात.

हिंदु समाज व हिंदु समाजाची रचना यांच्या एकंदर स्वरूपाची त्यांनी चिकित्सा करून विश्लेषण केले. त्यावरून त्यांनी हिंदु समाजाला शिडी नसलेल्या मनो—याची उपमा दिली. त्यांच्या मते हिंदु समाज व्यवस्था ही श्रेणीबद्ध विषमता, सामाजिक विषमता व आर्थीक विषमता या प्रमुख तत्वावर उभारली आहे. हिंदु समाज हा केवळ जातीचा संग्रह आहे. म्हणून जातीभेदावर आधारलेल्या समाज व्यवस्थेवर त्यांनी तिव्र हल्ले चढविलेले दिसतात. जात ही एक घातकी संस्था असुन, शोषणाचे एक हत्यार म्हणून तिला स्थान आहे. जाती अंतर्गत विवाह हेच एकमेव जातीचे वैशिष्ट आहे. म्हणून जात नष्ट झाल्याशिवाय राजकीय व सामाजिक परिवर्तन होवु शकणार नाही. म्हणूनच जातीव्यवस्था व वर्णव्यवस्थेचा अंत करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

आपले ध्येय मानले होते. त्यांच्या मते जात ही राष्ट्रीय एकात्मतेच्या आड येत असल्यामुळे भारत हे एकात्म राष्ट्र बनू शकत नाही असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यावर उपाय सुचवितांना आंतरजातीय विवाह हाच त्यावर एकमेव उपाय असल्याचे विचार मांडलेले आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकरांनी जातीविरहीत, वर्गविरहित आदर्श अशा समाजव्यवस्थेचे, एकात्म राष्ट्राचे स्वप्न पाहीलेले दिसुन येते.

**डॉ. आंबेडकरांचे धर्मविषयक विचार :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवाला धर्माची नितांत आवश्यकता असल्याचे खंबीरपणे प्रतिपादन करतात. त्यांच्या मते धर्म हा सामाजिक जीवनाचा मुलभूत पाया आहे. कारण धार्मिक भावनेमुळे मानवात असलेल्या चांगल्या गुणांचा विकास होतो असे त्यांना वाटत असे. त्यादृष्टीने डॉ. आंबेडकरांचे धर्मविषयक विचार पाहता त्यांनी व्यक्त केलेले धर्मविषयक विचार हे हिंदुधर्माची चिकित्सा करतांना व बौद्ध धर्माची तत्वे मांडत असतांना प्रकट झालेली दिसुन येतात. धर्मात काय नसावे याचा विचार त्यांनी हिंदुधर्माच्या चिकित्सेच्या निमित्ताने केला आहे. तर धर्मात काय असायला हवे याची मांडणी त्यांनी बौद्ध धर्माची विशेषता सांगतांना केली आहे.

डॉ. आंबेडकराच्या मते खरा धर्म हा नितीवर आधारीत असुन, विवेक आणि विज्ञानाशी सुसंगत असतो. तो समता, स्वातंत्र व बंधुत्व यावर आधारीत असतो, शिवाय तो दारिद्रयाचे कधीही समर्थन करीत नाही म्हणून ज्या धर्मात समता, प्रेम व आपुलकीची भावना नसते त्या धर्माला धर्म म्हणावयास त्यांचा नकार होता. जो धर्म वर्तमान समृद्ध करण्यासाठी व भवितव्य घडविण्यासाठी माणसाला प्रोत्साहन देतो. माणसांच्या मनात अशा पल्लवीत करतो व फुलवतो तोच धर्म हा खरा धर्म होय, असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी धर्म हा बुद्धीप्रामाण्यवादी व मानवतावादी असावा अशी अपेक्षा धर्माकडून व्यक्त केलेली आहे. तसेच धर्म हा मानवाच्या सेवेसाठी असुन, मानव त्याचे साधन राहता कामा नये. धर्म हा व्यक्तीच्या विकासाला अनुकूल असावा, तो प्रगतीशील असावा, शिवाय धर्माचे नितीनियम सर्वांना समान असावेत. डॉ. आंबेडकरांच्या अपेक्षीत असलेल्या धर्माच्या कल्पनेत धर्मभोळेपणा, मुर्तीपुजा, हटवादीपणा, ढोंगीपणा, धर्मवेडेपणा, व्यक्तीवाद, गुढवाद, परंपरावाद, दारिद्रय यांना अजीबात थारा नव्हता. जो धर्म कोट्यावधी लोकांना त्यांचा कोणताही दोष नसतांना गुन्हेगारांपेक्षा वाईट रितीने वागवतो, विशिष्ट लोकांना पिढ्यांन—पिढ्या इहलोकांचा नरक यातना भोगावयास लावतो, तो धर्म हा धर्म होवुच शकत नाही. जो धर्म आपल्या दोन अनुयायांमध्ये भेदभाव करतो, गुन्हेगारांपेक्षा अधिक वाईट वागवतो, त्यावर असहाय दुबळेपणा लादतो तो खरा धर्म नव्हे, म्हणून असा धर्म डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हता. हिंदुधर्मात अस्पृश्यांकरीता, त्यांच्या आत्मोन्नतीला पोषक असे वातावरण नाही म्हणून त्यांनी आयुष्यभर त्याविरूद्ध व जातीव्यवस्थेच्या जुलमाविरूद्ध लढा दिलेला दिसुन येतो.

डॉ. आंबेडकर यांच्या मते मानवी समाजासाठी धर्माने उपयुक्त अशा तीन गरजा भागविल्या पाहिजेत त्या गरजा म्हणजे १. धर्म हा आधुनिक विज्ञानाशी सुसंगत व सहमत असला पाहीजे. २. धर्माने स्वातंत्र, समता व बंधुत्व या मुलभूत तत्वांना मान्यता दिली पाहीजे. ३. धर्माने दारिद्रयाची थोरवी व महती गाउ नये. या तीन गरजा धर्माने भागविल्या पाहिजेत. या सर्व गरजा त्यांच्यामते केवळ बौद्ध धर्मच पुर्ण करू शकतो. कारण भगवान बुद्धाने सामाजिक, आर्थीक व राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. तद्वतच स्त्री—पुरूष समानतेचा पुरस्कार ही या धर्माने केलेला असल्याने सामाजिक समता निर्माण होण्यासाठी एकमेव बौद्ध धर्मच त्यासाठी योग्य आहे. हा निष्कर्ष त्यानी केलेल्या सर्व धर्माच्या तौलानिक अभ्यासा अंती काढला. त्यांच्या मते बौद्ध धर्म हा व्यक्तींच्या सर्वागीण प्रगतीसाठी पोषक असुन, या धर्मात द्रव्यबळ, मनुष्यबळ व मानसिक बळ प्राप्त होउ शकते. म्हणून बौद्ध धर्म हा सर्वांगीण प्रगतीसाठी पोषक असुन, या धर्मात द्रव्यबळ, मनुष्यबळ व मानसिक बळ प्राप्त होउ शकते. म्हणून बौद्ध धर्म हा सर्वांगिण कल्याणाचा मार्ग असुन, तोच धर्म राष्ट्राची उन्नती करू शकतो, अशी त्यांच्या मनाची खात्री पटल्यानंतर १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी त्यांनी आपल्या लाखो अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धर्माची दिक्षा घेतलेली दिसुन येते.

**डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा मागोवा घेतांना असे दिसुन येते की, त्यांना अभिप्रेत असलेली शिक्षण पद्धती म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धीक विकास करून स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्ती निर्माण करणारे, व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचे, विकासाचे सहायभूत साधन असुन, शिक्षणाचे महत्व सांगतांना ते म्हणतात, उपासमारीने शरिराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीन बल होउन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाअभावी तो निर्बुद्ध राहील्यास जीवंतपणी दुस—याचा गुलाम होतो. म्हणुन शिक्षणाला त्यांनी व्यक्तीची सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे आर्थीक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र मिळविण्याचे शस्त्र मानलेले दिसुन येते.

डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व ओळखले होते, त्यांनी त्यांचे पहिले उपास्य दैवत विद्या हेच मानले होते. त्यांचे विद्येचे वेड भयंकर होते. चोवीस तास ते विद्येची उपासना करीत असत. अस्पृश्य समाजाच्या सर्वागीन विकासासाठी, त्यांच्या उज्वल भविष्यासाठी उन्नतीसाठी जर कोणती गोष्ट आवश्यक असेल तर ते शिक्षण होय, अशी डॉ. आंबेडकरांची ठाम समजूत होती कारण त्यांच्या मते अस्पृश्यता नष्ट करायची असेल, माणसाला माणूस म्हणून जगायचे असेल, तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे त्यांचे मत होते. म्हणून अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी, त्यांना इतर समाजाच्या

बरोबरीने आणण्यासाठी त्यांनी राज्यघटनेत तशा प्रकारची व्यवस्था केलेली दिसुन येते. त्यांच्या मते आपण शिकलो म्हणजे सर्व काही झाले असे नाही तर शिक्षणाबरोबरच माणसाचे शील ही सुधारले पाहीजे. कारण शीलाशिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे असे त्यांना वाटत असे. याबाबत त्यांनी अनेकदा आपल्या सभा, परिषदांमधून वेळोवेळी विचार व्यक्त केलेले दिसून येतात. विद्या हा माणसाचा तिसरा डोळा आहे, ज्ञान संपादन केल्याशिवाय माणसाला तरणोपाय नाही, विद्येशिवाय मानवाला शांतता नाही, विद्या ही महासागरासारखी आहे, ज्याप्रमाणे मानवाला जीवन जगण्यासाठी अन्नाची गरज आहे, तशीच विद्येचीही गरज आहे. कारण ज्ञानाशिवाय व्यक्ती काहीही करू शकत नाही. परंतु शिक्षण हे नवमानवतावादाचे संस्कार करणारे असावे, असा त्यांचा आग्रह असलेला दिसुन येतो.

**डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यते बद्दलचे विचार :** हिंदू धर्म हा चातुर्वण्यावर आधारलेला आहे. चातुर्वण्यातून जातीभेद निर्माण होतो म्हणून अस्पृश्यतेचे मूळ जातीव्यवस्थेत आहे. जातीभेदातून अस्पृश्यतेचा उमग झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते अस्पृश्यता ही साधीसुधी गोष्ट नसुन ती आपल्या दारिद्र्याची व हीनतेची जननी आहे. तिच्यामुळेच अस्पृश्यांची विपन्नदशा झालेली दिसते. अस्पृश्यांना हिंदुधर्माने कमी लेखले. त्यांच्यावर नको ते निर्बंध सवर्ण हिंदुनी लावले. म्हणून अस्पृश्यता नष्ट करावयाची असेल तर जातीसंस्थेवर आघात केला पाहिजे, शुद्रातिशुद्रांचे स्वातंत्र हिंदुधर्माने हिरावुन घेतले. त्यांना गुलाम करून गुलामासारखे निर्बंध लादून जनावरांच्या पातळीवरचे जीवन जगण्यास भाग पाडले. हिंदुधर्माने जातीव्यवस्था व अस्पृश्यता यांच्या रूपात समाजात विषमता, भेदाभेद निर्माण केले. या संदर्भात ते म्हणत, आत्म्यात परमात्मा मानणा—या हिंदुधर्मातील लोक मुंग्यांना साखर खाउ घालतात, पण अस्पृश्य माणसाला मात्र पाण्याच्या थेंबासाठी तडफडावे लागते ही भयंकर विसंगती आहे. हिंदुधर्माने अस्पृशांवर जाचक निर्बंध लावुन त्यांना दारिद्र्यात पिचत ठेवले, वेठबिगार बनविले. म्हणून हिंदु समाजात जोपर्यंत जाती आहेत तोपर्यंत अस्पृश्यता जीवंत राहील असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून ते आपल्या अस्पृश्य बांधवांना नेहमी म्हणत की, अस्पृश्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःचा उद्धार केला पाहिजे, त्यांनी स्वयंप्रकाशित झाले पाहीजे, परप्रकाशित राहू नये यासाठी त्यांनी अस्पृश्य समाजावर लादलेल्या गुलामगिरीविरूद्ध आवाज उठवुन त्यांनी अस्पृश्यांना जागृत केले. त्यासाठी त्यांनी अनेक सामाजीक व धार्मीक चळवळी केल्या. या चळवळीचा उद्देश मानवी हक्क व स्वातंत्राचे रक्षण करणे हा होता. डॉ. आंबेडकरांनी आपल्या संपुर्ण हयातीत सार्वजनिक व राजकीय जीवनात जे जे लढे दिले, चळवळी केल्या. भुमिका घेतल्या, त्या सर्वात अस्पृश्यता नष्ट करावी हेच त्यांचे ध्येय राहीले. त्यांच्या अस्पृश्यता निवारण चळवळीचा मुख्य हेतू अस्पृश्यांना स्वातंत्र मिळवून देणे हाच होता व ते स्वातंत्र धर्मांतराशिवाय मिळणार नाही. हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी योग्य विचारांती आपल्या असंख्य अनुयायांसह बौद्ध धर्मात प्रवेश केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. भारताची जुनी समाजरचना मोडून ती नवीन आधुनिक मुल्यांवर उभारण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्य व आदिवासी यांना संरक्षण देण्याच्या तरतुदीचा समावेश केला. घटनेने, कायद्याने अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी पार पाडले. हे त्यांच्या अस्पृश्यतेविरूद्धच्या लढ्याचे एक यशच म्हणता येईल.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार :** डॉ. आंबेडकर समस्त मानवजातीच्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. म्हणूनच स्त्रीयांच्या गुलामगिरीकडे, त्यांच्या गौणस्थानाकडे त्यांचे लक्ष वेधल्या गेले. एखाद्या समाजाची प्रगती त्या समाजात स्त्रीयांचा दर्जा किती उच्च असतो यावर अवलंबून असल्याचे प्रतिपादन ते करतात व स्त्रीयांची हिनस्थीती होण्यास कारण येथील धर्म परंपरेने आलेले धर्मग्रंथ व त्यातील विचार त्यास जबाबदार असुन, स्त्रीयांचे सर्व मानवी हक्क हिरावून घेवुन विषम समाजरचना निर्माण करणारा प्रतिनिधीक ग्रंथ मनुस्मृती नष्ट करण्यासाठी व समताधिष्ठीत समाज निर्मितीसाठी त्यांनी मनुस्मृतीचे दहन केलेले दिसुन येते. मनुस्मृती दहन प्रसंगी मुलींना शिक्षण, ज्ञान देणे आवश्यक असुन, त्यासाठी आपण घडपड करावी, असा उपदेश करून पूढे ते म्हणतात,. स्त्री ही पुरूषांप्रमाणे एक पुर्ण व्यक्ती आहे आणि म्हणून तिला व्यकती स्वातंत्र असायला हवे. लग्नानंतर पत्नी ही पुरूषाची समान अधिकारी असलेली गृहीणी असली पाहीजे, ती नव—याची गुलाम असता कामा नये असे त्यांना वाटत असे. एक भारतीय नागरीक म्हणून स्त्रीलाही तेच सर्व हक्क असावे जे की एका पुरूषाला असतात. शिवाय स्त्रीच्या असणा—या गौन स्थीतीत आमुलाग्र बदल घडवून आणणारा, तिला ख—या अर्थाने एक नागरीक म्हणून एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगता यावे यासाठी हिंदु कोड बीलाचा मसूदा मांडला. हिंदु कोड बील हे स्त्रीयांच्या समानत्वाच्या दृष्टीने टाकलेले एक क्रांतीकारक पाउल होते. त्याद्वारे त्यांनी समग्र स्त्रीयांच्या उन्नतीचा मार्ग ख—या अर्थाने खुला केल्याचे दिसुन येते. म्हणूनच ते शोषितांचे मुक्तादाता ठरतात.

**डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. सांसदीय शसनपद्धती ही देशाच्या सर्वांगीन विकासाला उचीत आहे असा सूत्रबद्ध विचार मांडून त्यांनी जाती, धर्म, पंथ, भाषा याच्या पलीकडील सत्तेचा आग्रह धरला होता. भारतीय लोकशही बलशाही झाल्याशिवाय भारतीय समाज आणि राष्ट्र बलशाही होणार नाही. लोकशाही हा एक प्रकारचा जीवनमार्ग आहे. ती एक प्रकारची सर्वकष समाज व्यवस्था आहे. अशी त्यांची धारणा होती. शिवाय खरी

लोकशाही ही राजकीय, आर्थीक व सामाजिक असली पाहिजे असे त्यांना वाटत असे. त्यांच्या मते जे सरकार स्वतंत्र्य समानता व बंधुत्व यांना बरोबर घेवुन चालते ज्यात सन्मान, सहकार्य, प्रेम व मीत्रत्व आहे हेच त्यांना आदर्श सरकार वाटत असे. ते राजकारणाला समाजविकास व परिवर्तनाचे साधन म्हणून पहात असत. एकात्मसमाज निर्माण करणे हे त्यांचे स्वप्न होते. भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असावे असा त्यांचा अग्रह होता. धर्मनिरपेक्षता हे मूल्य आपल्या संविधानांचे फार मोठे बळ आहे हे आपण पहातोच. कारण धर्मांध शक्तींना, जातीयवादी शक्तींना आवर घालण्यासाठी हे तत्व किती प्रभावी ठरत आले आहे, हे आपणांस वेळोवेळी दिसून येते. डॉ. आंबेडकरांच्या विचारात न्याय, समानता, स्वातंत्र्य व बंधुत्व ही तत्वे आहेत. ह्या तत्वात विविध जाती धर्मांना एकत्रीत बांधण्याचे सूत्र असुन, ती राष्ट्रीयतेची द्योतक असल्याचेही दिसुन येते. समाजवादी समाजरचना निर्माण व्हावी असा त्यांचा अग्रह होता. तसेच लोकशाहीवर त्यांची खूप निष्ठा होती. तसेच त्यांच्या मते लोकशाहीत रक्ताचा एक थेंबही न सांडता लोकांच्या आर्थीक व सामाजिक जीवनात क्रांतीकारी बदल घडवुन आणला जातो. त्यांच्या मते अर्थात लोकशाहीच्या विकासासाठी समतेची, मजबूत विरोधी पक्षाची, घटनात्मक निमिमत्तेची आवश्यकता असुन, त्यात कायदा व प्रशासन सर्वांसाठी समान असावे, बहुसंख्याकांचे अल्पसंख्यांकावर राज्य नसावे. तसेच लोकशाहीत व्यक्तीपुजा नसावी. सद्सद्विवेकबुद्धी ही लोकशाहीच्या विकासासाठी आवश्यक असते असे त्यांना वाटते.

एकात्म समाज निर्माण करणे हे त्यांचे स्वप्न होते. भारतीयांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे आवश्यक असुन, त्यासाठी एकोपा, सहभाग वाढवुन भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणले पाहिजे. तेंव्हाच समाजात एकात्मता निर्माण होईल. परंतु असे साध्य होणे त्यांना अवघड वाटत असुन, त्याला कारण भारतातील जातीप्रथा हे होय. म्हणून हा अडथळा नष्ट केला पाहिजे असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय एकात्मतेत ज्याप्रमाणे धर्म, पंथ, जाती, प्रांतवाद हे घटक अडथळा ठरतात, त्याचप्रमाणे भाषा हा सुद्धा फार मोठा अडथळा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केल्याचे दिसते. थोडक्यात त्यांचे राजकीय विचार हे सर्वांना सामाजिक न्याय देण्याच्या प्रेरणेने भारावलेले असुन, त्यातून भारतीयांचे सर्वांगिण कल्याण साधणारे असल्याचे दिसुन, येतील.

**डॉ. आंबेडकरांचे आर्थीक विचार :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययन व चिंतनाचा अर्थशास्त्र हा महत्वाचा विषय होता. त्यांनी अर्थशास्त्रात विपूल असे संशोधन व लेखन केलेले आहे. त्यांनी सामुदायिक शेती, भूमिहीन मजूर, लहान जमीनी, खोती पद्धती, महार वतन, जमीन महसूल, जमीनदारीचे उच्चाटन, उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण, समाजवाद, समान कर विषयक धोरण अशा विविध विषयांवर त्यांनी आपले विचार प्रकट केले आहेत. यातून त्यांच्या अर्थविषयक विचारांचा मागोवा घेता येतो.

डॉ. आंबेडकरांच्या मते जनतेच्या कल्याणासाठी आर्थीक सत्तेचे केंद्रकरण टाळणे, संपत्तीचे योग्य वाटप होणे हा उपाय महत्वाचे असतो. समाजवादी अर्थव्यवस्थेत आर्थीक शोषण, पिळवणूक या घटकांना वाव नसतो. लोकशाहीच्या चौकटीतच समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा, अशी त्यांची अपेक्षा होती. समाजातील शोषीत, पीडीत वर्गाचे आर्थीक शोषण थांबविण्यासाठी त्यांनी समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार केला.

डॉ. आंबेडकरांच्या मते भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा शेती हा पाया आहे. त्यातही अर्थव्यवस्था ही पुर्णपणे शेतीवरच आधारीत आहे. शेतजमिनीच्या मालकीबाबत कमालीचे केंद्रीकरण झाले आहे. हे केंद्रीकरण ग्रामीण भागातील वरीष्ठ जातींकडे एकवटलेले आहे. याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील कनिष्ठ जाती परंपरेने ठरवून दिलेली कामे करीत असतात. त्यामुळे अतिशय असहाय अवस्थेत श्रमीक, शेतमजूर हे बंदीस्त अवस्थेत जीवन जगतात. त्यांच्या मते आर्थीक व सामाजिकदृष्ट्या प्रबळ असणा—या वर्गाच्या दबावामुळे श्रमीक व शेतमजूर यांचे आर्थीक शोषण होते. अशा अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात बदल होणे आवश्यक असल्याचे मत ते नोंदवितात. म्हणून जोपर्यंत परंपरागत स्वरूपाची ग्रामीण अर्थव्यवस्थेची चौकट उखडणार नाही, तसेच जातीव्यवस्थेच्या शृंखला तोडल्याशिवाय या विशिष्ट समुहाचाच नव्हे तर देशाचाही आर्थीक विकास होणार नाही, असे विचार ते व्यक्त करतात. पारंपारिक अर्थव्यवस्था व भांडवलदारांना अनुकूल असणारे आर्थीक धोरण शासनाने अंगिकारल्यामुळे दलित जाती, जमाती दारिद्रय रेषेखाली, गुलामीचे जीणे जगत आहेत. म्हणून ग्रामीण समाजातील परंपरागत चौकटीतील आर्थीक गुलामगिरीविरूद्ध दलितांनी, शोषितांनी आवाज ग्रामीण अर्थव्यवस्थेची चौकट उखडणार नाही, तसेच जातीव्यवस्थेच्या शृंखला तोडल्याशिवाय या विशिष्ट समूहाचाच नव्हे तर देशाचाही आर्थीक विकास होणार नाही, असे विचार ते व्यक्त करतात. पारंपारिक अर्थव्यवस्था व भांडवलदारांना अनुकूल असणारे आर्थीक धोरण शासनाने अंगिकारल्यामुळे दलित जाती, जमाती दारिद्रय रेषेखाली, गुलामीचे जीणे जगत आहेत. म्हणून ग्रामीण समाजातील परंपरागत चौकटीतील आर्थीक गुलामगिरीविरूद्ध दलितांनी, शोषितांनी आवाज उठविला पाहिजे, असा क्रांतीकारक विचारही त्यांनी मांडला. त्यांच्या आर्थीक विचारात सामान्यजनांमध्ये न्याय रितीने संपत्तीची विभागणी करणे हा हेतू दिसून येतो. सामुदायिक शेतीमुळे भूमिहीन मजूरांचा प्रश्न सोडविल्या जावा असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. खोती पद्धती विरूद्धही डॉ. आंबेडकरांनी प्रथम आवाज उठविलेला दिसुन येतो. रत्नागिरी येथे भरलेल्या दलित वर्गाच्या

परिषदेत त्यांनी ही पद्धती रद्द करण्यासाठी प्रयत्न केले. कारण खोती पद्धती ही रक्त शोषण करीत असुन, ती नाहीशी करण्यानेच शांतता आणि प्रगती साधेल असे सांगून जनतेस त्याविरूद्ध चळवळ करण्यास प्रेरणा दिल्याचे दिसून येते. ''जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक्स सोसायटीच्या'' नियतकालीकात डॉ. आंबेडकरांनी लहान शेतजमिनी व त्यावरील उपाय यावर एक लेख लिहीला होता. जमीनीच्या होणा—या अनेक तुकड्यांमुळे होणारे दुष्परिणाम हे जमिनीच्या एकत्रीकरणाने कमी होतील पण त्या जमीनी आर्थीकदृष्टीने फलदायी नसतील तर त्यांचा काही उपयोग नसतो, असे त्यांचे मत होते.

जमीनीच्या उत्पन्नावर जमीन महसूल आकारणे अन्यायाचे असल्याचे त्यांना वाटते. कर भरण्याची पात्रता ही उत्पन्नात वाढ झाल्यावरच असते. परंतु जमीन महसुलाबाबत गरीब व श्रीमंत यांना सारखाच कर भरावा लागत असे, त्यांना हे मान्य नव्हते.

शेतजमीनीच्या राष्ट्रीयकरणाबरोबरच डॉ. आंबेडकरांनी देशातील महत्वाच्या आधारभूत उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण करावे असेही सुचविलेले दिसते. भारतात औद्योगिकरण ही बाब आवश्यक असल्याचे त्यांनी वेळोवेळी प्रतिपादन केले. ग्रामीण भागातील औद्योगिकरण व सुधारीत शेती यांचा उपयोग देशातील कामगारांना कामे देण्यात होईल. परिणामी बेकारी दूर होईल, असा विश्वास ते व्यक्त करतात. थोडक्यात देशातील आर्थीक विषमता नष्ट होण्यासाठी आर्थीक समता प्रस्थापित करणे महत्वाचे असेल किंबहूना स्वातंत्र्याचा खरा अर्थ प्राप्त होण्यासाठी आर्थीक समता महत्वाची असते, अशा स्वरूपाचे आर्थीक विचार त्यांनी मांडलेले दिसून येतात.

**निष्कर्ष** : १. डॉ. आंबेडकरांनी जे मानवतावादी, धर्मनिरपेक्षतावादी भावना व एकात्मता वृद्धींगत होण्यास त्याचप्रमाणे नविन, सुजान, निकोप व वैभवशाली भारत निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व निर्माण व्हावे यासाठी स्वातंत्र्याचे विचार, दास्यत्व झुगारून देणारे विचार व देशनिष्ठा जपणारे असे बहुमूल्य विचार आहेत ते आजही प्रेरणादायी ठरतात. २. देशातील आर्थीक विषमता नष्ट होण्यासाठी आर्थीक समता प्रस्थापित करणे महत्वाचे आहे. किंबहूना स्वातंत्राचा खरा अर्थ प्राप्त होण्यासाठी आर्थीक समता त्यांना महत्वाची असल्याचे स्पष्ट होते. ३. डॉ. आंबेडकरांनी लोकशाही पद्धतीच्या सरकारला आदर्श सरकार म्हटले आहे. त्यांच्या मते, जे सरकार स्वातंत्र, समानता व बंधुत्व यांना घेवुन चालते तेच आदर्श सरकार होय. ४. स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार व स्त्री—पुरूष समानतेसाठी अनेक सभा संमेलने, महिला परिषदा, लिखान, हिंदू कोडबील, राज्यघटनेतूर भर दिल्या गेल्याचे दिसून येते. ५. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांच्या अवनतीला मनुस्मृती जबाबदार असल्याचे म्हटले आहे. स्त्रीयांच्या प्रगतीवरून समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करावयास हवे असा विचार ते व्यक्त करतात. ६. मानवी हक्काचे, स्वातंत्र्याचे रक्षण करणे यासाठी त्यांनी कार्य केले व त्यांच्या हक्क व अधिकारांसाठी राजकीय लढा दिला. ७. डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचारप्रणालीने, कार्यकर्तृत्वाने आयुष्यभर अस्पृश्य वर्गात स्वाभीमान, महत्वाकांक्षा व जागृती निर्माण केली. अस्पृश्य समाजावर वर्षानुवर्षे लादलेल्या गुलामगिरीविरूद्ध आवाज उठवुन अस्पृश्य समाजाला जागृत केले. ८. मुलांच्या शिक्षणाइतकेच मुलींनाही शिक्षण आवश्यक आहे. समाजाची प्रगती ही मुलींच्या शिक्षणानेच झपाट्याने होईल, असा त्यांना विश्वास होता. ९. स्वाभिमानी, स्वावलंबन आणि आत्मोद्धार हे शिक्षणामुळे साध्य होतो असे त्यांना वाटते. १०. शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन असल्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घ्यायलाच हवे असा त्यांचा आग्रह होता. ११. मानवी समाजाच्या तीन गरजा धर्माने भागविल्या पाहिजे. धर्म हा विज्ञानाशी सुसंगत असावा, धर्माने स्वातंत्र, समता व बंधुत्व या मुलभूत तत्वांना मान्यता दिली पाहीजे. तद्वतच दारीद्र्याची थोरवी, महती ही धर्माने गाउ नये असे धर्माबद्दलचे विचार प्रतिपादन केलेले दिसतात. १२. स्वातंत्र, समता व बंधुत्व या तीन तत्वावर हिंदु समाजाची पुनर्रचना व्हावी व त्यात सामाजिक न्यायाला महत्व दिले गेले पाहिजे, म्हणजेच आदर्श समाज निर्माण करणे त्यांचे ध्येय असलेले दिसून येते. १३. देशाच्या प्रगतीसाठी जातीविरहीत असा समाज असण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.


***संदर्भग्रंथ सूची :***

*१. गंगाधर पानतावणे, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अभिजीत प्रकाशन, लक्ष्मीनगर, नागपूर, १९८७.*

*२. भीमराव रामजी आंबेडकर, बहिष्कृत भारत, ३/२/१९२८.*

*३. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२.*

*४. अधिवक्ते डॉ. बी. आर. आंबेडकरः जातीभेद निर्मुलन, भाषांतर—प्रा. मा. फ. गाजरे, प्रज्ञा प्रकाशन, पुणे, १९९२.*

*५. वा. ना. कुबेर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विचार मंथन, केसरी प्रकाशन, जून १९७२.*

*६. टी. ए. गवळी, प्रा. सुखराम हिवराळे, प्रा. पी. ए. गवळी, प्रा. सुधीर गव्हाणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १४ एप्रिल, १९९१.*

*७. मा. फ. गाजरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड २, अशोक प्रकाशन, नागपूर.*

*८. चांगदेव भगवान खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड १, प्रताप प्रकाशन, गिरगाव, मुंबई.*

*९. भालचंद फडके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ३० ऑक्टोबर, १९८५.*

# व्यक्तिमत्व विकासावर योगाचा परिणाम: एक अभ्यास

**प्रा. वसंत निनावे,** सहा. प्राध्यापक, शारीरिक शिक्षण न. प. शिवाजी महाविद्यालय, मोवाड, जि नागपूर

**प्रस्तावना :** भारतीयांना परंपरेने मिळालेल्या योग आणि ध्यान या देणग्या किती उपयुक्त आहेत, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. मात्र, यावर आता जगन्मान्यतेची मोहोर उमटली आहे. योग हा शब्द 'युज' या संस्कृत धातू पासून बनलेला आहे, ज्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे. योग ही भारतातील पांच हजार वर्ष प्राचीन ज्ञानशैली आहे. पुष्कळ लोकांचा असा समज आहे की योगाभ्यास म्हणजे शारीरिक व्यायाम आहे, ज्यात शरीर ताणले, वाकवले, पिळले जाते आणि अवघड श्‍वसन प्रक्रियांचा अवलंब केला जातो. खरेतर मानवी मन आणि आत्मा यांची अनंत क्षमता जाणून घेणाऱ्या या विज्ञानाची ही म्हणजे योगाभ्यासाची केवळ वरवरची ओळख झाली. योगाभ्यासामध्ये जीवनशैलीचा परिपूर्ण सारांश प्राप्त होतो. योग आणि ध्यान वैयक्तिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात, असे अमेरिकेतील पेनिसिल्विनिया विद्यापीठाच्या संशोधकांना आढळले आहे. ध्यानाद्वारे मेंदूला तीन माध्यमातून कसे एकाग्रचित्त करता येते याचा शोध त्यांना लागला आहे. याशिवाय ध्यानात राहूनही मेंदूला क्रियाशील ठेवता येते.

**व्यक्तिमत्व विकास :–** व्यक्तीचा शारिरीक, मानसिक, भावनिक व सामाजिक विकास होत असतो. या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तिचा हा घडलेला पिंड म्हणजे व्यक्तिमत्व होय. व्यक्तिमत्वाबाबत विशेष माहिती स्पष्ट होण्यासाठी पुढे काही व्याख्या दिल्या आहेत. १. 'व्यक्तिमत्व म्हणजे स्वत:च्या परिसराशी व्यक्तीचे जे वैशिष्ट्यपूर्ण समायोजन होत असते त्याला कारणीभूत असणारी व वर्तनाला चालना देणारी शारिरीक, मानसिक यंत्रणेची संघटना होय.' २. 'व्यक्तिमत्व म्हणजे सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाची गोळा बेरीज होय.' ३. 'व्यक्तिमत्व म्हणजे सामाजिक उद्दीपन मुल्य.'

**व्यक्तिमत्व विकासाचे निकष :–** शरीराचा रंग व ठेवण, बुद्धी इत्यादी गोष्टी घेऊन व्यक्ती जन्माला येते. या गोष्टी तिला आनुवंशिकतेने मिळालेल्या असतात. व्यक्तीकडे असलेल्या उपजत अशा बाबींना जैविक बीजे म्हणता येईल. जीवन जगत असतांना विविध बाह्य घटकांचा, प्रामुख्याने सामाजिक घटकांचा, व्यक्तीच्या विकासावर परिणाम होत असतो. जैविक बीजे आणि बाह्य घटक यांच्यातील आंतरक्रियेचा परिपाक म्हणजे व्यक्तीचे व्यक्तिमत्व होय. अर्थात व्यक्तिमत्व विकासात आनुवंशिकता आणि वातावरण या दोन्हीशी संबंधीत घटकांचा वाटा असतो. व्यक्तिमत्व विकासात वाटा असणारे काही घटक पुढीलप्रमाणे

**शरीररचना :** काही व्यक्तींना उंच धिप्पाड तर काहींना बुटके शरीर लाभलेले असते, काही व्यक्तींचे शरीर सुडौल आणि व्यंगरहीत असते तर काहींच्या ठिकाणी शारिरीक व्यंगे असतात. व्यक्तीच्या शरीररचेनाचा तिच्या समायोजनावर चांगला अथवा वाईट परिणाम होतो. उत्तम शरीरयष्टी व आकर्षक चेहरा असणाऱ्या व्यक्तींचा चेहरा इतरांवर लवकर प्रभाव पडतो. उत्तम शरीरसंपत्तीच्या बळावर व्यक्ती नेता बनू शकतो. काही व्यक्ती अतिशय बारीक असतात. लहानपणी मी पण फार हडकुळा होतो. माझे वडील मला नेहमी म्हणत हा एकेरी हाडाचा आहे. त्यामुळे हा बारीक आहे. परंतु सतत ह्व वर्ष व्यायाम करून माझे शरीर दुहेरी हाडाचे झाले. म्हणजे एकेरी हाड व दुहेरी हाड हा काही फरक नसतो. हे मला ह्व वर्षानंतर कळले. परंतु मला सुचवायचे एकच आहे. माणूस लहानपणी बारीक जरी असेल परंतु योग्य आहार व नियमित व्यायाम यामुळे आपणांस शरीर भारदस्त बनवता येते. यासाठी सर्वांनी नियमित व्यायाम, योगासन व प्राणायाम नियमित करणे अतिशय आवश्यक आहे.

**अंतस्त्राव ग्रंथी :** कंठपिंडातून जास्त स्त्राव होऊन रक्तात मिसळला तर वर्तनात अस्थिरता व चांचल्य येते. हा स्त्राव कमी झाला तर व्यक्ती सुस्त बनते. वृकस्थ पिंडातील स्त्रावामुळे भावनिक उद्रेकांच्या समयी शरीरव्यापावर ताबा राहतो. जननग्रंथीतील स्त्राव कामवासना वाढवितात. थोडक्यात हे लक्षात घ्यावयास हवे की, व्यक्तिमत्व विकासात अंतस्त्राव ग्रंथीचा महत्वाचा वाटा आहे.

**विविध क्षमता :** बौद्धिक क्षमतेचा व्यक्तिविकासावर फार परिणाम होतो. ज्या गोष्टी तैल बुद्धीच्या व्यक्ती सहज करू शकतात त्या गोष्टी मंद बुद्धीच्या व्यक्तींना जमत नाही. एखाद्या व्यक्तीच्या बुद्धीची चमक दिसताच अन्य व्यक्ती प्रभावित होतात. बुद्धीसामर्थ्याने कोणतीही व्यक्ती इतरांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकते. अभिक्षमतेमुळे व्यक्तिमत्व परिपुष्ठ होण्यास मदत मिळते.

**भौगलिक परिस्थिती :** भौगिलिक परिस्थितीनुसार व्यक्तिमत्वाला विशिष्ट वळण लागते. डोंगर व जंगल असलेल्या प्रदेशातील लोक जास्त कष्टाळू असतात. सुपिक मैदानी प्रदेशातील लोक जास्त धडपड न करणारे, संथ व ऐषआरामाचे जीवन जगणारे असतात.

**कुटुंब:** घर हाच मुलांचा पहिला सामाजिक परिसर होय. आई वडील व कुटुंबातील अन्य व्यक्तींच्या वर्तनाचा तसेच घरातील एकुण वातावरणाचा मुलांच्या वर्तनावर फार परिणाम होतो. मुलांच्या योग्य व्यक्तिमत्व विकासासाठी त्याची मातृप्रेमाची गरज योग्य त्या प्रमाणात लहानपणी भागविली जाणे अत्यावश्यक असते. ज्या मुलाला प्रेमळ, वत्सल, सद्वर्तनी, फाजील लाड न करणारे व अपत्याच्या योग्य विकासाची काळजी घेणारे आई वडील लाभतात त्यांचे व्यक्तिमत्व योग्य रीतीने उमलते. लहानपणीच मुलांकडून पालकांनी ग्रामगीता, ज्ञानेश्वरी, विविध आरती संग्रह, हरीपाठ पाठ करून घेतले तर मोठेपणी आपोआप मुलांवर चांगले संस्कार होतात. मुलांना वयाच्या ७ वर्षापासूनच नियमित योगासन व व्यायामाची सवय लावावी.

**शेजार व मित्र:** घराबाहेर पडता येऊ लागल्यावर मुले शेजारच्या समवयस्क मुलांबरोबर खेळू लागतात. चांगल्या मित्रांच्या सहवासात असणाऱ्या मुलांच्या व्यक्तिमत्वाचे चांगले पैलू पडत जातात, तर वाईट मुलांच्या संगतीत असणारे मुले दुर्वतनी होऊ लागते. 'संगती सगदोषोण' असे म्हटलेच आहे. समाज व संस्कृती सुसंस्कृत समाजात वाढणारी मुले व रानटी समाजात वाढणारी मुले यांच्या व्यक्तिमत्व विकासात महत्वाचे फरक आढळतात. सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाचा व्यक्तिमत्व विकासावर परिणाम होतो. त्याग, सेवा, सहिष्णुता यासारख्या मुल्यांची जोपासना करणाऱ्या समाजात वाढणाऱ्या मुलांमध्ये ही मुल्ये हळूहळू रूजत जातात. लोकशाही पद्धतीने जीवन जगणाऱ्या समाजात सहकार्याची भावना वाढीला लागते. काही समाज शांत तर काही भांडखोर वृत्तीचे असतात.

**योगाचा इतिहास व व्यक्तिमत्व विकासावर होणारा परिणाम :–** योग दहा हजार पेक्षा जास्त वर्षापासून प्रचलित आहे. या परंपरेचा उल्लेख नारदीय सुक्त आणि सर्वात प्राचीन अश्या ऋग्वेदामध्ये आढळतो. हा आपणास पुन्हा सिंधू–सरस्वती सभ्यतेचे दर्शन

घडवतो. या सभ्यतेमधील पशुपतीनाथांच्या एका नाण्यावर योगमुद्रा विराजमान आहे जी त्या काळातील योगाच्या व्यापकतेचे द्योतक आहे. अतिप्राचीन उपनिषद बृहद अरण्यक मध्ये योगामधील काही शारीरिक आसनांचा उल्लेख आढळतो. छान्दोग्य उपनिषदामध्ये प्रत्याहार चा तर बृहद अरण्यक मधील एका स्तवनामध्ये प्राणायाम चा सविस्तर उल्लेख आहे. प्रचलित योगाच्या स्वरूपाचा प्रथम उल्लेख कठोपनिषदमध्ये आहे जी आयुर्वेदाच्या कथा शाखामधील अंतिम आठ वर्गांमध्ये पहिल्यांदा येते जे मुख्य आणि अत्यंत महत्वाचे उपनिषद आहे. येथे योगाला अंतर्मनाच्या यात्रेसाठी तसेच चेतनेच्या विकासासाठी गरजेच्या प्रक्रियेच्या रुपात जाणले जाते.प्रसिद्ध संवाद "योग याज्ञवाल्क्य", जो बाबा याज्ञवल्क्य आणि शिष्या गार्गी यांच्यामधील संवाद आहे, ज्याचे वर्णन बृहद अरण्यक उपनिषदमध्ये आहे, यामध्ये श्वास घेण्याचे कित्येक व्यायाम प्रकार, शारीरिक शुध्दतेसाठी गरजेची आसने आणि ध्यानाचा उल्लेख आहे. गार्गी लिखित छांदोग्य उपनिषद मध्ये देखील योगासनांचा उल्लेख आहे. अथर्ववेद मध्ये संन्याश्यांच्या एका समुहामधील चर्चेनुसार शारीरिक आसने हि योगासने म्हणून विकसित होऊ शकतात यावर भर दिला आहे. विविध संहितांमध्ये असा उल्लेख आढळतो कि प्राचीन काळी मुनी, महात्मा आणि विविध संतांद्वारे कठोर शारीरिक आचरण, ध्यान आणि तप केले जात असे.

व्यायाम आणि नियमित सकस आहार घेऊन व्यक्तीला आपले शरीर निकोप व पिळदार बनविता येते. काळा रंग व बसके नाक असूनही व्यक्तीचे शरीर पिळदार तर या पिळदारापणाची इतरांवर छाप पडणारच. नेहमी हसतमुख असणारी व गोड बोलणारी व्यक्ती आपल्याला आवडते. सदासर्वदा कपाळावर आठ्या असलेल्या, दुर्मुखलेल्या व्यक्तिचा सहवास आपल्याला आवडत नाही. आपली वृत्ती आनंदी ठेवणे व गोड बोलणे फारसे कठीण नाही. समाजात मान्यता पावलेल्या कृतिनैपूण्यापैकी एखादे कृतिनैपूण्य संपादन करणे कुणालाही शक्य आहे. इतरांना आवडेल असे काही ना काही प्रत्येकाला करता येईल व स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा दर्जा सुधारता येईल. आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी तसेच सुधारणेसाठी इतरांच्या मदतीची आवश्यकता असते हे लक्षात ठेवावे. माणुसघाणी व कुढ्या प्रवृत्तीची व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्वाच विकास साधू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे मुल्य असते. इतरांचा आपल्यावर परिणाम होतो तसा आपला इतरांवर परिणाम होत असतो.

गुरुदेव श्री श्री रविशंकर म्हणतात, ''योग म्हणजे निव्वळ व्यायाम आणि आसन नव्हे. हा भावनात्मक समतोल आणि त्या अनादी अनंत तत्वाला स्पर्श करत अध्यात्मिक प्रगतीतील सर्व शक्यतांची ओळख करून देणारे शास्त्र आहे.'' काळानुसार योग एक आचरणाच्या रुपात प्रसिध्द होत गेला आहे. भगवत गीतेसह महाभारतातील शांतिपर्वा मध्ये योगाचा खुलासेवार उल्लेख आढळतो. महाभारत आणि भगवत गीतेच्या फार पूर्वी वीस पेक्षा ज्यादा उपनिषदामध्ये सर्वोच्च चेतनेसोबत मनाचे मिलन होणे म्हणजे 'योग' असे सांगितले गेले आहे. पतंजली योग सूत्रश या प्राचीन ग्रंथावरील गुरुदेवांची अमुल्य प्रवचने आपल्याला योग ज्ञानाबाबत लाभान्वित करतात तसेच योगाची उत्पती आणि उद्देशांबाबत माहिती करून देतात. योगाची तत्वे, सिद्धांत बनवणे आणि सूत्रांना समजण्यास आणखी सोपे बनवणे हाच या योगसूत्रांचा उद्देश आहे. यामध्ये योग जीवनशैलीचा उपयोग योगाच्या अंतिम लाभांचा अनुभव होण्यास सहाय्यभूत अश्या आपले लक्ष केंद्रित करणाऱ्या काही प्रक्रियांचा उल्लेख आहे.योग अशी परिपूर्ण जीवनशैली आहे ज्यामध्ये योगाच्या सर्व प्राचीन तत्वांचा अंतर्भाव आहे, जेणेकरून कृतज्ञ आणि शिस्तबध्द रहात शरीर, मन आणि आत्मा एकत्र होऊ शकतो. एका क्रमाने प्रभावी योगासने, प्राणायाम आणि ध्यानाच्या आंतरिक अनुभवावर भर दिला जातो. कारण मानसिक स्वास्थ्य आणि मानवी अस्तित्वाच्या काही छुप्या तत्वांसाठी हे गरजेचे आहे. असा अनुभव आहे कि जेंव्हा एखाद्याच्यात सद्भाव, सात्विकता असते तेंव्हा त्यांचे जीवन शांत, सुखद आणि परिपूर्ण होते.

**समारोपः—** योग चा नियमित सराव करणाऱ्यांच्या जीवनशैली मध्ये उल्लेखनीय परिवर्तन झाले आहे. त्यांचे जुने आजार नाहीसे झाले, त्यांच्या वागणुकीत बदल झाले. आरोग्य प्राप्ती झाली, चिंता घटल्या, आनंद वृद्धी, सहिष्णुता वृद्धी आणि सजगतेमध्ये वृद्धी झाल्याचे अनुभव सांगितले आहेत. योगाचे एक वैशिष्ट्य हे आहे कि तुम्ही युवक असा कि वयोवृध्द, निरोगी असा कि आजारी, योगाभ्यास सर्वांसाठी लाभदाई आहे आणि तो सर्वांना प्रगती पथाकडे घेऊन जातो. वयपरत्वे आपली आसनांची समज अधिक परिपक्व होऊ लागते. मग आपण शारीरिक आसनांसोबत अंतर्गत सुक्ष्मतेवर अधिक कार्य करू लागतो. योग प्रत्येकाच्या जीवनाची आदर्श दिशा ठरवण्यासाठी सहाय्य करायला दृढ संकल्प आहे.प्राणायाम आणि योगासने हे एकमेकास पूरक आहेत. या दोन योगतत्वांचा मिलाफ झाल्याने शरीर आणि मनाच्या उत्तम प्रतीचे शुद्धीकरण व आत्म नियमन प्राप्त होते , एकंदरीत मानवीय व्यक्तिमत्व विकास वृद्धिंगत होण्यास साहाय्यभूत ठरते .

***संदर्भसूची:—***

*कोल्हटकर, कृष्णाजी केशव, भारतीय मानसशास्त्र अर्थात सार्थ व सविवरण पातंजली योग दर्शन.*

*अय्यंगार, बी. के. एस., आरोग्य योग.*

*कुलकर्णी, जी. जी., आपली योगविद्या.*

*मराठे, शाम, दीर्घायुष्याची रहस्ये.*

# ग्रामस्वच्छतेच्या शासकीय योजना

**प्रा.डॉ.राजेंद्र कांबळे,** कार्यकारी प्राचार्य व समाजशास्त्र विभाग प्रमूख, इंदिरा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर ४४१५०१ मो.नं. ९८५०५२६३१९ mail – rajendrakamble2020@gmail.com

पुराणांतरी गावाची व्याख्या अशी दिली आहे.

तथा शुद्रजनप्राया सुममृध्दकृषीवला ।
क्षेत्रोपभोगभूमध्ये वसतिर्ग्रामसंज्ञिता ।

'जिच्या सभोवती कीर्दसार–वहितीला योग्य जमीन आहे व जिच्यामध्ये मातबर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत, अशा वस्तीला गाव म्हणतात''. (गावगाडा, त्रि.ना. अत्रे)

त्रि.ना. अत्रे यांनी खेडयाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. 'खेडणे म्हणजे जमीन कसणे व खेडून म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेडुतांची जी वस्ती ते खेडे. ज्यामध्ये प्रधान धंदा शेती व ज्यामध्ये भरण्याची वस्ती शेतकऱ्यांची असते, त्या गावाला लोक खेडे किंवा गावढे म्हणतात आणि तद्व्यतिरिक्त गावांना शहर म्हणतात.''

देशाच्या संस्कृतीचा प्रभाव त्या देशातील स्वच्छतेच्या सवयीवर पडतो. भारतात समाज म्हणून स्वच्छतेची परंपरा दिर्घकाळ हृदयात बाळगलेली संस्कृती विश्वास आणि जिवनशैली आत्मसात केली आहे. विविध विश्वास प्रणालीध्ये सणांच्या अगोदर स्वच्छता आणि घरांची सजावट करणे, अभ्यंगस्नानाची सवय आढळते, तसेच पंचतत्वाच्या संतुलनाचा आदरही असतो, निसर्गाची पाच तत्वे जल, पृथ्वी, हवा, अग्नी आणि आकाश स्वच्छता आणि पर्यावरणाचे महत्व सांस्कृतीक संदर्भात प्रतीके आहेत.

हळूहळू वाढता उपभोक्तावाद आणि समाजात दुही झाल्यामुळे एकीकडे कचऱ्याची निर्मीती वाढली आणि दुसरीकडे आदर्श स्वच्छता सवयींबाबत तडजोड केली गेली. वर्तनात्मक आकृतिबंध बदलल्याचा परिणाम शहरी भागांच्या बाहय भागांत कचऱ्याचे विशाल ढीग भराभर वाढू लागले, ज्यामुळे पाणी, माती दूषित होऊन अखेरीस जीवनावर विशेषत: उपेक्षित लोकांवर परिणाम झाला. दुसरीकडे ग्रामीण भारत, अजूनही सामाजिक निकष म्हणून उघडयावर शौचास बसणे, गटार व्यवस्थेचा अभाव आणि स्वच्छतेविषयक जागृती आणि जाणीवेची सुमार स्थिती अशा मुद्यांशी लढत आहे.

यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेवून जागतिक शास्वत विकास उद्दीष्टे निश्चित केलेत. ते म्हणजे सर्वांना सुरक्षित आणि परवडणाऱ्या दरात पिण्याच्या पाण्याची सार्वत्रिक आणि समन्यायी उपलब्धता, पुरेसे आणि समन्यायी स्वच्छता आणि हायजीन सर्वांना मिळणे, उघडयावर शौचास बसण्याचा अंत करणे, महिला आणि मुलींच्या तसेच जे कमकुवत परिस्थितीमध्ये आहेत, अशांच्या गरजांकडे विषेश लक्ष देणे, प्रदुषण कमी करून पाण्याचा दर्जा सुधारणे, डंम्पींग आणि घातक रसायने आणि इतर साहित्य टाकणे बंद करणे, जल आणि स्वच्छताविषयक उपक्रमांत विकसनशील देशात अंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवून क्षमता उभारण्यास पाठींबा मिळवणे हे साध्य करण्यासाठी व्यापक चौकट पूरवतात.

परंतु हे उद्‌दीष्टे पूर्ण करण्याकरिता प्रत्येकजण स्वत:च सफाई कामगार (Scavenger) असणे आवश्यक आहे. अन्न सेवन करण्याइतकेच मलविसर्जनही गरजेचे आहे, आणि स्वत:चा कचरा स्वत: नष्ट करणे हे प्रत्येकाच्या दृष्टीने योग्य आहे. जर हे शक्य होणार नसेल तर प्रत्येक कुटुंबाने आपले स्वच्छतेचे काम स्वत: केले पाहीजे.

महात्मा गांधी म्हणतात आपण लहानपणापासूनच आपल्या मनावर हे बिंबवले पाहिजे की आपण सर्वजण सफाई कामगार आहोत. आणि याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे ज्यांना याची जाणीव झाली आहे, त्या सर्वांनी सफाई कामगार म्हणून मेहनत घेण्यास सुरूवात केली पाहिजे. सफाई काम, अशाप्रकारे हुशारीने हाती घेतल्यामुळे मनुष्याच्या समानतेचे खरे कौतुक होईल. (योजना नोव्हेंबर २०१९ पेज नं.५)

देशात सर्वात जास्त शौचालये आणि शौचालयांचा वापर गुजरात (८५ टक्के) मध्ये होतो. त्या खालोखाल ६१ टक्के तेलंगाना आणि बिहार मध्ये सर्वात कमी ३० टक्के आहे. (योजना पेज ६)

१९४६ मध्ये भारताने न्यूयॉर्कमध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या एका करारावर स्वाक्षरी केली होती, त्यात स्वच्छता, पोषण, सुधारणा, गृह निर्मिती, आर्थीक व इतर सेवाशर्ती यासह इतर बाबींवर विशेष संस्थांच्या माध्यमातून सहकार्याची परवानगी जागतीक आरोग्य संघटनेला देण्यात आली. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने पाणी स्वच्छता मानवी हक्क जाहीरनामा मांडला होता त्यावर भारताने २०१० मध्ये स्वाक्षरी केली होती.१९८६ मध्ये व १९९९ मध्ये केंद्रीय ग्रामिण स्वच्छता व सांडपणी व्यवस्थापन कार्यक्रमात सुधारणा करून नंतर संपूर्ण स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रम हाती घेण्यात आला होता.

निर्मल ग्राम पुरस्कार कार्यक्रम हा २००५ मध्ये राबविण्यात आला त्यात माफक यश आले. यात हागणदारी मुक्तीमध्ये चांगले काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना रोख पुरस्कार देण्यात आला. त्यानंतरच्या काळात २०१२ मध्ये निर्मल भारत अभियान राबविण्यात आले त्यात आधीच्या ४६०० रूपयां ऐवजी प्रत्येक पात्र कुटूंबाला १०,००० रूपये अनुदान देण्यात आले. जिल्हा पातळीवर संयुक्त अंमलबजावणीसाठी ही योजना मनरेगा व इतर योजनांच्या निधीवर अवलंबून होती. यात निधी एकत्र करून तो वापरण्यात अनेक अडचणी आल्या, राज्ये व जिल्हयांनी या योजनेला महत्व दिले नाही त्यात सामाजिक भेद व लिंगभेद टाळण्यासाठी योग्य संदेश गेले नाहीत. त्यातून हवे ते परिणाम साध्य करता आले नाहीत.

२ आक्टोंबर २०१४ रोजी स्वच्छ भारत योजना राबविण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली यात ग्रामपंचायतींना

हागणदारी मुक्तीसाठी स्वतःच्या योजना तयार करण्यास स्वतंत्रता देण्यात आली. लोकांच्या सवयी बदलण्यासाठी संदेश व्यवस्था करण्यात आली. (योजना पेज नं. १७)

राज्यघटनेच्या ६३ व्या दुरूस्तीनुसार भारतात पिण्याचे पाणी व स्वच्छता हे विषय पंचायत राज संस्थांची जबाबदारी ठरविण्यात आली. त्याच अर्थात ग्रामपंचायतीचाही समावेश होता. ग्रामपंचायतीचा निधी, पदाधिकारी व कार्ये हे सगळे घटक मजबुत करण्यात आले. राष्ट्रीय ग्रामपंचायत विकास योजना २०१८ अनुसार पंचायत राज मंत्रालयाने ग्रामपंचायत राज मंत्रालयाने ग्रामपंचायत व जिल्हा प्रशासन यांना एकत्र आणले गेले त्यातून गुंतवणूक व धोरणात्मक हस्तक्षेप हे आधीच्याच अर्थसंकल्पीय अंदाजात बसविण्यात आले. अशा योजना काही वेळा अपेक्षित उद्दिष्टे गाठू शकत नाहीत पण तसे होवू नये यासाठी केंद्रीय मंत्रालयांनी विशेष करून पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने मार्गदर्शक तत्वे जारी केली. ग्रामपंचायतींनी निधी किती लवचिकतेने वापरला यावर सगळे अवलंबून होते. ती मुभा त्यांना देण्यात आली होती. (योजना २०१९ पेज १८)

**स्वच्छ पाणी व स्वच्छता सांडपाणी व्यवस्था:–** पाणीटंचाईचा फटका किमान चाळीस टक्के लोकांना आपल्या देशात नेहमीच बसत असतो. वाढत्या तापमानाबरोबर हे प्रमाण वाढत जाणार आहे. १९९० पासून आतापर्यंत २.१ अब्ज लोकांना सुधारित जल स्वच्छता मिळाली असली तरी पेयजलाचा पुरवठा कमी होत चालला आहे. अधिकाअधिक देशात पाण्यावरचा ताण लोकसंख्येमुळे वाढला आहे. २०५० पर्यंत दर चार पैकी एका व्यक्तीला पाणीटंचाईचा फटका बसेल असा अंदाज आहे. सुरक्षीत व परवडणाऱ्या पेयजलासाठी आपल्याला २०३० पर्यंत मोठी गुंतवणूक ही पायाभूत सुविधा, स्वच्छता सोयी व आरोग्य यात करावी लागणार आहे. जलस्त्रोतांचे रक्षण व पुनःभरण गरजेचे असुन मुलभूत सेवा मिळत नसलेल्या ८० कोटी लोकांना त्या मिळवून देणे व २ अब्ज लोकांना मिळत असलेल्या सेवांमध्ये सुधारणा करणे महत्वाचे आहे. (संयुक्त राष्ट्रे पेज १८, योजना)

**हागणदारी मुक्ती प्लस (ओडीएफ प्लस) योजनेतील उद्दिष्टे**

१) कौटूंबिक पातळीवर बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचा सातत्यपूर्ण वापर.

२) योजनेत कुणी मागे राहणार नाही. हे पाहणे तसेच नवीन कुटुंबाना स्वच्छतागृह सुविधा देणे.

३) सामुदायीक स्वच्छतागृहांची उपलब्धता वाढवून त्यात सार्वजनिक सहभाग वाढविणे.

४) कंपोस्ट खताचे खड्डे, विकेंद्रित कचरा प्रक्रिया सुविधा यांच्या माध्यमातून ग्रामिण भागात घन व द्रव्य कचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी करणे.

५) दृश्य पातळीवर स्वच्छता तसेच द्रव्य व घनकचरा व्यवस्थापन. (योजना पेज नं. १९)

*संदर्भ :–*

*१. त्रि.ना. अत्रे, गावगाडा.*
*२. नागगोंडे गुरूनाथ, ग्रामीण समाजषास्त्र, २००२*
*३. योजना (मासिक) अक ४, नोव्हेंबर २०१९, मुख्य संपादक राजेंद्र भट्ट*
*४. संतोश कुमार गंगवार, योजना २०१९ पेज ५*
*५. सुजॉय मुजूमदार, योजना २०१९ पेज १६*

# मराठवाड्यातील कुपोषित बालकांचा अभ्यास

**प्रा. डॉ. अन्सारी एस. जी.** पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागप्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

कुपोषण ही प्रगत–अप्रगत समाजात दिसून येणारी जागतिक समस्या आहे. निरोगी जीवनासाठी पोषण आहाराची आवश्यकता असते. किंबहुना आहारावरच शरीराची जडणघडण अवलंबून असते. शरीराला आवश्यक काम करण्यासाठी लागणारी शक्ती आपण घेत असलेल्या आहारातल्या अन्नपदार्थातून मिळत असते. शरीराला सदृढ ठेवण्यासाठी आहारात कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, खनिजे आणि प्रथिने या पोषक घटकांची आवश्यकता असते. यात प्रथिने शरीराची वाढ व शरीराची झीज भरून काढतात. सतत ऊर्जा उत्पन्न करण्याचे काम कार्बोदके आणि स्निग्ध पदार्थ करतात. खनिजे आणि जीवनसत्वामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि सर्व शरीराची हालचाल चलनवलन सुलभ होण्यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता असते. ही पोषकद्रव्ये आहारात असणे आवष्यक आहे. या पोषक घटकांची आहारात कमतरता असेल तर कुपोषणाची स्थिती निर्माण होते. कुपोषणात महिला व बालक बळी पडतात. सर्वसाधारणपणे गरोदरपणात स्त्रियांना ३३०० उश्मांकाची गरज असते. स्तनदा मातेला ४००० उश्माकांची गरज असते. त्याचबरोबर प्रथिने, खनिजे, जीवनसत्वे, कर्बोदके, स्निग्ध पदार्थ यांची आवश्यकता असते. तसेच एक वर्श ते सहा वर्श वयोगटातील बालकांस १५०० उश्माकांची आवश्यकता असते. परंतु ज्या कुटुंबात पोटभर जेवण मिळत नाही त्या कुटुंबात पोषक आहाराबाबत विचार केला जात नाही. गरीबाच्या कुटुंबात मीठ, मिरची, भाकर मिळते. यापलीकडे दूध, फळे, भाज्या, मांस, मासे, अंडे या घटकांचा समावेश आहारात नसतो. म्हणून कुपोषणाचा विचार केला तर 'Food and Agriculture Organization of the United Nation' (FAO) २००१–०३ च्या सर्वेनुसार कुपोषणाच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे.[१] १९७ मिलीयन लोक कुपोषणाने ग्रस्त आहेत. ग्लोबल हंगर इंडेक्स (GHI) २०१५ रिपोर्टनुसार जागतिक पातळीवर भारत भुकेच्या बाबतीत २० व्या स्थानावर आहे.[२] भारतात ६९ टक्के लोक कुपोषणामुळे आजारी आहेत. ३० कोटी लोक कुपोषणामुळे त्रस्त आहेत.

National Family Health Survey (2005-06) नुसार महाराष्ट्रात ३९ टक्के बालके बुटकी, १९.९ टक्के बालके रोडावलेली, २९.६१ टक्के बालके कमी वजनाची आहेत. महाराष्ट्रात गंभीर तृतीय श्रेणीतील कुपोषित गटात १ ते ३ टक्के बालके आहेत. CNSM-२०१४ च्या रिपोर्टनुसार महाराष्ट्रात ६ टक्के बालके खूप कमी वजनाची आहेत.[३] प्रस्तुत शोधनिबंधात कुपोषणाच्या समस्येचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

**संशोधन पध्दती :–** प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन तंत्राचा वापर करण्यात आला असून यासाठी इंटरनेट, संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील लेख, पुस्तके, मासिके, अहवाल इत्यादींचा आधार घेतला आहे.

**उद्देश :** १) मराठवाड्यातील कुपोषणास कारणीभूत असणारे घटक अभ्यासणे. २) मराठवाड्यातील कुपोषणाची सद्य:स्थिती तपासणे.

**कुपोषण म्हणजे काय? –** कुपोषणाचा संबंध मानवाच्या आहाराशी निगडित आहे. प्रत्येक व्यक्तीला समतोल आहार मिळणे आवश्यक आहे. समतोल आहाराची कमतरता असेल तर कुपोषणाची स्थिती निर्माण होते. 'कुपोषण' या शब्दाला विशेष अर्थ आहे. उपासमारीने होणारे कुपोषण यात अंतर्भूत नाही. उपासमार होत असताना मिळेल ते अन्न जीवन रक्षणासाठी खावे लागते. त्या परिस्थितीत पोषण संतुलनाचा विचार शक्य नसतो. जेव्हा व्यक्तीला शारीरिक आवश्यकतेनुसार सर्व पोषक तत्त्व समतोल प्रमाणात मिळत नाहीत. तर कधी काही घटक आवश्यकतेपेक्षा जास्त तर काही घटक अजिबात मिळत नाही. त्याचे जे परिणाम दिसतात त्याला कुपोषण म्हणतात. कुपोषण संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी डेव्हिड वार्नर यांनी त्यांच्या 'जेथे डॉक्टर नसेल तेथे' या ग्रंथात म्हटले आहे की, पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जो अशक्तपणा व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते, तिला कुपोषण असे म्हणतात. कुपोषणासंबंधी बालरोग तज्ज्ञ प्रकाश वेदपाठक असे म्हणतात की, कमी पोषण आहारामुळे निर्माण होणारा रोग म्हणजे कुपोषण.[४] आरोग्य संवर्धनासाठी आवश्यक त्या प्रमाणात योग्य अन्न मिळाले नाही तर कुपोषणाची स्थिती उद्भवते.

**कुपोषण मोजमाप पद्धती :–**

१) उष्मांक व पोषण सेवन पद्धती (Calone Nutrition Intake)

२) मानवमिती (Anthropometric Approach)

या दोन्ही पद्धतींचा अवलंब करून पोषण स्तर मोजण्यात येतो. परंतु अलीकडे उष्मांक सेवन पद्धतीपेक्षा मानवमिती पद्धत अधिक खात्रीशीर मानण्यात येत आहे. अलीकडे या पद्धतीचा उपयोग पाच वर्ष वयाच्या बालकांचे कुपोषण मोजण्यासाठी केला जातो.

**कुपोषणाची लक्षणे :–** १) शरीराची वाढ खुंटणे २) बालकांचे वजन कमी होणे ३) एडिमा–हातापायाला सुज येते. ४) त्वचेतील बदल – त्वचा कोरडी व खडबडीत होते. त्वचेखालील मेदाचा थर नाहीसा झाल्यामुळे त्वचेची लवचिकता नाहीसी होते. ५) शरीरातील रक्त कमी होते. ६) केसातील बदल – केस गळतात, भूरकट रंगाचे होतात. ७) डोळ्यातील बदल – रातांधळेपणा, नेत्रगोल शुष्कता येते. ८) इतर दुखणी सतत चालू राहते. सुस्तपणा, मरगळ, पायाच्या हाडात बाक येणे, तोंड व जिभेचा त्रास.

**कुपोषणास जबाबदार घटक :–** १) माता व बालकास पोषक संतुलित आहार न मिळणे. २) बाळाला पूरक आहार न मिळणे. ३) मातेमधील अज्ञान, अंधश्रद्धा ४) दोन बाळांत अंतर कमी असणे ५) चालीरिती, रुढी परंपरा ६) दारिद्र्य ७) वैद्यकीय सोयीचा अभाव

**तक्ता क्र.०१**

**मराठवाडा विभागातील जिल्हानिहाय कुपोषित बालकांची स्थिती (ऑगस्ट २०१४)**

| विभाग जिल्हे | औरंगाबाद | जालना | परभणी | हिंगोली | नांदेड | बीड | लातूर | उस्मानाबाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वजन घेतलेल्या बालकांची संख्या | २२९३२० | १५१७४ | ११०६३६ | ८७७९० | २१९४१९ | १९२४०४ | १४७८१४ | १०७१२८ | १२४६२५८ |
| साधारण श्रेणीतील बालकांची संख्या | २०८४९७ | १४२००८ | १०३६७६ | ७९६८१ | २०५३३५ | १७८१८७ | १३९६३८ | ९७८७० | ११५४८८९ |
| मध्यम कमी वजनाच्या बालकांची संख्या | १६६४० | ८३४० | ५४७४ | ६७३८ | ११६५६ | १२५१० | ६८९७ | ७८४४ | ७६०९९ |
| तीव्र कमी वजनाच्या बालकांची संख्या | ४१८३ | १३९९ | ४८९ | १३७१ | २४२८ | १७०७ | १२७९ | १४१४ | १५२७० |

स्त्रोत : एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय, लातूर, महाराष्ट्र २०१४[५]

वरील तक्ता क्र. ०१ वरुन असे निदर्शनास येते की, ऑगस्ट २०१४ मध्ये मराठवाडा विभागातील ० ते ६ वयोगटातील वजन घेतलेल्या एकूण बालकांची संख्या १२४६२५८ होती. यात साधारण श्रेणीतील बालकांची संख्या ११५४८८९ होती. मध्यम श्रेणीतील बालकांची एकूण संख्या ७६०९९ तर तीव्र कमी वजनाच्या बालकांची संख्या १५२७० असल्याचे आढळते. मराठवाड्यात सर्वांत जास्त तीव्र कमी वजनाची बालके ४१८३ औरंगाबाद जिल्हयात असल्याचे आढळते. तर सर्वात तीव्र कमी वजनाची बालके ४७९ परभणी जिल्ह्यात आढळून आले. यावरुन असे दिसून येते की, मराठवाड्यात सर्वच जिल्ह्यांत कुपोषित बालके आहेत. मात्र यात कुपोषणाची तीव्रता कमी–जास्त असल्याचे आढळून येते.

**कुपोषणाचे अहवाल :–** १) National Family Health Survey (NFHS-03) 2005-06 नुसार महाराष्ट्रात गंभीर तीव्र कुपोषित सॅम या गटात १ ते ३ टक्के बालके आहेत. मध्यम तीव्र कुपोषित सॅम या गटात १२ ते १३ टक्के बालके आहेत. महाराष्ट्रात एकूण सॅम व मॅम अशी १५ टक्के कुपोषित बालके आहेत. २० टक्के बालके अॅनॅमिक आहेत.[६]

२) Comprehensive Nutritional Survey in Maharashtra (CNSM)-2012 या रिपोर्टनुसार २ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या बालकांचे उंचीनुसार वजन करुन सॅम, मॅम बालके ठरवण्यात आले. (Sever Acute Malnourished) मॅम म्हणजे मध्यम तीव्र कुपोषित वयानुसार उंची कमी असलेली म्हणजे बुटक्या बालकांचे प्रमाण २२.८ टक्के आहे. उंचीनुसार वजन असलेल्या तीव्र लुकडी बालकांचे प्रमाण १५.५ टक्के आहे. कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण २१.८ टक्के असल्याचे आढळते.[७]

३) नॅशनल मॉनिटरींग ब्युरो (NNMB) २०००–२००१ यात नऊ राज्याचा सर्वे करण्यात आला. या सर्वेनुसार अर्ध पूर्वशालेय बालके मध्यम व तीव्र कुपोषित आहेत. तीन ते पाच वर्षे वयाच्या बालकांमध्ये ४९ टक्के कुपोषण होते जी मुले ०६ ते ०९ वर्षे वयाची होती त्याच्यामध्ये ६३ टक्के कुपोषण, १० ते १३ वर्षे वयाच्या मुलांमध्ये ७८ टक्के कुपोषण, १४ ते १७ वर्षे वयाच्या मुलांमध्ये ६६ टक्के कुपोषण असल्याचे आढळून आले.

**निष्कर्ष :–** प्रस्तुत संशोधनात असे आढळून आले की, मराठवाड्यात बाल कुपोषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. कुपोषण हा आजार समतोल व पोषक आहार न मिळाल्यामुळे निर्माण होतो. ज्या कुटुंबात दारिद्रय आहे त्या कुटुंबात आरोग्य सुविधा, पोषक आहार मिळत नाही. माताचे अज्ञान, निरक्षरता, बाल कुपोषणास जबाबदार आहे. कारण अनेक माता आपल्या बाळांना सहा महिन्यानंतर पूरक आहार देत नाहीत. फक्त स्तनपान करतात. बाळ आजारी पडल्यास डॉक्टरकडे न जाता भगत, जादूटोणा यावर विश्वास ठेवतात, उपवास करतात. परिणामी बालकात कुपोषणाचे प्रमाण वाढल्याचे आढळून येते. तसेच अनेक गावात वैद्यकीय सुविधा मिळत नाहीत त्यामुळे बालक कुपोषित होतात. मराठवाड्यात सर्वांत जास्त कुपोषण औरंगाबाद जिल्हयात आढळून आले.

**उपाय :–** १) प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींना नवजात अर्भकाची काळजी, गरोदर मातेचा आहार व आरोग्याची काळजी, बालकांचा आहार व आरोग्य, बालकांचे आजारपणात व आजारानंतरची काळजी याचे शिक्षण प्रत्येक घराघरातून द्यावे. २) समाजातील अंधश्रद्धा दूर करून आरोग्यविषयक मार्गदर्शन करावे. ३) कुपोषण कमी करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा.

*संदर्भ :–*


१. *Internet google.com malnutrition among treble: Wikipedia the free encyclopedia.html*
२. *Global Hunger Index Report 2015, International Food Policy Research Institute (IF-PRI)*
३. *Comprehensive Nutrition Survey in Maharashtra (CNSM) 2012 Mumbai State Report. International Institute of Population Sciences*
४. *शिंदे आर.के. २००७. कुपोषण समस्या आणि उपाय. मिश्र अनुराग (संपा.) नवी मुंबई : योजना. पृ.३४*
५. *एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय, लातूर, महाराष्ट्र, २०१४*
६. *Comprehensive Nutrition Survey in Maharashtra (CNSM) 2012 Mumbai State Report. International Institute of Population Sciences*
७. *National Nutrition Monitoring Bureau, 2000-2001. National Institute of Nutrition, Osmania. P.O. Hyderabad. Indian Council of Medical Research Journal*
८. *पार्क, जे. ई., पार्क, के. १९६१. आरोग्य परिचर्या. जबलपूर : बनारसीदास भनोत पब्लिशर्स.*
९. *अन्सारी एस.जी. २००८. आदिवासी कुपोषित बालकांचा समाजशास्त्रीय अभ्यास, विशेष संदर्भ किनवट तालुका, अप्रकाशित एम. फिल. शोधप्रबंध. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*

Volume - 08 - Issue – 02, July - December, 2019 / ISSN 2278-3199

# भ्रुणहत्या : कारणे व उपाययोजना

**प्रा. डॉ. विलास घोडे,** सहयोगी प्राध्यापक, बी. पी. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर

**प्रस्तावना :—** विसाव्या शतकात मुलींना जन्म दिलेल्या महिलांवर अन्याय व अत्याचारांचा सामना करावा लागत होता, मुलीला जन्म दिल्याने महिलांना अनेक कुंटुंबात त्रास सहन करावा लागत होता. मात्र भ्रुण हत्या करण्या इतपत तंत्रज्ञान विकसित न झाल्याने भ्रुणहत्या होत नव्हता. काही का होईना मुलींना कुटुंबात जन्म दिल्या जात असे. परंतु जन्मानंतर मुलीला दुय्यम वागणूक दिली जात होती. मुलगी जन्माला घातली म्हणून आईला सासरच्या मंडळी व पती कडून त्रास सहन करावा लागत होता, कुटुंबात मुलगी होण्याचा संपूर्ण दोष स्त्रीला दिला जात होता. मुलगा होत नाही म्हणून घटस्फोट दिल्या जात होता किंवा दुसरा विवाह केला जात होता. शिक्षणाचा प्रगतीबरोबरच विविध विज्ञानाचा अविष्कार झाला. त्यातच सोनोग्राफी सारख्या तंत्राचा शोध लागला. सोनोग्राफी तंत्र महिलांना वरदान ठरण्याऐवजी भ्रुणहत्यामुळे शापच ठरत आहे. मुलीला जन्माला येण्यापूर्वी तिला नष्ट करण्याइतपत तंत्रज्ञान प्रगत झाले. त्यातुनच आर्थिक लोभामुळे भ्रुणहत्या सारखे सामाजिक गुन्हे करण्याचे प्रमाण समाजात मोठया प्रमाणात वाढू लागले आहे. आज या भ्रुणहत्या समस्येने विशाल रुप धारण केलेले आहे त्याचा अनिष्ठ परिणाम समाजात दिसत आहे. या समस्यांचे गांभिर्य लक्षात घेता भ्रुणहत्या रोखण्याकरिता अनके कायदे तयार करण्यात आले असुन सुध्दा प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने अक्षेपित यश भ्रुणहत्या रोखण्याकरिता मिळू शकलेले नाही.

**शोध निबंधाचा उद्देश:** १. समाजातील भ्रुणहत्येच्या स्थितीचे विश्लेषण करणे. २. भ्रुणहत्येच्या कारणांचे अध्ययन करणे. ३. भ्रुणहत्यासंबंधी उपाययोजनांचे विश्लेषण करणे.

**अध्ययन पध्दती::—** प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये पुस्तके, मासिके, वृत्तपत्रातील लेख आणि इंटरनेटवरील माहिती यांचा उपयोग शोध निबंधासाठी करण्यात आलेला आहे.

भ्रुणहत्या ही आधुनिक काळात मानव जातीवर असलेली कलंकीत समस्या आहे.,सोनोग्राफी आणि इतरही मशिनच्या जन्माबरोबरच या समस्यांचाही जन्म झालेला आहे. अपंगत्व, शारीरिक व्यंग असलेले गर्भ शोधणे, किंवा गरोधर मातेच्या जीवनाला हानी पोहचत असल्यास या बाबत गर्भजल चाचणी करुन गर्भाचे निरिक्षण करणे, गर्भांचा विकासाबाबत नोंद घेणे इत्यादी सोनोग्राफी मशिनचा शोध लावण्या मागचा मुळ उद्देश होता. वैद्यकिय क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे आणि आर्थिक लोभामुळे काही डॉक्टर्स किंवा वैद्यक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांकडून मुलगा किंवा मुलगी लिंग चाचणी करिता सोनोग्राफी मशिनचा दुरुपयोग केल्या जात आहे. किंवा आई—वडिलांच्या जिद्दीपणामुळे लिंग चाचणकरिता डॉक्टरांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. गर्भजल चाचणी करिता येणारा प्रत्येक व्यक्ती हा मुलगा हवा या मानसिकतेतून डॉक्टरांकडे येतो. समाजातील लोकांना मुलगा का हवा, मुलगी का नको, या मागील कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे. मुलींची संख्या दिवसेंदिवस घटत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे समाजात त्याचे दुष्परिणाम दिसू लागले आहे. या समस्यासंबंधी सामाजिक संस्था व संघटना समोर येऊन भ्रुणहत्यासंबंधी समाजात जनजागृती करीत आहे. समाजातील लोकांच्या भावना ही प्रसार माध्यमातून तीव्र विरोध करीत आहे. समाजातील लोकांनी मोठया प्रमाणात सामाजिक चळवळी व आंदोलने उभी करुन शासनास प्रतिबंधात्मक कायदा करण्यास बाध्य करण्यात आले. अखेर भ्रुणहत्या करणे कायदयाने गुन्हा ठरविण्यात आले. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला ममतेची उपमा दिलेली आहे. निसर्गाने स्त्री मध्ये ममता, करुणा, माया, लज्जा,सहनशिलता आणि त्याग इत्यादी अनेक स्वाभाविक गुण दिलेले आहेत. याच गुणांवर भारतीय संस्कृती व कुंटुंब पध्दती सक्षमपणे उभी आहे. हिंदु समाजात पुरुष प्रधान संस्कृती रुजली असली तरी महिलांचे संरक्षण करणे, सन्मान देणे ही पुरुषाची जबाबदारी आहे.

आजचे युग हे विज्ञान व ज्ञानाचे युग आहे. आज सुध्दा आपल्या समाजात मुलीला अवंचित व ओझे समजल्या जाते. समाजातील स्त्रीच्या प्रती असलेला दुय्यम दृष्टिकोन हाच समस्येला कारणीभूत आहे. समाजात हजारो वर्षापासून चालत आलेली रुढी, परंपरा, धार्मिक कु संस्कार आणि पुरुषप्रधान समाजाद्वारे स्त्री दमनाकरिता केलेले नियम, स्त्रीची सामाजिक स्थितीसंबंधी अटी. स्त्री— पुरुषामध्ये भेदभाव, अत्याचार अशा अनेक बंधनामध्ये स्त्रीचे जीवन गुरफटल्या गेलेले होते. त्यामुळे समाजातील स्त्रीचे अस्तित्वत लक्षात न घेता स्त्री जीवनामध्ये नकारात्मक दृष्टिकोनातून बघितल्या जात होते.

समाजात स्त्रीयांच्या जीवनासाठी चाकोरीबध्द मार्ग निश्चित तयार करण्यात आले होते. स्त्रीला जन्मापासून तर मृत्युपर्यंत कधी वडील, तर कधी पती, तर कधी मुलांवर म्हणजे कोणत्या ना कोणत्या पुरुषांवरती जीवनभर निर्भर किंवा आश्रित राहावे लागत आहे. एकाच पोटातून जन्मलेल्या मुलगा व मुलगी यांच्यामध्ये खाणे, पिणे, शिक्षण, संधी आणि प्रतिष्ठा इत्यादी बाबतीत भेदभाव केल्या जातो. अशा प्रकारचा भेदभाव हा केवळ कोणत्या एका दर्जाचे किंवा वर्गातच नाही तर निम्न ते उच्च वर्गाती समाजात पहायला मिळत आहे. समाजातील हजारो वर्षाच्या हीन दर्जाच्या वागणूकीने, शिक्षणाचा अभाव आणि असमानतेमुळे स्त्रीयांना फार मोठा संघर्ष करावा लागत आहे. आज अलीकडे स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करीत आहेत. विकासाच्या सर्व क्षेत्रात योगदान व सहभागी होत आहे. अनेक विक्रम स्त्रीयांचा नावावर होत परंतु स्त्रीयांच्या दर्जा व प्रतिमामध्ये पाहिजेतसा बदल होत नाही. आजही देशातील सर्व्हेक्षणाद्वारे, देशात प्रत्येकवर्षी हजारोच्या संख्येनी स्त्री भ्रुणहत्या होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस दर हजारी पुरुषांमागे

स्त्रीयांचे प्रमाण कमी कमी होत असलेले दिसून येत आहे. स्त्री गर्भाचा सुदृढ विकास, संगोपन, आवश्यकता आणि उपचार करण्याचा चांगल्या उद्देशाने सोनोग्राफी हे तंत्र विकसित झाले आहे. परंतु पुरुष प्रधान संस्कृतित स्त्री भ्रुणहत्येसाठी या तंत्राचा सरासर वापर होत असून समाजात स्त्री–पुरुषांचे प्रमाणाची समस्या निर्माण झाली.. दुर्देवाची बाब म्हणजे राज्याचा ज्या भागात सोनोग्राफी केंद्राची संख्या जास्त आहे. त्या ठिकाणी पुरुषांच्या प्रमाणात स्त्रीयांची संख्या घटली असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात एकूण चार हजार तीनशे पंचेचाळीस नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रे आहेत. तर नागपूरात १८८ केंद्रे कार्यरत आहे. राज्यात ज्या भागातशंभर पेक्षा जास्त सोनोग्राफी केंद्रे आहेत. तेथे दर हजारी पुरुषांमागे ९०१ असे प्रमाण आहेत. या उलट १०० पेक्षा कमी सोनोग्राफी केंद्रे आहेत. तेथे दर हजारी पुरुषांमागे ९३७ स्त्रीयांचे प्रमाण आहेत. गर्भजल निदानाचे वाढते प्रमाण हेच महिलांच्या एकूणच संख्येला प्रचंड घातक ठरत असून राज्यातील पुरुषांच्या संख्येच्या तुलनेत महिलांची संख्या सात्तत्याने कमी होत आहे. भारतात दरवर्षी २३ लाख भ्रुणहत्या होत असल्याचे दिसून येते. मागील १५ वर्षामध्ये साडेतीन कोटी स्त्री भ्रुणहत्या झालेली असल्याचे दिसून येते. भारतात दरहजारी पुरुषांमागे २००१ मध्ये स्त्रीयांचे प्रमाण ९३३ होते. तर २०११ या वर्षात दर हजारी पुरुषांमागे ९४० असे झाले आहेत.

**स्त्री भ्रुणहत्या वाढीची प्रमुख कारणे:–** १. मुलांला जन्म देण्याची इच्छा २. अट्रासाऊड टेक्नॉलाजी दुरूपयोग ३. मुलींसबंधी असुरक्षित वाटणे ४. विवाहाचा अतिरिक्त खर्च होणे. ५. हुंडा देण्याची पध्दत. ६. मुलींचे लैगिंक शोषण. ७. लिंगभेदभाव. ८. शिक्षणाचा अभाव. ९. आरोग्य विषयक समस्या. १०. अवैध लैंगिक व्यवहार. ११. गर्भ अवस्था कालावधीत समस्या. १२. आर्थिक समस्या. १३. समाजातील महिलांची दुय्यम स्थिती. १४. पुरुषप्रधान संस्कृती. १५. कुटुंब नियोजन साधनाचा अभाव. १६. वंशाचा दिवा असायला हवा या उद्देशाने भ्रुणहत्या. १७. मुलगी जन्माला येऊ नये म्हणून भ्रुणहत्या करणे. १८. मुलगी जन्माला आल्यामुळे समाजात कमी प्रतिष्ठा.

**भारतातील स्त्री–पुरुषांचे प्रमाण(१९०१–२०११)**

| अनु. क्र. | लोकसंख्या वर्ष | प्रति हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | १९०१ | ९७२ |
| ०२ | १९११ | ९६४ |
| ०३ | १९२१ | ९५५ |
| ०४ | १९३१ | ९५० |
| ०५ | १९४१ | ९४५ |
| ०६ | १९५१ | ९४६ |
| ०७ | १९६१ | ९४१ |
| ०८ | १९७१ | ९३० |
| ०९ | १९८१ | ९३४ |
| १० | १९९१ | ९२७ |
| ११ | २००१ | ९३३ |
| १२ | २०११ | ९४० |

**स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी उपाययोजना:–** स्त्रीचे भारतीय समाजात अनेक प्रकारे वर्णन व उपमा दिलेली आहे. समाजात मुलगा हा वंशाचा दिवा असल्याचा विचारामुळे मुलीला गर्भातच क्रुर पणे नष्ट करण्यात येत आहे. समाजातील व कुटुंबातील दबावामुळे स्त्रीयांकडून स्त्री भ्रुणहत्या केल्या जात आहे. निसर्ग चक्रात मानवाच्या या हस्तक्षेपामुळे भविष्यात याचे गंभिर परिणाम भोगावे लागेल. देशातील लोकसंख्या नियंत्रणात आवश्यक असले तरी स्त्री भ्रुणहत्येला आळा घालणे गरजेचे आहे. या सृष्टीत मानव वंशाचे अस्तित्व टिकवावयाचे असेल तर स्त्री भ्रुणहत्या प्रतिबंधक करण्याची व तसेच समाजातील मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे, स्त्री भ्रुणहत्या प्रतिबंधासाठी खालील प्रमाणे उपाययोजना दर्शविलेल्या आहेत.

**१) गर्भजल परिक्षण बंदी:–** आधुनिक युगात मानवाने अनेक नवीन तंत्रज्ञानाचा शोध लावला परंतु त्याचा मानवाला फायदा होईल हा हेतू होता. परंतु मानवाने त्याचा दुरुपयोग केला. त्या तंत्रज्ञानाचा उपयोग मानव मानवाला नष्ट करण्यासाठी होत आहे. सोनोग्राफी चा उपयोग मानव हा स्त्री भ्रुणहत्या करण्यासाठी करत आहे. म्हणून यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गर्भजल परिक्षणामध्ये बदल आणि आवश्यकतेनुसार बंदी घालण्यात यावी.

**२) कायद्याची अंमलबजावणी :–** शासनाने जो कायद्या भ्रुणहत्येसाठी भ्रुणहत्या विरोधी कायदा केला आहे त्याची अंमलबजावणी योग्य रितीने होणे आवश्यक आहे. तो कायदा अस्तित्वात असून त्याची अंमलबजावणी पूर्णपणे होत नसल्याचे दिसून येत आहे.

**३) स्वयंसेवी संस्थांचे योगदान:–** कोणत्याही सामाजिक समस्येबाबत स्वयंसेवी संस्था हया जागृत असल्या पाहिजे. स्वयंसेवी संस्था स्थानिक लोकांच्या समस्या समजून त्या शासनापर्यंत पोहचण्याचे उत्तम कार्य करीत असते. तसेच सामाजिक, मानसिकतेचा अभ्यास करुन ते बदलण्यासाठी प्रभावीपणे कार्य करीत असते. स्वयंसेवी संस्था सामाजिक समस्यासंबंधी आवाज उठवून त्यांसंबंधी जनजागृती करण्यामध्ये योगदान देत असते.

**४) जनतेचे सहभाग व सहकार्य:–** कोणत्याही सामाजिक समस्यांना नियंत्रणा आणण्याकरिता राज्य व केंद्र शासनाकडून अनेक योजना, कायदे तयार करण्यात येतात. परंतु या कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी लोक सहभागाशिवाय शक्य होत नाही. अश्यावेळी लोक सहभाग मिळून सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते.

**५) मुलींसबंधी चुकीची विचारधारा :–** समाजात आजही मुलीसंबंधी चुकीच्या कल्पना व विचार आहेत. मुलगी दुसऱ्या कुटुंबाचे धन आहे. दुसऱ्या घरी जाणार असे समजुन मुलींच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक विकासाकडे दुर्लक्ष केल्या जाते. तसेच पोषण आहार आणि आरोग्याच्या समस्यांकडेही दुर्लक्ष केल्या जाऊ मुलींवर अन्याय केला जातो..

**६) तंत्रज्ञानावर नियंत्रण व दुरपयोग थांबविणे:–** मनुष्यांच्या विकासासाठी, सुलभतेसाठी आणि आरोग्यांच्या जटील समस्यासंबंधी

निदान श्शोधण्याच्या व उपचार करण्याच्या दृष्टिकोनातून विविध तंत्रज्ञानाचा शोध लागलेला आहे. परंतु स्वार्थीवृत्तीमुळे तंत्रज्ञानाचा दुरूपयोग करुन मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम करुन घेत आहे.

७) **जनजागृती करणे:—** समाजाचे गतिशिल अस्तित्व ठेवण्यासाठी स्त्री—पुरुषांचे प्रमाण महत्वाचे आहे. समाजातील नैसगिक समतोल ठेवण्यासाठी स्त्रीचे प्रमाण गरजेचे आहे. आजही समाजामध्ये मुलींच्या जन्माबद्दल उदासीनता दिसून येते. सर्वच समाजात मुलींच्या जन्माचे महत्व आहे. म्हणूनच समाजात मुलींच्या जन्मासंबंधी महत्व पटवून सांगणे महत्वाचे झालेले आहे.

८) **कुटुंब नियोजन साधनाचा उपयोग:—** आज समाजामध्ये मर्यादीत कुटुंबांचे महत्व आलेले आहे. प्रत्येक कुंटुंबात एक किंवा दोन अपत्याची संख्या झालेली आहे. अशावेळी अनावश्यक मुलांना जन्म देण्याऐवजी किंवा गभंपात करण्याऐवजी कुटुंब नियोजन साधनाचा उपयोग करुन भ्रृणहत्या किंवा गर्भपाताचे प्रमाण थांबविल्या जाऊ शकते. भ्रृणहत्या आणि गर्भपाताचे प्रमाण कमी झाल्यास महिलांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही.

**सारांश:—** २१ व्या शतकात वास्तव्यकरीत असतांना सुध्दा तंत्रज्ञानाच्या दुरुपयोग करुन मुलींचा जन्मावर अत्यंत वाईट अन्याय करीत आहे आणि तिला जन्म होण्यापासून वंचित ठेवत आहे. त्यामुळे समाजातील स्त्री—पुरुषांचे प्रमाण विघडलेले दिसून येत आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्री—पुरुषांना समान संधी व अधिकार दिलेले असून सुध्दा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक असल्याचे दिसून येते. आजची बालिका उद्याची स्त्री असुनही बालिकेचे महत्व लक्षात घेतले जात नाही. भारतात जवळजवळ पन्नास टक्के लोकसंख्या महिलांची आहे. कुटुंबांच्या आणि देशाच्या विकासामध्ये महिलांचे महत्वपूर्ण योगदान आहे. महिला प्रत्येक क्षेत्रात यशचे शिखरे संपादित करीत आहे. अशा परिस्थितीमध्ये स्त्रीयांसबंधी नकारात्मक विचार न करता समाजातील मुलींच्या जन्माचे स्वागत व आनंद व्यक्त केला पाहिजे. तेव्हाच समाजातील स्त्री —पुरुषांचे प्रमाण समतोल ठेवता येईल.

***संदर्भ ग्रंथ सूची :***


१. *आगलावे प्रदीप (२००३) भारतीय समाज: संरचना आणि समस्या, नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन.*
२. *बंडेवार साधना (२०१४) महिलांसबंधी कायदे , नागपूर ऋचा प्रकाशन*
३. *खैरनार दिलीप (२००४) आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन*
४. *काचोळे दा.धों (२००९) आदिवासी समाजशास्त्र, औरंगाबाद: कैलाश पब्लिकेशन्स*
५. *कवि माधवी (२०००) महिला कल्याण आणि विकास, नागपूर: विद्या प्रकाशन*

# महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार

**डॉ. नारायण दौ. बालपांडे,** राज्यशास्त्र विभाग, नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड ता. नरखेड जि. नागपूर मो.न. ९४२३४०७८६५

भारतीय संविधानाद्वारे केंद्रीय आणि राज्यस्तरावर सांसदीय व्यवस्थेचा स्विकार केला गेला. सांसदीय व्यवस्था शासनाची अशी व्यवस्था आहे ज्यामध्ये कायदेमंडळ आणि कार्यपालीका परस्पर संबंधित आहे. कार्यपालीकेचे गठन कायदेमंडळाकडून केले जाते आणि कार्यपालीका कायदेमंडळाप्रती उत्तरदायी असते. उत्तरदायीत्व म्हणजे वास्तविक कार्यपालीका अर्थात मंत्रिमंडळ तो पर्यंत आपल्या पदावर राहते जोपर्यंत कायदेमंडळाचा विश्वास प्राप्त असतो. जसे भारतात केंद्रीयस्तरावर लोकसभा किंवा घटकराज्य स्तरावर विधानसभा सांसदीय व्यवस्थेमध्ये केंद्रीय स्तरावर आणि घटकराज्य स्तरावर कायदेमंडळाचे लोकप्रिय सभागृह लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका होतात. या निवडणुमध्ये एका पक्षाला बहुमत प्राप्त होते आणि राजकीय प़क्ष आपला नेता निवडतो तेव्हा देशाचा प्रमुख राष्ट्रपती किवा राज्याचा प्रमुख राज्यपाल बहुमत प्राप्त नेत्याला प्रधानमंत्री किवा मुख्यमंत्री पद बहाल करतो अथवा मंत्रीमंडळाचे गठन झाल्याबरोबर सरकारचे गठन केल्या जाते परंतु जेव्हा सभागृहाचा विधानसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत प्राप्त झाले नव्हते त्रिशंकु विधानसभेची स्थिती निर्माण होते राजकीय पक्षाचा आणि पक्षनेत्यामध्ये गठबधंन प्रक्रीया सुरू होते गठबंधन सरकार असे सरकार असते ज्यामध्ये कमीत कमी दोन पक्षाची भागीदारी असते.

महाराष्ट्रमध्ये २१ ऑक्ट्रोबंरला मतदानाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर महायुतीला बहुमत प्राप्त झाले. परंतु ७५ ते ८० टक्के सत्ता देवेंद्र फडवणिस यांनी आपल्या हातात ठेवली २० वर्षे चाललेल्या सत्ता विभाजनाचा पध्दतीत झालेला तो एक मोठा बदल होता सत्तेत केवळ २० ते २५ टक्के वाटा मिळत असल्याने शिवसेना सतत पाच वर्षे धुसफुसत होती ही पाच वर्षे कोडुंन धुसफुस, राग, अपमान सेनेने बाहेर काढला २०१९ विधानसभा निवडणुकीनंतर अडीच वर्षे मुंख्यमंत्री पदाची मागणी करून बहुमतापासून ४० सदस्य संख्येने दुर असलेल्या भाजपाने या मुख्यमंत्री पदाचा विभाजनाचा प्रस्तावाला मान्यता दिली नाही तिथेच सत्तेचा त्रिभाजनाची बिजे रोवली गेली

अडीच वर्षे मुख्यमंत्री पद या मागणीसाठी अडून बसलेल्या शिवसेनेचा मदतीला ५४ आणि ४४ आमदार असलेले राष्ट्रवादी आणि कॉग्रेस हे दोन्ही पक्ष धावून आले. सोबतीला शिवसेना ५६ इथेच महाआघाडीला सुरूवात झाली निवडणूकीत राज्यातील मतदारांनी भाजप सेनेला युतीला स्पष्ट बहुमत दिले पण शिवसेनेला वगळून अपक्षचा मदतीने भाजप बहुमत सिध्द करू शकणार नाही असे संख्याबळ दिले निकालचा दिवसी चित्र स्पष्ट झाले. हिच ती वेळ आहे शिवसैनिकाला मुख्यमंत्री पदी बसण्याची हे शिवसेनेच्या लक्षात आले. शिवसेनेने भाजपासी फारकत घेण्याची भाषा सुरू केली तरी भाजप आशावादी मुख्यमंत्री पदाचा दावा शिवसेना सोडायला तयार नाही आणि भाजप त्यांचा हा हट्ट पुर्ण करयाला तयार नाही मुख्यमंत्री पद मिळाल्याशिवाय युती नाही अशी निर्वाणीची भाषा शिवसेनेने करायला सुरूवात केली आणि राजकीय पटावरील वेगवेगळया पक्षाच्या चाली बदलु लागल्या शिवसेना नेतृत्वाने शरद पवार यांच्याशी संपर्क सुरू केले भाजपामध्ये चलबिचल सुरू झाली परंतु राष्ट्रवादी आणि शिवसेना येवून काय फरक पडणार आहे. म्हणुन कॉग्रेस शिवाय सरकार स्थापन होऊ शकत नाही आणि काग्रेस शिवसेनेला पाठीबा देणार नाही अशी भाजपाची भुमिका होती. पवार यांनी साऱ्या परिसिथतीचा अंदाज घेतला भाजपाचा आणखी जाच सोसायचा नसेल तर त्यांना सत्तेपासून दुर ठेवण्याची चालुन आलेली संधी साधणे काग्रेस नेत्यांना पटवून सांगणे याचात यश मिळाले. पुढे हळुहळु पवार यांनी बदलत्या राजकारण्याचे सारे सुत्रे आपल्या हातात घेतली भाजपाला सत्तेपासून दुर ठेवणे या एकाच मुदयावर शिवसेना, काग्रेस व राष्ट्रवादी काग्रेसला एकत्र आणण्याचे पर्यंत सुरू झाले. पुथ्वीराज चौव्हान यांनी भाजपाला सत्तेबाहेर ठेवण्याकरीता शिवसेनेबरोबर हातमिळवणी करणे कसे आवश्यक आहे हे समजावून घेण्याचा प्रयत्न केला गेल्या पाच वर्षात कॉग्रेसला कसे खच्चीकरण करण्यात आले हे निदर्शनात आणुन दिले पुथ्वीराज चौव्हान व अशोक चौव्हान या दोन माजी मुख्यमंत्र्यानी अनुकुल भुमिका मांडली. अखेर भाजपाला सत्तेपासून दुर ठेवण्याकरीता शिवसेनेशी हातमिळवणी करण्याची हे दिल्लीतील नेत्यांचा पचणी पाडण्यात माजी मुख्यमंत्री पुथ्वीराज चौव्हान यांना यश आले किमान समान कार्यक्रमावर राष्ट्रवादी आणि शिवसेनेबरोबर चर्चा करण्यास दिल्लीने मंजुरी दिली.

महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपदावरून वाद सुरू झाल्यानंतर महायुती तुटली त्यानंतर एका राष्ट्रीय पक्षाला या पुर्वी कोणीही कधीही आव्हान दिले नसेल असे आव्हान महाराष्ट्रामध्ये घडले त्यामुळे अनेक शक्यता निर्माण झाल्या लहान पक्षांनी हा बदल घडून आणला आहे पण हे कसे घडले? राजकारणात चाणक्य नसतात जे लोक दुरचे पाहतात. बारीक हालचालीवर लक्ष ठेवतात आणि योग्य वेळी निर्णय घेतात. तेच त्यावेळचे चाणक्य ठरतात. कारण महाराष्ट्रातील अनुभवी राजकारण्यांनी हा बदल घडवून आणला. तसेच राजकारण हा नेहमीच शक्यतांचा खेळ असतो पण कौशल्यपुर्ण फाटाफुटीमुळे राजकारण तो यावेळी अशक्यतेचा खेळ झाला आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा नावाने तिन पक्ष एकत्र येणे हे संकटाला निमत्रंण देणारे ठरू शकते. यावर कशा विश्वास ठेवायचा? तेव्हा यावेळी फाटाफुट घडून आणणाऱ्यांना जास्तीत जास्त गुण दयाला हवे या ठिकाणी यशाचा मंत्र ठरला महाविकास आघाडीने निर्माण केलेला समान किमान कार्यक्रम.

राष्ट्रीय चॅनेल्सवर परस्पर भिन्न विचारांचे लोक कसे एकत्र आहेत आणि त्यांचात कशी फाटाफुट होणार आहे यावर चर्चा घडून आल्या. ज्या गोधंळातुन राष्ट्रीय तिन पक्ष एकत्र आले. त्यातुन त्यांनी राजकीय दुष्टया एकत्र येण्याचे महत्व समजायला हवे. एकत्र आल्याने एकमेकांना समजून घेण्याची संधी त्यांना मिळाली आहे.

सर्वोच्च न्यायालयांने महाराष्ट्रात सरकार स्थापन करण्यासाठी महत्वाची भुमिका बजावलेली दिसून येते. महाराष्ट्रात सरकार स्थापनेमध्ये जो तिढा निर्माण झाला होता त्यावर महाराष्ट्रात सरकार स्थापन होण्यासाठी महत्वपूर्ण निकाल दिला त्यामुळे महाराष्ट्रात लोकशाही शासनाची स्थापना होऊ शकली अलिकडचा काळातील ही फाटाफुट उत्कृष्ठ व्यवस्थापनचा धडा शिकवून गेली. शिवसेना, राष्ट्रवादी कांग्रेस आणि कांग्रेस यांना पुन्हा एकदा स्थिरता लाभली आहे.

ऑगच्या अनुसार, ''आघाडी अथवा संयुक्त सरकार एक असे सहयोगी प्रबंधाचे नाव आहे ज्यामध्ये विभिन्न राजकीय पक्षाचे सदस्य सरकाराच्या गठन अथवा मंत्रीमंडळच्या निर्मितीसाठी एकत्र येतात.'' गठबंधन किंवा संयुक्त सरकारमध्ये राजकीय समुदाय अथवा पक्षांची आघाडी अस्थयी आणि काही विशिष्ट कार्यासाठी केली जाते. राजकीय पक्षांच्या सहकार्याचे फलस्वरूप संयुक्त सरकाराची निर्मिती केली जाते ज्यांचे एका समान राजकीय कार्यक्रमावर एकमत होते.

***संदर्भ :–***


१. *भोळे, भा.ल. (२००७) – भारतीय साशन व राजकारण, पिपळापुरे प्रकाशन, नागपूर*

२. *जैन पृखराज एंव बी.एल. फाडीया, (२०११) – भारतीय शासन व राजनिती, साहित्य भवन न्यु दिल्ली.*

३. *अग्रवाल जे. सी. आणि एन. के. चौधरी, (१९९६) इलेक्शन इंन इंडिया १९५२.१९९६ सिफ्रा पब्लीकेशन दिल्ली.*

४. *न्युज पेपर :– १) लोकसत्ता २) लोकमत*

# घनकचरा व घनकचऱ्याचे व्यवस्थापन

**डॉ. अल्का दुधबुरे,** श्यामकिशोर पशिने कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय दासगांव/बुज. alka_d9@rediffmail.com

**प्रस्तावना** : प्रत्येक दिवशी घराघरातुन, दुकाने, कार्यालये, उपहारगृहे, दवाखाने इत्यादींमधून बाहेर पडणारा कचरा म्हणजे शहरांपुढे एक आवाहन आहे. लोकसंख्या वाढ, औद्योगिक विकास, नागरिकरणाचा विस्तार यातून मोठयाप्रमाणात टाकावू पदार्थ, विषारी रसायने, कचरा उत्पन्न होतो. संयुक्त राष्ट्र अमेरिकासारख्या विकसित देशात शहरी टाकावू घनपदार्थाचे प्रमाण दरवर्षी ४.३४ कोटी टन आहे. संपूर्ण देशांमध्ये उपयोगानंतर १०० ग्रॅम ते ६०० ग्रॅम प्रती व्यक्ती कचरा व टाकावू पदार्थ एकादिवशी उत्पन्न होतो, म्हणजेच महानगरांमध्ये एकादिवशी २००० टन कचरा उत्पन्न होतो. दिल्ली ४८०० टन, मुंबई ९००० टन प्रती दिवशी कचरा निर्माण होतो. नियंत्रण व महालेखापरिक्षक सर्वेक्षणनुसार दरवर्षी ७.२ मैट्रिक टन औद्योगिक कचरा, ४ लाख मैट्रिक टन इलेक्ट्रॉनिक कचरा, १.७ मैट्रिक टन मेडिकल कचरा, १.५ मैट्रिक टन प्लास्टिक कचरा, ४.८ मैट्रिक टन नगरनिगम कचरा निर्माण होतो. त्यातील शहरी कचऱ्यात ३० ते ३५ टक्के जैविक कचरा असतो. त्यापासून खाद पुन:निर्मीती खत, गॅस व विद्युत निर्मीती करता येणे शक्य आहे.

**घन कचऱ्याची व्याख्या** : टाकावू पदार्थ जे कि उपयोगानंतर फेकण्यात येणाऱ्या किंवा उपयोगात नसणाऱ्या पदार्थाचे अवशेष किंवा पदार्थ जसे कि, कागद, पॉलिथिन, रबर, काच, अन्य कचरा (ओला व सुका कचरा) होय.

**घन कचऱ्याचे प्रकार:**

- **ओलाकचरा** : पालापाचोळा, भाजीपाल्याचा कचरा, फळफुलांचा कचरा, लाकडाचा भुसा, नखे, खरकटे अन्न, हाडे, मांस, माशांचे काटे. नारळ, शहाळे, करवंट्या इत्यादी.
- **कोरडा कचरा** : कागद, पुठ्ठा, प्लास्टिक, धातु, कापड, चिंध्या, रेग्झिन, थर्माकोल, रबर, काच ई–कचरा इत्यादी.
- **घातक कचरा** :सुया, सिरीज, जुनी औषधे, डायपर्स, सॅनिटरी पॅड, कापूस, बॅटरी सेल्स, रसायने, तुटलेले बल्ब, ट्युबलाईटस, किटकनाशके, जंतूनाशके इत्यादी.
- **कचऱ्याचे उपप्रकार** : रंगीत पोस्टर्स, साधे कागद, पुठ्ठा, सिगारेट, साबण, सौदर्य प्रसाधनांची वेष्टन, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे पेपर कप, प्लेटस् इत्यादी.
- **प्लास्टिक कचरा** : दुध आणि तेलाच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, नॉयलॉन ब्रश, वायर्स, इंजेक्शन शिरिंज, ग्लुकोज बॉटल्स, कप बशा, घरगुती वापराच्या कुंड्या, पेन, रिफिल्स.

१. **कुजणारे पदार्थ** : पालापाचोळा, भाजीपाल्याचा उरलेला अंश, स्वयंपाकातील टाकलेले पदार्थ, जनांवरांची विष्ठा, मेलेले प्राणी, लाकूड इत्यादी.

२. **न कुजणारे पदार्थ** :

- **प्रकियाशील:** प्लास्टिक, कागद, काच, कपडा, लोखंड, रबर इत्यादी वस्तू येतात.
- **अप्रकियाशील:** थर्माकॉल, टेट्रापॅक, पाण्याच्या बॉटल्स इत्यादी वस्तू येतात.

**घनकचऱ्याचे परिणाम** : पर्यावरण प्रदूषण स्वास्थ्य, स्थलीय जीवनाबरोबरच जलीय जीवन व भूमी या घटकांवर विपरीत परिणाम होतो. पर्यावरण प्रदुषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. हे असचं चालतं राहिल्यास सजिवांच्या अस्तित्वावर मोठे संकट ओढले जाईल. दवाखान्यातील व आसपासच्या परिसरातील घातक स्वरूपाचा कचरा (अवयव, मल–मुत्र, रक्त, सूया, बॅन्डेज इ.) दिवसेंदिवस पडून राहिल्यास त्याच्या संपर्कातील लोकांवर दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. पॉलिथिन किंवा प्लास्टीक हे केवळ उपयोग व वापराअंती प्रदुषण पसरविणारे वस्तू नसून, त्या तयार होणाऱ्या कारखाण्यातील मजूर व आसपासचा परिसर याकरिता घातक ठरीत आहे.कारखाण्यात काम करणाऱ्या मजुरांना चर्मरोग, श्वसनाचे आजार, यकृत, फेफडे व त्वचा कॅन्सर यासारखे भयानक रोगांबरोबरच संपूर्ण पर्यावरणाकरिता ते धोकादायक सिध्द झाले आहे. घनकचऱ्यामूळे जमिनीवर एक दृढ आच्छादन निर्माण होते. त्यामूळे पाण्याचा निचरा होत नाही. प्रत्यक्ष जमिनीवर पोहचण्यासाठी अवरोध निर्माण होतो. यामूळे मृदेची प्रत खालावते. प्रदुषणात अधिक वाढ होउन जमिनीची उत्पादन क्षमता कमी होत जाते व पोषणमुल्य नष्ट होते त्यामुळे परिस्थीतीकी यंत्रणेला धोका निर्माण होतो. घातकपदार्थ, कुजणारी घटकद्रव्ये जमीनीत झिरपून भूमिगत जलप्रदुषित होते. घनकचऱ्याच्या कूजण्यामूळे दुर्गंधी पसरून हवा प्रदुषीत होते. घनकचऱ्याच्या संग्रहणामूळे श्वसनाचे, घशाचे, फुफुसाचे रोग, दमा, क्षय, इत्यादी रोगांना निमंत्रण मिळते. आजार व रोगराईचे प्रमाण वाढत आहे.

**घनकचऱ्याचे व्यवस्थापन** : विविध शहरांमध्ये कचऱ्याचे प्रमाण वेगवेगळे असू शकते, त्यानुसार त्या त्या ठीकाणचा कचरा व्यवस्थापनाबाबत योग्य त्या पद्धती संयुक्तपणे अवलंबता येतात. घनकचऱ्याचे परिणामकारक व्यवस्थापन तीन तत्वांवर अवलंबून आहे. उघड्यावर कचरा टाकण्याच्या जोखिम समजून घेऊन समाजास व पर्यावरणास हितकारक असलेले धोरण ठरवून ते प्रत्येक शहरात राबविणे आवश्यक आहे.

**कमी वापर करणे** : फेकण्याजोगे साहित्य वापरण्यापेक्षा कायमस्वरूपी वापरण्यात येणाऱ्या वस्तूंचा वापर केल्यास टाकावू वस्तूंची निर्मीती कमी होईल.

**पुनर्वापर करणे** : टाकावू पदार्थ अनेक प्रकारांनी वापरता येतात. जूने प्लास्टिक, धातूंचे डब्बे, बॉटल्स, बरण्या पुन्हा वापरामूळे अविघटनशिल घनकचऱ्याचे प्रमाण कमी होईल.

**चक्रीकरण करणे/पुनप्रक्रिया:** लोखंड किंवा धातू पासून वस्तू बनवता येतात.

**व्यवस्थापनाची उदिद्ष्टे :**

○ घनकचरा ही आपत्ती समजुन तिचे घातक परिणाम रोखण्यासाठी किंवा ते परिणाम कमी करण्यासाठी उपाय शोधणे.

○ घनकचरा निर्मीती कमी करणे, घनकचऱ्याचा पुर्नवापर तसेच त्यावर संस्करण करून पुर्न:वापरक्षम करण्याचे तंत्र शोधणे.

○ योग्य सुरक्षित साठवण, विनीयोग व विल्हेवाट करणे ही उदिद्ष्टे आहेत.

**घनकचरा व्यवस्थापनातील क्रिया /पद्धती:**

घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी घनकचऱ्याची वर्गवारी केली पाहिजे. त्यानुसार घनकचरा वेगळा करणे महत्त्वाचे आहे. घनकचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी वेगवेगळ्या रंग असणाऱ्या कुंड्यांचा वापर केला जाऊ शकतो.

**संग्रह** : कचराकुंडी, कचरापेटी, संग्रहण ट्रॉली, हाथठेला यांचावापर

**पांढरा** : पून्हा वापरता येण्याजोगा कचरा.

**हिरवा** : कुजणारा किंवा ओला कचरा.

**काळा** : न कुजणारा किंवा सुका कचरा.

**निस्तारण:** बंद पेटीचा वापर करून निर्धारित ठिकाणी घनपदार्थाचा निपटारा करावा. transfer station garbage grinder याद्वारे घनकचरा पिसून त्याचे प्रमाण कमी केले जाते. चदमनउंजपब चपचमेय द्वारे भूमिगत लाइन द्वारा घनकचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. विकसीत देशात या प्रणालीचा मोठया प्रमाणावर उपयोग केला जातो.

निपटारा :

**पृथ्थकरण** : काच, पेपर, पुठ्ठा, धातू, लाकडी वस्तू यांना छाटून पूनर्चक्रण, रद्दी कागदापासून कागद, लोखंडापासून स्टील, एल्यूनिअम, प्लास्टिक पासून प्लास्टिक अशाप्रकारे उपयोग पृथ्थकरणात केला जातो.

**खड्डेभरणे** : संग्रहण केल्यानंतर कचरा खड्डयांत भरला जाऊन सुक्ष्मजिवांकडून विघटन होऊन ऑक्साइड, मिथेन, अमोनिया आम्ल बनते व त्यानंतर जैविक प्रकियेनंतर बुल्डोजरचा वापर करून भरले जाते.

**खुला भंडार:** शहरापासुन दूर खुल्या जमिनीवर कचरा टाकला जातो.

**खत तयार करणे:** विघटन होणाऱ्या घनकचऱ्याला जमिनीत गाडून, त्याला सडवून, गलवून उत्तम खत तयार केला जातो. २७ हजार करोड रूपयाचे खत निर्माण होणार एवढा कचरा एकटया भारतात आहे.

**भस्मीकरण** : दहनभट्टीद्वारे कचऱ्याचे जळण करून प्रदूषण कमी केले जाते. सिमेंट विटांचीही भट्टी बनवली जाते.

*संदर्भ ग्रंथ सुची :—*

*पर्यावरण विज्ञान — डॉ. विजय कुमार तिवारी*

*कचरा व्यवस्थापन — सौ. निर्मला कांदळगवाकर*

*कचरा व्यवस्थापन — डॉ. शाम अष्टेकर*

# जागतिकीकरणाचा भारतीय युवकांच्या जीवनशैलीवर झालेला प्रभाव

**प्रा. विनोद एस. शेंडे,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, एच. बी. टी. आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

**सारांश :** एकोणविसाव्या शतकानंतर जागतिकीकरणाला प्रारंभ झाल्यानंतर अविकसनशील देशातील विशेषकरुन भारतीय समाजातील युवकांच्या जीवनशैलीवर सर्वात जास्त परिणाम झाल्याचे आढळून येते. विसाव्या शतकात भारतातील परिस्थितीचा आढावा घेतल्यास बहुसंख्य प्रमाणात तंत्रज्ञानामध्ये बदल झाल्याचे निदर्शनास येते. परंतु युवकांसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. या प्रक्रियेत एक विशिष्ट प्रकारची असमानतेची दरी निर्माण होत आहे. विकसित देशांचा सहभाग जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जास्त प्रमाणात असल्यामुळे पाश्चात्य देशाची संस्कृती, व्यवसाय, जीवनशैलीत सकारात्मक आणि नकारात्मक बदल झाल्यामुळे समाजामध्ये संघर्ष निर्माण होत आहे.

भारत हा बहुसांस्कृतिक देश असल्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक सांस्कृतिक पैलूंमध्ये बदल झाला आहे. जगातील सर्वात जास्त युवक म्हणून भारतामध्ये असून आणि त्याचा विचार भांडवलशाहीच्या दृष्टिकोनातून आपल्या देशाकडे बघितले जाते. आधुनिक काळात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर सर्वात जास्त केल्या जात आहे. युवकांनी याचा योग्य उपयोग केल्यास आणि प्रत्यक्ष उत्पादन न करताही आपला विकास साध्य करता येते. भारतातील सचिन व बिन्नी बंसल यांनी फ्लिपकार्ट आणि अमेरिकेतील वॉलमार्ट यांच्यातील व्यवहारातून बाजारमूल्यांमध्ये विक्रमच केला आहे. हा एक संदेश युवकांसमोर दिला आहे. जागतिकीकरणात युवकांच्या एकूणच जीवनशैलीवर बदल होत आहे जसे बोलचाल, पेहराव, केशरचना, संगीत, शिक्षण, विवाहसंस्था, कौटुंबिक पिढ्यांमधील संघर्ष, सांस्कृतिक बाबींवर परिणाम होत आहे. युवकांना सांस्कृतिक जीवन जगतांना परंपरागत मुल्ये टाळणे आणि जागतिकीकरणाच्या माध्यमातून उपसंस्कृती निर्माण होत आहे. संस्कृतीतून उपसंस्कृती निर्माण करीत असतांना विचलनाचे व्यवहार जास्त प्रमाणात आढळून येत आहे.

**प्रस्तावना:** जगातील मानवी समाजाला एकत्रित आणण्याचे सर्वात महत्त्वाचे कार्य जागतिकीकरणाच्या माध्यमातून केले आहे. जागतिकीकरणाचा भारतीय समाजव्यवस्थेवर जसा चांगला परिणाम झाला आहे. तसाच वाईटही झाल्याचे दिसून येते. भारतीय समाजामधील सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि सामाजिक जीवनाच्या पैलूंवर परिणाम घडून आलेला आहे. लक्ष केंद्रित असणाऱ्या संदर्भात स्थानिक, राज्य, राष्ट्र, आंतरराष्ट्रीय आणि सामाजिक सर्व स्तरांवर बदल होत असल्याचे आढळून येत आहे. विशेष करुन तरुण वर्गाच्या जीवनमानावर प्रभावित झालेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या जीवनाचा सांस्कृतिक आकृतिबंध बदलत असून अमेरिकेत कपडे, चायनीज अन्न, फ्रेंच व्हिस्की, इंग्लिश पॉप संगीत याबाबीचा मोठ्या प्रमाणात परिणाम होत चालला आहे.

युवक हा प्रत्येक देशाचा नव्हे तर जगाचा नेतृत्व करणारा असून त्यांच्यावर जागतिकीकरणाचा कशाप्रकारचा प्रभाव पडतो हे जाणून घेणे आवश्यक आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचे विश्लेषण करणे, युवकांसमोर कोणती आव्हाने निर्माण झाली आहेत याचा चिकित्सक अध्ययन करणे त्याचप्रमाणे जागतिकीकरणाची निर्मिती कशी झाली आहे त्या संदर्भात विविध विचारवंतानी केलेल्या संकल्पनाचा आणि परिभाषाचा आढावा घेणे.

**जागतिकीकरणाची प्रक्रिया :** जागतिकीकरणाची उत्पत्ती आधुनिक काळात विकसित देशांनी सुव्यवस्था, शांतता विकास आणि मानवतावादीचे धोरण स्विकारल्यामुळे निर्माण झाली आहे. हा खरा विचार दुसऱ्या महायुध्दाचा अंत झाल्यानंतर केला गेला आहे. जागतिकीकरण ही अत्यंत जटील आणि मानवी जीवनाच्या विविध पैलूंशी संबंधित असणारी अशी प्रक्रिया आहे. समाजशास्त्रज्ञ ॲन्थनी गिडिन्स (१९९९) यांनी जगातील विविध लोकांमध्ये आणि क्षेत्रामध्ये वाढत असणारी पारस्पारिकता आणि परस्परनिर्भरता म्हणजे जागतिकीकरण होय. ही पारस्पारिकता आर्थिक आणि सामाजिक संबंधातील तसेच स्थळ काळातील अंतर मिटवून टाकते. एन वाटर्स (२००१) यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेवरील भौगोलिक मर्यादा कमी होते आणि लोक अधिक जागरुक होत असतात असे मत त्यांनी मांडले आहे. जागतिकीकरणाच्या परिभाषेवरुन सामाजिक बदलांच्या प्रक्रियेतून समाजातील भेदभाव कमी होऊन तसेच स्थानिक आणि जागतिक स्तरावर एकत्रित झाले आहेत. जागतिकीकरणास भांडवलशाही जगाच्या प्रणालीमध्ये परिवर्तन करण्याची प्रक्रिया म्हणूनही पाहिले जाते. यामुळे जो संरचनात्मक आणि वैचारिक प्रवृत्तीमध्ये बदल होण्यास मदत होते. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक आणि सामाजिक आयोगाच्या मते, वस्तू, भांडवल, सेवा आणि श्रम यांचा प्रवाह सुलभ करण्यासाठी राष्ट्रांच्या सीमांमधील अडथळे काढून टाकणे अथवा कमी करणे म्हणजे जागतिकीकरण होय. जगाच्या सर्व पैलूंवर आपल्या कल्पना, वस्तू सामाजिक संबंध आणि सर्वात महत्त्वाच्या संघर्षामधील एकाच आणि निरंतर होणाऱ्या परिणामाचा समावेश केला जातो. आर्थिक दृष्टीकोनातून त्यामध्ये विदेशी थेट गुंतवणूक करणे, व्यापार, भांडवलाचा प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांचा प्रचार–प्रसाराच्या माध्यमातून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी मुक्त केले आहे. गीलपीन यांनी प्रभुत्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था आणि संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय असे म्हटले आहे. थॉमस एल. फेडमॅडिव्हिल यांनी जागतिकीकरणाला तीन कालखंडात विभाजन केले आहे. त्यांनी १४९२ ते १८०० या कालावधीत विभिन्न देशांचा जागतिकीकरणात अंतर्भाव करणे, सन १८०० ते २००० दशकात वेगवेगळ्या प्रकारच्या उद्योगाचा समावेश करणे आणि २००० ते

आजतागायत अनेक व्यक्तींचा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आधुनिक काळात ओळख करुन देणे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये भारताने १९९० पासून सुरुवात केली आहे. मागील वीस वर्षात या प्रक्रियेमुळे भारतातील पायाभूत संरचना, उद्योग व्यवसाय, सेवा क्षेत्रात विकास झाला आहे. माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचारात जास्त प्रमाणात विकास झाला आहे. थोड्या प्रमाणात जीवनमानाचा दर्जा उंचावला असून गरीबी व श्रीमंती मध्ये तफावत निर्माण होऊन असमानता वाढली आहे. त्यामुळे त्याचा वाईट परिणाम समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांवर जास्त प्रमाणावर झाला आहे. भौतिकदृष्ट्या बदलांच्या कारणामुळे संयुक्त कुटुंब पध्दती, समाजातील जीवन जगण्याच्या शैली, रुढी परंपरा यांचाही लुप्त होत असल्याने अनेक सामाजिक समस्या देखील निर्माण झाल्या आहेत.

जागतिकीकरणाची निर्मिती करण्यासाठी विविध तज्ज्ञ विचारवंतानी प्रादेशिक विस्तार करण्याचे महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. थोडक्यात जागतिकीकरण ही जागतिक स्तरावरील विविध लोक, राष्ट्रे आणि समाज यांच्यातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक संबंधाची विश्व ग्राम (ळसवइंस टपससंहम) म्हणून मॅकलुहन (१९६८) यांनी मांडलेली संकल्पना असून ज्याला जागतिक व्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया म्हटले आहे.

**युवक** : रुढी परंपराच्या दृष्टिकोनातून पौंगडावस्थेपासून ते मध्यम वर्गापर्यंतच्या काळाला युवक म्हणून ओळखला जातो. युवकांमध्ये जोश, उत्साह, साहस आणि जीवनशैलीत असलेली भिन्नता आढळून येते. त्यांच्या दृष्टिकोणामध्ये स्थिरता नसून लवचिकता असते. वयोगटाच्या वैशिष्ट्यांवरुन युवकाची परिभाषा निश्चित केली आहे. संयुक्त राष्ट्र, संघाच्या राष्ट्रीय युवक धोरणानुसार २००३ मध्ये युवकांना १५ ते ३५ वर्षे वयोगटातील असल्याचे नमूद केले आहे. जागतिक लोकसंख्येच्या अहवालावरुन भारतातील युवकांची संख्या ३५.६ कोटी, चीन मधील युवकांची संख्या २६.९ कोटी आहे. त्यानंतर खालील इंडोनेशियामध्ये ६.७ कोटी तर अमेरिकेतील युवकांची संख्या ६.५ कोटी आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, जगातील इतर देशांपेक्षा तरुणांची संख्या सर्वात जास्त भारतामध्ये आहे. आपल्या देशाची समृध्दी करण्याचे कार्य युवकांच्या गुण कौशल्ये, सुदृढ आरोग्य, निर्णयक्षमता आणि वर्तमान परिस्थितीत वास्तविकता निवडण्याची क्षमता ज्या युवकांमध्ये असते तेच देशाला उज्ज्वल भविष्य निर्माण करु शकतात. उपरोक्त परिस्थिती निर्माण करण्यासाठी मुलभूत गरजा, शिक्षण, सुरक्षा, आरोग्य, रोजगार, उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. युवक हाच त्या देशाची मोठी संपत्ती आणि शक्ती म्हटले जाते.

**युवकांची संस्कृती आणि जीवनशैलीवर प्रभाव** : युवकांच्या अवस्थेला मुख्यत: आधुनिक औद्योगिक समाजाची एक विशिष्ट घटना म्हणून संबोधले जाते. दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर सर्वात जास्त युवकांवर लक्ष केंद्रीत केले, कारण जटील समाजाच्या विकासाकरिता अनेक आव्हाने निर्माण झाली होती. यामुळे आधुनिक औद्योगिक समाजामध्ये सर्वाधिक युवकाची एक समस्या म्हणून बघितल्या गेले आहे. यामध्ये युवकांच्या आरोग्याचा विशेष सामाजिक अनुकूलन करणे आवश्यक वाटायला लागले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये युवकाच्या सामाजिक श्रेणीमध्ये आपली जीवनशैली, खान–पान, वेशभुषा, केशभूषा, अभिवादनाचे प्रकार, शिष्टाचार, बोलचाल आणि व्यवहाराच्या वेगळेपणाची ओळख निर्माण होत असल्याचे आढळून येत आहे.

जागतिकीकरणाचा समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि शिक्षण प्रक्रियेवर फार मोठा प्रभाव झालेला आहे. जगातील सर्वच समाजातील संस्कृतीवर देखील याचा परिणाम झालेला आहे. केवीन रोबीन्सच्या मते, या प्रक्रियेमुळे मानवी संस्कृतीवर फार मोठा परिणाम झाला आहे. आर्थिक व्यवहारासोबतच सांस्कृतिक रुपांतरणही निर्माण झाले आहे. भारतीय समाजातील युवकांच्या संस्कृतीवर पाश्चात्य देशांचा प्रभाव पडलेला आहे.

सर्वांना स्वातंत्र्य मिळायला पाहिजे म्हणून जागतिक स्तरावर समाजातील मूल्ये मान्य केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी सर्वांना सारखा अधिकार प्राप्त झालेला नव्हता. परंतु स्वातंत्र्यानंतर संविधानाच्या माध्यमातून सर्वांना स्वातंत्र्य हा मुलभूत हक्क मानले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्तीला आपला विकास करण्यासाठी जगात कुठेही जाण्याचे स्वातंत्र्य दिल्या गेले आहे. सोबतच तो व्यक्ती आपले मत मतांतरे, शिक्षण, व्यवसाय, नौकरी आणि वास्तव्य करण्याचे अधिकार दिलेले आहे. परदेशात जाण्यासाठी सहजपणे पासपोर्ट आणि व्हिसा संदर्भात असणारे नियम शिथिल करुन सरळ सोपी पध्दती केली आहे.

संस्कृतीतून युवकांची एक विशिष्ट प्रकारची वेगळी उपसंस्कृती निर्माण केली जाते. ज्याचे प्रदर्शन संगीत, फॅशन, जीवनशैली इत्यादीच्या माध्यमातून केंद्रित केली आहे. याप्रकारच्या कार्याला त्यांना अत्यंत आनंद आणि आराम वाटणारी संस्कृती म्हणून अपेक्षा केली जाते, ही पध्दती समूहामध्ये मुख्य आवड असणाऱ्या शैलीच्या पध्दतीमध्ये रुपांतर होते. कुटुंबातील संस्कृती आणि नियमानुसार युवकांनी व्यवहार करावा अशी अपेक्षा असते. परंतु मुलांना ते मुळीच आवडत नसते, त्यांच्यावर जास्त बंधने लादली आहेत असे मुलांना वाटते. त्यामुळे युवकांकडून विचलन आणि विद्रोह निर्माण होतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्तीच्या विकासाला सर्वोत्तम प्राधान्य व पुरस्कार तथा प्रोत्साहन दिले जाते. या विकासाच्या प्रक्रियेमध्ये कुणीही अडथळा निर्माण केल्यास त्याचे निरसन केले जाते. अशाप्रकारच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात करण्यापूर्वीच ही मूल्ये अस्तित्वात असल्याचे हर्बट स्पेन्सर यांनी स्पष्ट केले आहेत. व्यक्तिस्वातंत्र्यवादाच्या विचारसरणीला व्यक्तीच्या हितालाच जास्त प्राधान्य दिले जाते. प्रत्येक व्यक्तीला अत्यंत जास्त प्रमाणात हित प्राप्त करणे असे व्यक्तीवाद मान्य करतो.

या प्रक्रियेमध्ये भांडवलशाहीचे जास्त महत्त्व दिले आहे. यात ग्राहकाला दैवत मानले जाते. म्हणून त्यांना वस्तू आणि सेवांची विक्री करुन त्याचा सर्वात जास्त उपभोग घेतला पाहिजे हे त्यांचे

ध्येय्य असते. सुख व चैनीच्या वस्तूला प्रवृत्त आणि प्राधान्य दिले जात आहे. अनेकांनी आपल्या वस्तूंचा वापर केला पाहिजे म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या नवनवीन स्कीमच्या जाहिरातीचा प्रचार आणि प्रसार केला जातो. त्या उत्पादनाचा ग्राहकांवर अथवा लोकांवर बळजबरी केली जाते. जसे की, 'एकवर एक फ्री' याची गरज नसतांनाही त्या वस्तूला प्राधान्य दिल्या जाते. कर्ज काढून चैनीचा वापर केल्याची मानसिकता तयार झाली आहे.

जगातील समूह एकमेकांशी संपर्कात येतात. तेव्हा त्यांच्या विशेष असणाऱ्या संस्कृतीचा प्रभाव इतरांवर होतो. अशा परिस्थितीत प्रत्येक समूहातील संस्कृतीच्या घटकातील तत्त्वे दुसऱ्यांच्या समूहात अथवा समाजात हस्तांतरीत होतो. भारतामध्ये असणारी संस्कृती जेव्हा पाश्चात्य देशांच्या संपर्कात आले तेव्हा त्यांच्या संस्कृतीचा परिणाम आपल्या समाजावर देखील झाल्याचे निदर्शनास येते. कालांतराने पाश्चात्य संस्कृती भारतीयांच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग बनला आहे. जसे की, पुरुष व स्त्रियांच्या केस रचना, जेवण करण्याच्या पध्दतीमधील बदल म्हणजेच डायनिंग टेबलवर बसून काट्याचमच्यांनी जेवण करणे, अंमली पदार्थामध्ये धुम्रपान आणि मद्यपान सेवन करण्याला निषिध्द न मानणे, स्त्री पुरुषांनी सार्वजनिक ठिकाणी नृत्य करणे अथवा शिष्टाचारामधील आलिंगन देणे इत्यादी पाश्चात्य लोकांच्या सांस्कृतिक घटकतत्त्वे अनुकरण करण्याच्या या प्रक्रियेला एम.एन. श्रीनिवास यांनी पाश्चिमात्यीकरण असे म्हटले आहे. प्रत्येक समाजातील जीवन जगत असतांना पर्यावरणानुसार अनुकूल असणाऱ्या गोष्टींचे आचरण करणे हे समाजाच्या मुल्यानुसार योग्य मानले जाते. ज्या प्रदेशामध्ये उष्णकटिबंध असेल तर त्या लोकांना सुती कपडे वापरणे आणि थंड प्रदेशातील वातावरणात असणाऱ्यांना लोकरी कपड्यांचा वापर करणे अत्यंत हितकारक असते. त्याचप्रमाणे खाण्यापिण्याच्या सवयी तथा व्यवहार पर्यावरणाशी जुडणारे असले पाहिजे. अशाप्रकारची प्रत्येक समाजाची स्वत:ची मुल्ये ठरलेले असतात. परंतु जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत त्यांच्यावर खऱ्या अर्थाने युवा पिढीवर निर्माण होत आहे. वाईट सवयींमुळे त्यांच्या मानसिकतेवर आणि त्यांच्या आरोग्यावर देखील गंभीर परिणाम निर्माण होत लागल्या आहेत. ज्याला गरज नाही अशाप्रकारच्या जसे थंड पेये, आईसक्रिम इत्यादी सर्वच ऋतूंमध्ये उपलब्ध करुन दिली आहेत. विशेषकरुन तरुण पिढीवर प्रामुख्याने जास्त वाईट परिणाम होत असल्याचे आढळून येत आहे.

मॅकडोनाल्ड या पाश्चात्य बहुराष्ट्रीय कंपनीचे फास्टफुड उपलब्ध करुन दिले आहेत. ही एक प्रकारची फॅशनच म्हणून लोकप्रिय होत चालली आहे. यामुळे जी परंपरागत खाद्यपदार्थाची निर्मिती कमी होऊन मागे पडली आहेत. खानपानासोबतच कपड्यांमध्ये जसे जीन्स, टी–शर्ट, बरमुडा, प्रवासी बॅग्स, विशिष्ट खेळाचा पोशाख बुट आणि साहित्य ही सर्वात जास्त आपल्या देशांमध्ये वापरल्या जात आहेत. बिग बॉस सारख्या अनेक चॅनल्सवर अश्लील प्रदर्शन करणे तसेच इंटरनेटवर पोर्न चे प्रदर्शन समाजाच्या आचरण करण्याच्या विरुध्द आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने यौन–अश्लील साहित्यांना प्रतिबंधीत करायला सांगितले होते पण मिडीया वर अनेक प्रतिबंध पूर्णपणे केलेले नाही. या सर्वांचा वापर करण्यासाठी जाहिरातीच्या माध्यमातून युवकांच्या मानसिकतेवर बिंबविल्या जात आहे. अशाप्रकारच्या वस्तूचा वापर केल्यास स्थानिक पर्यावरणांशी विसंगत निर्माण होत असल्यामुळे आरोग्यास फार घातक परिणाम निर्माण होऊ शकतात 'कळते पण वळत नाही' अशाप्रकारचे अनेकांना जाणीव नसल्याचे आढळून येते.

युवकांच्या या पिढीवर परिणाम झाल्यामुळे भारतातील विवाह, कुटुंब, शिक्षण, धर्म इत्यादींवर बदल झाल्याचे लक्षात येत आहे. तरुणांना करिअरसाठी अविवाहीत राहणे, विवाह, उशिरा करणे, विवाह न करताच युवा–युवतींनी एकत्र राहणे ज्याला स्पअम पद तमसंजपवदेीपच असे म्हटले जाते. काही थोड्याथोड्याशा कारणावरुन घटस्फोट घेणे, समलिंगी संबंध ठेवणे आणि त्याला मान्यता देणे, विवाहानंतर मुलांना जन्म होऊ न देणे, विभक्त कुटुंब निर्माण करणे, आईवडिलांकडे दुर्लक्ष करणे म्हणूनच अनेक वृध्दांना वृध्दाश्रमात राहावे लागत असल्याचे निदर्शनास येत आहे.

### *संदर्भ*


१. *आहूजा, राम (२०१६): सामाजिक समस्याए, रावत पब्लिकेशन्स, जयपूर, पृ.क्र.२७९–२८४*
२. *रावत, हरिकृष्ण (२०१२) : समाजशास्त्र विश्वकोष, रावत पब्लिकेशन्स, जयपूर, पृ.क्र.१५१–१५२*
३. *भार्गव, नरेश (२०१४), वैश्वीकरण: समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य, रावत पब्लिकेशन्स, नई दिल्ली, पृ.क्र.*
४. *Youth in India (2017), Central Statistics Office, Ministry of Statistics and Programme Implementation, Govt. of India (Social Statistics Division), P.No.2, 3*
५. *आहूजा, राम, मुकेश राम (२०१५): विवेचनात्मक अपराधशास्त्र, रावत पब्लिकेशन्स, जयपूर, पृ.क्र.२७०*
६. *दैनिक लोकसत्ता (२०१६), जानेवारी २५*
७. *आगलावे, प्रदीप (१९९९), समाजशास्त्रीय संकल्पना, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.२२३*
८. *कराडे, जगत (२००८): जागतिकीकरण: भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ.क्र.५८*
९. *shodhganga.inflibnet.in*
१०. *गॅलप (GALLUP) संस्था, (२०१५), ११ सप्टेंबर*
११. *WIKIPEDIA, History of Globalçation*
१२. *दैनिक लोकसत्ता (२०१४), नोव्हेंबर*
१३. *Mohanty, Tapan (2014), Globalçation Identity and Indigenous People, UGC, R.T.M. Nagpur University, Refresher Course*
१४. *careerride.com*

# आधुनिक काळ आणि बुध्द धम्म

**डॉ. राहुल भगत,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा. मो. ९८३४९८८३३७

**प्रस्तावना** :— महामानव विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अखंड मानव जातीला मिळालेले एक अतिशय दुर्मिळ व अनमोल असे रत्न होय. विसाव्या शतकातील एक महान विचारवंत, लेखक, राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडीत अशा विविध उपाधी ज्यांना बहाल करता येतील असे महान व्यक्ती होत. त्यांच्या क्रांतीकारी विचारांनी व त्यांनी मानवतेच्या मूक्तीसाठी उभारलेल्या लढयामुळे शतकानुशतके गुलामीत खितपत पडलेला अस्पृश्य समाज खडवडून जागृत झाला. शेकडो वर्षाच्या धार्मीक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक गुलामीच्या साखळदंडाना तोडून या समाजाने आज जी प्रगती केली आहे ती सर्वाच्याच नजरेस भरण्यासारखी आहे. अस्पृश्यांच्या या प्रगतीसाठी अजून एक महत्वाचे कारण कारणीभूत ठरले आहे ते म्हणजे १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ५ लाख अनुयायांसह बौध्द धम्माची दिक्षा घेऊन फार मोठी वैचारीक क्रांती घडवून आणली ही जगातील अत्यंत महत्वपूर्ण ऐतिहासीक, धार्मीक क्रांती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना जो बुध्द धम्म दिला तो विज्ञानावर आधारीत आहे. त्यातील बावीस प्रतिज्ञा जिवन सम्यक मार्गाने जगण्याचे सूत्र सांगतात. अंधश्रध्दा, बुवाबाजी, कर्मकांड यांच्या जोखंडात अडकलेल्या आणि उच्च, निच्च, जात, पात या चिखलात रूतलेल्या अस्पृश्य समाजाला नवीन ओळख बाबासाहेबांनी दिली. 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी सिंह गर्जना त्यांनी केली त्यांच्या या सिंह गर्जनेला त्यांच्या अस्पृश्य समाजातील लोकांनी दुजोरा दिला. ज्या धर्मात जन्माला येवून आणि संपूर्ण जिवन जगूनही, मृत्यू नंतरही अपमान आणि अवहेलनेशिवाय काहीच मिळाले नाही अशा हिंदू धर्मात राहणे म्हणजे स्वत:च्या प्रगतीला बाधा आणणे होय असे अस्पृश्यांना बाबासाहेबांनी ठणकावून सांगितले आणि त्याचीच परिस्थिती म्हणजे धम्मचक्र प्रवर्तन दिन होय.

**धम्मचक्र प्रवर्तन एक ऐतिहासीक आणि क्रांतीकारी घटना** :— डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द धम्माची दिक्षा घेण्यासाठी भारतातील मध्यभागी असलेले नागपूर हे शहर निवडले. या नागनगरीत पूर्वीचे नागलोक राहत होते. १४ ऑक्टो. १९५६ ला महाथेरो चंद्रमणी यांच्या हस्ते बौध्द धम्माची दिक्षा त्यांनी घेतली. त्या नंतर त्यांनी पाच लाख अस्पृश्यांना बौध्द धम्माची दिक्षा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील तथागत भगवान बुध्दाच्या बुध्द धम्म स्विकारून बौध्द धम्माच्या थांबलेल्या प्रचार, प्रसाराच्या कार्याला पून्हा गतीमान केले. संपूर्ण आस्तामंतात 'बुध्दमं...शरणंम.... गच्छामी' असा जयघोष निनादू लागला विशेष म्हणजे हे वर्ष तथागत भगवान बुध्दांचे २५०० वे महापरिनिर्वाण वर्ष होते. आधुनिक जगाच्या इतिहासातील ही एक महान अशी ऐतिहासीक घटना होती ज्या महान भूमीवर हा अभूतपूर्व सोहळा झाला ती भूमी आज 'दिक्षाभूमी' या नावाने जगभर ओळखली जाते. जगातील सर्व बौध्दांचे ते पवीत्र तिर्थस्थान झाले आहे. दरवर्षी विजयादशमीच्या पावन पर्वावर इथे मोठा जगसागर उसळतो आणि इथे येणारा प्रत्येक बौध्द डॉ. बाबासाहेबांच्या कार्य कतृत्वाचे तेज त्याच्या सोबत घेऊन जातो आणि धम्म प्रचार व प्रसाराचे कार्य करीत असतो. आयुष्यात एकदाच नव्हे तर दरवर्षी दिक्षाभूमीचे दर्शन घेता यावे, तेथील गर्दीचा एक भाग होता यावे अशी धडपड सर्व बौध्दांमध्ये जाणवते. हा एक अभूतपूर्व सोहळा दरवर्षी नागपूर नगरीत पार पडत असतो म्हणून या सोहळयाचे महत्व जागतीक स्तरावर अनोखे आहे.

**भगवान बुध्दांचा धम्म** :— महाकरूणीक सिध्दार्थ गौतम बुध्दाला 'गया' येथील बोधीवृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले आणि त्यांनी आपल्या धम्म मार्गाची रूपरेखा तयार केली. सर्वात प्रथम बुध्दांनी आपल्या जुन्या पाच सहकार्यांनी धम्मोपदेश करण्याचे ठरविले. त्या पाच परिव्राजकांना उपदेश करतांना बुध्द म्हणाले की, ''जीवनाची आत्यंतिक अशी दोन टोके आहेत एक सुखद भोगाचे व दुसरे स्वक्लेशाचे. पुढे बुध्द म्हणतात की, हे परिव्राजक, ही गोष्ट समजून घ्यावी की, दोन अत्यंतिक टोके अशी आहेत की माणसाने त्यांच्या कधीही अवलंब करू नये. एक टोक म्हणजे ज्या गोष्टींचे आकर्षण कामवासनेच्या तृष्णेमुळे होते, त्या गोष्टीत विशेषत: विषयासक्तीत सतत डुबत राहणे. तृप्ती मिळविण्याचा हा मार्ग अगदी हलक्या दर्जाचा, राणटीपणाचा, अयोग्य आणि हानीकारक आहे. दुसरे टोक म्हणजे तपश्चर्या किंवा स्वक्लेश हा मार्गही दु:खदायक, अयोग्य आणि हानीकारक आहे. ही दोन्ही आत्यंतिक टोके त्यामुळे टाहता येतात असा एक मध्यम मार्ग आहे ध्यानात ठेवा मी त्याच मध्यम मार्गाची शिकवण देतो आहे.''(आगलावे–२०१९–१३).

पाचीर परिव्राजकांनी बुध्दांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकूण घेतले तेव्हा पिंपळाच्या झाडाखाली आपण कसे चिंतन केले. चार आठवडे सतत चिंतन केल्यानंतर ज्ञानप्राप्ती झाली आणि आपण नवा जीवनमार्ग कसा शोधून काढला हे सर्व बुध्दांनी त्यांना सांगितले. त्यानंतर सर्वांनी बुध्दांना नवा जीवनमार्ग स्पष्ट करण्याची विनंती केली. तेव्हा बुध्द म्हणाले की, ''आपला मार्ग म्हणजे धम्म होय. धम्माला ईश्वर आणि आत्मा यांच्याशी काहीही कर्तव्य नाही. त्याचा मरणोत्तर जीवनाशी कोणताही संबंध नाही तसेच कर्मकांडाशी काहीही सबंध नाही. माणूस आणि माणसाचे माणसाशी या जगातील नाते हाच धम्माचा केंद्रबिंदू आहे.''

जीवन दु:खमय आहे, दु:खाचे कारण आहे दु:खाचा निरोध करता येतो आणि दु:ख निरोधाचा मार्ग म्हणजे आय आष्ट्रांगिक मार्ग होय. या संबंधीचे सविस्तर विवेचन बुध्दांनी केले.

तथागत भगवान बुध्द परिव्राजकांना अष्टांगिक मार्गाचा उपदेश करतात. बुध्दांनी सांगितलेले अष्टांगिक मार्गाचे आठ अंग पुढीलप्रमाणे आहेत.

१) **सम्यक दृष्टी** : भगवान बुध्दांनी सांगितलेले हे पहिले व महत्वाचे अंग होय. साम्यक दृष्टी अविद्येचा विनाश करते. ती मिथ्या दृष्टिची विरोधी आहे. सम्यक दृष्टिमुळे माणसाचा कर्मकांड व अंधःश्रध्देवरील विश्वास नष्ट होतो. सम्यक दृष्टी चा उद्देश आहे की मानवानं अशा मिथ्या धारणांपासून मूक्त व्हावे ज्या सिध्दांतांना वास्तवतेचा किंवा अनुभवाचा आधार नाही व जी केवळ काल्पनिक अनुमाने आहेत मन, विचार हे स्वतंत्र असले पाहिजेत.

२) **सम्यक संकल्प** : माणसाच्या आशा, आकांक्षा, ध्येये ही उदात्त व प्रशंसनीय असावीत. ती शुद्र आणि अयोग्य नसावीत. हा सम्यक संकल्प चा आशय आहे.

३) **सम्यक वाणी** : सम्यक वाणी म्हणजे जे सत्य असेल तेच बोलावे, खोटे बोलू नये. दुसऱ्या विषयी वाईट बोलू नये, दुसऱ्यांची निंदा नालस्ती करू नये. खोटया गोष्टीपासून परावृत्त व्हावे. शिविगाळ किंवा रागाची भाषा वापरू नये माणसाने माणसाशी विनम्रपणे व सौजण्याने वागावे. माणसाने अहिंन मूर्खपणाची बडबड करू नये. त्याचे बोलणे समजसपणाचे हेतूपूर्वक व मुद्देसुद असावे.

४) **सम्यक कर्म** : सम्यक कर्म हे वर्तनाशी संबंधीत आहे. दुसऱ्याच्या भावना आणि त्यांचे हक्क यांचा मान राखून प्रत्येक कृती करावी अशी शिकवण देते. जीवनाच्या मुलभूत नियमांशी अधिकात अधिक सुसंगत असे वर्तन हे त्यांचे प्रमाण होय. हाच त्याचा मापदंड होय. जेव्ह माणसाचे वर्तन नियमांशी सुसंगत असते तेव्हा ते सम्यक कर्मान्ताशी सुसंगत असते.

५) **सम्यक आजीविका** : प्रत्येक व्यक्तीला आपला चरितार्थ चालवयांचा असतो. परंतू चरितार्थाचे अनेक मार्ग आहेत. काही वाईट आहेत काही चांगले आहेत ज्यांच्यामुळे इतराची हानी होते किंवा त्यांच्यावर अन्याय होतो ते वाईट मार्ग होत. दुसऱ्यांची हानी किंवा त्यांच्यावर अन्याय न करता आपल्या जगण्यासाठी कमविण्याचे जे मार्ग आहेत ते चांगले होत याला सम्यक आजीविका म्हणतात.

६) **सम्यक व्यायाम** : सम्यक व्यायामचा पहिला हेतू अष्टांगिक मार्गाशी विरोधी अशा चित्तप्रवृत्तीचा विरोध करणे, अशा वित्तप्रवृत्ती अगोदरच निर्माण झाल्या असतील तर त्यांना दाबून टाकणे हा दुसरा हेतू होय. अशा प्रकारच्या ज्या आवश्यक चित्तप्रवृत्ती उत्पन्न झाल्या असतील त्यासाठी माणसाला सहाय्य करणे हा तिसरा हेतू होय.

७) **सम्यक स्मृती** : सम्यक स्मृती म्हणजे मनाची सतत जागरूकता होय. मनात जे अकुशल विचार येतात त्यांच्यावर पहारा ठेवणे याचेच दुसरे नाव म्हणजे सम्यक स्मृती होय. पुढे तथागत म्हणतात की परिव्राजकहो सम्यक दृष्टी , सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मान्त, सम्यक अजिविका, सम्यक व्यायाम आणि सम्यक स्मृती प्राप्त करून घेण्याचा प्रमाण करणाऱ्या माणसांच्या मार्गावर अडथळे येतात किंवा बंधणे असतात. लोभ व्देष, आळस किंवा सुस्ती, संशय आणि अनिश्चय हे ते पाच अडथळे होत.

८) **सम्यक समाधी** : वरील पाचही अडथळे म्हणजे बंधणेच होत आणि ते दूर करण्याचा मार्ग समाधी मार्ग हा होय. परंतू सम्यक समाधी म्हणजे समाधी नव्हे तिचे स्वरूप वेगळे आहे. समाधीमुळे केवळ या अडथळयांना अटकाव करता येईल परंतू सम्यक समाधीमुळे मनाला कायमचे वळण लावले जाते ती वास्तवात्मक आहे. जी मनाला एकात्मतेचे आणि एकाग्रतेच्या काळात कुशल कर्माचा विचार करण्याचे शिक्षण देते. त्यामुळे अकुशल कर्माकडे आकर्षित होण्याची मनप्रवृत्ती नष्ट होते. सम्यक समाधी मनाला कुशल गोष्टींचा विचार करण्याची सवय लावते. सम्यक समाधी चांगली कृती करण्यास आवश्यक अशी प्रेरणा मनामध्ये निर्माण करीत असते (डॉ. बाबासाहेब आंबेडकर – बुध्दा अॅड हिज धम्म).

अशी आठ आर्यसत्य किंवा अष्टांगिक मार्गाची तत्वे भगवान बुध्दांनी परिव्राजकांना विषद केली. बुध्दाचा उपदेश ऐकूण पाचही परिव्राजक आनंदित झाले. त्यांच्यावर बुध्दाच्या उपदेशाचा इतका परिणाम झाला की ते एकमताने म्हणाले, ' जगाच्या इतिहासात आजपर्यंत मानवी दुःखाचे अस्तित्व मान्य करणे हाच धर्माचा खरा पाया आहे.' हे कोणत्याही धर्म संस्थापकाने सांगितलेले नाही. जगाच्या इतिहासात यापूर्वी इतका सरळ, साधा, अद्भूत आणि अतिमानुषी शक्तीपासून इतका मुक्त, आत्मा इश्वर आणि मरणोपरांत जीवन या अंधःश्रध्देपासून इतका स्वतंत्र आणि अशा अंधःश्रध्देला विरोध करणारा मुक्तीचा मार्ग कधीही पुढे मांडण्यात आला नव्हता. आषाढी पौर्णिमेला या पाच परिव्राजकांना प्रथम धम्मोपदेश दिला होता म्हणून सारनाथ येथील मृगदान वनात या पाच परिव्राजकांना दिलेला उपदेश म्हणजे बुध्दाचे पहिले धम्मचक्र प्रवर्तन होय. त्यानंतर पुढे भगवान बुध्द महारिणिर्वाणापर्यंत सतत उपदेश देत राहिले. बौध्द धम्माला अनेक राजे आणि सम्राटांनी राजाश्रय दिला. तसेच बौध्द धम्माचा प्रचार व प्रसार केला. प्रीयदर्शी सम्राट अशोक यांनी इ.स. (३०४–२३२) या त्यांच्या कार्यकाळात श्रीलंका, ब्रम्हदेश, ग्रीक इत्यादी अनेक देशात धम्म प्रवर्तक पाठविले होते. त्यांनी भिक्खू संघाची पुर्नबांधणी केली. त्यांना इ.स. च्या पहिल्या शतकात सम्राट कनिष्क यांनीही बौध्द धम्माचा प्रचार व प्रसार केला. त्यांना बुध्द मर्जी तयार करून ठिकठिकाणी त्यांची स्थापना केली. त्यानंतर सम्राट हर्षवर्धन यांनी सुध्दा बौध्द धम्माचा प्रसार व प्रचारासाठी कार्य केले.

इ.स. १२व्या शतकापर्यंत बौध्द धम्माने संपूर्ण जग व्यापले होते. इ.स. १२व्या शतकानंतर मात्र भारतातून बौध्द धम्म लोप पावला. बौध्द धम्माने भारताच्या इतिहासाला प्रभावित केले. तत्वज्ञान, कला आणि संस्कृतीला प्रभावित केले. इ.स. ११५० ते १८०० हा काळ मात्र भारतातील बौध्द धम्माचा अंधःकारमय काळ होता. या काळात हिंदूनी आणि मुस्लीमांनी अनेक बौध्द स्तूप, विहार यांची तोडफोड केली आणि त्यांचे रूपांतर आपल्या धर्माच्या पूजा स्थळांमध्ये केले होते.

**आधुनिक काळातील बौध्द धम्माचे पुनरूज्जीवन** : १८०० शतकाच्या मध्यापासून भारतात बौध्द धम्माचे पुनरूज्जीवन झाले. इंग्रज अभ्यासकांनी, ब्रिटीश अधिकाऱ्यांनी, पूरातत्व वैज्ञानिकांनी अनेक बौध्द स्थळांचे उत्खनन करून जमिनिखाली दबलेल्या बुध्द विहार आणि स्तुपांचा इतिहास प्रकाशित केला. विदेशामधुन अनेक लोक भारतातील ही प्राचिन स्थळे पाहण्यास येवू लागले.

सर एडविन ॲर्नोल्ड या इंग्रज अभ्यासकाने १८८५ मध्ये बुध्दगया इथे भेट दिली. तेथील परिस्थिती पाहून त्याचे मन विषण्ण झाले आणि त्यांनी 'टेलिग्राफ' या वृत्तपत्रामध्ये लेख लिहून विहारांच्या दयनिय अवस्थेकडे लक्ष वेधण्याचे प्रयत्न केले. तसेच त्यांचे अध:पतन रोखण्यासाठी विनंती केली. त्यांच्या लेखामुळे श्रीलंकेतील एक बौध्द तरूण अनागरिक धर्मपाल विचलीत झाले. त्यांनी १८९१ मध्ये सारनाथ व बुध्दगया येथे भेट दिली. त्यांनी या प्राचीन बुध्द वैभवाला जपण्याचे आणि नवीन वैभव देण्याचे कार्य हातात घेतले. १७व्या शतकात बुध्दगया येथील महाविहारात महंतांनी शिव मंदिरामधील लिंग पिंड ठेवली आणि त्या विहाराची मंदिरात रूपांतर केले. हे महाविहार बौध्दांच्या ताब्यात असावे आणि महंताकडून त्याचा ताबा घेऊन बौध्दांकडे सोपविले पाहिजे असा विचार करून धम्मपाल सिलोनला गेले. बुध्द विहारांचे व्यवस्थापन बौध्दांकडेच असावे. इंग्रजी आणि भारतीय भाषांमध्ये बौध्द साहित्याचे प्रकाशन करणे इत्यादी उद्देश डोळयासमोर ठेवून त्यांनी ३१ मे १८९१ रोजी महाबोधी सोसायटीची स्थापना केली. त्यांनी ऑक्टोबर १८२१ मध्ये बुध्दगया येथे 'आंतरराष्ट्रीय बौध्द परिषद' आयोजित केली होती. ही आधुनिक भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय परिषद होय. त्यांनी महाबोधी ॲण्ड युनायटेड बुध्दीस्ट वर्ल्ड हे जर्नल सुरू केले. भारताच्या इतिहासात बौध्द धम्माचे पुनरूज्जीवन होण्याच्या संदर्भात १८९१ वर्ष विशेष महत्वाचे आहे कारण याच वर्षी अनागरिक धम्मपाल यांनी सारनाथ आणि बुध्दगयाला भेट दिली होती (आगलावे – २०१९ – १५).

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हेच महान कार्य पुढे नेत १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरच्या दिक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन करून लाखो लोकांना बुध्द धम्माची दिक्षा दिली आणि खऱ्या अर्थाने भारताच्या भूमीत बुध्द धम्माचे पुनरूज्जीवन घडवून आणले. हिंदू किंवा मुस्लीमांनी बौध्द स्थळांची नासधुस केली. बुध्दांच्या मुर्त्या तोडल्या, फोडल्या. विहारांना आणि स्तूपांना आपल्या मूर्त्या मांडून मंदिरामध्ये व सस्जिदिंमध्ये परावर्तीत केले. परंतू बुध्दांचे शाश्वत तत्वज्ञान, त्यांची शिकवण ते कधीही नष्ट करू शकले नाही. बुध्दांचा धम्म हा भारताच्या मातीच्या कणाकणात रूजलेले बियाणे आहे. जरासा ओलाव मिळताच त्याला पालवी फूटते आणि लवकरच त्याचा मोठा बोधीवृक्ष होतो हे या बौध्द विरोधी शक्तींना माहित नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्र प्रवर्तन घडवून आणून जगातील एक फार मोठी ऐतिहासिक क्रांती घडवून आणली. पुश्यमीत्र शुंग या ब्राम्हण राजाने बौध्द धम्माला नष्ट करण्याकरिता बौध्द भिक्खुंच्या कत्तली केल्या होत्या. जो कोणी बौध्द भिक्खुंचे कापलेले मुंडके शरयु नदीत फेकेल त्याला लाख मोहरांचे बक्षिस जाहीर केले होते. केवळ स्वत:च्या हातात सत्तेची सुत्रे आलीत म्हणून रक्तरंजीत आणि मानवतेला काळीमा फासणारे हे वर्तन त्यांनी केले. त्यांनतर अयोध्येच्या व संपूर्ण भारतातील बौध्द विहारांना तोडफोड करून नष्ट करणे. विहार व स्तूपांमध्ये हिंदूचे देविदेवता यांच्या मूर्ती मांडून पूजारी नेमणे अशी कारस्थाने त्याने केली. त्यानंतर भारतावर ज्या मुस्लीम शासकांचे राज्य आले त्यांनीही हेच पापाचरण केले. अनेक मुस्लीम बादशहांनी बौध्द धम्माच्या तीर्थस्थळांना नष्ट करून जीथे विहारांचे रूपांतर मस्जिद मध्ये केले आणि उर्स भरविणे सुरू केले होते.

परंतू १८०० ला जेव्हा भारताची सत्ता ब्रिटीश अधिपत्याखाली आली त्यांच्यामधील अनेक उच्च विद्याभूषीत तत्वज्ञानी लोकांनी भारताच्या इतिहासाची पडताळणी केली आणि त्यांना हे आढळून आले की भारताचा खरा इतिहास बौध्द धम्माचा इतिहास आहे. बुध्द धम्म भारतातील एकमेवच प्राचीन असा धम्म आहे जो जनसामान्यांच्या प्रगतीचा मार्ग होता. ज्याला राजाश्रय मिळालेला होता. जो जगाच्या कानाकोपऱ्यात अरजही भारतीयांच्या प्रमाणांमुळे पसरलेला आहे. परंतू भारतात मात्र त्यांची सतत पिछेहाट होत गेलेली आहे. अनेक इंग्रज अधिकारी पुरातत्व शास्त्रज्ञ कामाला लागले आणि बुध्दगया, सारनाथ, नालंदा, रांची, विदिशा सारखी अनेक बौध्द ठिकाणे शोधून त्यांचे पुनरूज्जीवन करण्याचे कार्य हाती घेतले. एवढेच नव्हे तर जगातील सर्व बौध्दांचे लक्ष याकडे वळावे यासाठी सातत्याने त्यावर लिखाणही प्रकाशित केले.

दु:खाची व खेदाची गोष्ट आहे की आजही बुध्दगया विहार महंतांच्या आधिपत्याखाली आहे. त्यांना त्यांच्या पोटापाण्याचा व्यवसाय सोडायचा नाही. परंतू बुध्द अस्मीतेचा मानबिंदू बुध्दगया विहाराचे व्यवस्थापन बौध्दाच्या हातात यावे यासाठी सतत संघर्ष सुरू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अस्पृश्यांना त्याचा जगण्याचा प्रकाशमान आणि स्वाभिमान बुध्द धम्माच्या रूपाने परत मिळवून दिला. या महामानवाचे संपूर्ण मानव जातीवरील हे ऋण कधीही फिटणारे नाही. जेव्हा जेव्हा मानवाच्या मूक्तीचा लढा या जगात लढला जाईल येणाऱ्या सर्व पिढया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून या लढयाला सामोरा जातील.

१७८९ च्या फ्रेंच आणि १९१७ च्या रशियाच्या राज्य क्रांतीमुळे जगातील सामाजिक व राजकीय जीवनात प्रचंड क्रांती घडून आली. आधुनिक भारताच्या इतिहासातील १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरच्या दिक्षाभूमीवरील ५ लाख अस्पृश्यांनी बुध्द धम्माची दिक्षा घेतली अशी क्रांती जगात कुठेच घडून आलेली नाही. हिंदूच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक गुलामीत खितपत पडलेल्या आपल्या समाज बांधवांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ वैचारिक परिवर्तनाच्या आधारावर मूक्त केले. मानवाच्या मूक्तीचा हा महासंग्राम या राज्यक्रांतीपेक्षा कितीतरी मोठा आहे. या धम्म क्रांतीमुळे भारतीय समाजात सामाजिक, आर्थिक बदल घडून आले.बौध्दांची स्थिती तर आमूलाग्र बदलली. आज बौध्द समाजाकडे इतर समाज असुयेने पाहतात एवढी त्यांची प्रगती डोळयात भरवण्यासारखी आहे. बौध्दांच्या या प्रगतीसाठी केवळ आणि केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुध्द धम्मच कारणीभूत आहेत. तथागत भगवान बुध्द व डॉ. बाबासाहेब हे दोन्ही महामानव मानव मुक्तीचे महान शिल्पकार आहेत.


*संदर्भ :*

*१. आंबेडकर, भी. रा., भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, अनुवादक, इंजि. व्ही. टी. पाटील, प्रकाशक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर, २०१९.*

*२. आगलावे, प्रदिप, धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २०१९.*

# खाजगीकरण एफडीआय आणि आरक्षण

**डॉ. प्रदिप एच. गजभिये,** नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर मो.नं. ९८२२९९१३१४

**प्रस्तावना** :— भारतात १९९१ पासून पी.व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वात कांग्रेस सरकारने नवीन आर्थिक धोरणाची अंमलबजावनीला सुरूवात केली. नवीन आर्थिक धोरण म्हणजे खाजगीकरण होय. खाजगीकरणा अंतर्गत देशातील मालमत्ता संपत्ती विविध कंपन्याला विकणे होय. १९९९ नंतर मोठया प्रमाणात बीजेपी सरकारने खाजगी करणाला सुरूवात केली. विषेशत: त्यासाठी निर्गुतवणुक विभागाची स्थापना केली जगाच्या पाठीवर देशाची संपत्ती विकण्यासाठी एका कॅबिनेट मंत्र्याची नेमणुक करणारा भारत पहीला देश आहे.

वर्तमान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील बीजेपी सरकारने घाटयातील कंपन्या व नफा देणाऱ्या कंपन्या सुध्दा कवडी मोलाने विकल्या आहेत. संरक्षण क्षेत्रातील कंपन्या सुद्‌धा विकण्यात आल्यात तसेच किरकोळ व्यापार क्षेत्रामध्ये सुध्दा परदेशी कंपन्याना व्यापार करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्याचा परिणाम सर्वसामान्य दुकानदारांना व मंजुरावर पडणार आहे. सरकारी कंपन्या उदयोगपतींना विकल्यामुळे त्याचा सर्वात मोठा परीणाम देशातील ओबीसी, एससी, एसटी या समुहावर पडणार आहे. कारण त्यांना मिळालेला सवैधानिक अधिकार नश्ट होणार.

भारतीय संविधानाने या मागासवर्गिय समुहाला प्राप्त झालेले आरक्षण आपोआप समाप्त होणार. खाजगी कंपन्यामध्ये कुठलाही प्रकारचा आरक्षण नसल्यामुळे त्यांना आरक्षण मिळणार नाही भारतीय संविधानात लिखीत आरक्षण राहील परंतु वास्तवात नोकऱ्या नसल्यामुळे त्यांचे संविधानिक अधिकार समाप्त झालेले. असतील म्हणून खाजगीक्षेत्रात ओबीसी, एससी, एसटी या मागासवर्गीय लोकांना आरक्षण देण्यासाठी संविधानात संषोधन करण्यात येवून त्यांना आरक्षण देण्यात यावे.

**एफडीआय** :— विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक हे जागतिकीकरणाचे उत्तम उदाहरण आहे. रिटेल मार्केटिंग, किरकोळ व्यापार जागतिकीकरणाच्या मदतीने भारतात आला आहे. वॉलमार्ट सारख्या असंख्य कंपन्या भारतात येत आहे. भारतात किरकोळ व्यापार ज्यामध्ये किराणा दुकान, भाजीपाला व्रिक्री दुकान, इलेक्ट्रॉनिक वस्तु विक्री दुकान, खाद्यपदार्थ विक्री दुकान, बाजारपेठ, कापड दुकान इ. खादय तथा भौतिक वस्तु विक्री करून भारतात १.५ कोटी लोक स्वत:चा व कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवत आहेत. दीड ते दोन कोटी लोक असा किरकोळ व्यापार करून कुटूंबे चालवत आहेत. परंतु या कायद्याने किरकोळ विक्रेत्यांच्या व्यापारावर संकंट कोसळले आहे. भारतात मॉल पध्दत आणण्यात आली. प्रत्येक तालुक्यात असे मॉल तयार झाले तर किरकोळ व्यापार करणारे लोक रत्यावर येतील. त्यांची रोजी रोटी बंद पडेल.

जगातील सर्वात मोठी अमेरीकन कंपनी वॉलमार्ट ने २८ देशात आपले साम्राज्य स्थापन केले आहे. विकसीत देशात असे मॉल बंद पडत आहे. तेथील जनतेने अशा कंपनीला विरोध केला आहे. वॉलमार्ट, कॅरीफॉर, टेस्को सारखे आंतरराष्ट्रीय सुंपर मार्केट्समुळे भारतातील लहान दुकानदार दीड ते दोन कोटी लोक धोक्यात आले आहे.

एफडीआय ने विदेशी भांडवलदरांना भारतीय भुसंपत्ती खुली केली आहे. भारत सरकारचे कुठलेही नियंत्रण असणार नाही. भारतातील भट बनियाच्या माध्यमातुन भारतीय बाजारपेठेचा लिलाव करण्यात येत आहे. २०११ मध्ये सिंगल ब्रॅन्ड किरकोळ क्षेत्रात १०० टक्के परकीय गुंतवणुक करण्याचे ठरले. २० सप्टेबर २०१२ मध्ये ५१ टक्के मल्टी बॅन्डला किरकोळ क्षेत्रात प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याचे धोरण स्विकारण्यात आले.

सरकारी धोरणाचा परिणाम (अर्जुनसेन गुप्ता रिपोर्ट)

भारतात १२१ कोटी लोकसंख्या आहे. (२०११)

१. त्यापैकी भारतात ८३ कोटी लोक भुकबळीच्या सिमारेषेवर आहे.
२. आज भारतात ८३ कोटी जनतेचे सरासरी दरडोई उत्पन्न २० रूपये आहे.
३. आज भारतात मागील १० वर्षात एक लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.
४. आज भारतात १२ कोटी सुशिक्षित बेरोजगार आहेत.
५. आज भारतात साडेसात कोटी बालके गिरणी कामगार आहे.
६. ७७ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली जिवन जगत आहे.
७. गरीब देशाच्या यादीत निर्देशांक क्रमांक १३४ वर आहे.
८. १९९१ ला शुन्य खरबपती परंतु या धोरणाने सन २००८ पर्यंत ५६ खरबपती झाले.
९. गरोदर महिलांसाठी भारत देश सुरक्षित नाही.
१०. भारतीय विद्यापिठाचा दर्जा निकृष्ट ठरविण्यात आला.
११. भारतात शास्त्रज्ञ, संशोधक निर्माण होत नाही.
१२. शिक्षण पध्दतीने विद्यार्थ्याची जिज्ञासा नष्ट करणारी व्यवस्था आहे.
१३. दैववाद, अंधश्रध्दा, भोंदु महाराज अशी ओळख
१४. दर्जेदार शिक्षण देणारी प्रथम २०० विश्वविद्यापीठामध्ये भारतीय विद्यापिठाचे नाव नाही.
१५. नक्षलवाद मोठया प्रमाणात वाढविण्यात येत आहे.
१६. महागाई मोठया प्रमाणात, सर्वसामान्य जनता त्रस्त
१७. ओबीसी यांची जातिनिहाय जनगणनेवर पडदा टाकण्यात येत आहे.

भारत देशावर मार्च २०११—१२ पर्यंत ४४,६८,४१४.५४ कोटी रूपये कर्ज होते. आता मार्च २०१२—१३ पर्यंत ५०,२५,०७१.६४ कोटी कर्ज आहे.

स्टॅंडर्ड ऑफ प्युअर या पतनामांकन देणाऱ्या संस्थेने भारतास निकृष्ट दर्जा दिला आहे. भारतात फक्त भट—बनिया भांडवलदाराचा विकास झाला. त्यांची संख्या तीन ते पाच हजार दरम्यान असावी. भांडवलदाराच्या संपत्तीत वाढ झाली म्हणजे भारतीय जनतेच्या संपत्तीत वाढ झाली असे नव्हे, परंतु बनियांची प्रचार साधने आणि भटांची लेखनी सतत प्रचार करतात की, भारताचा विकास झाला. म्हणजेच भट बनियांचा विकास झाला म्हणजे तो संपुर्ण भारतीय जनतेचा विकास झाला असे असे समजले जाते.

शिक्षण क्षेत्रात सरकारचे लक्ष नाही. विद्यार्थी देशाचे भवितव्य घडविणारे महत्वाचे घटक आहे. शिक्षणावर केवळ अर्थसंकल्पाचा अडीच टक्के खर्च केला जातो. यावरून भट बनिया शिक्षणाच्या क्षेत्रात किती जागृत आहे हे कळते. कारण निकृष्ट शिक्षण प्रणालीत बहुजन विद्यार्थी निकृष्ट शिक्षण घेवुन स्पर्धेमध्ये मागे पडतील अशी योजना आहे.

शिक्षण क्षेत्रात भारत पिछाडीवर आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातुन विदेशी विद्यापीठे भारतात येत आहे. शिक्षणाचा बाजार मांडण्यात येथील धोरण कारणीभुत आहे. कुठे गेली गुणवत्ता, उद्योगक्षेत्रात पिछाडीवर, शिक्षण क्षेत्रात पिछाडीवर, आंतरराष्ट्रीय व्यवहार तुलनेत पिछाडीवर, शिक्षण क्षेत्रात पिछाडीवर आहे. युनिव्हर्सिटीज २१ ने जगातील ४८ देशांमध्ये उच्च शिक्षण व्यवस्थेचे सर्वेक्षण केले त्यात भारताचा क्रमांक शेवटचा म्हणजे ४८ वा मिळाला.

**जगात एक तृतीयांश गरीब भारतात राहतात** :– जागतीक बॅक वॉशिंग्टन वृत्तसंस्था (दिव्य मराठी १९/०४/२०१३) जगातील एक गरीब नागरिक दररोज १.२५ डॉलरपेक्षा कमी पैशावर आपले जिवन व्यतित करीत आहे. जागतिक बॅकेच्या ताज्या अहवालात ही बाब समोर आली आहे.

**गरिबांची स्थिती**:– कुठे आहेत गरीब, कोठे आहेत अतिगरीब या शिर्षकाचा अहवाल प्रसिध्द करण्यात आला आहे. जगातील १२० कोटी नागरीक अति गरिबीत आयुष्य जगत आहेत. मात्र प्रत्येक विकसनशिल देशात गरिबी कमी झाल्याचे अहवालात नमुद करण्यात आले आहे. सन १९८१ ते २०१० दरम्यान हे प्रमाण ५० टक्याहुन कमी होवुन २१ टक्के झाले आहे. कमी विकसनशील देशांची लोकसंख्या ५९ टक्क्यांनी वाढल्यानंतर ही आकडेवारी समोर आली आहे.

जागतिक बॅक समुहाचे अध्यक्ष जिम योंग किम म्हणाले, एवढया संख्येत गरीब लोक असणे आपल्या सामाजिक जाणीवेवरील कलंक आहे. मात्र आमचे विश्लेषण आणि आमचा सल्ला स्विकारला गेल्यास २०३० पर्यंत जगातील खुप गरीब लोकांची अवस्था संपुष्टात येवु शकते.

वरील जागतीक बॅकेच्या अतिगरिब नागरिक एक दिवसाला जिवन जगण्यासाठी ६५ रूपयांपेक्षा कमी खर्च करतो. अर्थात जो व्यक्ती दरडोई ६५ रूपये खर्च करतो तो अति गरीब म्हणुन गणला जातो. जगात एकुण १२० कोटी नागरिक या उत्पन्नाच्या गटामध्ये येतात. त्यापैकी भारतात एक तृतियांश अति गरीब नागरिक राहतात. १२० कोटीच्या एक तृतियांश म्हणजे ४० कोटी नागरिक एकटया भारत देशांमध्ये आहे. जागतिक बॅकेचे धोरण म्हणते आमचा सल्ला स्विकारला तर २०३० पर्यंत गरीबीची अवस्था संपुष्टात येईल. जागतीक बॅक मानवतावादी प्रेरणेने काम करीत आहेत.

सन १९९१ पर्यंत भारतात समाजवादी अर्थव्यवस्थेकडे मोठा कल होता. परंतु नंतर मात्र भांडवलशाहीचे मोठे प्रस्थ निर्माण केले आहे. भारतातील भांडवलशाही आणि ब्राम्हणशाही हया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणचा कार्यक्रम राबविण्या अगोदर भारतात भारतातील जनता गरिबी रेषेखाली जीवन जगत होती. मोठया संख्येने लोक गरिबी रेषेत होती परंतु आज या धोरणाचा परिणाम म्हणजे, नवीन रेषा तयार झाली. ती म्हणजे भुकमरीची रेषा. कारण ८३ कोटी जनता भुकबळी, अर्धभुकबळीचे शिकार आहे. यांना एक वेळेचे जेवन मिळत नाही. बहुसंख्यांक बहुजन मुलनिवासी समाज उपाशीपोटी झोपत आहे. २० कोटी ८५ लाख लोक भुकमरीच्या अंतिम काठाला पोहचले आहे. फायद्यात चालणाऱ्या कंपन्याचे खाजगीकरण होणार नाही, परंतु निर्गुतवणुकीला थांबविता येणार नाही. प्रायव्हेट इंडस्ट्री देखील प्रचार करीत होत्या की, कोटी संख्येने रोजगार निर्माण करू, परंतु एलपीजी या सरकारी धोरणाने खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे असे स्पष्ट केले आहे.

**सन १९९१ च्या धोरणा मागील रहस्य** :– एलपीजी धोरणामागील खरे कारण माहितच होवु दिले नाही. एलपीजी धोरणाने भारताचा विकास होणार आहे. रोजगार उपलबध होणार आहे. भारत जागतीक महासत्ता बनणार आहे असे स्वप्न समोर करून येथील मुलनिवासी बहुजन समाजाला मुर्ख बनविले.

अनुसुचित जाती जमातीला २२.५० टक्के आरक्षण प्राप्त झाले तसेच ओबिसीला सुध्दा २७ टक्के संविधानिक आरक्षण मिळाले. त्यामुळे या देशातील उच्च जाती विषमतावादी विचारसरणीच्या लोकांना ही बाब प्रामुख्याने खटकली त्यामुळे शासन प्रशासनातील ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व कमी झाले आहे. असे संविधानामध्ये स्पष्ट होते.

भारतीय संविधानाला आपण हात लावू शकत नाही. आरक्षण थांबवु शकत नाही. अनु जाती जमाती, इतर मागास वर्ग यांना त्यांचा सांविधानीक न्याय, हक्क द्यावाच लागेल आणि न्याय हक्क दिला तर ब्राम्हण सत्तेच्या खाली येतो.

१९९१ ची आर्थिकनीती तयार करून खाजगीकरण धोरण स्विकारले. सरकारी संस्थेचे हस्तांतरण खाजगी व्यक्तीकडे करण्याचा सपाटा सुरू केला. सरकारी संस्थेचे हळु हळु अनुदान कमी करून त्यास तोटयात दाखविण्याचा प्रकार सुरू झाला. सरकारी संस्थेतील बहुजन कर्मचाऱ्यांसाठी अतिरिक्त कामे सोपविण्यात आली. कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा देण्यात येवु लागला. बॅका, महामंडळे, बोर्ड यांची विक्री करण्यात येवु लागली सरकारी सस्था नष्ट करण्यात येवु लागल्या. यामुळे आरक्षण समाप्त करण्यात येत आहे. खाजगी क्षेत्रात आरक्षण रहणार नाही. जागतीकरण, उदारीकरणाच्या माध्यमातुन कंपनीराज, भांडवलराज निर्मीती सुरू केली. संविधानाला हात न लावता संविधान निष्प्रभ बनविणारी नीती सन १९९१ पासुन सुरू केली. मंडल कमीशन थोडया प्रमाणात लागु केले. त्यांना आरक्षणाचा लाभ मिळु लागला. परंतु जेथे आरक्षण प्रतिनिधीत्व मिळणार आहे त्याचेच खाजगीकरण केले. म्हणजेच आरक्षण दिले परंतु संस्थेचे खाजगीकरण केले.

वर्तमान सरकारने खाजगीकरणाच्या अंतर्गत एफडीआय आणल्यामुळे सर्व सामान्य बहुजन समाजातील आर्थिक व्यवस्था उध्वस्त होवून सामाजिक जिवनावर वाईट परिणाम पडणार आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर असंतोष निर्माण होईल. संविधानिक आरक्षण सुध्दा समाप्त होईल. हे होवु नये म्हणून मोठया प्रमाणात जन जागृती करून खाजगीकरणाच्या विरूध्द आंदोलन निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच खाजगी क्षेत्रातील कंपन्यामध्ये आरक्षणाची तरतुद करण्यासाठी आंदोलन करणे आवश्यक असुन तेव्हाच मागासवर्गीय समाजाचे संविधानिक अधिकार सुरक्षित राहतील.

*संदर्भ :–*

*१. भारत पगारे, मुलनिवासी पब्लीकेशन पुणे, भारतातील अर्थव्यवस्था.*
*२. जागतिक बॅकेचा अहवाल, वर्ष २०११.*
*३. दैनिक मुलनिवासी नायक, पुणे आवृत्ती.*
*४. दिव्य मराठी, पुणे.*

# कृषि पर्यटन आणि ग्रामीण विकास

**प्रा. सतिश आर. जाधव**, न. प. शिवाजी महाविद्यालय, मोवाड. मो. क्र. ९४२३४१९६३५

**प्रस्तावना—** कोणत्याही देशाच्या अर्थव्यस्थेत पर्यटनाची भूमीका महत्वाची आहे. पर्यटन म्हणजे निसर्गाच्या सानिध्यात आनंदाचे क्षण घलविण्याची आणि नवनवीन गोष्टींबाबत जाणून घेण्याची माणसाची मुलभूत प्रवृत्ती आहे. आज दळणवळण साधनाच्या विकासामुळे जग जवळ आलेले आहे. त्यामुळे देशाबरोबरच बाहेरचे जग जाणून घेण्याच्या माणसाच्या प्रवृत्तीमुळे या क्षेत्राचा सातत्याने विस्तार होत आहे. म्हणूनच भविष्याचा वेध घेत या भूमीकेला अधिक महत्व प्राप्त व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्राच्या जागतीक पर्यटन संघटनेने जागतीक पर्यटन दिनाला शाश्वत पर्यटन विकासाचे साधन असे घोषवाक्य निश्चित केले आहे. जागतीक पर्यटन संघटना पर्यटन क्षेत्राच्या विविध विकासासाठी मार्गदर्शन व कार्य करते. या संघटनेच्या एकूण १५५ देशांपैकी भारत एक सदस्य देश आहे. १९७९ मध्ये स्पेन येथे झालेल्या जागतीक संघटनेच्या सभेत १९८० पासून पर्यटन दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरवर्षी पर्यटन दिनाच्या निमित्ताने या क्षेत्राशी संबधीत विविध पैलूंवर चर्चा घडवून आणली जाते. जगातील इंधन व रसायने यानंतरचा तिसरा मोठा व्यवसाय पर्यटन हा आहे. पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारावर अनेकांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. वाहतूक, हॉटेल्स, मनोरंजन इत्यादी व्यवसाय देखील पर्यटनाशी जोडले गेले आहे. जगभरातील विविध पर्यटकांनी विविध देशी विदेशी स्थानांना भेटी दिलेल्या आहेत. जागतीक पर्यटन संघटनेच्या अनुमानानुसार हि संख्या २०३० पर्यंत १८० कोटीच्या घरात जाईल असा अंदाज व्यक्त केला आहे. म्हणून अशा संधीचा उपयोग करून निरंतर विकासाला चालना देता येईल का? यादृष्टीने पर्यटनाचा विचार होणे आवश्यक आहे.

पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणविषयक विकास होण्याबरोबरच स्थनिक नागरीकांच्या जीवनमानातही बदल घडून येतो. पर्यटकाला आवश्यक असलेली निवास, भोजन, वाहतूक, माहिती, मनोरंजन इत्यादी व्यवसायांबरोबरच त्या भागातील स्थानिक उत्पादनाला देखील मागणी निर्माण होते. सांस्कृतिक व विचारांची आदान प्रदान या माध्यमातून नागरीकांना एकमेकांशी जोडण्याचे काम देखील पर्यटनाच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे पर्यटन विकासात नागरीकांचा जेवढा सहभाग वाढेल तेवढिच त्या भागातील अर्थकारणाला देखील गती मिळते. पर्यटनाबाबत विकासाच्या कल्पना मांडतांना त्या भागातील खाद्यसंस्कृती, पारंपारीक कला, साहित्य, लोकजीवन, निसर्ग यांचा फारसा विचार केला जात नाही. जे प्रामुख्याने महत्वाचे आहे. पर्यटकांसाठी चांगल्या सुविधां एवढेच त्यांना नव्या जगाचे दर्शन होणे आणि रोजच्या जीवनापेक्षा वेगळा अनुभव मिळणे महत्वाचे असते. पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या परंपरेच्या खुणा यासाठीच खास करून जपल्या आहेत आणि त्याचेच मार्केटिंग केले जाते. पर्यटन क्षेत्राशी संबधित विविध घटकांच्या विकासात्मक पैलुंवर कार्य केल्यास भविष्यातील विकासाच्या वाटा दृष्टीक्षेपात येवू शकतील. अर्थात यासाठी पर्यटन केंद्रस्थानी असणे व त्याच्या विकासावर लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

आधुनिक काळानुसार पर्यटनाच्या वेगवेगळया संकल्पना उदयास येत आहे. काही लोकांना दुरच्या देशात प्रवास करणे, काहिंना समुद्र किनारी जाण्याची, तर काहिंना तिर्थक्षेत्राचे दर्शन घेत धार्मिक पर्यटनाची हौस किंवा ईच्छा असते. यावरून पर्यटनाचे सांस्कृतिक पर्यटन, यात्रा पर्यटन, साहस पर्यटन, शेती पर्यटन, निसर्ग पर्यटन, वैद्यकिय पर्यटन, समुद्र पर्यटन असे एकुण सात प्रकारात वर्गीकरण केले जाते. पर्यटन करणाऱ्या मंडळीच्या आकडेवारीचा अभ्यास केल्यास ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील नागरीक पर्यटनासाठी अधिक प्रमाणात बाहेर पडतात असे आढळून येते. शहरी भागातील लोकांची मानसिक आणि शारीरीक थकवा घालविण्याची ईच्छा त्यांना शहराबाहेर पडण्यास भाग पाडत असते. कित्येक देशांमध्ये पर्यटनाच्या पारंपारीक संकल्पना मोडीत काढून नवीन काहितरी वेगळे धुंडाळण्याचा प्रयत्न होत आहे. अलिकडे मात्र पर्यटन म्हणजे पैसा असणाऱ्यांची हौस हा समज आता मोडित निघाला आहे. शांत, निवांत आणि ग्रामीण जीवन जवळून न्याहाळण्याची आवड असलेल्यांसाठी कृषि पर्यटन हा प्रकार आता चांगलाच रूजला आहे.

**कृषि पर्यटन —** कृषी पर्यटनाची अगदी सरळ व सोपी व्याख्या करावयाची झाल्यास शेतकऱ्यांच्या फळत्या—फुलत्या शेतीत पर्यटकांसाठी निवासाची आणि न्याहारीची उत्तम व्यवस्था करून देणे होय. कृषी पर्यटन म्हणजे कृषी व पर्यटन या दोन विभागाचा समन्वय आहे. जिथे पर्यटक शेताला भेटी देतील, शेतीच्या विविध पैलुंचे दर्शन व विविध अनुभव घेतील, ताजा भजीपाला व फळे खरेदी करू शकतील, प्रदुषण मुक्त वातावरणाचा आनंद घेवू शकतील, ग्रामीण भागातील भोजनाचा आनंद घेतील तसेच जागरण, गोंधळ, भारूड, किर्तन, प्रवचन आणि ग्रामीण संस्कृतीशी संबधीत अशा पारंपारीक लोककलांचा आनंद व अनुभव घेवू शकतील. पुन्हा ताजेतवाने होवून आपल्या शहराकडे किंवा घराकडे जावू शकतील. मार्टने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार महाराष्ट्रातील प्रमुख शहरात सुमारे ४२ टक्के लोकांना ग्रामीण भागात एकही नातेवाईक नसल्याचे सिध्द झाले. कृषी पर्यटनामुळे शहरी व ग्रामीण भाग यामध्ये असलेली दरी कमी होईल. ग्रामीण भागातील माणूस शहराशी जोडला जाईल. शहरातील मुलांना गांवाकडे आपल्या नात्याचे घर मिळाल्याचा अनुभव येईल. शहरातील पैसा ग्रामीण भागात विखूरला जाईल, आर्थिक विकेंद्रीकरण होण्यास मदत होईल व आपले गांव निश्चितच स्वयंपूर्ण होईल.

महाराष्ट्रात कृषी पर्यटनाचा प्रयोग यशस्वीपणे राबविणाऱ्या काही शेतकऱ्यांनी एकत्र येत महाराष्ट्रातील सर्व विभागात हा

व्यवसाय नेण्याचा विचार मांडला. सहा लाखापासून तर दहा ते पंधरा लाखापर्यंतच्या खर्चात आपापल्या कुवतीनुसार शेतात निवासासाठी किमान सहा खोल्या, एखादा सभामंडप यासाठीच प्रामुख्याने खर्च येतो. बैलगाडितुन फेरफटका मारणे, म्हैस किंवा गाईचे दुध पारंपारीक पध्दतीने कसे काढले जाते. खापरावर मांडे कसे तयार केले जातात. अशा गोष्टींचे शहरी वातावरणात रूळलेल्यां लोकांसाठी ते मोठे विशेष असते. तेव्हा शहरी लोकांना असेच काहीतरी देण्याचा प्रयत्न कृषी पर्यटनातून होणे आवश्यक आहे. पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीसह शेतीची माहिती, कोणते पिक कसे आणि केव्हा येते, कोणत्या प्रकारच्या फळापासून शरीराला कोणता फायदा होतो. या माहिती बरोबरच परिसरातील डोंगरदऱ्या, मंदिराची ओळख करून देणे असे प्रयत्न झाल्यास हा व्यवसाय यशस्वी होवू शकतो.

भारतात महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटन चळवळ सुरू करणारे पहिले राज्य आहे. सन २००४ साली बारामतीपासून सुरू झालेली कृषी पर्यटनाची चळवळ आज राज्याच्या सीमा ओलांडून देशभर पसरली आहे. आज महाराष्ट्रात ४१८ कृषी व ग्रामीण पर्यटन केंद्र कार्यरत असून कृषी पर्यटन केंद्राची संख्या मोठया प्रमाणावर वाढत आहे. पर्यटकांचा मोठा कल कृषी व ग्रामीण पर्यटनाकडे आहे. या माध्यमातून ५००० पेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळालेला आहे. गांवातील महिला बचत गट, कारागीर, युवक, कलाकार या सर्वांना कृषी पर्यटनाला येणाऱ्या पर्यटकांमुळे फायदा झाला आहे. त्यामुळे कृषी पर्यटन हे गांवाला पूरक व्यवसायाचे जाळे निर्माण करणारा आणि शेतीवर आधारीत असा उपक्रम आहे.

जगभरातील विविध देशांनी पर्यटन क्षेत्र हे खूप गांभीर्याने घेतले आहे. आशिया खंडातील कित्येक देशांची आर्थिक उलाढाल हि फक्त पर्यटनाच्या जोरावर सुरू आहे. कृषी पर्यटनाचे महत्व आणि गरज सर्वच स्तरावर घेतली जाते. महाराष्ट्रात कृषी पर्यटनामध्ये साधारणतः ६९ टक्के कृषी पर्यटन चालक शेतकरी पदवीधर आहेत. २० टक्के कृषी पर्यटन चालक जन्माने शेतकरी नसले तरीही त्यांना व्यावहारीक ज्ञान खूप आहे. हे सर्व कृषी पर्यटन चालक उच्च पदवीधर असून १० टक्के कृषी पर्यटन चालक शेतकरी सातवी पर्यंत शिकलेले आहेत. ५८ टक्के कृषी पर्यटन केंद्राना शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध आहेत. ३० टक्के कृषी पर्यटन केंद्रांच्या जवळ गड किल्ले आहेत. त्यातून ईतिहासाची माहिती मिळते. ७५ टक्के कृषी पर्यटन केंद्रावर कौटुंबिक सहली येतात. शिकलेले युवक कृषी पर्यटन चांगल्या प्रकारे चालवू शकतात. विषेशतः जे कृषी पदवीधर होवून या व्यवसायात येवू ईच्छीतात त्यांना सर्वाधिक संधी आहेत. महाराष्ट्रातील ४१८ कृषी पर्यटन केंद्रावर ९२७ खोल्या असून २८ टक्के कृषी पर्यटक फक्त दिवसभराची सहल करतात. कृषी विकासातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास यासाठी व शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्रात कृषी पर्यटन करणाऱ्या व कृषी पर्यटन संस्थांनी एकत्र येवून एक 'महाराष्ट्र स्टेट ॲग्रो एण्ड रूरल टुरिझम को ऑप फेडरेशन लि' हा महासंघ स्थापन केला आहे. कृषी पर्यटन विकास संस्था १५ वर्षापासुन काम करीत आहे. सन २०१५–१६ या एका वर्षात जवळपास २३ लाख पर्यटकांनी भेटी दिल्या असून ३५.७९ कोटी रूपयाची उलाढाल एका वर्षात झाली आहे. याचा अर्थ कृषी व ग्रामीण पर्यटनाला मोठा वाव आहे. त्यामुळे शेती, शेतकरी आणि शिवार स्वच्छता राहते. कृषी संस्कृतीचे व ग्रामीण परिसरातील पर्यावरणाचे जतन व संवर्धन होत आहे. ग्रामीण भागातील युवक तसेच महिला बचत गटातील महिलांनी बनवलेले पदार्थ यांना गांवातच बाजारपेठ उपलब्ध होत आहे. नवीन पिढितील युवकांना रोजगाराची मोठी संधी आपोआपच उपलब्ध होते. पारंपारीक शेतीबरोबरच पर्यटन केंद्र उभारून आर्थिक शाश्वत उत्पन्न मिळत आहे.

शेतकरी घाम गाळतो. रात्रंदिवस कष्ट करतो परंतू जेव्हा हाती येणाऱ्या पिकाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येते तेव्हा वाईट वाटते. कधी कधी लहरी निसर्गाचा फटका बसून येणाऱ्या पिकावर त्याला बघता बघता पाणी सोडावे लागते. आणि त्यामुळेच शेतकऱ्यांना आता कृषी पूरक व्यवसाय करणे गरजेचे झाले आहे. शेती व्यवसायाला कृषी पर्यटनासारख्या जोडव्यवसायाची साथ मिळाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनात भर पडू शकते. महाराष्ट्र राज्यात नवीन पर्यटन धोरण मे २०१६ ला अस्तित्वात आले असून महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटन विकास महामंडळाचे सहकार्य तसेच महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ मर्यादित यासह राज्याच्या वेगवेगळया भागात स्थापन झालेल्या संस्थांकडून कृषी पर्यटनाला चालना देण्यात येत आहे. असे असले तरीही कृषी पर्यटनाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने आणखी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**उपाययोजना –** कृषी पर्यटन केंद्राचे मार्केटिंग शासन स्तरावर होणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळांचा विकास, प्राधान्यक्रम, रस्ते व वाहतुक सुविधा तिथे असलेल्या मुलभूत सोयी सुविधा, इत्यादिंवर अवलंबून असते. पर्यटन प्रदर्शनातून कृषी पर्यटनाचे मार्केटिंग केले जावू शकते. त्यामुळे त्याचे व्यवस्थीत मार्केटिंग करून विविध पर्यटकांपर्यंत पोहचविण्यासाठी मार्केटिंगच्या वेगवेगळया पर्यायांचा अवलंब करायला पाहिजे. तसेच प्रत्येक बसस्थानक, रेल्वेस्टेशन, विमानतळ या ठिकाणी पर्यटक माहिती केंद्र उभारायला पाहिजे. जगभरातील वेगवेगळया पर्यटन प्रदर्शनात कृषी पर्यटन केंद्र चालकांना मोफत टेबल स्पेस दिली पाहिजे.

महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाला अव्वल दर्जा प्राप्त करायचा असेल तर त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आपल्याला तयार करावे लागेल. त्याकरीता पर्यटनासाठी लागणारे विशेष कौशल्य पुरवू शकतील अशा प्रशिक्षण संस्था उभ्या कराव्या लागतील. सर्व पर्यटन स्थळांवर माहिती फलकाद्वारे पर्यटकांचे प्रबोधन केले जायला पाहिजे. मौजमजेबरोबरच त्या ठिकाणी पाळावयाची शिस्त व स्वच्छतेबाबतचे नियम सुध्दा अधोरेखीत केली जायला पाहिजे. काहि नियम हे त्या ठिकाणच्या वैशिष्टयांना अनुसरून असायला पाहिजे.

जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून १६ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय पर्यटन महोत्सव पत्रिकेमध्ये समाविष्ट केला असून आज जगभर त्याची व्याप्ती वाढतांना दिसत आहे. १६ मे हा जागतिक

कृषी पर्यटन दिन महाराष्ट्र पर्यटन विभागाने मोठया प्रमाणात साजरा केला पाहिजे. उत्कृष्ट कृषी पर्यटन केंद्रांना पुरस्कार दिले पाहिजे.

**निष्कर्ष–** शेतिपुरक उत्पन्नाचे साधन म्हणून उपलब्ध साधनसामग्रीत अगदी कमी भांडवली खर्चात केला जाणारा पुरक व्यवसाय म्हणूप कृषी पर्यटनाकडे बघीतले जाते. शहरी पर्यटकांना ग्रामीण जीवनाची ओळख करून देणे व त्या अनुषंगाने शहरी पैसा ग्रामीण भागाकडे वळविणे हा उद्देश या माध्यमातून साध्य होतो. कृषी पर्यटन व्यवसायात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य आहे. रोजगार निर्मिती, शेतमालाला शेतातच ग्राहक हे महत्वाचे हेतू त्यामुळे साध्य होतात. कृषी पर्यटन हे प्रत्येक गांवात निर्मितीचे नवीन साधन म्हणून उदयास यायला पाहिजे. आजच्या नवीन पिढिला शेती, गोठे, चुलीवरचे जेवण, घर, गांवाकडच्या प्रथा हे सार माहित नसत. कारण त्यांनी या सर्व गोष्टी अगोदर पाहिलेल्याच नसतात. जे अन्न आपण खातो ते आपल्यापर्यंत किती प्रकारच्या प्रक्रियेतून जाते याची कल्पनाच नसल्यामुळे अन्नाचे महत्व त्यांना पटणार नाही. कांदा जमीनीवर उगवतो की जमीनीखाली, शेतकरी आत्महत्या का करतात. या प्रश्नांची उत्तरे मिळवायची असेल तर त्यासाठी कृषी पर्यटनाला चालना मिळणे आवश्यक आहे.

आजच्या धकाधकिच्या जीवनातील परस्परातील संवाद कमी होत असल्याने ताणतणाव वाढतो. तो कमी करण्यासाठी कृषी पर्यटन एक चांगले माध्यम आहे. पर्यटकांना निवांतपणा मिळाला कि ते आनंदी होतात. कृषी पर्यटन हि खरतर परदेशी संकल्पना आहे. ब्राझिल, न्युझिलंड, ऑस्ट्रेलिया या देशात ती खूप लोकप्रिय आहे. हि संकल्पना आपल्या देशातही रूजत आहे. शासनाच्या विविध योजना आणि भविष्यातील या क्षेत्राची वाढती मागणी याची वेळीच दखल घेवून आपल्याकडिल प्रत्येक शेतकऱ्याने कृषी पर्यटनासाठी सुरूवात करायला पाहिजे.

आज शेतमालाच्या बाजारात अनिश्चितता आहे. जो शेतकरी शेतमाल पिकवितो त्याला आपल्या मालाचे दर ठरविण्याचा हक्क नाही. त्यामुळे कधी कधी शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुध्दा भरून निघत नाही. अशा अवस्थेत कृषी पर्यटन शेतकऱ्यांसाठी अत्यंत उज्वल भवितव्य असणारा आर्थिकदृष्टया स्वातंत्र्य आणि सामर्थ्य देणारा व्यवसाय आहे. कारण कृषी पर्यटन केंद्रासाठी नवीन जागा शोधण्याची गरज राहत नाही. कृषीपुरक व्यवसायामुळे शेतीचे होणारे नुकसान भरून निघण्यास मदत या कृषी पर्यटन केंद्रामार्फत कृषीमाल थेट ग्राहकांच्या हाती पडण्यास मदत होते. या ठिकाणी सेंद्रीय पध्दतीने पिकविलेला भाजीपाला, फळे, अन्नधान्य मिळू शकते. शेतकऱ्यांसह गांवातील युवकांना गांव पातळीवर रोजगार मिळू शकतो. गांवातील महिला बचत गटांमार्फत तयार मालाच्या विक्रीसाठी या ठिकाणी बाजारपेठ उपलब्ध होवून शहरी पर्यटकांमुळे ग्रामीण परिसरातील आधुनिकतेची ओळख होण्यास मदत होते व गांवाला प्रसिध्दी मिळते. आणि संस्कृती व पर्यावरणास मदत असे विविध फायदे मिळत असल्याने ग्रामीण युवक शेतकऱ्यांनी कृषी पर्यटन क्षेत्राकडे आपल्या जीवनाची वाटचाल करणे आवश्यक आहे.

जागतिक पर्यटन संघटनेचे महासचिव तालेब रिफाई यांचा पर्यटकांना सुदर संदेश आहे. निसर्ग, संस्कृती आणि यजमान यांचा सन्मान करा तुम्ही अधिक चांगल्या विश्वाचे दुत बनु शकता. हि भावना पर्यटकांपुरतीच मर्यादित न राहता पर्यटनस्थळ परिसरातील नागरीकांनी देखील स्वागत, सन्मान आणि सुविधा या तीन बाबी लक्षात घेतल्यास पर्यटनाच्या माध्यमातून अपेक्षित विकास शक्य आहे.

***संदर्भ–***

*१. पर्यटन और पर्यटन उत्पाद, वर्मा संजय कुमार, तक्षशीला प्रकाशन, नवी दिल्ली, १९९८.*
*२. पर्यटन भूगोल, वर्मा एस. के. एवं सिंह आर. पी., नेहा पब्लिकेशन, बरेली, २००५.*
३. *www.mopharma.com*
४. *www.mr.vikaspedia.in*
५. *www.mazisheti.org*
६. *www.linkedin.com*
७. *www.saamana.com*

Volume - 08 - Issue – 02, July - December, 2019 / ISSN 2278-3199

# क्रिप्स मिशन/आयोगाचे परिक्षण

**प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर**, (सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख, स्व.निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लाखनी, जि.भंडारा–४४१८०४ E-mail – bhandarkarpriyansh@gmail.com Cell. 9765889913

**प्रस्तावणा :–** इ.स. १६०० मध्ये इंग्रज व्यापार करण्याच्या उद्देशाने भारतात आले. त्यावेळी आपल्या देशाची सत्ता मोगलांच्या हातात होती. दिल्लीच्या गादीवर मोगल बादशाहा जहॉंगीर होता म्हणून इ.स. १६१२ मध्ये जहॉंगीरकडून इंग्रजांनी व्यापारी सवलती मिळविल्या आणि व्यापार करण्यास सुरूवात केली. भारतभर व्यापार करीत असतांना माल साठवून ठेवण्यसासाठी वखारी स्थापन करू लागले. अशाच वखारी स्थापन्यावरून किंवा मालाच्या संरक्षणासाठी बंगाल मध्ये एक भिंत बांधली परंतू तेथील शासक सिरोजउद्दोला यांची परवानगी घेतली नाही त्यावर सिरोजउद्दोला व इंग्रज यांच्यात इ.स. १७५७ ला लढाई झाली हिच इंग्रज व भारतीयांमध्ये झालेली इतिहास प्रसिध्द प्लासीची लढाई होय. हिच इंग्रज व भारतीयामधील पहिली लढाई होय. हया लढाईत इंग्रजांना विजय मिळाला व इंग्रजांची हिंमत वाढली नंतर इ.स. १७६४ ला बक्सारची लढाई जिंकली. म्हणजेच प्लासीच्या लढाईने इंग्रजांनी आपले पाय रोवले व बक्सारच्या लढाईनी ते पक्के केले. असे म्हटले जाते. नंतर इंग्रजांनी भारतातील एक–एक करता सर्व प्रांत जिंकून संपूर्ण भारत जिंकून भारताचे सत्ताधिश बनले. म्हणून म्हटले जाते की, व्यापारी म्हणून आले व राज्यकर्ते बनले इंग्रज राज्यकर्ते बनल्यानंतर भारतीय जनतेवर अन्याय करीत म्हणून इंग्रजानी भारत सोडून जावे. यासाठी अनेक उठाव व चळवळी भारतीय जनतेनी केल्यात परंतू इंग्रज आपल्या आधुनिक शस्त्राच्या भरोशावर उठाव व चळवळी दडपून टाकत. त्यामुळे भारतीय जनतेचे इंग्रजाबद्दल असंतोष निर्माण होत असे हा असंतोष कमी करण्याच्या उद्देशानी काहीतरी सोयीसुविधा देत आहोत म्हणून आणि भारतीय जनतेचा लक्ष भटकविण्यासाठी एखादी सुविधा देत असत अशातच क्रिप्स मिशनचा जन्म झाला.

विशिष्ट अंतर्गत आणि जागतिक स्पोटक परिस्थीमुळे राजकीय स्वार्थ सिध्दीकरीता सार्थ होऊन ब्रिटिश शासनाला भारतीयाकरीता नवी घटना स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने क्रिप्स आयोगाची घोषणा करावी लागली भारताच्या राष्ट्रीय चळवळीच्या व घटनात्मक विकासाच्या दृष्टीने क्रिप्स आयोगाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. भारताच्या राष्ट्रीय चळवळीला व जनतेमधील असंतोषाला आणि त्यांनी ब्रिटिश शासनाप्रती अंगीकारलेल्या असहकाराच्या मार्गाला सह देण्याचा रितसर प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला परंतू तो प्रयत्न यशस्वी न ठरता ब्रिटिशाच्या अंगावर आला.

**क्रिप्स मिशन/आयोग भारतात येण्याची कारणे :**

**१) ऑगष्ट प्रस्तावाचे अपयश (ऑगष्ट १९४०) :–** इ.स. १९३५ च्या कायदयानूसार प्रांतामध्ये निवडणूका होवूण काही प्रांतात भारतीयांचे शासन सत्तादृढ झाले. परंतू इ.स. १९३९ मध्ये दुसऱ्या जागतीक महायुध्दाला सुरूवात झाली. त्यावेळी ब्रिटन सरकारणे भारतीयांना विश्वासात न घेता दुसऱ्या महायुध्दात उडी घेतली त्यामुळे प्रांतिक भारतीय मंत्रीमंडळानी राजीनामे देऊन ब्रिटिश शासनासी असहकार धोरणाचा अवलंब केला. युध्दजन्य परिस्थितीमध्ये भारतीयांचा हा असंतोष ब्रिटिशांना हाणिकारक ठरेल त्यामुळे ८ ऑगष्ट १९४० रोजी ब्रिटिश सरकारणे एक प्रस्ताव पारीत केला. त्यालाच ऑगष्ट प्रस्ताव असे म्हणतात.

ऑगष्ट प्रस्तावानूसार विधिमंडळाचा विस्तार करणे अल्पसंख्याकाच्या हितसंबंधाची जपवनूक करणे तसेच युध्दसमाप्ती नंतर भारताच्या स्वातंत्र्याविषयी विचार केला जाईल. अशा प्रकारच्या घोषणा ब्रिटिश सरकारणे या प्रस्तावात जाहीर केल्यात. परंतू कॉंग्रेसला ब्रिटिशाच्या घोषणावर विश्वास नव्हता. त्यांना त्वरीत निर्णय आणि अमंलबजावणी हवी होती. त्यामुळे कॉंग्रेसणे ऑगष्ट प्रस्ताव फेटाळून लावला ऑगष्ट प्रस्तावाच्या अपयशामुळे भारतात ब्रिटिश विरोध कायमच होता. त्यामुळे काहीतरी सुधारणा करण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारला भारतात क्रिप्स आयोगाची नेमणूक करावी लागली.

**२) भारतीय जनतेचे लक्ष युध्दाकडे आकर्षीत करण्याची निकड :–** ऑगष्ट प्रस्तावातील ब्रिटिशांच्या कुटील नितीमुळे गांधीनी सरकाराविरूध्द व्यक्तीगत कायदेभंगाची चळवळ सुरू केली. लवकरच गांधीच्या चळवळीला भारतीय जनतेकडून सुध्दा उत्तम प्रतीसाथ मिळू लागला. अनेक नेते आणि जनतासुध्दा या चळवळीत सहभागी होऊ लागलीत. ब्रिटिश जीवनमरणाकरीता संघर्ष करीत असतांना गांधीनी चळवळ सुरू करूण ब्रिटिशांच्या पाटीत खंजीर खूपसला अशी टिका मुस्लीम लीगने केली.

सुरवातीला ब्रिटिश शासनाला या चळवळीमुळे काही अडचणी निर्माण झाल्या नाही. परंतु दिवसेंदिवस चळवळ व्यापक होत असल्याने भारतीय जनतेचे लक्ष युध्दाकडून आंदोलणाकडे वळू लागले. त्यामुळे युध्दजन्य परिस्थितीत जनतेचे लक्ष युध्दाकडे वेधून घेण्यासाठी भारतात काहीतरी सोई सुधारणा कराव्यात असे ब्रिटिश सरकारला वाटले आणि त्यातूनच क्रिप्स आयोगाची निर्मीती करण्यात आली.

**३) जपानची यशस्वी आगेकूच/जपानचा धोका :–** दुसऱ्या जागतीक महायुध्दात जपानने ब्रिटिश विरोधात उडी घेतली होती. आणि मार्च १९४२ पर्यंत ब्रम्हदेशातील रंगुन पर्यंत जपानची यशस्वी घोडदौड सुरू होती. आणि लवकरच जपान भारतावर आक्रमण करण्याची शक्यता निर्माण झाली होती. अशा प्रसंगी भारताच्या मदतीची गरज ब्रिटिश सरकारला वाटत होती. याशिवाय भारत जपानला मदत करणार नाही. याचीही व्यवस्था करणे ब्रिटीशसरकारला अत्यावश्यक वाटत होते. त्यामुळे भारतीयाकरीता अधिक सवलतीची घोषणा करूण त्याच्या मागण्या मान्य करण्याच्या

दृष्टीने काहीतरी उपायोजना करणे ब्रिटीश सरकारला अपरीहार्य ठरले.

४) **भारतीय उदारमतवादयाचा आग्रह** :– जुलै १९४१ मध्ये भारतातील काही उदरमतवादी नेत्यांनी एक बैठक घेऊण युध्दकाळात भारतीयांनी ब्रिटिशांना मद्दत करावी परंतु त्या बदल्यात केंद्रीय आणि प्रांतीय विधीमंडळामध्ये ब्रिटिश सरकारणे भारतीयांना जास्त प्रमाणात सहभागी करूण घ्यावे. तसेच युध्दासंबंधी भारतीयांशी विचार–विनिमय करावा अशा काही मागण्या भारतीय उदारमतवादी नेत्यांनी ब्रिटन सरकारकडे केल्या आणि ही सुचना, तार पाठवून ब्रिटन सरकारला कळविल्या गेली. त्यामुळे एका लेखकांच्या मतानूसार '' ब्रिटिश सरकारणे या तारेकडे, योग्य लक्ष दिले''. त्यामुळे भारतात एखादा आयोग पाठविण्याचा मार्ग मोकळा झाला.

५) **ब्रिटीश उदारमतवादयाचा दबाव/दडपण** :– भारतातील कॉंग्रेससारख्या राष्ट्रीय संघटनेस अनुकूल केल्याशिवाय जपानसारख्या शत्रुसी पूर्वेकडे तोंड देणे शक्य नाही. त्यामुळे हिंदूस्थानला भरीव अशा सुधारणा देणे आवश्यक आहे आणि तशा प्रकारचे आश्वासन ब्रिटिश सरकारने भारतीयांना दयावे अशा प्रकारची दडपणे तत्कालीन ब्रिटनचा प्रधानवर चर्चिलव्दार उदारमतवादी नेते ॲटली आणि एडवर्ड यांनी आणला. त्यामुळेच ब्रिटन सरकारला भारतामध्ये क्रिप्स आयोगाची नेमणुक करावी लागली.

६) **जागतीक लोकमताचे दडपण** :– अमेरीकेने दुसऱ्या महायुध्दात इंग्लंडच्या बाजूने उडी घेतली त्यामुळे पूर्वेकडे जपानविरूध्द युध्द जिंकण्यासाठी हिंदूस्थानचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे असे अमेरीकेचे अध्यक्ष फ्रॅकलीन रूझवेल्टला वाटत होते. त्यामुळे रूझवेल्टनी चर्चिलवर दडपण आणून हिंदुस्थानला स्वराज्य देण्याच्या दृष्टीने काहीतरी योजना तयार करण्यास भाग पाडले. तसेच चीनचा सरसेनापती चॅग–कै – शेक यांनी ऑस्ट्रीयाचे विदेशमंत्री डॉ. स्वाह इ. परदेशी नेत्यांनी भारताच्या स्वातंत्र्याची लवकर सोडवणूक करावी अशी सुचना ब्रिटिश सरकारला केली. यांचासूध्दा प्रभाव ब्रिटिश सरकारवर पडला त्यामुळे भारतात क्रिप्स आयोगाची नेमणूक करण्यात आली.

**आयोगाचे आगमन २२ मार्च १९४२** :– वरिल कारणामुळे वा परिस्थीतीमुळे ब्रिटिश सरकारणे २२ मार्च १९४२ रोजी आयोगाचे प्रतिनिधी म्हणून सर क्रिप्स याला भारतात पाठविले. त्यानंतर क्रिप्सने भारतातील कॉंग्रेस, मुस्लीमलीग, हिंदु महासभा संस्थानीक इ. पक्षासी चर्चा करून क्रिप्सने जी योजना तयार केली तिलाच क्रिप्स योजना असे म्हणतात.

**क्रिप्स योजनेचा प्रस्ताव (३० मार्च १९४२)** :– ३० मार्च १९४२ ला सर क्रिप्सयांनी आपली योजना घोषीत केली या योजनेचे युध्दोत्तरकालीन आणि तत्कालीन योजना अशा दोन भागात विभाजण केले आहेत.

१) **युध्दोत्तरकालीन योजना** :– १) महायुध्द समाप्तीनंतर भारतसंघाची निर्मीती करण्यात येऊन त्यात भारतातील प्रांत आणि संस्थाचा समावेश केला जाईल हा संघ अंतर्गत आणि बाहय कार्याकरीता स्वतंत्र राहिल. २) युध्दोत्तर काळात भारताकरीता नव्या संविधानाची निर्मीती करण्यात येऊन त्यामध्ये प्रांत आणि संस्थानीक त्यांच्या प्रतीनीधीचा समावेश केल्या जाईल. ३) ज्या प्रांताना नविन संविधान मान्य नसेल त्यांना भारतीय संघापासुन वेगळे राहण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल. ४) ब्रिटीश शासन आणि संविधान घटना परिषद यांच्यात करार करून अल्पसंख्यांकाच्या संरक्षणाची हमी दिली जाईल. जर कोणतेही भारतीय राज्य नव्या संघटनेचा अस्वीकार करेल त्यांना ब्रिटीश शासनासी वेगळा करार करावा लागेल.

२) **तत्कालीन योजना** :– महायुध्दापासुन भारताच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटिशावर राहील. तसेच भारताच्या सहकार्याने वरिल जबाबदारी अंमलात आणली जाईल. इ. प्रमुख तरतुदी क्रिप्स योजनेत सामील/समाविष्ठ करण्यात आल्यात.

३) **क्रिप्स योजनेस भारतीयांच्या विरोधी प्रक्रीया** :– क्रिप्स योजना जाहीर होताच भारतातील बहुतेक सर्व पक्षांनी आणि नेत्यांनी या योजनेला विरोध दर्शविला परंतु यावर **सिता रामाय्या म्हणतात,** ''क्रिप्स योजनेमध्ये भारतातील प्रत्येक पक्ष प्रसन्न होईल अशा गोष्टी होत्या''.

१) **कॉंग्रेसची प्रतिक्रीया** :– क्रिप्स योजना कॉंग्रेसनेसुध्दा फेटाळुन लावली त्यासाठी खालील परिस्थीती कारणीभुत ठरली त्यामध्ये भारतीय स्वातंत्र्याला युध्द संपेपर्यंत स्थगीत ठेवण्यात आले. तसेच प्रांताना भारतीया संघापासून वेगळे राहण्याचा अधिकार देण्यात आला. याशिवाय संघटना परिषदेमध्ये संस्थानिकांना मुद्दामच समाविष्ट करून त्यांना भारतीय संघापासुन वेगळे राहण्याचे स्वातंत्र्य दिल्या गेले आणि मुख्य म्हणजे भारताचा संरक्षण विभाग भारताच्या नियंत्रणाखाली ठेवला होता.

२) **मुस्लीम लीगची प्रतीक्रीया** :– मुस्लीम लीगने सुध्दा ही योजना अमान्य केली कारण कि या योजनेनूसार पाकिस्थानच्या निर्मीतीची मागणी पुढे ढकलण्यात आली. तसेच प्रांतीय विधीमंडळातील मुस्लीमांना दिल्या गेलेले प्रतीनिधीत्व असमाधानकारक होते. त्याचबरोबर मुस्लीमांना वेगळया मतदार संघाची या योजनेत व्यवस्था केल्या गेली नव्हती.

३) **दलित वर्गाची प्रतिक्रीया** :– दलित वर्गाने सुध्दा ही योजना अमान्य केली. त्याच्या मतानूसार त्यांच्याही संबंधाच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने योग्य अशी तरतुद या योजनेत करण्यात आली नव्हती.

भारतीय काही उदारमतवादी नेत्यानी सुध्दा या योजनेमुळे भारताची प्रतीष्ठा आणि सुरक्षीतता यावर आघात केल्या गेला असे म्हटले आहे. तरी हिंदू महासभेनी वेगळया पाकिस्तानच्या मागणीला विरोध दर्शविला. तर महात्मा गांधीनी या योजनेचे वर्णन ''बुडत्या बॅंकेचा पुढील तारखेचा दिलेला चेक'' असे वर्णन केलेले आहे. अशाप्रकारे क्रिप्स योजना असफल होऊण क्रिप्स २१ एप्रिल १९४२ ला लंडणला परत गेलेत.

**क्रिप्स मिशनच्या अपयशाची कारणे** :– क्रिप्स मिशन अपयशी ठरली यासाठी जी कारणे वा परिस्थिती कारणीभुत ठरली त्यांचा सारांशरूपाने आढावा येणेप्रमाणे

१) **ब्रिटीश शासनाने तडजोडीच्या धोरणाचा स्विकार केला नाही** :– ब्रिटिश शासनाने या योजनेत तडजोडीच्या धोरणाचा स्विकार

केला नाही. केवळ दिखाऊ तडजोडीच्या प्रयत्नानी आपल्या शासनाचा कालखंड वाढविण्याचा प्रयत्न केला. संरक्षण विभागावर स्वत:चेच पूर्ण नियंत्रण ठेवण्याचा ठेका ब्रिटिशांनी सोडला नाही. एका इतीहासकाराच्या मते ''शासनाने केवळ सीमाअंतर्गत आपल्या फायदयाकरीता करार करू इच्छित होते. त्यातच कराराचे निश्चयाने पालन करत नव्हते.

एकंदरीत या योजनेमध्ये ब्रिटिश सरकारने भारतीयांशी काही बाबतीत तडजोड केली असती. भारतीयांना विश्वासात घेऊण ही योजना जाहीर केली असती तर कदाचीत परिणाम वेगळा झाला असता.

२) **ही योजना अर्धवट होती :–** क्रिप्स योजना अपूर्ण होती असे म्हटले जाते कारण की, यापूर्वी भारतीयांनी पूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली होती परंतू या योजणेत भारताच्या स्वातंत्र्यासंबंधी कसल्याही प्रकारचा उल्लेख नव्हता. याशिवाय या योजनेत वर्तमानकाळापेक्षा भविष्यावर अधिक भर होता. तसेच मुस्लीमांना स्वतंत्र पाकिस्तान हवा होता. पण त्याचाही उल्लेख या योजनेत नव्हता. आणि मुख्य म्हणजे या योजनेमध्ये ब्रिटिशांचा स्वार्थ समाविष्ठ होता. आणि त्यामुळेच ही योजना पूर्णत्वास न आल्यामुळे असफल करणे स्वाभाविक होते.

३) **राष्ट्रीय कॉंग्रेसची खंबीर भुमीका :–** यावेळी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आपल्या धोरणावर आणि भुमीकेवर अतिशय खंबीर राहीले आपल्या धोरणातून माघार घ्यायला कॉंग्रेस तयार नव्हती. भारताच्या पूर्ण स्वातंत्र्याच्या निर्णयावर कॉंग्रेस ब्रिटिश सरकारणी करार करण्यास तयार होते. याशिवाय दुसऱ्या, महायुध्दामुळे, आणि ब्रिटिशांच्या अस्थीर स्थितीमुळे भारतात क्रांतीचे वातावरण निर्माण होत होते. अशा या अस्थिर परिस्थितीमुळे ब्रिटिश भारतीयांची मागणी मान्य करतील असे कॉंग्रेसला वाटत होते. कारण की, युध्दकाळात भारतीयांच्या सहकार्याची गरज ब्रिटिशांना होती.

४) **ब्रिटीश राजदुत हेलीफॅक्सचे विधान/वक्तृत्व :–** क्रिप्स योजना पूर्ण करण्याच्या काळातच ब्रिटनचा राजदुत हेलीफॅक्सने हयावेळी असे एक उद्‌गार काढले की, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ही लहान संघटना असून भारतातील सर्व वर्गाचे प्रतीनीधीत्व करीत नाही. त्यामुळे कॉंग्रेसच्या मागणीकडे लक्ष देण्याची गरज नाही. अशा या हेलीफॅक्सच्या विधानामुळे कॉंग्रेसनी हया योजनेस अतीशय तीव्र विरोध केला त्यामुळेच जॉन्सन हा मृत्सद्दी म्हणतो. ''हेलीफॅक्सच्या उद्‌गारामुळे क्रिप्स मिशनच्या अपयशाचा मार्ग मोकळा झाला.

५) **चर्चील यांची अडेल भुमीका :–** ''ब्रिटन चे प्रधानमंत्री चर्चीलवर त्यावेळी सर्वबाजुने दडपण आणल्यामुळे त्यांनी नाईलाजास्तव क्रिप्स योजनेला मान्यता दिली. परंतु ही योजना यशस्वी ठरण्याच्या दृष्टीने त्या योजनेचे चर्चीलने मनपूर्वक समर्थन केले नाही.'' चर्चीलची भुमीका कशी अडेल होती. हे त्यांच्या खालील विधानावरून लक्षात येईल.

**चर्चील म्हणतो,** ''ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे वाजविण्यासाठी मी पंतप्रधान झालो नाही.'' असे चर्चीलणे म्हटले होते. इ. प्रमुख कारणामुळे क्रिप्स योजना यशस्वी ठरू शकली नाही.

**परिक्षण :–** इ.स. १९४० च्या ऑगष्ट प्रस्तावाला कॉंग्रेसनी फेटाळून लावले आणि भारतीय जनतेच्या मनात इंग्रजाबद्‌दल तीव्र असंतोश निर्माण झाला होता हा असंतोष कमी करण्यासाठी आणि भारतीय जनतेचे लक्ष कुठतरी लावून त्यांना गुंतवून ठेवण्यासाठी काहीतरी सोयी–सुविधा देत आहोत असे नाटक ब्रिटिश सरकार करीत होते त्यातूनच क्रिप्स मिशन भारतात पाठविण्यात आले. हे मिशन भारतीय नेत्यांसोबत विचार–विनियम करून युध्दसमाप्तीनंतर भारताची सत्ता, भारतीयांच्या हाती देण्यात येईल अशा प्रकारची भुलथाप देणारी ही योजना होती. पण सुरूवातीपासुनच क्रिप्स मिशन यशस्वी होणार नाही. याची दखल चर्चील व इतर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी घेतली होती. कारण त्यामध्ये त्यांचाच फायदा होता. सविनय कायदेभंग चळवळीमुळे भारतीय जनता युध्दा ऐवजी आपले लक्ष देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या चळवळीकडे केंद्रीत करीत होते. यामुळे ब्रिटिश सरकार अडचणीत येत हेते. दुसऱ्या महायुध्दात जपानने ब्रिटिशाच्या विरोधात युध्दात उडी घेवून भारताच्या सिमेपर्यंत आपली यशस्वी आगेकूच केली होती त्यामुळे ब्रिटिश नियंत्रणाखाली असलेल्या भारताला धोका होता. तसेच भारतीय जपानच्या मदद्‌तीला जाणार नाही. याचीही व्यवस्था ब्रिटिशांना करायची होती. मात्र कॉंग्रेसला विश्वासात घेतल्याशिवाय भारताविषयीचे निर्णय घेवू शकत नाही. कारण कॉंग्रेस ही सर्व भारताचे नेतृत्व करणारी संघटना होती. म्हणून उदारमतवादी ब्रिटिश नेते ॲटली आणि एडवर्ड यांनी चर्चीलवर दडपण आणले. अमेरिकेनी इ.स. १९४१ मध्ये जागतीक दुसऱ्या महायुध्दात भाग घेतला. त्यामुळे पुर्वेकडे जपानविरूध्द युध्द जिंकण्यासाठी भारताच्या सहकार्याची गरज वाटू लागली. म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष फ्रॅंकलीन रूझवेल्टनी ब्रिटनचे पंतप्रधान चर्चीलवर दडपण आणून भारताला स्वराज्य देण्याच्या दृष्टीने काहीतरी योजना तयार करण्यास भाग पाडले.

मित्रराष्ट्रांना खुश करण्यासाठी चर्चीलनी क्रिप्स मिशन भारतात पाठविले. परंतू ते सफल होणार नाही याची मात्र काळजी घेतली कारण यामध्ये चर्चीलचाच फायदा होता. चर्चील फक्त देखावा करून भारतीयांना गुंतवून ठेवायचे होते. भारतीयांनसमोर असे प्रस्ताव ठेवण्यात आले की, ते भारतीयांना मान्य होणार नाही. क्रिप्स मिशन अपयशी झाल्यास त्यांचा दोष आपल्यावर येणार नाही तर उलट भारतीय जनतेत, किंवा भारतातील सर्व पक्षांच्या नेत्यांमध्ये एकमत नाही, ते स्वातंत्र्य घेण्यास तयार नाही असा देखावा करून अपयशाचे दोष भारतीयांवर लावण्यास चर्चील विसरला नाही. इंग्रजांच्या अशा वर्तनामुळे भारतीय जनतेच्या मनात इंग्रजाबद्‌दल कटूता, व्देश आणि असंतोष निर्माण होवून इंग्रजांना आता भारतातून हाकलून लावलेच पाहीजे. अशाप्रकारची भावना सर्व भारतीय जनतेच्या मनात निर्माण होवून काहीतरी वेगळ कराव म्हणून इ.स. १९४२ च्या चलेजाव चळवळीचा उदय झाला या चळवळीत भारतातील जनतेनीसुध्दा भाग घेतला. नेता नसतांना जनतेनी ही चळवळ चालविली.

दुसऱ्या महायुध्दकालीन कालखंडात भारतात अंमलात आणल्या गेलेल्या क्रिप्स योजनेचे जर आपण बारकाईने परिक्षण केले तर त्यामध्ये भारताचे नुकसान आणि ब्रिटिशांचा फायदा असलेला आणि झालेला दिसून येतो. कारण की या योजनेत भारताला स्वातंत्र्य मिळेल असा कोठेही उल्लेख केला नव्हता किंवा भारताला वसाहतीअंतर्गत स्वातंत्र्य देण्याची वेळ ठरविण्यात आली नव्हती या योजनेत देशी संस्थांना आणि प्रांताना भारतीय संघात सामिल होण्याचे किंवा वेगळे होण्याचे स्वातंत्र्य देऊन भारताला अनेक भागात विभाजनाची आणि जातीय वादाची पार्श्वभुमी तयार केल्या गेली होती.

याशिवाय या योजनेअंतर्गत ब्रिटिश शासनाला अनेक लाभ मिळाले. अमेरिकन आणि इतरही जागतीक नेत्यांच्या दडपणापासून मोकळीक मिळाली आणि त्यांनी या माध्यमातून ''भारतात घटनात्मक परिवर्तनाच्या मार्गात भारतीय नेत्यामधील मतभेद आणि त्यांची अत्याधिक महत्वाकांक्षा हया गोष्टी आड येत असल्याने आम्ही भारतात पूर्णरूपाने सुधारणा करू शकत नाही. यांचा देखावा निर्माण केला याबाबद **डॉ.पांडे म्हणतात,** ''चर्चिल स्वत: कोणत्याही बदलाकरीता वा प्रगतीकरीता उत्सुक नव्हता म्हणून त्याने क्रिप्स योजनेचे समर्थन केले नाही.'' त्यामुळे भारतात ब्रिटिश विरोध कायमच राहील.

क्रिप्स योजनेच्या संदर्भात **डॉ. क्लेन्सी म्हणतात**, ''क्रिप्स केवळ कटकारस्थान विश्वासघात दगाबाजी आणि दुटप्पी कसे करीत होते आणि त्याबद्दल त्यांना कवडीचाही पश्चाताप नव्हता.''

**पं. नेहरू म्हणतात,** ''या योजनेवर जेवढा अधिक प्रमाणात विचार केला जाईल तेवढी ही योजना अधिक काल्पनीक वाटू लागेल.'' एकंदरीत ही योजना म्हणजे ब्रिटिश शासनाचा राजकीय खेळ होता.

**डॉ.सितारामय्या म्हणतात,** ''क्रिप्स योजना मंत्रीमंडळाच्या त्या अपत्याप्रमाणे होती की, अजुनपर्यंत ज्याचा जन्म झाला नव्हता. दिल्लीतील २० दिवसाच्या प्रवासात क्रिप्स यांनी जन्मणाऱ्या अपत्यास कृत्रीम खादय आणि औषधाने जिवीत ठेवण्याचा प्रयत्न केला पण ते अयशस्वी ठरले.''

खरे सांगायचे म्हणजे दुसऱ्या महायुध्दकाळात ब्रिटीश शासनाची क्रिप्स योजना म्हणजे एक कुट नैतीक प्रयोग होता.

**निष्कर्ष** :– क्रिप्स मिशन जागतीक दुसऱ्या महायुध्दात भारतीयांचा सहयोग मिळविण्यासाठी चर्चीलनी भारतात पाठविली होती. क्रिप्स मिशनच्या प्रस्तावात हिंदूस्तान व पाकिस्तान यांच्या विभाजनाचा कळत–नकळत उल्लेख होता. त्यामुळे क्रिप्स मिशन असफल होवून इंग्लंडला वापस गेले तेव्हा आपल्या मागे हताश आणि कडवाहट भरलेल्या भारतीयांना सोडले. भारतीयांच्या मनात ब्रिटिशांबद्दल तीव्र असंतोष निर्माण झाला. भारतीयांची परिस्थिती असाहय झाली होती. त्यामुळे भारतीय लोक चिडले आणि आता साम्राज्य वादावर अंतिम प्रहार केला पाहिजे. अशाप्रकारची भावना निर्माण होवून इ.स. १९४२ ची चलेजाव चळवळ सुरू झाली.

***संदर्भ सूची :–***


*१. डॉ. वि. भा. आठल्ये : 'आधुनिक भारताचा इतिहास'*

*२. डॉ. अनिल कठारे : 'आधुनिक भारताचा इतिहास सन १८५८ ते १९४७*

*३. डॉ. बि.एल.ग्रोवर आणि डॉ.एन.के. बेल्हेकर : आधुनिक भारताचा इतिहास*

*४. धनंजय आचार्य : भारताचा इतिहास सन १७६१ ते १९७१*

*५. डॉ. सुमन वैद्य आणि शांता कोटेकर : आधुनिक भारताचा इतिहास*

*६. डॉ. जी.बी.शाह व डॉ.आर.पी.भामरे आणि प्रा. एम.डी.पवार : आधुनिक भारताचा इतिहास सन १८५७ते १९५०*

# भारतातील आदिवासी समाज आणि कुमारीमातांची समस्या

**डॉ. श्रीराम किसनराव खाडे,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य महाविद्यालय, मारेगांव ता. वणी जि. यवतमाळ.

**प्रस्तावना** :— भारतीय समाज संरचनेत आदिवासी समाज एक महत्त्वाचा घटक आहे. तथापी आजही आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीत अधिकांश बदल झालेला नाही. त्यांचा जीवनविषयक संघर्ष आहे त्या स्थितीतच आहे. त्यांच्या रूढी व परंपरामध्ये त्यांचे जीवन नियंत्रित झाले आहे. आदिवासी समाज अज्ञानी आणि बंदिस्त मानसिकतेचा असल्यामूळे व्यापारी, सावकार, ठेकेदार, नोकरशाही यांच्याकडून त्यांची प्रचंड प्रमाणात पिळवणूक आणि फसवणूक केली जात आहे. आदिवासी स्त्रियां आणि मुलींचे लैंगिक शोषण अधिक प्रमाणात केले जात आहे आणि म्हणूनच आदिवासी समाजात कुमारी मातांची समस्या अधिकाधिक प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसते.

भारतीय समाजातील अंधश्रद्धा, प्रथा, परंपरा, चालीरिती इत्यादींच्या माध्यमातून स्त्रियांचे लैंगिक शोषण केले जाते. या अंधश्रद्धांना धर्माचा मुख्यत्वेकरून आधार असतो. आणि यातूनच देवदासी, मुरळी इ. देवांना अर्पण केलेल्या स्त्रिया, त्या—त्या देवालयाच्या परिसरात संचार करीत असतात. त्याच विभागातील श्रीमंत लोक किंवा मंदीरातील पुजारी धर्माच्या नावांवर स्त्रियांचे लैंगिक शोषण करीत असतात. काही आदिवासी समाजातील प्रभुत्वशाली नेतृत्व आदिवासी मुलींचे व स्त्रियांचे लैंगिक शोषण करीत असतात. अलिकडे आदिवासी समाजात इतर लोकांचे वेगवेगळया कारणाने येणे—जाणे सुरू झाले आहे. असे लोक ही स्वत:च्या वासनापूर्तीसाठी आदिवासी मुलींचा उपभोग घेत आहेत. या लैंगिक संबधातून अशा मुलींना पुढे गर्भधारणा होऊन मुल होते. त्या मुलांबद्दल या समाजात फारसा विधिनिषेध नसतो. परंतु या आदिवासी मुलींचे विवाह होत नाहीत. ती तरूण असेपर्यंत लैंगिक समाधानाच्या मोबदल्यात त्यांना काही प्रमाणात आर्थिक मदत त्याच परिसरातील लोक करीत असतात. पण या मुलांना नियमित बाप मिळत नाही आणि मग या कुमारीमाता स्वत:च्या आणि मुलांच्या दैनंदिन व्यवहारासाठी अपरिचित वा अनोळखी पुरूषाचे नाव वडील म्हणून धारण करीत असतात. अशाप्रकारच्या कुमारीमातांसाठी कोणत्याच मान्यताप्राप्त प्रथा किंवा धर्माचा आधार नाही. परंतु त्या परिसरातील लोकांकडून शोषण झालेल्या आणि नंतर इतरांनी उपभोगलेल्या कुमारीमाता असतात. त्या मुळातच गरीब आणि अशिक्षित असतात. कुमारीमाता झाल्यामुळे त्यांच्याच समाजात त्यांची सतत अवहेलना व अवमान होत असतो.

आदिवासी समाजातील या कुमारीमातांकडे बघण्याचा समाजाचा अपमानित दृष्टीकोण, मुलांची होणारी गैरसोय हे प्रश्न सत्य अर्थाने सोडविले जात नाही. या कुमारीमातांची नोंद शासन दरबारी सन्माननिय पद्धतीने होत नाही. त्या अत्यंत गरीब असूनही त्यांना दारिद्रियरेषेखालचे कार्ड दिले जात नाही, रेशनकार्ड नाही, मतदानाची नोंद नाही. फक्त मुलाला बापाचे नाव हवे म्हणून त्या एखादे काल्पनिक नाव घेऊन मुलांच्या बापाची नोंद करीत आहेत. या कुमारीमातांनी अशाप्रकारे जीवन व्यतीत करणे हे या देशातील लोकशाहीकरीता अयोग्य, अनुचित घटना आहे.

**'कुमारीमाता' संकल्पनेचा अर्थ** :— भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्थेला प्रकार्यात्मक महत्त्व आहे. तसेच भारतीय कुटुंबसंस्थेत स्त्रियांबाबत विवाहाला आणि मातृत्वाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्त्रियांच्या बाबतीत विवाह अपरिहार्यतेने सक्तीचा असतो. या वैवाहिक जीवनातूनच लैंगिक समाधानाची अनुभूती स्त्रीने उपभोगायची असते. स्त्रियांचे विवाहबाहय संबध मूल्यव्यवस्थेत अंतर्भूत होत नाही आणि तिचे लैंगिक समाधान मूलभूतपणे प्रजोत्पादनासाठी असते. म्हणूनच एक पुरूष, एक स्त्री अशाच दोन व्यक्तींचा विवाह होतो. त्यांचे लैंगिक जीवन व त्यांचे समाधान हे सर्व प्रजोत्पादनाशी संबधीत असते ज्यातून वंश सातत्याचे संवर्धन केले जाते आहे. स्त्रियांच्या बाबतीत मातृत्वाला विशेषित महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीत मातृत्वाचे अनेक सर्वोत्तम प्रकारचे संदर्भ दिले जातात. जसे मातृत्वाशिवाय स्त्रीला पूर्णत्व नाही, मातृत्व हेच स्त्रीचे सर्वात मूलभूत कर्तव्य व समाधानही मानले जाते. यासाठीच विवाहित स्त्रियां मातृत्वासाठी व्रतवैकल्ये, पूजाअर्चा, उपवास, नवस या सर्व गोष्टी करीत असतात. कारण मातृत्वाशिवाय स्त्रीच्या जीवनशैलीला अर्थ नसतो. मातृत्वामूळेच कुटुंबात स्त्रीचा मान, सन्मान, प्रतिष्ठा वृद्धींगत होत असते. मातृत्वामूळेच स्त्रीचा कुटुंबात मानसन्मान केला जातो, तिची पूजा केली जाते. परंतू या सगळया गोष्टी तेव्हाच प्राप्त होतात जेव्हा स्त्रियांना हे मातृत्व विवाहातून मिळत असते. विवाहातून मिळालेले मातृत्व हे एक पुण्यकर्म व वरदान मानले जाते. जी स्त्री माता होऊ शकत नाही, तिला वांझोटी मानले जाते. याचाच अर्थ मातृत्व हे स्त्रीला विवाहाच्या अंर्तगत एका पुरूषाकडून मिळाले पाहिजे, अशी भारतीय समाजात प्रमाणसंहिता आहे. याउलट विधवा आणि कुमारीकांना विवाहाशिवाय प्राप्त झालेले मातृत्व हे अपवित्र, अयोग्य व कलंकित मातृत्व समजले जाते. विवाह न करता प्राप्त झालेले मातृत्व अभिशाप असल्याचे मानले जाते आणि अशा कुमारीमातांना समाज व्यभिचारिणी ठरवित असते. थोडक्यात, ज्या मुलींना विवाहाच्या पूर्वी इतर पुरूषांबरोबरच्या लैंगिक संबधातून अपत्यप्राप्ती होत असते, अशा मुलींना 'कुमारीमाता' म्हटले जाते.

भारतीय समाजात 'माता' हा शब्द एक आदर्श व्यक्तिमत्व समजले जाते. आई आणि मूल हे जगातील सर्वात पवित्र व शुद्धस्वरूपाचे नांत आहे असे मानले जाते. परंतु याच शब्दाला आधी 'कुमारी' हा शब्द जोडला गेला की त्याचे सगळे संदर्भ बदलत असतात. विवाह न करता किंवा विवाहाच्या पूर्वी प्राप्त झालेल मातृत्व धार्मिक दृष्टीने अपवित्र मानले जाते. विवाहाशिवाय स्थापित झालेले लैंगिक संबध हे अनैतिक मानले जातात. जाती—धर्माचे नियम मोडणारे असे हे असंवैधानिक कृत्य मानले

जाते. घराण्याला काळिमा फासणारी, कुटुंबाची प्रतिष्ठा उध्वस्त करणारी अशी ही घटना आहे, अशी कुटुंबाची व समाजाची मानसिकता आहे. कुमारीमातेच मुल समाज स्विकृत करण्यात असमर्थता प्रकट करतो. अशा मुलांना 'अनौरस' ठरविल्या जाते आणि त्या मुलालाही समाजाची हेटाळणी, अवमानना सहन करावी लागते आहे. हे समाज वास्तव आहे.

ग्रामीण व शहरी समाजापेक्षा कुमारीमातांचे प्रमाण आदिवासी समाजात अधिक आहे. कारण आदिवासी समाजातील कुटुंबसंस्था व विवाहसंस्था इतर समाजापेक्षा अशंत: वेगळया आहेत. काही आदिवासी जमातीत विवाहपूर्व लैंगिक संबध ठेवण्याचे स्वातंत्र्य आहे. विवाहपूर्व लैंगिक संबधाबाबत आदिवासी लोक फारसे संवेदनशील नाहीत. 'कोव्याक नागा' जमातीत विवाहापूर्वी झालेल्या मुलाला घेऊन स्त्री आपल्या पतीच्या घरी जाऊ शकते. हे मूल अन्य व्यक्तीचे आहे हे माहित असूनही त्यांच्यात संघर्ष होत नाही. मध्यभारतातील काही आदिवासी जमातीतही विवाहपूर्व लैंगिक संबध असल्याचे आढळते. यासारख्या प्रथाशिवाय आज आदिवासी समाजाचा इतर समाजाशी दैनंदीन स्वरूपात मोठया प्रमाणात संपर्क प्रस्थापित होत आहे. सावकार, व्यापारी, ठेकेदार, शासकीय कर्मचारी व इतर समाजघटकांचा आदिवासी क्षेत्रातील संपर्कात व व्यवहारात वाढ झाली आहे.

आदिवासी मुलींच्या गरीबिचा, त्यांच्या साधे व सरळपणाचा फायदा सदर लोक घेत आहेत. त्यांचे लैंगिक शोषण करीत आहेत आणि त्यामूळेच आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या निर्माण झाली आहे. सुनीता शर्मा आणि अमरेंद्र किशोर[१] यांनी ओडिसा राज्यात केलेल्या एका सर्वेक्षणात ओडीसा राज्यांमध्ये आदिवासी समाजात जवळपास ४० हजार कुमारीमाता असल्याचे निदान केले आहे. यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील फुले—आंबेडकर महिला प्रबोधीनीच्या प्रा. लिला भेले[२] आणि महिलांच्या समस्यांच्या अभ्यासक डॉ. सीमा साखरे यांनी झरी—जामणी तालुक्यात केलेल्या कुमारीमातांच्या सर्वेक्षणात आदिवासी समाजात जवळपास २०० कुमारीमाता असल्याचे आढळून आले आहे.

**भारतीय समाजातील कुमारीमातांची समस्या व स्वरूप**:— भारतीय समाजात 'आई' किंवा 'माता' या शब्दाला विशिष्ट व आदर्श व्यक्तिमत्वाचं अनन्यसाधारण महत्व आहे. जगातील सर्वात पवित्र नातं म्हणून आई आणि मुलाच्या नात्यालाच ओळखल जाते. 'आई' किंवा 'माता' हा अत्यंत पवित्र शब्द समजला जातो. परंतु याच शब्दाला आधी 'कुमारी' हा शब्द जोडला गेला की, त्याचे सगळे संदर्भच बदलून जातात. कारण भारतीय समाजात विवाह न करता किंवा विवाहापूर्वीचे मातृत्व अपवित्र मानले जाते. विवाहाशिवाय निर्माण झालेले लैंगिक संबंध हे अनैतिक व अयोग्य मानले जातात. भारतीय समाजव्यवस्थेच्या दृष्टीने जाती आणि धर्माचे नियम मोडणारं असं हे असंवैधानिक कृत्य समजले जाते. विवाहापूर्वीचे कुमारी मातृत्व म्हणजे घराण्याला काळिमा लावणारी, कुटुंबाची प्रतिष्ठा ऱ्हास करणारी घटना आहे. एकंदरीत भारतीय समाजात विवाह न करता लैगिंक संबंध स्थापित करणे आणि त्यातून कुमारीमातृत्व येणं हे अयोग्य, अपवित्र आणि समाजाच्या व धर्माच्या नियमाच्या विरूद्ध असल्याचे मानले जाते. अशा कुमारीमाता आणि त्यांची अपत्ये यांच्याविषयी भारतीय समाजात कमालीची घृणा असल्याचे आढळते. कुमारीमातेला बदफैली, व्यभिचारी, लैगिंक सुखासाठी अनैसर्गिक क्रिया करणारी, देहव्यवसाय करणारी वेश्या, तर तिच्या मुलाला अनौरस समजून त्यांना अत्यंत वाईट प्रकारची क्रिया व व्यवहारांना सामोरे जावे लागत असल्याचे चित्र आढळते.

तथापि, भारतीय समाजव्यवस्थेतील काही समाजात यासंबधीचे नीतिनियम वेगवेगळे असल्याचे आढळते. भारतातील आदिवासी जमातींच्या समाजव्यवस्थांचे अध्ययन केले असता असे निदर्शनास येते की, आदिवासी समाजात विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था यासारख्या सामाजिक संस्था आहेत. परंतु आदिवासी समाजाचे स्वत:चे म्हणून काही प्रथा, परंपरा, कायदे, निर्बंध आहेत. आणि हे कायदे व निर्बंध भारतातील इतर जाती—धर्मापेक्षा अधिकांश वेगळे आहेत. आदिवासी समाजातील 'जात पंचायत' नावाची संस्था आदिवासी समाजातील प्रथा, परंपरा व कायद्यांच संरक्षण करण्याची जबाबदारी पार पाडत असते. परंतु आधुनिक काळात विविध कारणांनी इतर जाती जमातींचे लोक आदिवासी वस्त्यांपर्यंत जाऊन विविधपध्दतीने संवाद, संचार व विनिमय करीत आहेत. वेगवेगळया संस्कृती एकत्र आल्याने मुळच्या आदिवासी समाजात आज विविध प्रकारचे प्रश्न व समस्या निर्माण होत आहेत. आदिवासी समाजातील कुमारीमातांचा प्रश्न आदिम समाजात इतर समाजांतील कुमारीमातांच्या प्रश्नांपेक्षा काहीसं वेगळ स्वरूप धारण करून सामोरे आलेला आहे. त्यामूळेच आधुनिक काळात आदिवासी समाजातील कुमारीमातांच्या समस्येच स्वरूप दिवसेंदिवस अधिकाधिक अक्राळविक्राळ व गंभीर होत असल्याचे आढळत आहे.

भारतीय आदिवासी समाजातील कुमारीमातांच्या विविध प्रश्नांचा आढावा घेऊन व त्यांचे विश्लेषण करून, कुमारीमातांच्या प्रश्नाच्या स्वरूपाची मांडणी करीत विवेचन करण्याचे काम भारतातील विविध स्वयंसेवी संस्था करीत आहेत. त्यामुळे आदिवासी समाजातील कुमारीमातांच्या प्रश्नाचे एकूण पर्यावरणातील, परिस्थितीतील स्थान आणि गांभीर्याचे स्वरूप समजण्यास सहाय्य होते आणि या समस्येच्या स्वरूपाचा अंदाज लक्षात घेऊनच त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे. सुनीता जैन—शर्मा[३] यांनी आपल्या 'सुलक्ष्मी लोक संस्थान' या स्वंयसेवी संस्थेच्या वतीने भारतीय आदिवासी समाजातील कुमारीमातांच्या समस्येचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. अधिकांशवेळा अशा संशोधनांचे अहवाल तयार केले जातात आणि मग ते बंदिस्त केले जातात. तसं न होऊ देता त्यांनी या व्यष्टीअध्ययनांना (Case Study) एका सविस्तर अभ्यासपूर्ण प्रस्तावनेची जोड देऊन ते पुस्तकरूपाने प्रकाशित केले. त्यामुळे सामान्य व सर्वसामान्य वाचकांपर्यंत या प्रश्नाचे गांभीर्य पोहोचले आहे. सुनीता शर्मा यांनी भारतातील एका विशिष्ट परिसराची निवड करून जरी हे काम केलेले असले, तरी देशातली एकूण परिस्थिती पाहता ही समस्या सार्वत्रिक आहे, हे लक्षात येते.

भारतीय समाजाच्या नागरी व ग्रामीण समाजातील कुमारीमाता आणि आदिवासी समाजातील कुमारीमाता यात मुलत: फरक आहे. कारण ग्रामीण–नागरी समाजातील कुमारीमातांच्या समस्येपेक्षा आदिवासी समाजातील कुमारीमातांची संमस्या आणि स्वरूप वेगळे आहे. तेंव्हा ग्रामीण–नागरी समाजातील कुमारीमातांची समस्या आणि आदिवासी समाजातील कुमारीमातांची समस्या यात नेमका कोणता फरक आहे. हे अभ्यासण्यापूर्वी या दोन्ही प्रकारच्या समाजांतील वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

ग्रामीण व नागरी समाजातील मुलींच्या संदर्भात लैंगिक कुतूहल, आकर्षण वाटणे आणि लैंगिक संबंधांच्या परिणामांची अजिबात कल्पना नसणे किंवा अर्धवट, चुकीची कल्पना असल्यामुळे अनेक अविवाहित व अल्पवयीन मुलींच्या वाटयाला अकाली मातृत्व येते. घरातील पुरूषांच्या, परीचित पुरूषांकडून कधी आमिषे, कधी लग्नाचा असत्य वायदा करून, कधी धाक–धमकी–दडपण व दहशत अशा मार्गानी एकदा वा अनेकदा बलात्कार केला जातो; त्यातून गरोदर राहून आई बनलेल्या अशा कुमारीमातांची संख्या नागरी व ग्रामीण भागात अधिक प्रमाणात आढळते. या भयांमुळे घरी वेळेत कळविले जात नाही आणि घरी कळतं तेव्हा गर्भपात करण्याची वेळ निघून गेलेली असते.

तर आदिवासी समाजातील मुलींच्या संदर्भात दुष्काळापासून ते दहशतवादापर्यंत, नैसर्गिक ते मानवनिर्मित आपत्ती, आदिवासी अल्पवयीन मुलींसाठी सर्वार्थानं आपत्तीच असल्याचे आढळते. विस्थापन, स्थलांतर, दंडेली, मारहाण, निर्घृन कत्तली या गोष्टींना बहुतेक सर्व आदिवासी समाज सामोरे जात असले, तरी या सगळयांचे जास्त विपरित परिणाम आदिवासी स्त्रियांच्या वाटयाला आली आहेत. जीवनमरणाच्या प्रश्नात आदिवासी समाजातील नातीगोती, आप्तसंबंध बिनमहत्त्वाची असल्याचे आढळते. मग एखाद्या व्यापाऱ्याला घरात घेऊन कोवळी मुलगी त्याच्या स्वाधिन करणं, मजुरीवर मुकरदमांशी संबंध ठेवायला मुलींना भाग पाडणं, आई–वडिलांनीच मुलींना विकणं, हे प्रकार सर्रास घडत असतात. किंवा मुलगी अजाणतेपणी अशा एखाद्या प्रकाराची बळी ठरते आहे, हे लक्षात आल्यावरही स्वार्थापोटी आईबाप डोळयांवर कातडी ओढून घेत असतात. लग्नाचं आश्वासन देऊन, लग्न झालंच आहे असं भासवून या मुलींचा उपभोग घेतला जातो. हे तर घडतंच असते पण वेळप्रसंगी तिला आपल्या मित्रांच्या वा वरिष्ठांकडे सुर्पूद करणं किंवा सरळसरळ त्यांना विक्रि करून कमविण्याचे साधन असल्याचे मानले जाते. उपासमार, सतत परिश्रम, हेटाळणी, तुच्छता, तिरस्कार, घरगुती हिंसा हेच या मुलींच्या वाटयाला येत असतं. अशा स्थितीत कुणी प्रेमाचे दोन शब्द बोललं वा दोन–चार रूपयांच्या पावडर–लिपस्टिकच, टिकल्या–बांगडयांची भेट दिली; तरी ती गोष्ट त्यांच्यासाठी अप्रुपाची ठरते. अन्न, अंलकार, विविध वस्तू, पैसे अशा आमिषांनी अनेक गरीब आदिवासी मुली स्वत:चे शरीर पुरूषांच्या पुढे ठेवत असल्याचे सचित्र आहे. अशा मुलींच्या अंगात प्रतिकाराची शक्ती नाही, मूलत: प्रतिकार करायचा असतो. याचीही जाणीव नाही, अन्यायाविरूद्ध जाब विचारावा, न्याय मागावा, अशी जागाच नाही, अशा अवस्थेतल्या या मुली असतात. मुलांचे हक्क, महिलांचे हक्क, आदिवासींचे हक्क, हे शब्द परवलीचे असले तरी आदिवासी समाजातील कोणालाही हक्क, अधिकार माहित नाही, ही वस्तुस्थिती आहे.

आदिवासी मुलींची फसवणूक, अत्याचार सर्वांकडूनच होत असतात. रक्ताचे व कायदेशीर नात्याचे नातलग, जमीनदार, स्थानिक राजकारणी, व्यापारी, नोकरशाही यांच्यापासून तर स्वंयसेवी संस्थामधील कार्यकर्ते, नक्षलवादी, दहशतवादी सर्वांचे अत्याचार कोवळया आदिवासी मुलींना सहन करावे लागतात. आर्थिक प्रश्न, आरोग्यविषयक प्रश्न, एड्ससारख्या आजारांची शक्यता, मानसिक आरोग्याचे प्रश्न, सामाजिक बहिष्कार वा असहकार्य अशा अनेक स्तरांवरील समस्या या कोवळया मुलींच्या पदरी एका निष्पाप जीवाच्या जबाबदारीसह येतात. परंतु यापेक्षा भयानक म्हणजे या कुमारीमातांना कायमच सार्वजनिक उपभोगाची वस्तू असल्याप्रमाणे समाजात वागणूक मिळते. एकदा कुमारीमाता झाल्यानंतर तीचं कोणत्याही पुरूषाला सहजतेने उपलब्ध असणं हे गृहीतकृत्य असल्याचे काही प्रमाणात मानले जाते. कुमारीमातांचं पुनर्वसन करणं, त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी काही व्यावसायिक प्रशिक्षण देणं, शारीरिक आरोग्यासाठी औषधोपचार करणं, मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन करणं, कायदेशीर सल्ला देऊन त्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करणं, यासाठी आदिवासी भागात अनेक स्वंयसेवी संस्था कार्यरत आहेत. पण संस्थांची संख्या आणि पीडित महिलांची संख्या लक्षात घेतली तर कुमारीमातांची संख्या अधिक असल्याचे आढळते.

**भारतीय आदिवासी व कुमारीमातांची समस्या**:– आदिवासी समाजात स्त्रियांचं स्थान किंवा भूमिका निर्विवादपणे महत्त्वाची आहे. असंघटित क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि बांधिलकीच्या भावनेने आदिवासी तरूणी आपल्या श्रमाची विक्रि करीत असल्यामुळेच दुर्गम व अतिदुर्गम भागात भाताची शेती केली जात आहे. याउलट शहरात गतित्वाने इमारतींची निर्मिती केली जात आहे. आणि सरकारने सुरू केलेल्या विकास कामांना निदान काही प्रमाणात योग्य आकार प्राप्त होत आहे. हे स्विकृत करणे शक्य नसले तरी सत्य हेच आहे की आपलं अस्तित्व आणि सर्वस्व देऊन आदिवासी स्त्रियांनी आज हे क्षेत्र जीवंत अवस्थेत ठेवले आहे. परिणामी त्यांनी खूप काही सहन केले आहे. समाजाकडून मिळणारे उपदेशाचे रसायन अमुक्ततेने सहन करावे लागते. त्या असाध्य रोगांना बळी पडतात किंवा कुमारीमाता म्हणून उपेक्षेचं आणि दारिद्रयाचा जिवन जगत आहेत. भारतातील ओडिसा, आसाम, केरळ, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र यासारख्या राज्यातील आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या विशेषत्वाने आढळून येते. भारतातील कुमारीमातांच्या समस्येचे स्वरूप खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

**ओडिसा** :– भारताच्या पूर्वकिनारपट्टीवर ओडिसा राज्य आहे. या राज्यात एकुण ३२ जिल्हे असून या विविध जिल्हयातून ६२ आदिवासी जमाती वास्तव्य करीत आहेत. कोरापुट, रायगडा, नौरंगपूर, बउध, मल्कानगिरी, कालाहांडी, नुआपाडा, फूलबनी,

क्योंझर, सुंदरगढ आणि मयुरगंज या जिल्हयात आदिवासींचं प्रमाण अत्याधिक आहे. संपूर्ण भारतातील एकूण आदिवासींपैकी २२ टक्के आदिवासी एकमेव ओडिसा राज्यातील आहेत. कंद आदिवासींच्या लोकसंख्येनंतर संथाल आदिवासींची संख्या आहे. त्याखेरीज जोआंग, भुआंग, साओरा, बोंड आणि बथुदी ह्या आदिवासी जमातीही या राज्यात आहेत.

ओडिसा राज्यातील कालाहांडी, कोरापूट, बोलांगीर, रायगडा, मल्कानगिरी, नुवापाडा, केंद्रपाडा, सोनपूर, सुंदरगड, फुलबनी आणि बारगड या जिल्हयात सुलक्ष्मी या अशासकीय संस्थेने २००४ ते २००६ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणानुसार उपरोक्त जिल्हयात आदिवासी कुमारीमातांची संख्या लक्षणिय आहे. या सर्वेक्षणानुसार ओडिसातील उपरोक्त जिल्हयात जवळपास ४० हजार कुमारीमाता आहेत.[४] ओडिसा राज्यातील सुलक्ष्मी संस्थेने कुमारीमातांसाठी विस्तृत कार्य केले आहे. कुमारीमातांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना आधार देण्याचे, व जिवनात त्यांना पुन्हा उभे करण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. या दुर्देवी कुमारीमातांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण व्हावा, यादृष्टीनं सुलक्ष्मी संस्थेने प्रयत्न केला आहे.

या कुमारीमातांसाठी काय करता येईल हे बघण्यासाठी सुलक्ष्मी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवर समाजाच्या प्रत्येक स्तरातील कुमारीमातांचे विचार समजून घेतले. लोकांमध्ये जागृती यावी, यासाठी त्यांचे प्रयत्न होते. समाधानाची बाब म्हणजे त्यांच्या या प्रयत्नाला लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कुमारीमातांना उत्पन्नाचं चांगलं साधन मिळवून देण्याची या संस्थेची इच्छा होती. याची सुरूवात त्यांनी कालाहांडी जिल्हयापासून केली. ‘द इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर द वेलफेयर ऑफ द ट्रायबन्स’ या स्वंयसेवी संस्थेसोबत सुलक्ष्मी संस्थेने कुटीरउद्योग सुरू करण्याचा आराखडा तयार केला. यातून किमान आठ ते दहा कुमारीमातांना उत्पन्नाचे स्थायी स्वरूपातील साधन मिळाले आहे.

सुलक्ष्मी संस्थेच्या सर्वेक्षण अहवालानुसार आज ओडिसात सुमारे ४०,००० कुमारीमाता आहेत. कधी बळजबरीनं, तर कधी त्यांना आमिषे देऊन, मोहात पाडून मुलींना मातृत्वाकरिता बाध्य केले आहे. विवाहाशिवाय लैंगिक संबंध स्थापित केल्यामुळे त्या आई वा माता झालेल्या आहेत. त्यापैकी काहींना समाजानं नावं ठेवली नाहीत किंवा वाईट चालीची आहे असे ही म्हटलं नाही, तरीही त्यांना जिवनात कमी व अधिक प्रमाणात त्रास सहन करावा लागला. समाजाकडून त्यांना सहानुभूती मिळाली नाही, त्यांच्या मुलांना संरक्षण मिळालं नाही की मदतीला वा आधार द्यायला कुणीही आलं नाही. परंतु वाटयाला आली फक्त उपेक्षा आणि एकटेपणा. मग ती माता ओडिसातील समुद्र किनाऱ्यालगतच्या भागातली असो की कालाहांडीच्या डोंगराळ भागातली; जगण्याचा संघर्ष त्यांच्या पाचवीला पुजलेला असल्याचे आढळते.

**झारखंड राज्य** :— २०११ च्या जनगणनेनुसार झारखंड राज्याची एकूण लोकसंख्या ३२, ९८८,१३४ असून त्यात पुरूषांची संख्या १६,९३०,३१५ तर स्त्रियांची संख्या १६,०५७,८१९ आहे. झारखंड मध्ये १००० पुरूषांच्या मागे स्त्रियांचे प्रमाण ९४८ असून साक्षरतेचा दर ६६.४० टक्के आहे.[५]

झारखंड राज्यात आदिवासींची एकूण लोकसंख्या ८६,४५,०२२ असून त्यात ७८,६८,१५० आदिवासी लोकसंख्या ग्रामीण भागात तर ७,७६,८९२ लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करते.[६] झारखंड राज्यात प्रामुख्याने बीरहोर, कोरवा, हील खरीया, सौउरीया पहारीया, महाली, लोहरा, करमाली, संथाल, मुंडा, ओरॉवं, हो, भूमीज इत्यादी ३२ प्रकारच्या आदिवासी जमाती वास्तव्य करीत आहेत.

मिरॅकल इंडीया, दिल्ली येथील अशासकीय संस्थेच्या संशोधन अहवालानूसार झारखंड राज्यात जवळपास ३० हजार कुमारीमाता असून त्यामध्ये आदिवासींचे प्रमाण सर्वाधिक आहे.[७] या राज्यातील आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण अधिक प्रमाणात केले जात असून त्यांना देहव्यापारासाठी परराज्यातही अधिक प्रमाणात पाठविले जाते. राज्यातील ३० हजार कुमारीमातासाठी आश्रयगृह बनविण्याचे कार्य झारखंड सरकारने हाती घेतले आहे. यावरून या राज्यातही आदिवासी कुमारीमातांची समस्या मोठया प्रमाणात असल्याचे दिसते.

**केरळ राज्य** :— २०११ च्या भारतीय जनगणनेप्रमाणे केरळ ची एकूण लोकसंख्या ३३,४०६,०६१ असून त्यात १६,०२७,४१२ पुरूष तर १७,३७८,६४९ स्त्रिया आहेत.[८] केरळ राज्यात एकूण १४ जिल्हे असून वायनाड या जिल्हयात आदिवासींची संख्या लक्षणिय आहे. केरळ राज्यात एकूण आदिवासींची लोकसंख्या ४ लाख ८४ हजार ८३९ आहे. त्यात ४ लाख ३३ हजार ०९२ आदिवासीं ग्रामीण भागात तर फक्त ५१ हजार ७४७ आदिवासी नागरी भागात वास्तव्य करतात. राज्यातील एकूण आदिवासी लोकसंख्येत २ लाख ३८ हजार २०३ लोकसंख्या आदिवासी पुरूषांची तर २ लाख ४६ हजार ६३६ आदिवासी स्त्रियांची लोकसंख्या आहे.[९]

केरळ राज्यातील वायनाड जिल्हयातील एकटया ‘तिरूनेल्ली’ येथे शेकडो आदिवासी कुमारीमाता आहेत. शासकीय आकडेवारीनुसार केरळमध्ये फक्त ३४२ कुमारीमाता आहेत.[१०] तथापि अशासकीय संस्थाच्या सर्वेक्षणानुसार वायनाड आणि पलक्कड या जिल्हयात ४०० पेक्षा जास्त आदिवासी कुमारीमाता आहेत.[११] केरळ मधील या सर्व कुमारीमाता लैंगिक शोषणाच्या बळी आहेत. यातील काही तर अगदी ११ वर्ष वयाच्या आहेत. या कुमारीमातांचे समाजातील धनदांडग्यांनी, व्यापारी, सावकार, ठेकेदार, अधिकारी यांनी लैंगिक शोषण करून, त्यांना विवाहाचे किंवा प्रेमाचे आमीष देवून त्यांचे लैंगिक शोषण केले व त्यांना कुमारीमाता होण्यास भाग पाडले आहे. Jos Chathukulam, M. Gopinath Reddy, Palla Trinadha Rao यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार एकटया वायनाड जिल्हयात जवळपास ५०० च्या वर कुमारीमाता असून त्यांच्या संदर्भात गरीबी, दारिद्रय, वेश्यावृत्ती, कर्जबाजारीपणा इत्यादी समस्या निर्माण झालेल्या आहेत.[१२]

**मध्यप्रदेश** :— मध्यप्रदेशात आदिवासींची लोकसंख्या लक्षणिय आहे. २००१ च्या जनगणनेप्रमाणे जवळपास १.२२ करोड आदिवासींची लोकसंख्या होती. २०११ मध्ये ती १ करोड ५३ लाख १६ हजार ७८४ झाली आहे.[१३] या राज्यात गोंड, भील्ल, कोरकू,

बैगा, सहरिया, कोल, भारिया इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती वास्तव्य करीत आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार मध्यप्रदेशात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या भिल्ल जमातीची आहे. त्या पेक्षा कमी गोंड, कोल, कोरकू, सहारिया व बैगा या जमातीची आहे. मध्यप्रदेशातील झाबुआ, धार, बारवाणी, खरगोन, दिंडोरी, छिंदवाडा, मंडला, बैतुल, सिवनी व शहडोल या जिल्हयात आदिवासींची संख्या अधिक आहे.

मध्यप्रदेशातील भिल्ल, गोंड, कोरकू व सहारिया या जमातीत काही कुमारीमाता आढळून येतात. शासकीय स्तरावर या कुमारीमातांची कोणतीही नोंद नाही. त्यामूळे त्यांचा निश्चित आकडा देता येणार नाही. तथापि काही स्वंयसेवी संस्थाच्या सर्वेक्षणानुसार मध्यप्रदेशातील आदिवासी समाजात कुमारीमातांची संख्या जवळपास ४०० ते ५०० इतकी आहे.[१४]

**छत्तीसगड राज्य** :— २०११ च्या जनगणनेनुसार छत्तीसगड राज्याची एकूण लोकसंख्या २,५५,४५,१९८ असून त्यात पुरूषांची १,२८,३२,८९५ तर स्त्रियांची संख्या १,२७,१२,३०३ आहे. तर या राज्यात आदिवासींची एकूण लोकसंख्या ७८,२२,९०२ आहे. यातील ७२,३१,०८२ आदिवासी लोकसंख्या ग्रामीण भागात तर फक्त ५,९१,८२० आदिवासी लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करीत आहे.

छत्तीसगढ राज्यातील आदिवासी जमाती आपल्या विशिष्ट जीवनशैली परंपरागत संस्कृतीमूळे भारतातील इतर आदिवासीपेक्षा वेगळयाप्रकारे ओळखल्या जातात. या राज्यात आदिवासींच्या एकूण ४२ जमाती आहेत. तथापि प्रमुख जमाती म्हणून गोंड, कंवर, बिंझवार, भैना, भतरा, उरांव, मुंडा, कमार, हलबा, बैगा, भरिया, नगेशिया, मंझवार, खारिया आणि धनवार इ. जमातीचा उल्लेख केला जातो. या राज्यात आदिवासी समाजातील अत्यंत मागास जमाती म्हणून अबूझमाडिया, कमार, पहाडी कोरबा, बैगा व बिरहोर या जमाती असून या जमातींच्या विकासासाठी छत्तीसगड शासनाचे विशेष प्रयत्न सुरू आहेत.[१५]

पूणे येथे मार्च २०१४ मध्ये जवळपास ४५०० विद्यार्थ्यांनी यवतमाळ जिल्हयातील आदिवासी कुमारीमातांना न्याय मिळावा यासाठी एक मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनात या विद्यार्थ्यांनी यवतमाळ जिल्हयातील कुमारीमाता प्रमाणेच मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, झारखंड या राज्यातही आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या मोठया प्रमाणात असल्याचे सांगीतले. छत्तीसगड मधील आदिवासी समाजातील मुलींनाही ठेकेदार, सावकार, अधिकारी यांनी विविध आमीषे देऊन त्यांचे लैंगिक शोषण करून त्यांना कुमारीमाता बनविले असल्याचे या विद्यार्थ्यांनी माध्यमासमोर सांगीतले. याचाच अर्थ छत्तीसगड राज्यातही आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या आहे.[१६]

**महाराष्ट्र** :— महाराष्ट्रात गोंड, वारली, कातकरी, कोलाम, बंजारा, महादेव कोळी, भिल्ल, ठाकूर, परधान, हलबा, हलबी इत्यादी आदिवासी जमाती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या १ करोड ०५ लाख १० हजार २१३ आहे. या एकूण लोकसंख्येपैकी ९० लाख ०६ हजार ०७७ आदिवासी लोकसंख्या ग्रामीण भागात तर १५ लाख ०४ हजार १३६ आदिवासी लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करीत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत ९.४ टक्के आहे.[१७]

महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, गडचिरोली, यवतमाळ या जिल्हयातील आदिवासी समाजात कुमारीमातांचे अधिक प्रमाण आहे. अलीकडच्या काळात यवतमाळ जिल्हयातील झरीजामणी या तालुक्यातील ४०० कुमारीमातांचा प्रश्न विविध माध्यमांतून फार मोठया प्रमाणात चर्चेत होता. या चर्चामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील आदिवासी समाजातील कुमारीमातांचा शोध घेण्यासाठी कार्यवाही सुरू केलेली आहे.[१८]

निरक्षरता आणि गरिबीच्या फेऱ्यात अडकलेल्या आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण करून, त्यांना कुमारीमाता करून पळ काढणाऱ्या परप्रांतीय ठेकेदारांविरोधात आता महाराष्ट्र शासनाने कडक भूमिका घेतली आहे. राज्यातील कुमारीमाता प्रकरणांच्या वाढत्या संख्येमुळे प्रकाशझोतात आलेल्या यवतमाळ जिल्हयाप्रमाणेच ठाणे, नाशिक, नंदुरबार आणि धुळे या आदिवासींची अधिक लोकसंख्या असलेल्या जिल्हयातही आता कुमारीमातांचा शोध घेण्यात येत आहे. परराज्य व जिल्हयातून आवागमन करणाऱ्या ठेकेदारांची ग्रामपंचायतीत नोंदणी करणे, अत्याचाराचा आरोप असलेल्यांची डीएनए चाचणी करणे, अशा उपाययोजना राज्य सरकारने निश्चित केलेल्या आहेत.

आदिवासी समाजात कंत्राटाची कामे मिळालेले ठेकेदार गावात येतात, आदिवासी मुलींना लग्नाचे, पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याशी शारीरिक स्थापित करतात व त्यांची गावातील कामे पूर्ण झाली की ते परस्पर निघून जातात. त्यातून महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हयात आदिवासी समाजात कुमारीमाताची सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. याबाबत लोकसत्ता, लोकमत, सकाळ, दिव्य मराठी इत्यादी वर्तमानपत्रांनी सतत लेखन करून या प्रश्नाकडे शासनाचे व सर्वसामान्याचे व स्वयंसेवी संस्थाचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. तसेच शिवसेनेच्या आमदार डॉ. नीलम गो—हे यांनीही विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री विष्णू सावरा यांनी या विषयावर स्वतंत्र बैठक घेऊन आदिवासी मुलींचे शोषण थांबविण्यासाठी आणि सध्याच्या कुमारीमातांचे पुनर्वसन कसे करायचे, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कसा सोडवायचा, इत्यादी विषयावर चर्चा करून, या समस्येच्या निराकरणासाठी तातडीच्या उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मान्य केले होते.

यवतमाळ जिल्हयातील कुमारीमातांच्या समस्येप्रमाणेच ठाणे, नाशिक, नंदुरबार, धुळे या जिल्हयातूनही कुमारीमातांच्या तक्रारी येत आहेत. त्यामूळे या जिल्हयातील आदिवासी कुमारीमातांचा शोध घेण्यासाठी पुण्याच्या गोखले इंन्सिटटयूट ऑफ पॉलिटिक्स अॅड इकॉनॉमिक्स या संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याचे मान्य केले होते. परंतु या संदर्भात आजपर्यंत पाहिजे त्या प्रमाणात प्रगती झालेली नाही. थोडक्यात महाराष्ट्र राज्यातील धुळे, नंदुरबार, नाशिक, ठाणे,

यवतमाळ या जिल्हयात आदिवासी समाजातील कुमारीमातांची समस्या आजही आढळून येते. इतर जिल्हयाच्या तुलनेत यवतमाळ जिल्हयातील आदिवासी समाजात ही समस्या प्रकर्षाने आढळून येत आहे.

**समारोप** :– आधुनिककाळात विकासाची प्रक्रिया अतिशय गतीमान आहे. नवनवे कायदे, सामाजिक न्याय, सामाजिक कल्याण, सत्तेचे विकेंद्रिकरण, राजकीय क्षेत्रात आदिवासींसाठी असलेले आरक्षण, शिक्षण इत्यादी गोष्टींमूळे आज आदिवासींचा विकास होऊन त्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय सहभाग वाढत आहे. आदिवासी समाजातील लोक आज समाजकारण, अर्थकारण व राजकारणात सक्रीय सहभागी होत आहेत. अनेक आदिवासी आज उच्च पदावर अधिकारी, कर्मचारी व कारकून म्हणून कार्यरत आहेत, अनेक आदिवासी आज आमदार, खासदार झाले आहेत. काही आदिवासी तर मोठमोठया राजकीय पक्षात उच्च पदावर आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून आदिवासी पुरूषच नाही तर स्त्रियांसुद्धा सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य असे विविध पदे भूषवित आहेत.

राजकीय व शैक्षणिक आरक्षणाने आदिवासी समाजातील काही स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा झाली असल्याचे आढळते. परंतु या समाजातील जवळपास ९० टक्के स्त्रियांची स्थिती आजही अतिशय दयनीय वा दारिद्रयजन्य संस्कृतिशी संवाद करीत आहे. आदिवासी समाजात स्त्री–पुरूष समानता आहे असे केवळ म्हटले जाते. वास्तविकत: या समाजातही स्त्रियांना अत्यंत कनिष्ठ दर्जाची वागणूक दिली जाते. तिला सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक हक्कापासून वंचित ठेवले जाते. तिचे सामाजिक, आर्थिक व शारीरिक शोषण केले जाते. आदिवासी समाजात क्रिया व व्यवहारातील व्यापारी, सावकार, अधिकारी, कर्मचारी आदिवासी स्त्रियांना पैशाचे, प्रेमाचे, चांगल्या आयुष्याचे आमिष दाखवून त्यांचे लैंगिक शोषण करीत आहेत. या लैंगिक शोषणातून ती गर्भवती झाली की 'तो मी नव्हेच' अशी भूमिका घेतली जाते किंवा पलायन केले जाते. परंतु लैंगिक शोषणाला बळी पडलेली आदिवासी स्त्री जिथे आहे ती तिथेच असल्याचे आढळते. समाज तिची हेटाळणी व अवहेलना करतो, ती अनैतिक आहे, वेश्या आहे, अशाप्रकारची दुषणे लावतो. परंतू अशाही परिस्थितीत ही आदिवासी कुमारीमाता जीवन जगते आहे. अशा शेकडो आदिवासी कुमारीमाता भारतातील सर्वच आदिवासी समजात आढळून येतात. भारतातील आदिवासी समाजातील कुमारीमातांचे सखोल अध्ययन होणे आवश्यक आहे. आदिवासी समाजातील कुमारीमातांच्या समस्येचे स्वरूप काय आहे? या कुमारीमातांची वास्तविक सद्यस्थिती काय आहे? या कुमारीमातांच्या पूर्नवसनासाठी शासकीय व गैरशासकीय संस्था काय करीत आहेत? इत्यादी सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सामाजिक विचारवंत, अभ्यासक व संशोधकांनी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ** :–


1. *शर्मा सुनिता, अमरेंद्र किशोर, (२०१२) 'कुमारीमाता', अनुवाद – प्रतिमा डिके, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१२.*
2. *भेले लिला, (२००८–०९) 'झरी–जामणी येथील आदिवासी कुमारीमातांचे सर्वेक्षण', पांढरकवडा, फुले आंबेडकर महिला प्रबोधिनी.*
3. *Sulaxmi Lok Sansthan, Sector - 27, Noida, Uttar-Pradesh, India.*
4. *The State of Unwed Mothers of Orissa: Possibilities of Their Rehabilitation and Prevention to Mar This Malpractice, Research Project of Sulaxmi, Orissa, 2004-2006.*
5. *http://www.jharkhand.gov.in/web/guest/facts&figures*
6. *[1]http://timesofindia.indiatimes.com/city/ranchi/Marginal-fall-in-tribal-population-in-Jharkhand/articleshow/20374392.cms*
7. *Unwed mothers, pregnant women may soon get shelter, RANCHI Updated: Jul 29, 2015 22:45 IST, Saurav Roy, Hindustan Times*
8. *www.anthroposindiafoundation.com/Attachement/DemographicSCTribePopulation*
9. *www.anthroposindiafoundation.com/Attachement/DemographicSCTribePopulation*
10. *The Rediff Special, Venu Menon, Unwed Mothers may spark tribal rebellion in Kerala.*
11. *Radhakrishnan M. G., (1998) 'On The Road to Justice', Backed by the Women's Commission, Wayanad's unwed tribal mothers may finally get their due, March 30.*
12. *Chathukulam Jos, Reddy M. Gopinath, Rao Palla Trinadha, (2012), 'An Assessment and Analysis of Tribal Sub-Plan (TSP) in Kerala', Research Unit for Livelihoods and Natural Resources, (Supported by Jamsetji Tata Trust), Hyderabad, Centre for Economic and Social Studies.*
13. *http://www.census2011.co.in/scheduled-tribes.php*
14. *Ansari Mubarak, (2014), 'Look in to Unwed Tribal Mothers Issue', Pune Mirror | Dec 25, 2014, 02.30 AM IST,http://punemirror.indiatimes.com/pune/civic/articleshow/45634174 .cms? (News Paper Article)*
15. *http://www.chhattisgarhexams.in/2016/11/Tribes-of-Chhattisgarh-Art-culture.html*
16. *http://punemirror.indiatimes.com/pune/civic//articleshow/45634174.cms? 'look in to Unwed Tribal Mothers Issue, By Mubarak Ansari, Pune Mirror | Dec 25, 2014, 02.30 AM IST (News Paper Article)*
17. *Census of India, (2011).*
18. *https://bkshinde.blogspot.in/2014/12/blog-post_41.html*

# आदिवासींचा सामाजिक दर्जा

**प्रा. डॉ. सरोज आगलावे,** सहयोगी प्राध्यापक, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर

भारतातील बहुतांश आदिवासी हे दूर जंगलात वास्तव्य करतात. ते दुर्गम भागात राहत असल्यामुळे इतर लोकांशी विशेष संबंध येत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर देखील आदिवासी भागात पक्के रस्ते, पोष्ट, टेलिफोन आणि इतर दळणवळणाच्या सोयी नाहीत. आदिवासींच्या विविध समस्या आहेत. तसेच ह्या सर्व समस्या अतिशय गुंतागुंतीच्या आहेत. म्हणून आदिवासींच्या समस्या या कोणत्या पद्धतीने सोडविता येतील, याबात समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांनी वेगवेगळी मते मांडली.

सभ्य समाजाशी संपर्क आल्यामुळे आदिवासींच्या पारंपारिक जीवनावर आघात झाला. अधिकारी, सावकार, व्यापारी या लोकांचा आदिवासींशी संबंध वाढला, या सर्वांनी आदिवासींचे शोषण केले. त्यातून आदिवासींच्या अनेक समस्या निर्माण झाल्यात. ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांना समाजापासून पृथक ठेवले पाहिजे असे मत डॉ. व्हेरियर इल्विन यांनी १९४२ मध्ये प्रकाशित केलेल्या 'Los of Nerye" या ग्रंथात मांडले. त्यांनी पुढे असे विचार मांडलेत की, 'आदिवासींचा इतरांशी येणारा सर्व प्रकारचा संपर्क बंद करून त्यांच्या संस्कृतीचे जतन केले पाहिजे.' आदिवासींकरिता स्वतंत्र विभाग स्थापन करावेत. या विभागात इतरांनी ढवळाढवळ करता कामा नये. यालाच डॉ. इल्विन यांनी 'राष्ट्रीय उद्यान' (National Park) असे म्हटले आहे. या राष्ट्रीय उद्यानात गोंड, बैगा इत्यादी असंख्य आदिवासी आपले जीवन मुक्तपणे आणि निर्भयपणे जगू शकतील. काही वर्षांनतर डॉ. इल्विन यांनी आपल्या विचारात बदल करून एकतेच्या मार्गानेच आदिवासींचा विकास होऊ शकते असे प्रतिपादन केले.

आदिवासींना प्रगत समाजापासून पृथक न ठेवता त्यांचे भारतीय समाजाशी जाणीवपूर्वक विलीनीकरण घडवून आणावे. आदिवासी समाज भारतीय समाजाशी एकरूप झाल्यास त्यांच्या परंपरागत समस्या सुटतील. असे विचार समाजशास्त्रज्ञ डॉ. जी. एस. धुर्ये यांनी मांडलेत. आदिवासींना इतर समाजापासून पृथक ठेवणे किंवा त्यांचे संपूर्ण संम्मिलीकरण किंवा सात्मिकरण करणे हे दोनही मार्ग परस्पर टोकाचे आहेत. पृथकतेमुळे आदिवासी समाजाच्या संस्कृतीचे जतन होईल. परंतु त्याचबरोबर ते राष्ट्रीय प्रवाहापासून दूर फेकले जातील तर सात्मीकरणामुळे आदिवासी भारतीय समाजापासून अलिप्त राहणार नाहीत किंवा एकत्रीकरणाचा मार्ग सुचविला. भारतीय जीवनाशी आदिवासींचे अभिन्नत्व साधतांना त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्याच्या संदर्भात पुढील पाच तत्वांचा स्वीकार केला.

१. आदिवासींचा विकास त्यांच्या जीवनपद्धतीप्रमाणे करणे तसेच त्यांच्या कला आणि संस्कृतीस प्रोत्साहन देणे. २. आदिवासी लोकांच्या भूमी आणि वनविषयक अधिकारांचा आदर करणे. ३. आदिवासी लोकांमध्ये नेतृत्व विकसित करून त्यांच्या माध्यमातून विकासास गती देणे. ४. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमातून विकास साध्य करणे. ५. योजनांचे मूल्यांकन करतांना परिणामांऐवजी परिमाणात्मक घटक लक्षात घेणे.

अशाप्रकारे एकतावादी दृष्टीकोनातून उपाययोजना केल्यास आदिवासींचा विकास होईल. तसेच त्यांची संस्कृती, कला आणि परंपरेचे जतन होऊन ते राष्ट्रीय प्रवाहात सामील होतील. डॉ. हट्टनच्या मते, 'आदिवासींचा विकास संरक्षणाच्या छायेतच होणार. संरक्षण दिले तरच ते आपल्या पायावर उभे राहतील. स्वयंशासन करू शकतील आणि भारतीय जीवन संपन्न करण्यासाठी आपल्या बुद्धी आणि शक्तीनुसार हातभार लावतील.' भारतातील आदिवासींचा विकास करण्याच्या दृष्टीने एकतावादी मार्ग हाच अधिक संयुक्तिक आहे. भारतीय संविधानाने याच मार्गाने स्वीकार करून आदिवासींचा विकास करण्याची जबाबदारी शासनावर टाकली आहे.

**आदिवासींची लोकसंख्या:–** २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१ कोटी ५ लाख, ६९ हजार ५७३ होती. त्यापैकी १० कोटी ४५ लाख ४५ हजार ६१६ इतकी लोकसंख्या ही आदिवासींची आहे. भारतीय लोकसंख्येपैकी ८.६ टक्के लोक हे आदिवासी आहेत. १९९१ च्या जनगणनेनुसार ५ कोटी १५ लाख २९ हजार १६२ इतकी लोकसंख्या आदिवासींचीच होती. १९९१ ते २००१ या दशकात ०.४४ टक्के इतकी वाढ आदिवासी लोकसंख्येत झाली. २००१ च्या जनगणनेनुसार केंद्रशासीत लक्षद्विप प्रदेशात एकूण लोकसंख्येच्या ९४.९१ टक्के, मिझोराम ९४.४६ टक्के, नागालॅंड ८९.१५ टक्के आणि मेघालय मध्ये ८५.९४ टक्के आदिवासी आहेत. अरूणाचल प्रदेश दादरा आणि हवेली, मणिपूर, छत्तीसगड, झारखंड, ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र राज्यात आदिवासींची लोकसंख्या बरीच मोठी आहे.

२०११ मध्ये महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ इतकी होती. त्यापैकी १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी लोकसंख्या ही आदिवासी होती. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.४ टक्के लोक हे आदिवासी आहेत. महाराष्ट्रात गोंड, वारली, कोलाम, कोरकू इत्यादी प्रमुख आदिवासी आहेत. विदर्भात गोंड–माडिया, कोलाम आणि कोरकू या तीन प्रमुख आदिवासी जमाती आहेत. विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर आणि भंडारा या जिल्ह्यात गोंड–माडिया तर अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात कोरकू आणि यवतमाळ व वर्धा जिल्ह्यात कोलाम आदिवासी आहेत. तर यवतमाळ जिल्ह्यात बंजारा या भटक्या जमातीचे लोक मोठ्या प्रमाणात आहेत.

भारतीय राज्यघटनेत आदिवासींसाठी 'अनुसुचित जमाती' असा शब्दप्रयोग करण्यात आला. १९५० पासून २५० आदिवासी जमाती ज्या १०० किंवा त्यापेक्षा जास्त भाषा किंवा बोलीभाषा बोलतात त्यांना अनुसुचित जमाती म्हणून संबोधण्यात आले. भारतीय

राज्यघटनेच्या कलम ४६ नुसार अनुसुचित जाती–जमातींना सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण आणि सामाजिक न्याय देण्याची तरतूद करण्यात आली आहे. आदिवासींच्या विकासाकरिता केंद्र सरकार आणि राज्य शासनाने विविध योजना सुरू केल्या असल्या तरी या योजनांची योग्य अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे आज देखील त्यांचा विशेष सामाजिक आणि आर्थिक विकास झालेला आढळून येत नाही.

**विकासाची संकल्पना :–** विकासाची संकल्पना व्यापक आहे. विकासाचा संबंध केवळ आर्थिक घटकांशी निगडीत नसून तो सामाजिक घटकांशी सुद्धा संबंधित आहे. आदिवासी समाज हा एक अतिशय साधा समाज आहे. आपल्या जमातीच्या रूढी, परंपरेनुसार आदिवासी लोक जीवन जगतात. ते केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक विकासापासून खुप दूर आहेत. सामाजिक विकासाची संकल्पना स्पष्ट करतांना व्ही. एस. डीसूजा म्हणतात की, ‘सामाजिक विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामुळे संबंधित साधा समाज एका विकसित समाजाच्या रूपात परिवर्तित होतो.’ (Social development is the process by which a relatively simple society is transferred into a relatively advanced one[1]) कोणत्याही समाजाचा केवळ सामाजिक विकास होऊन चालत नाही तर आर्थिक विकास सुद्धा महत्वाचा असतो. म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने विकासाची व्यापक व्याख्या दिली आहे. संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या अहवालात नमूद केले की, ‘विकास हा केवळ मानवाच्या भौतिक आवश्यकतांशीच नव्हे तर त्याच्या जीवनाच्या सामाजिक परिस्थितीतील सुधारणांशी सुद्धा संबंधित असतो. म्हणून विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी नाही तर त्यात मानवाच्या सामाजिक, सांस्कृतिक, संस्थागत आणि परिवर्तनांचा सुद्धा समावेश होतो.’ (Development concerns not only Man’s material needs but also the improvement of the social conditions of his life. Development, is, therefore, not only economic growth, but growth plus change i.e. social, cultural and institutional as well as economic.[2]) पी. ए. सैमुल्सन यांनी लिहिले की, ‘सामाजिक परिवर्तन जे सामाजिक विकासाशी संबंधित आहे ते आर्थिक वृद्धीशी देखील घनिष्ट रूपात संलग्न आहे.’ (Social change is closely related to economic growth.[3]) यावरून हे स्पष्ट होते की, आर्थिक आणि सामाजिक या दोन्ही घटकांशी विकासाची संकल्पना संबंधित आहे. हे दोन्ही घटक परस्पर संबंधित आणि एक–दुसऱ्यांवर परिणाम करणारे आहेत. म्हणून कोणत्याही समाजाच्या विकासांबाबत अभ्यास करतांना, या दोनही घटकांचा विचार करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय कोणत्याही समाजाच्या विकासाचा स्पष्टपणे बोध होणार नाही.

कोणत्याही समाजाचा विकास झाला किंवा नाही, हे स्पष्ट करण्यासाठी त्यांचा सामाजिक दर्जा लक्षात घेणे आवश्यक आहे. सामाजिक दर्जा उंचावणे हे विकासाचे निर्देशक आहे. म्हणून विदर्भातील आदिवासींच्या विकासाबात चर्चा करतांना त्यांचा सामाजिक दर्जा स्पष्ट करणे आवश्यक आहे. समाजिक आणि आर्थिक दर्जावरून आदिवासीचा विकास झाला किंवा नाही याबाबत स्पष्टपणे निष्कर्ष मांडता येतील. विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील गोंड–माडिया या आदिवासींचे अध्ययन करण्यासाठी मे २००५ मध्ये पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांसोबत मी स्वत: गेले होते. भामरागड येथे तीन दिवस मुक्काम होता. यवतमाळ जिल्ह्यातील ‘कोलाम’ लोकांचे ऑगस्ट २००५ मध्ये अध्ययन केले तर एम. ए. च्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील ‘कोरकू’ चे काही वर्षापूर्वी सर्वेक्षण केले होते. त्या आधारावर विदर्भातील आदिवासीचा सामाजिक दर्जा स्पष्ट केला आहे.

**आदिवासींचा सामाजिक दर्जा :–** लोकांचा सामाजिक दर्जा हा श्रेष्ठ असेल तर त्या समाजाचा विकास झाला असा निष्कर्ष काढता येतो. कारण लोकांचा सामाजिक दर्जा उंचावणे हा विकासाचा निर्देशांक आहे. तर सामाजिक दर्जा निम्न असणे हे त्या समाजाच्या मागासलेपणाचे लक्षण समजले जाते. म्हणून त्या समाजाचा सामाजिक दर्जा हा काही विशिष्ट घटकांच्या आधारावर निश्चित केला आहे.

**१. रूढी आणि परंपरांचा प्रभाव :–** विदर्भातील गोंड, कोरकू आणि कोलाम या तिन्ही आदिवासी जमातीमध्ये रूढी आणि परंपरांचा विशेष प्रभाव आहे. सर्वच समाजामध्ये रूढी आणि परंपरा असतात. परंतु जसजसा समाजाचा विकास होतो त्यानुसार रूढी आणि परंपरांमध्ये काळानुसार परिवर्तन घडून येते. परंतु या तिन्ही आदिवासी जमातीमध्ये अनेक कालबाह्य रूढी आणि परंपरा आहेत. त्या रूढी आणि परंपरांचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव आहे की, ते त्यामध्ये परिवर्तन करावयास तयार नाहीत.

**२. बालविवाह** :– गोंड, कोलाम आणि कोरकू या तिन्ही आदिवासी जमातीमध्ये बालविवाहाची पद्धत रूढ आहे. बालविवाहाचा अनिष्ट परिणाम त्यांच्यावर होतो. अल्पवयीन मातृत्व, बाळंतपणामुळे स्त्रियांचा मृत्यू, बालमृत्यू दर अधिक असणे इत्यादी विविध समस्या बालविवाहामुळे निर्माण झाल्या आहेत.

**३. कुपोषण** :– विदर्भातील गोंड–माडिया, कोलाम आणि कोरकू या तिन्ही आदिवासी जगातील कुपोषणाची समस्या आढळून येते. शरीराच्या पोषणासाठी सकस आहाराची आवश्यकता असते. परंतु दारिद्रामुळे त्यांना पुरेसा सकस आहार मिळत नाही. जागतिक बँकेने प्रकाशित केलेल्या २००५ ‘World Development Indicators’ या अहवालात कुपोषण हे दारिद्र्याचे सामाजिक निर्देशक असल्याचे नमूद केले आहे.[४]

**४. बालमृत्यू दर अधिक असणे :–** जागतिक बँकेने बालमृत्यू दर अधिक असणे हे देखील दारिद्र्याचे सामाजिक निर्देशक मानले आहे. कोरकू, गोंड–माडिया आणि कोलाम या आदिवासी जमातीमध्ये बालमृत्यू दर अधिक आहे. या तीन आदिवासी जमातींपैकी मेळघाट परिसरातील कोरकूमध्ये बालमृत्यू दर अधिक आहे. जून, जुलै ऑगस्ट आणि सप्टेंबर या महिन्यात शेकडो बालकांचा मृत्यू होतो. कोरकू मधील बालमृत्यूची महाराष्ट्र सरकारला दखल घ्यावी लागली त्याकरिता महाराष्ट्र सरकारने काही उपाययोजना केल्यात. परंतु अजूनही त्यांच्यातील बालमृत्यूचे प्रमाण

कमी झाले नाही. डॉ. अभय बंग यांच्या समितीने विदर्भातील बालमृत्यूच्या संदर्भात महाराष्ट्र सरकारला अहवाल सादर केला.

५. **वस्त्रांचा अभाव** :— गोंड—माडिया, कोलाम आणि कोरकू यांना पुरेसे वस्त्र नाहीत. त्यांच्या जवळ एकापेक्षा जास्त कपडे नाहीत. एकच कपडा सतत वापरत असल्यामुळे कपडा स्वच्छ करण्याचा प्रश्न निर्माण होतो. तेच ते कपडे सतत वापरल्यामुळे चर्मरोग होतो. पावसाळ्यात कपडे ओले झाल्यानंतर ते कपडे तसेच अंगावर ठेवतात त्यामुळे ताप, निमोनिया, सर्दी होण्याची शक्यता अधिक असते. गडचिरोली जिल्ह्यातील बडा, माडिया आदिवासी स्त्री—पुरूष केवळ कमरेला फडके बांधतात. कमरेच्या वरच्या भागावर कपडे नसतात. स्त्रियांचा वक्षभाग हा उघडाच असतो. माडिया लोक कमरेच्या वरच्या भागावर कपडे घालत नाहीत. हळूहळू त्यांचा इतर लोकांशी संपर्क आल्यामुळे स्त्रिया वक्षभाग झाकण्यासाठी एखादा मळकट कपडा वापरतात.

६. **साक्षरतेचा अभाव** :— विदर्भातील आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. आदिवासी भागात शिक्षणाची कोणतीही सोय नाही. भामरागडपासून ४०—५० किमी अंतरावरील बिनीगुंडा या गावात शाळा आहे परंतु त्या शाळेत शिक्षक नियमित येत नाही आले तरी ते मुलांना चांगले शिकवत नाही. असे तेथील उसेडा या आदिवासीने सांगितले.

७. **स्वास्थ सेवांचा अभाव** :— आदिवासी भागात स्वास्थ्य सेवेचा अभाव आढळतो. आदिवासी राहत असलेल्या दुर्गम भागापर्यंत स्वास्थ्य सेवा पोहोचविल्या जात नाही. डॉक्टर, नर्सेस आणि स्वास्थ्य कर्मचारी या दुर्गम भागात जाण्याचे टाळतात. आजारी पडल्यास शासन किंवा मांत्रिकाकडे जाऊन उपचार करतात. भामरागड येथे डॉ. प्रकाश आमटे यांचा मोठा दवाखाना आहे. हळूहळू गोंड, माडिया लोकांना डॉक्टरांचे महत्व कळू लागले आहे.

परंपरागत स्थलांतरीत शेती बेरोजगारी इत्यादीमुळे विदर्भातील आदिवासींची आर्थिक परिस्थिती विशेष हलाखीची आहे. त्यांचे वास्तविक उत्पन्न कमी आहे. त्यांना संपूर्ण आयुष्य दारिद्र्यात घालवावे लागते. ते आपल्या आवश्यक गरजांची पूर्ती करू शकत नाही. त्यामुळे त्यांचा आर्थिक दर्जा अत्यंत निम्न आहे. दारिद्र्यामुळे गोड, माडिया, आदिवासी जमातीमधील तरूण मुले—मुली नक्षलवादी चळवळीत सहभागी झाले आहेत.

अशाप्रकारे विदर्भातील आदिवासींचा सामाजिक दर्जाच्या निष्कर्षाचे अध्ययन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, त्यांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा अतिशय खालावलेला आहे. त्यांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा निम्न असणे म्हणजेच अजूनही त्यांचा विकास झालेला नाही. ते सामाजिक, आर्थिक विकासापासून खूप दूर आहेत.

त्यांचा सामाजिक दर्जा निम्न असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांचे वास्तव्य दुर्गम भागात असणे हे होय. म्हणून या दुर्गम भागात जाण्यासाठी रस्ते, सडका तयार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आदिवासी क्षेत्रातच त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. आदिवासींमध्ये शिक्षणचा प्रसार करण्यासाठी निवासी शाळा सुरू करणे अनिवार्य आहे. यवतमाळ जिल्ह्यातील कोलामांमध्ये शिक्षणाचा प्रसार होत आहे. कारण तिथे आदिवासींच्या मुलांसाठी शासकीय निवासी शाळा आहेत. आदिवासी मुलांना शिक्षण देण्यासाठी शासनाने आश्रम शाळा काढल्या आहेत. परंतु या आश्रम शाळा संस्थाचालकांचे कमाईचे माध्यम बनले आहे. या आश्रम शाळा बंद करून शासकीय निवासी शाळा सुरू कराव्यात.

**संदर्भ**:—


1. *Dsouza, V. S. - Social Development, Education and Unemployment in India, p.237.*
2. *United Nations Organization (UNO) Report.*
3. *Samuelson P. A. – Economics an Introductory Analysis p.6.*
4. *2005 World Development Indicators – The World Bank, Washington, USA, 2005 p.70.*

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE & SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

**TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.**

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in Journal Website: www.journalsnmcsip.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657